**केंद्र व राज्य सरकार निधी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :210-3213 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1321500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 79591.00/-

***राजीव आवास योजनेतील प्राप्त निधीतून केलेल्या संगणक,प्रिंटर व हार्डवेअर खरेदीत अनियमितता दिसून आल्या आहेत. पुरवठादारांना रु79591/- VAT/जकात चे जादा प्रदान केल्याचे दिसून आलेले आहे. त्याचे अभिलेखे नाहीत. योजनेचा रु.16.51 लाख निधिचा वापर केला नसल्याने दि.31/03/2013 अखेर अखर्चित पडलेला आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेतील राजीव आवास योजनेची प्रमाणके, निविदा-नस्ती, रोख पुस्तक तपासले असता सदर योजनेची अंमलबजावणी करणेसाठी केलेल्या संगणक व हार्ड-वेअर साहित्य खरेदी मध्ये अनियमितता दिसून आलेल्या आहेत.या बाबत अर्धसमास क्र.39 दि. 25/05/2015 अन्वये खुलासा मागवला असता खुलासा प्राप्त झाला नसल्याने खालील अभिप्राय देण्यात येत आहेत. खालील नमूद प्रमाणकांद्वारे

पुरवठादारास रक्कम प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | खरेदी केलेल्या वस्तू/माल | प्रमाणक क्र.व दिनांक | प्रदान केलेली देयकाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | अमरज्योत एन्टरप्रायजेस | लॅपटॉप | 2413/ 25/09/12 | 171600 |
| 2 | अमरज्योत एन्टरप्रायजेस | कॅमेरा,युपीएस प्रोजेकटर इ. | 2808/ 17/10/12 | 404508 |
| 3 | जय पी कॉम्पुटर | प्रिंटर, स्कॅनर यु.एस.बी. | 2414/ 25/09/12 | 223007 |
| 4 | जय पी कॉम्पुटर | डेस्कटॉप पीसीएस | 2415/ 25/09/12 | 520104 |
| 5 | जय पी कॉम्पुटर | डेस्कटॉप सर्वर | 2807/ 17/10/12 | 345956 |
| 6 | जय पी कॉम्पुटर | लेझरप्रिंटर फोटोकॉपीयर | 2807/ 17/10/12 | 404196 |

अभिप्राय-

1) संगणक, लेपटॉप,लेझेर-प्रिंटर,हार्डवेअर इ. खरेदी करतांना महानगरपालिकेने उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस-2002 उद्योग-6 दिनांक 4/02/2003 नुसार शासकीय विभाग/निमशासकीय विभाग/मंडळे/शासकीय उपक्रम/ महानगरपालिका इ. ना वस्तू खरेदी साठी शासनाने दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहित केले कार्यपद्धती बंधनकारक केलेली आहे. सदरहू कार्यपद्धतीचा अवलंब महानगरपालिकेने वरील खरेदी करताना केलेला नाही. महानगरपालिकेने स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून न्यूनतम निविदा धारकाकडून खरेदी केलेली आहे.

2) शासन निर्णय 02/01/1992 मधील तरतूद व उद्योग संचालनालय मंत्रालय मुंबई यांचे कडील परिपत्रक क्र.उस/शा.निम.शा.वख./परिपत्रक/2009/बी-15279 दि. 03/06/2009 मधील तरतुदी नुसार एकूण वार्षिक खरेदी रु.50000/-किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी निविदा चौकशी राजपत्रात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे तथापि अशी कार्यवाही सदरहू खरेदी प्रक्रियेत करण्यात आलेली नाही.

3) संगणक/प्रिंटर, लेपटॉप व इ हार्डवेअर साहित्य खरेदी बाबत राज्य शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दर करार पत्रक अथवा केंद्र शासनाचे दर करार पत्रकान्वये खरेदी करणे आवश्यक आहे तथापि सदरहू खरेदी शासन दर करार प्रमाणे न करता स्थानिक निविदा काढून केलेली आहे. केंद्र व राज्य शासनाचे दर करार उपलब्ध असताना स्थानिक पुरवठादारा कडून खरेदी केलेली आहे.

शासन दर करार पत्रकातील दर व निविदेतील मंजूर केलेले दर हे दर करार पत्रकातील दरापेक्षा जास्त आहेत. दरामध्ये खालील प्रमाणे तफावत दिसून आली आहे.

Ulhasnagar (M Corp.)

| अ.क्र. | वस्तू/मालाचे वर्णन | प्रमाण | शासन करारा प्रमाणे दर रु. | निवेदितील मंजूर दर रु. | दरातील तफावत रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डेस्कटॉप पी.सी.एस | 12 | 482328 | 500100 | 17772 |
| 2 | डेस्कटॉप सर्वर | 1 | 307493 | 332650 | 25157 |
| 3 | लेझरप्रिंटरकलर, फोटोकॉपीयर | 2 | 46152 | 57000 | 10848 |
| 4 | नेटवर्क लेसर जेट प्रिंटर | 3 | 123606 | 133500 | 9894 |
| 5 | प्लोटर | 1 | 176860 | 195000 | 18140 |
| 6 | 42 U रेक | 1 | 26359 | 27250 | 891 |
| 7 | डिजिटल फोटोकॉपीयर | 1 | 46368 | 48500 | 2132 |
| 8 | मेनेज नेटवर्क स्वीच | 1 | 25475 | 27500 | 2025 |
| एकूण | | | 1234641 | 1321500 | 86859 |

4) वरील खरेदी करिता दैनिक अमृत कलश व नगरन्यूज या स्थानिक दैनिकात जाहिरात प्रसिद्ध करून निविदा काढलेली आहे. महानगरपालिकेने राज्यस्तरावरील किंवा जिल्हा स्तरांवरीत वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध केली असती तर उत्पादक कंपनी किंवा अधिकृत पुरवठादारांना निविदा प्रक्रियेत भाग घेण्याची संधी मिळाली असती व त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस मिळाला असता परंतु तशी कार्यवाही न केल्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही असे दिसून आले आहे.

5) निविदा अटी व शर्ती नुसार खालील बाबींची पूर्तता पुरवठादाराकडून झालेली नाही.

अ) 5% बँकहमी घेतलेली नाही. EMD रु.10000/-भरल्याची पावती नस्तीत दिसून आली नाही.

ब) पुरवठादाराकडे निविदेतील मालाचे अधिकृत विक्रेते असणे जरुरीचे असल्याचे निविदा अटी मध्ये समावेश आहे परंतु तसे प्रमाणपत्र पुरवठादारा कडे दिसून आलेले नाही.

तसेच निविदा अटी व शर्तीत पुरवठादार हे संगणकीय हार्डवेअर व सॉफ्टवेअर वस्तूंचे अधिकृत विक्रेते असण्याबाबतची अट निविदेत समाविष्ट केलेली नाही.

1) पुरवठादाराचे ताळमेळ पत्रके (balance-sheet) व गेल्या तीन वर्षाचे निविदेतील मालाचे विक्री/पुरवठा इतर शासकीय विभागास केल्या बाबतची कागद-पत्रे दिसून आली नाही.

ड) पुरवठादारांकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम,1948 अन्वये ऑफिस या बाबीचा परवाना असताना व संगणक,प्रिंटर व हार्डवेअर या वस्तूंची विक्री करणे बाबतचा परवाना नसतांना व तरी देखील पुरवठादाराची निविदा मंजूर करणे हे नियमबाह्य आहे.

6) खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंचे, वस्तू/माल प्राप्त झाल्याबाबतचे डिलिव्हरी चलन/दिनांकासहित नस्तीत/देयकासोबत सादर केलेले नाही. त्यामुळे मालाचा पुरवठा विहित मुदतीत केल्याची खात्री करता आली नाही. तसेच मनपा गेटवर तशी नोंदवहीत नोंदी नाहीत. उशिरा साहित्य प्राप्तीबाबत खात्री करता आली नाही.

7) खरेदी करण्यात आलेल्या वस्तू/मालाची नोंद जड संग्रह नोंदवहीत घेतलेली नाही.

8) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता परि.क्र.5.3 अन्वये योजनेचे रोख पुस्तक विहित प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही. रोख पुस्तकात डे टू डे नोंदी घेतलेल्या नाहीत.

9) खरेदी करण्यात आलेल्या मालाच्या/ वस्तूंच्या करारनाम्यातील कलम 5 (a) नुसार पुरवठादाराने नमूद केलेले निविदेतील दर हे सर्व करासहित आहेत. तरी देखील पुरवठादाराने वस्तूंच्या/मालाच्या किंमतीवर वेगळा 4 % VAT/LBTकर आकारून देयक सादर केलेले आहे व त्याप्रमाणे देयकांचे प्रदान करण्यात आलेले आहे. काही देयकात जकात भरण्यात आल्याचे नमूद आहे परंतु जकात भरल्याची पावती देयकासोबत सादर केलेली नाही. खालील तक्त्यात दर्शविलेल्या पुरवठादारास 4% मूल्यवर्धित कर (VAT)/जकात जादा प्रदान केलेला आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | खरेदी केलेल्या वस्तू/माल | प्रमाणक क्र.व दिनांक | प्रदान केलेली देयकाची रक्कम रु. | प्रदान देय असलेली रक्कम रु. | जादा प्रदान केलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरज्योत एन्टरप्रायजेस | लॅपटॉप | 2413/ 25/09/12 | 171600 | 165000 | 6600 |
| 2 | अमरज्योत एन्टरप्रायजेस | कॅमेरा,युपीएस प्रोजेकटर इ. | 2808/ 17/10/12 | 404508 | 388950 | 15558 |
| 3 | जय पी कॉम्पुटर | प्रिंटर, स्कॅनर यु.एस.बी. | 2414/ 25/09/12 | 223007 | 214430 | 8577 |
| 4 | जय पी कॉम्पुटर | डेस्कटॉप पीसीएस | 2415/ 25/09/12 | 520104 | 500100 | 20004 |
| 5 | जय पी कॉम्पुटर | डेस्कटॉप सर्वर | 2807/ 17/10/12 | 345956 | 332650 | 13306 |
| 6 | जय पी कॉम्पुटर | लेझरप्रिंटर फोटोकॉपीयर | 2807/ 17/10/12 | 404196 | 388650 | 15546 |
| जादा प्रदान केलेली एकूण रक्कम रु. **79591** | | | | | | |

10) निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठादारास 10% खरेदी किमंत बँक हमी सोबत द्यावयाची आहे परंतु वरील पुरवठादारास 100% प्रदान केलेले आहे.

11) राजीव आवास योजनेसाठी दि. 28/02/2011 रोजी रु.35.97 लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. मार्च-2013 अखेर रु.19.46 लक्ष खर्च झालेले असून रु.16.51 लक्ष निधी शिल्लक आहे. फेब्रुवारी-2011 रोजी निधी प्राप्त झालेला असताना दि. 21 जुलै 2012 पर्यंत खर्च केलेला नाही. निधी मंजुरीचे आदेश प्राप्त झाले नसल्याने निधी खर्च करण्याची कालमर्यादा तपासता आली नाही. त्यामुळे विनाकारण निधी गुंतून पडलेला दिसून येत आहे. त्याची गुंतवणूक केली असता महानगरपालिकेचा फायदा झाला असता. तरी त्याचे पालन झालेले नाही. शासन निधी एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी शिल्लक असल्यास महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि. क्रमांक संकीर्ण-

10.20/प्र.क्र. 128/अर्थोपत्र/दि. 06/06/2008 नुसार शासनास परत करणे आवश्यक आहे. अथवा मान्यता घेऊन खर्ची करणे आवश्यक होते. त्याचे पालन झालेले नाही.

12) योजनेचा निधी रु. 35 लक्ष दि.25/07/2012 रोजी आय.डी.बी.आय.बँकेत 92 दिवसासाठी गुंतवलेला आहे परंतु त्याची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.1321500/- (कामावरील खर्च )

वसूलपात्र रक्कम रु.79591/- (मूल्यवर्धित कर )

TRTARCM6001 (Ref No : 9, Hmm No : 39)

## *6 उल्हासनगर-4, ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोल पंपपर्यंत रस्ता रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 13**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4300000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 673755.00/-

***अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा अधिक 18.18% दराचे विश्लेषण प्राप्त झाले नाही. मुळ अंदाजपत्रकापेक्षा जादा कामास विना-निविदा, सुधारीत करारनामा न करता मंजूरी देण्यात आली आहे. वाढीव कामाची सुधारीत बँक गॅरंटी घेण्यात आली नाही. काम पुर्ण करण्यास झालेल्या विलंबाकरीता कंत्राटदाराकडून कोणताही दंड आकारण्यात आला नाही. मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केली आहे. कामाचा दर्जा योग्य नसून निकृष्ट दर्जाचे झाले आहे. वाढीव कामाचा व कामगारांचा विमा काढण्यात आला नाही. काम पुर्ण करण्यास कंत्राटदाराच्या मागणीपेक्षा जास्त कालावधीची मुदतवाढ दिली आहे. मोजमाप पुस्तिका क्र.1169 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. गौण खनिजांचे रॉयल्टी ची रक्कम शासन खाती भरणा केलेली नाही.***

उल्हासनगर क्र.4, ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोल पंपपर्यंत रस्ता रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.1,73,63,910/- च्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 40 दि.22/08/2008 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. प्राप्त निविदाकारांपैकी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची निविदा लघूत्तम असल्याने अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक 18.18% दराने कार्यादेश क्र.881 दि.09/06/2009 अन्वये काम सुरू करण्याचे व 12 महिन्यात काम पुर्ण करण्याचे आदेश कंत्राटदारास देण्यात आले आहे. सदर कामाच्या नस्तीचे व प्रमाणकाचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

स्थायी समिती ठराव क्र.40 दि.22/08/2008
अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,73,63,910/-
निविदा रक्कम रु.2,05,20,668/- (+18.18 टक्के)
कंत्राटदाराचे नाव- मे. कोणार्क इन्फा. लि.
कार्यादेश क्र. व दिनांक- 881 दि.09/06/2009 कामाचा कालावधी- 12 महीने
मोजमाप नोंदवही क्र.1169 प्रथम धावते देयक, प्रमाणक क्र. 4353 दि.23/12/2011 रु.43,00,000/-

1) उपरोक्त कामा करीता निविदा मागविल्या असता तीन निविदा प्राप्त् झाल्या असून त्यापैकी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची निवीदा लघुत्तम असल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे. परंतू मंजूर अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक 18.18 टक्के दराचे विश्लेषण लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने मंजूर दर योग्य असल्याची पडताळणी झाली नाही.

2) मुळ अंदाजपत्रक तसेच विकास आराखडयानूसार रस्त्याची लांबी 375 मी. व रुंदी 45 फुट एवढया मापाचे कॉंक्रिटीकरणाचे काम होणे आवश्यक होते. परंतू मुळ कामात सुधारणा व जादा काम वाढवून लांबी 677 मी. व रुंदी 60 फुट एवढे जादा सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.5,21,03,550/- चे काम करणेची स्थायी समितीची मंजूरी ठराव क्र.143 दि.21/02/2011 अन्वये देण्यात आली आहे. मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनाच सदर जादा काम देण्यात आले आहे. वाढीव रु.34739640/-कामाचा करारनामा करण्यात आलेला नाही. तसेच सुधारीत बँक गॅरंटी देखील घेण्यात आली नाही.

3) सदर काम दि.09/06/2010 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक असतांना कामास तसेच वाढीव कामाच्या रकमेस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतू प्रथम वेळी घेण्यात आलेल्या बँक गॅरंटीची वैधता मुदतवाढ करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

4) कार्यादेशानंतर 12 महिन्यात काम पुर्ण होणे आवश्यक असतांना कार्यादेशानंतर 46 महिने मार्च 2013 पर्यंत होवूनही काम पुर्ण झालेले नाही. विलंबाबाबत कंत्राटदाराकडून निविदा अटी व शर्तीनुसार दंड आकारणे आवश्यक आहे.

5) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम-1958 मधील कलम 63 नूसार एकूण कंत्राट रकमेच्या रु.10 लक्ष करीता रु.100/- व पुढील प्रत्येक लक्ष रुपयास रु.100/- प्रमाणे कमाल रु.5,00,000/- इतक्या रकमेच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची रक्कम रु.2,05,20,668/-चा करारनामा रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. तसेच वाढीव कामाची रक्कम रु.3,15,82,882/- आहे. मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे सोबत केलेला करारनामा रु.51,200/- च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. शिल्लक रक्कम रु.51,100/- इतकी रक्कम वसुल करून शासनजमा करणे आवश्यक आहे.

6) टेक्नो कन्सल्टंट यांनी त्यांच्या दि.31/10/2009 च्या पत्रान्वये सदर रस्त्याच्या कामाचा दर्जा स्टॅंडर्ड स्पेशिफीकेशननुसार नसल्याचा तसेच टाकण्यात आलेल्या ड्रेनेजला प्लॅस्टर केले नसलेचे व सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे क्युब टेस्टिंग न केल्याचे मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना कळविले आहे. त्यामुळे सदर कामाचा दर्जा योग्य नसून निकृष्ट दर्जाचे झाले आहे. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2008/1338/प्रक्र.171/नवि20 दि.02/03/2009 अन्वये 50 लाखावरील कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन केले नसल्याने कामावर झालेला खर्च रु.4300000/- हा आक्षेपाधीन आहे.

7) वित्त विभाग शा.नि.विकास/1098/प्र.क्र.29/98/शासन हमी दि.19.08.1998 अन्वये कामाचा विमा काढणे

आवश्यक आहे. विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे पॉलिसी क्र.एआयएफ/810/ सीएआर/190 दि.13/04/2010 अन्वये कामाचा रु.1,73,95,165/- चा विमा काढण्यात आला आहे. वाढीव कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रु.5.21 कोटी रकमेचे असल्याने वाढीव कामाचा विमा काढण्यात आला नसल्याचे दिसून आले आहे. कामाचा व कामगारांचा विमा काम सुरू करणेपुर्वी कंत्राटदाराने काढणेचे असतांना काम सुरू झाल्यानंतर जवळजवळ 1.5 वर्षानंतर कामाचा विमा काढण्यात आला आहे.

8) उल्हासनगर महानगरपालिका यांचे पत्राचे आवक दिनांक 10/01/2011 अन्वये मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी दि.31/12/2010 पर्यंत कामाची मुदतवाढ मागितली असतांना शहर अभियंता यांनी त्यांचे जावक पत्र क्र.881 दि.07/02/2011 अन्वये दि.30/06/2011 पर्यंत म्हणजे कंत्राटदाराच्या मागणीपेक्षा जास्त कालावधीची मुदतवाढ दिली आहे.

9) सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.5.21 कोटी रकमेची 2 टक्केप्रमाणे रु.1042071/- इतक्या रकमेची सुरक्षा अनामत रक्कमेची बँक हमी निविदा अटी व शर्तीनुसार घेणे आवश्यक असतांना रु.600000/- इतक्या कमी रकमेची घेतली आहे. तसेच बँकहमीचे नोंदणीकृत दस्तऐवज करणे आवश्यक होते त्याचे पालन झाले नसल्याने मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 40 नुसार रु.5/- प्रती हजार प्रमाणे रु.5210/- इतके मुद्रांक शुल्काचे शासनाचे नुकसान झाले आहे.

10) मोजमाप पुस्तिका क्र.1169 व 1316 लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने कंत्राटदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही.

11) निविदा Chapter II मधील 9 नूसार निविदा कालावधी 120 दिवसाचा आहे. निविदा जाहीरात दि.06/09/2008 रोजी प्रसिध्द केली आहे. स्थायी समिती ठराव क्र.40 दि.22/08/2008 अन्वये निविदा मान्य केली आहे. परंतू कार्यादेश दि.09/06/2009 रोजी म्हणजे उशिराने दिले आहे. त्यामुळे निविदेतील अटीचा भंग झाला आहे. निविदेतील दर 120 दिवस विधीग्राहय असतात परंतू कार्यादेश विलंबाने दिल्यामुळे फेरनिविदा प्रक्रीया करणे आवश्यक होते.त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

12) पाणी पुरवठा विभाग यांचे दि.23/11/2009 च्या टिपणीनूसार सदर रस्त्यांच्या खाली भुयारी गटार मलवाहीन्या टाकण्याकरीता रु.5623525/- इतक्या रकमेचे काम कोणतीही निविदा प्रक्रिया न करता मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनाच देण्यात आले आहे. सदर प्रकरणी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

13) महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि.10/02/2003 व सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. गौणखनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) ची रक्कम रु.35.34 प्रती घ.मी. दराने शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याबाबतची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. दरसुचीमधील बेसिक रेट मध्ये रॉयल्टी रकमेचा समावेश आहे. गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने रु.35.34 प्रती घ.मी. प्रमाणे 17471.57 घ.मी. करीता शासनाचे रु.6,17,445/- चे नुकसान झाले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.59 दि.17/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.673755/- (मुद्रांक शुल्क रु.56,310/-+गौण खनिज रक्कम रु.6,17,445/-)

आक्षेपाधीन रक्कम रु.430000

## *7 नेताजी चौक ते बॅरेक 2108 व्हाया तहसिलदार ऑफीस रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे व वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 05**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 10196750.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 49685.00/-

***विहित कालावधीत काम पुर्ण झाले नाही. कामाची बँक गॅरंटी वैधता वाढविलेबाबत लेखे प्राप्त झाले नाही. उत्खननापेक्षा जादा खनिजाची वाहतूक करण्यात आली आहे. स्वामित्वधनाची रक्कम रु.41026/-वसुल करण्यात आली नाही. काम गुणवत्तापुर्वक झालेले नाही. कामाची त्रयस्थ पार्टीकडून तपासणी केलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील 12 रस्त्यांच्या पुनर्पृष्ठांकनाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.8,48,00,365/- च्या कामास स्थायी समिती ठराव क्र.101 दि.19/10/2011 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. निविदा जाहीरात डि.एन.ए., दै.नगर न्युज, दै.फ्रि प्रेस व लोकसत्ता या वर्तमानपत्रात देण्यात आली असता मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन, मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर, मे.जयहिंद रोड बिल्डर्स व आर.के. चंदनानी या चार निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. यापैकी मे.जयहिंद कंन्स्ट्रक्शन या एकाच निविदाकाराची निविदा तांत्रिकदृष्टया पात्र झाल्याने फेरनिविदा जाहीरात इंडियन एक्सप्रेस, लोकसत्ता व धनुष्यधारी या वर्तमानपत्रात दिली असता मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. (अधिक 39.60%) व मे. जयहिंद रोड बिल्डर्स (अधिक 46.80%) या दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. अशावेळी उदयोग ,उर्जा व कामगार कल्याण विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.भांखस 1088/2512/उदयोग 6 दि.02/01/1992 मधील क्र.8.3 (ब) नूसार अजून एकवेळा निविदेला मुदतवाढीकरीता जाहीरात देणे आवश्यक असतांना शहर अभियंता यांनी कामाची निकड असल्याची शिफारस केल्याने न्युनतम दर असलेले निविदाकार मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेशी दि.20/12/2011 रोजी वाटाघाटी केल्या असता त्यांनी 7% जादा दराने(एकूण निविदा रक्कम रु.9,07,36,390.55/-) काम करण्यास तयारी दर्शविली. कार्यादेश क्र.3501 दि.16/03/2012 अन्वये काम सुरू करण्याचे व 150 दिवसात काम पुर्ण करण्याचे आदेश कंत्राटदारास देण्यात आले आहे.

सदर 12 रस्त्यांपैकी नेताजी चौक ते बॅरेक क्र.2108 व्हाया तहसिलदार ऑफीस रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे व वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे कामाच्या नस्तींचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत. अनियमितताबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.61 दि.18/06/2015 दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

1)कामाचे नाव-नेताजी चौक ते बॅरेक 2108 व्हाया तहसिलदार ऑफीस रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 12344701/-

कंत्राटदाराचे नाव- मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि.

तांत्रिक मान्यता क्र. व दि. 6164 दि.12/09/2011

कार्यादेश क्र. व दिनांक- 3501 दि.03/01/2012 (+7 टक्के)

कामाची मुदत- 150 दिवस

मोजमाप नोंदवही क्र.2509

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र.1965 दि.23/08/2012 रु.2275000/-

2)कामाचे नाव- वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 20706800/-

कंत्राटदाराचे नाव- मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि.

कार्यादेश क्र. व दिनांक- 3501 दि.03/01/2012 (+7 टक्के)

कामाचा कालावधी- 150 दिवस

मोजमाप नोंदवही क्र.2779

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र.4071 दि.18/01/2013 रु.7921750/-

1) कामाची मुदत 150 दिवस असतांना दि.02/06/2012 पर्यंत काम पुर्ण होणे आवश्यक होते. परंतू 2012-13 या वित्तीय वर्ष अखरेपर्यंत 15 महीने कालावधी होवूनही काम पुर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे मुदतवाढीबाबत स्थायी समितीची मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले नाहीत. कामाचा कालावधी वाढल्याने बँक गॅरंटीची वैधता कालावधीही वाढवणे अपेक्षित असताना वैधता कालावधी वाढविलेबाबत कागदपत्र लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

2) नेताजी चौक ते बॅरेक क्र.2108 व्हाया तहसिलदार ऑफीस रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे कामात अर्थ सॉईल मधील उत्खननातून माती 744.25 घ.मी. व कठीण मुरूम 372.13 घ.मी. असे एकूण 1116.38घ.मी. खनिजाचे उत्खनन केले आहे. मोजमाप नोंदवहीत केलेल्या नोंदीनूसार उत्खननातून निघालेल्या 1221.38 घ.मी.खनिजाची वाहतूक केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे उत्खननातून प्रत्यक्ष निघालेले खनिजाचे परिमाण 1116.38 घ.मी. व वाहतूक केलेल्या खनिजाचे परिमाण 1221.38 घ.मी. असल्याने परिमाणात 105 घ.मी. ची तफावत असून उत्खननापेक्षा जादा परिमाणाची वाहतूक झालेली आहे. जादा परिमाण 105 घ.मी. च्या वाहतूकीपोटी रु.82.47/- प्रती घ.मी.प्रमाणे एकूण रक्कम रु.8659/-चे कंत्राटदारास जादा प्रदान झाले आहे.

3) निविदा विशेष अटी व शर्तीमधील क्र.7 नुसार डांबरीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायबीलीटी कालावधी 3 वर्षाचा आहे. कार्यकारी अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर काम केलेल्या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली असता रस्त्यामध्ये काही ठिकाणी खडडे पडले असल्याचे त्यांचे पत्र क्र.311 दि.23/07/2013 ,1000 दि.28/10/2014 व 175 दि.29/12/2014 अन्वये कंत्राटदारास कळविले आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झालेले नाही.

4) कामाच्या गुणवत्ते वर नियंत्रण राखणेसाठी नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2008/1338/प्रक्र.171/नवि20 दि.02/03/2009 अन्वये 50 लाखांवरील कामांचे किमान 10 टक्के त्रयस्थ पार्टीकडून तपासणी करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

5) महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि.10/02/2003 व शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/ सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रु.70.67 प्रती घ.मी. दराने शासन खाती जमा करणे आवश्यक

आहे. उपरोक्त दोन्ही कामात गौणखनिजाचा वापर केला असून अ.क्र.1 च्या कामाकरीता 558.19 घ.मी. व अ.क्र.2 च्या कामाकरीता 22.34 घ.मी. इतके परिमाणाचे खनिज वापरले आहे. गौणखनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रु.70.67 प्रती घ.मी. दराने अनुक्रमे रु.39447/- व रु.1579/- इतकी रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही अथवा पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे खात्री न करता प्रदान केल्याचे दिसून आले आहे.
उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.61 दि.18/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.
वसुलपात्र रकमेचा तपशिल

1) उत्खननापेक्षा केलेली जादा वाहतूकीचे प्रदानाची रक्कम रु.8659/-
2) स्वामित्वधनाची रक्कम रु.41026/-

DATPVWM7501 (Ref No : 63, Hmm No : 61)

## *8 उल्हासनगर क्र.5 दुधनाका ते गणेश नगरपर्यंत रस्ता रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण व नाला बांधणेचे काम करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 09**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5500000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 178023.00/-

***काम स्टँडर्ड स्पेशिफीकेशन नूसार झालेले नाही. काम विहित कालावधीत पुर्ण झाले नाही. कामाच्या मुदतवाढीची कारणमिमांसा वस्तुस्थितीला समर्पक नाही. बँक गॅरंटीची वैधता वाढविलेबाबत अभिलेख नस्तीत दिसून न आल्याने मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. मुद्रांक शुल्क आकारणी कमी केली आहे. दर विश्लेषणाचा तपशिल मोघम स्वरुपाचा आहे. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची वसुली करण्यात आली नाही.***

उल्हासनगर क्र.5 दुधनाका ते गणेश नगरपर्यंत रस्ता रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण व नाला बांधणेचे काम करणेकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.1,61,77,980/- च्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 47 दि.15/07/2010 अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुषंगाने निवीदा मागविण्यात आल्या असता मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन (+) 52.12%, इंद्रदिप कंन्स्ट्रक्शन (+) 47.70%, ईगल कंन्स्ट्रक्शन(+)52%, मोनिका कंन्स्ट्रक्शन (+)45% दराने निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे. मोनिका कंन्स्ट्रक्शन लि. यांची निविदा सर्वात लघूत्तम दराने असल्याने वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय

रकमेच्या अधिक 28% दराने कार्यादेश क्र.2394 दि.15/04/2011 अन्वये काम सुरू करण्याचे व 12 महीन्यात काम पुर्ण करण्याचे आदेश कंत्राटदारास देण्यात आले आहे. सदर कामाच्या व प्रमाणक नस्तींचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

प्रशासकीय मंजूरी स्थायी समिती ठराव क्र.47 दि.15/07/2010

स्थायी समिती ठराव क्र.96 दि.25/08/2010 अन्वये निविदेस मान्यता

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,61,77,980/-

स्विकृत निविदा रक्कम रु.2,07,07,814/- (+28 टक्के)

कंत्राटदाराचे नाव- मे. मोनिका कंन्स्ट्रक्शन लि.

कार्यादेश क्र. व दिनांक- 2394 दि.15/04/2011

कामाचा कालावधी- 12 महीने

मोजमाप नोंदवही क्र.2781

प्रथम धावते देयक, प्रमाणक क्र. 4982 दि.22/03/2013 रु.50,05,000/-

1) विरमाता जिजाबाई टेक्नालॉजी इन्स्टी. यांनी सदर कामातील सिमेंट कॉक्रीटचे सहा नमूने गुणवत्ता तपासणी करणेकरीता घेतले असता रस्त्याचे काम कमी दर्जाचे झाले असून रस्त्याची स्ट्रेंथ एम 35 पेक्षा कमी असल्याचे त्यांचे पत्र क्र. एसइ/कंडिशनल सर्वे रिपोर्ट/युएमसी/037/2012/89/1229/13 दि.31/05/2013 अन्वये शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविले आहे. त्याचप्रमाणे उप अभियंता (पीएस4), उल्हासनगर महानगरपालिका यांनी पत्र क्र.2394 दि.30/03/2012 अन्वये सदर काम स्टँडर्ड स्पेशिफीकेशन नूसार झाले नसल्यामुळे रस्त्याला तडे गेले असल्याचे कळविले आहे. शहर अभियंता, उल्हासनगर मनपा यांनी काम केलेल्या रस्त्याची तपासणी केली असता रस्त्याला तडे गेले असल्याचे व ब-याच ठिकाणी रस्त्याचा पृष्ठभाग खराब झाला असल्याचे त्यांनी कंत्राटदारास पत्र क्र.778 दि.24/10/2011, 2394 दि.17/12/2011 व 1180 दि.24/02/2012 अन्वये कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे. कंत्राटदारासोबत केलेल्या करारनाम्यातील अ.क्र.4 च्या अटीनूसार कंत्राटदाराने शेडयुल-बी प्रमाणे रस्त्याचे काम करणे आवश्यक होते. परंतू कंत्राटदाराने रस्त्याचे काम सिटू सिमेंट ऐवजी आरएमसी वापरून केल्याचे कंत्राटदाराच्या दि.23/09/2011 च्या अंडरटेकींगमध्ये नमूद आहे. आरएमसी कंत्राटदाराच्या प्लॉन्टमध्ये तयार होत असल्याने वापरलेल्या सिमेंटचे परिमाण व दर्जा यांची तपासणी झालेली नाही. त्यामुळे काम गुणवत्ता पूर्ण झाले नसल्याचे दिसून आले आहे.

2) कार्यादेशाचा दि.15/04/2011 नंतर काम विना विलंब सुरू होणे अपेक्षित असतांना कंत्राटदाराने काम दि.17/05/2011 रोजी म्हणजे विलंबाने सुरू केले आहे. तसेच कार्यादेशानूसार 12 महिन्यात काम पुर्ण होणे आवश्यक होते. परंतू 2012-13 अखरेपर्यंत कार्यादेशाचा दिनांक 15/04/2011 नंतर 24 महीने होवूनही काम पुर्ण झालेले नाही.

3) रस्त्याचे काम सुरू करणेपुर्वी वाहतूक विभागाकडून परवानगी मिळवणे, रुंदिकरणात बाधित होणा-या बांधकामाचे निष्कासन करणे, नगर रचना विभागाकडून सिमांकन करणे इ. बाबींची पुर्तता अगोदरच करणे आवश्यक होते व तसे करून घेणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी संबंधित विभागास पत्र क्र. 842 दि.07/01/2011 व 761 दि.18/01/2011 अन्वये सुचित केले होते. तरीही सदर बाबी मुदतवाढीच्या कारणमिमांसेत नमूद करून कामास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उपविभागीय अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी सदर रस्त्यावर कोणतेही काम करण्यात येणार नसल्याचे तत्पुर्वीच कळविले असतांनादेखील जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत पाणीपुरवठा जलवाहिनी

टाकणे काम चालू असल्याने कामास विलंब होत असल्याचे कारण मुदतवाढीच्या कारणमिमांसेत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे मुदतवाढीचे समर्थन योग्य नाही.

4) कार्यादेशात नमूद कालावधीमध्ये काम पुर्ण झाले नसून कामास मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. बँक गॅरंटी क्र.बीजी/2/573 दि.12/11/2010 नुसार रु.3,23,600/- ची बँक गॅरंटी घेतली असून तीची विधीग्राहयता दि.07/11/2011पर्यंत होती. सदर बँक गॅरंटीच्या वैधतेचे नुतनीकरण केलेले नाही.

5) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09 दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम 1959 मधील कलम 63 नूसार एकूण निवीदा रकमेच्या रु.10 लक्षकरीता रु.100/- व पुढील प्रत्येक लक्ष रुपयास रु.100/- प्रमाणे कमाल रु.5,00,000/- इतक्या रकमेच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची रक्कम रु.2,07,07,814/-चा करारनामा रु.4,100/- च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. करारनामा रु.19,708/- च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. तरी शिल्लक रक्कम रु.15,608/- इतकी रक्कम वसुल करून शासनजमा करणे आवश्यक आहे.

6) प्राप्त् निवीदाकारांमधील मे. मोनिका कंन्स्ट्र. लि. यांची निवीदा सर्वात लघुत्तम म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 45 टक्के जास्त दराची असल्याने त्यांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात आल्यानंतर त्यांनी 28 टक्के जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. 28 टक्केचे दर विश्लेषण मे. मोनिका कंन्स्ट्र. यांनी दिले आहे परंतू ते खालीलप्रमाणे वस्तुस्थितीशी विसंगत आहे.

ए) अंदाजपत्रक तयार करतांना जिल्हा दरसुचीमधील सर्वसाधारण टिप 3 नुसार मुल्यवर्धित करासह दरसुची निश्चित केली असतांना 5 टक्के व 4 टक्के मधील फरकाचा मुल्यवर्धित कराचा 1 टक्के जादा दराचा समावेश केला आहे. जे अयोग्य आहे.

बी) कामगारांचा व कामाचा विमा रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या +1 टक्के विचारात घेवून दर विश्लेषण दिले असून त्याप्रमाणे रक्कम प्रदान करण्यात आली आहे. परंतू कामाचा व कामगारांचा विमा काढण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने सदर बाबीकरीता एक टक्के जादा रक्कम अदा केल्याने अतिप्रदान झाले आहे.

सी) महसुल व वन विभागाच्या दि.11/02/2010 च्या शासन निर्णयाप्रमाणे रॉयल्टीच्या दरात वाढ झाल्याचे कारण नमूद करून दरात वाढ झाल्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक 10.67 टक्के रक्कम प्रदान करण्यात आली आहे. जिल्हा दर सुचीतील दरात रॉयल्टीची रक्कम समाविष्ठ असल्याने रॉयल्टीची रक्कम भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ करणे योग्य नाही.

डी) सन 2009-10 व सन 2010-11 च्या जिल्हादर सुचीमधील फरक अंदाजपत्रकीय रकमेच्या +10.2 टक्के विचारात घेवून प्रदान करण्यात आले आहे. सदर वाढीची टक्केवारी कोणत्या निकषावर आधारीत आहे, याबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. तसेच निविदा अटीमध्ये भाववाढीचे कलम नमूद केले असताना दरसुचीतील फरक समाविष्ठ करणे संयुक्तीक नाही.

इ) सेवाकराची रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक 3.42 टक्के कोणत्या निकषावर समाविष्ठ करण्यात आले आहेत, याबाबत कोणताही प्राधिकार लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करून देण्यात आला नाही.

7) निवीदा Chapter II मधील 9 नूसार निविदा कालावधी 120 दिवसाचा आहे. निविदा जाहीरात दि.13/08/2010 रोजी प्रसिध्द केली आहे. परंतू कार्यादेश दि.15/04/2011 रोजी उशिराने दिले आहे.

8) निविदा पुस्तिकेसोबत अंदाजपत्रकीय रकमेचे शेड्यूल "बी" (अपेक्षित अंदाजे) जोडण्यात आले आहे. परंतु कामाचे अंदाजे परिमाण निश्चित करतांना कामाचे मोजमापानूसार जसे, लांबी, रुंदी खोली इत्यादीसोबत परिगणना करणे आवश्यक आहे. परंतू सदर अंदाजित मोजमापे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे केलेले काम अंदाजपत्रकानूसारच झाले असलेची पडताळणी करता आली नाही.

Ulhasnagar (M Corp.)

9) महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि.10/02/2003 व शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/ सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रु.70.67 प्रती घ.मी. दराने शासन खाती भरणे बंधनकारक आहे. परंतू याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे 2298.21 घ.मी.करीता शासनाचे रु.1,62,415/- चे नुकसान झाले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.57 दि.17/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल

1)मुद्रांक शुल्क रु.15,608/-

2)गौण खनिज रक्कम रु.1,62,415/-

DATPVWM7501 (Ref No : 87, Hmm No : 57)

## *9 उल्हासनगर क्र.3 राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटीकरण कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2627893.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 168934.00/-

***काम विहीत कालावधीत पुर्ण झाले नाही. बँक गॅरंटीच्या वैधतेबाबत अभिलेख प्राप्त झाले नाहीत. तांत्रिक मंजूरीबाबत अभिलेख प्राप्त झाले नाहीत. मंजूर दराचे विश्लेषण योग्य नाही. मुद्रांक शुल्काची कमी वसूली केली आहे. कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण झाले नाही. काम गुणवत्तापुर्वक झाले नाही. स्वामित्वधनाची रक्कम वसुल केलेली नाही.***

उल्हासनगर क्र.3 राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिरपर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.3,32,91,530/-च्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 47 दि.15/07/2010 अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुषंगाने निवीदा मागविण्यात आल्या असता मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन (+) 52.50%, इंद्रदिप कंन्स्ट्रक्शन (+) 47.70%, ईगल कंन्स्ट्रक्शन(+)52%, मोनिका कंन्स्ट्रक्शन (+)45% या निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे. मोनिका कंन्स्ट्रक्शन लि. यांची निविदा लघूत्तम दराने असल्याने वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक 27% दराने कार्यादेश

क्र.2395 दि.15/04/2011 अन्वये काम सुरू करण्याचे व 12 महीन्यात काम पुर्ण करण्याचे आदेश कंत्राटदारास देण्यात आले आहे. सदर कामाच्या व प्रमाणक नस्तींचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 3,32,91,530/-

कंत्राटदाराचे नाव- मे.मोनिका कंस्ट्रक्शन लि.

कार्यादेश क्र. व दिनांक- 2395 दि.15/04/2011

कामाचा कालावधी- 12 महीने मोजमाप नोंदवही क्र.3216

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र.2495 दि.01/10/2012 रु.23,91,382/-

1) कामाची मुदत 12 महिने असतांना कार्यादेशाचा दिनांक 15/04/2011 नंतर 24 महीने होवूनही लेखापरीक्षण वर्ष अखेरपर्यंत काम पुर्ण झालेले नाही. त्याचप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीच्या मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणास अप्राप्त आहे. त्यामुळे मुदतवाढीस स्थायी समितीची मंजूरी घेतलेबाबत पडताळणी करता आली नाही. बँक गॅरंटीची वैधता वाढविलेबाबत कागदपत्र लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत.

2) कामाच्या व अंदाजपत्रकीय रक्कमेच्या तांत्रिक मंजूरीबाबत अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने कामाची कामाबाबत व अंदाजपत्रकीय रकमेबाबत पडताळणी करता आली नाही.

3) प्राप्त निवीदाकारांमधील मोनिका कंन्स्ट्र. यांची निवीदा सर्वात लघुत्तम म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा +45 टक्के असल्याने त्यांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात आल्यानंतर त्यांनी +27 टक्के दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. 27 टक्केचे दर विश्लेषण मे. मोनिका कंन्स्ट्र. यांनी खालीलप्रमाणे दिले आहे. परंतू त्याची कारणे वस्तुस्थितीप्रमाणे नाहीत.

ए) अंदाजपत्रक तयार करतांना जिल्हा दरसुचीमधील सर्वसाधारण टिप 3 नुसार मुल्यवर्धित करासह दरसुची निश्चित केली आहे. असे असतांना मुल्यवर्धित करात वाढ झाल्याचे कारण नमूद करून 5 टक्के व 4 टक्के मधील फरकाचा मुल्यवर्धित कराचा 1 टक्के जादा दराचा समावेश केला आहे. हे योग्य नाही.

बी) कामगारांचा व कामाचा विमा रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या +1 टक्के विचारात घेवून प्रदान करण्यात आले आहे. परंतू कामाचा व कामगारांचा विमा काढण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने सदर बाबीकरीता एक टक्के जादा रक्कम दर विश्लेषणात नमूद केली आहे.

सी) महसुल व वन विभागाच्या दि.11/02/2010 च्या शासन निर्णयाप्रमाणे रॉयल्टीच्या दरात वाढ झाल्याने फरकाची रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या + 10.09 टक्के प्रदान करण्यात आली आहे. जिल्हा दरसुचीतील रक्कमेत रॉयल्टीची रक्कम समाविष्ठ असतांना व रॉयल्टीची रक्कम भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने +10.09 टक्के जादा प्रदान करणे योग्य होणार नाही.

डी) सन 2009-10 व सन 2010-11 च्या जिल्हादर सुचीमधील फरक अंदाजपत्रकीय रकमेच्या +10.2 टक्के विचारात घेवून प्रदान करण्यात आले आहे. सदर वाढीची टक्केवारी कोणत्या निकषावर आधारीत आहे, याबाबत अभिलेख प्राप्त न झाल्याने दराबाबत खात्री करता येत नाही.

इ) सेवाकराची रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक 3.42 टक्के समाविष्ठ करण्यात आले आहेत. दरसुचीमधील बाबीचे दर हे संपूर्ण बाब म्हणून मंजूर आहे. त्यामुळे स्वतंत्र सेवाकर समाविष्ठ करणे योग्य नाही.

4) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09 दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम 1959 मधील कलम 63 नूसार एकूण निवीदा रकमेच्या रु. 10 लक्षकरीता रु.100/- व पुढील प्रत्येक लक्ष रुपयास रु.100/- प्रमाणे कमाल रु.5,00,000/- इतक्या रकमेच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची रक्कम रु.4,22,80,243/-असल्याने करारनामा रु.8,400/- च्या मुद्रांक

पेपरवर करण्यात आला आहे. करारनामा रु.41,400/- च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. शिल्लक रक्कम रु.33,000/- इतकी रक्कम वसुल करून शासनजमा करणे आवश्यक आहे.

5)निवीदा Chapter II मधील 9 नूसार निविदा कालावधी 120 दिवसाचा आहे. निवीदा जाहीरात दि.13/08/2010 रोजी प्रसिध्द केली असून परंतू कार्यादेश दि.15/04/2011 रोजी उशिराने दिले आहे. निवीदा अटीचा भंग झालेला आहे.

6) विशेष अटी व शर्तीमधील क्र.7 नुसार सिमेंट काँक्रिटीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायबीलीटी कालावधी 5 वर्षाचा आहे. कार्य. अभियंता,उमपा यांचे पत्र क्र.997 दि.16/12/2011 अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी तडे गेले असल्याचे कार्य. अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निदर्शनास आले असल्याचे नमूद आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झालेले नाही. नगरविकास विभाग शासन निर्णय दि.02/03/2009 अन्वये त्रयस्थ पार्टीने कामाचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झाले नाही.

7) कामामध्ये गौणखनिज साहीत्याचे 1923.50 घ.मी.इतके परिमाण वापरले आहे. सदर बाबीचे दर निश्चित करतांना बेसिक रेटमध्ये रॉयल्टी समाविष्ठ केलेली आहे. त्यामुळे महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि.10/02/2003 व शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रु.70.67 प्रती घ.मी. दराने रु.1,35,934/-शासन खाती भरणा केल्याची खात्री करणे आवश्यक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही अथवा पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.62 दि.18/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल

मुद्रांक शुल्काची रक्कम रु.33,000/-

2) स्वामित्वधनाची रक्कम रु.1,35,934/-

DATPVWM7501 (Ref No : 89, Hmm No : 62)

## *10 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग 1 ते 5 मधील अंतर्गत रस्त्यावरील खड्डे भरणेचे काम विना निविदा केल्याने झालेली अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष :A-8 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 17304093.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 407114.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम-1949 मधील कलम 5(2)2 अन्वये विना निविदा काम दिले आहे.***

***परंतु काम तातडीचे असल्याचे कारणास्तव स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. परंतु विहित कालावधीत काम केले नाही. त्यामळे तरतुदीचा गैरवापर झाला आहे. कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण किमान 10% करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन केलेले नाही. नगरविकास विभाग शासन पत्र.क्र.जीईएन-1018/1357/प्र.क्र166/98/नवि-28 दि.3/11/2003 अन्वये कंत्राटी कामगाराचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही. कंत्राटी कामगाराचा विमा उतरविला नसल्याने 1% विम्याची रक्कम रु.1,91,000/- देयकातून वसूल केली नाही. रु.18100/- मुद्रांक शुल्क कमी वसुल केले आहे. खड्डे भरण्याच्या कामात गौण खनिज साहित्य 11963.41 घ. मी. इतके परिमाण वापरले आहे. त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री न करता प्रदान केले आहे. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाही.***

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रभाग क्र. 1 ते 5 अंतर्गत रस्त्यावरील खड्डे भरणे या कामास स्थायी समितीने ठराव क्र. 74 दि. 10/8/2011 नुसार विना निविदा काम करण्यास मंजुरी दिली आहे. त्याची तपासणी केली असता अनियमितता निदर्शनास आल्या. याबाबत अर्धसमास क्र. 23 दि. 16/04/2015 अन्वये खुलासा मागविला असून त्यावर विभागाचे दि.29/06/2015 चे अनुपालन प्राप्त झाले आहे. ते विचारात घेऊन खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

अंदाजपत्रक रक्कम रु. 1,91,00,000/- तांत्रिक मान्यता क्र. 3883 दि.17/05/2010

प्रशासकीय मान्यता ठराव क्र. 73 दि. निरंक

कार्यादेश क्र. 3251 दि. 02/09/2012 कामाची मुदत 9 महिने

कामावर झालेला खर्च रु. 17304093/- मोजमाप पुस्तिका क्र. 2610

प्रमाणक क्र. 943 दि. 2/6/2012 रु. 49.50 लाख, प्रमाणक क्र. 2615 दि. 6/10/12 रु. 24.30 लाख व प्रमाणक क्र. 1964 दि. 23/12/2012 रु. 29.70 लाख

कामाचा कालावधी दि. 21/3/12 ते 20/5/12

1.स्थायी समिती ठराव क्र.74 दि.10/8/2011 अन्वये मनपा क्षेत्रातील प्रभाग क्र.1 ते 5 मधील अंतर्गत रस्तावरील खडडे भरण्याचे काम विना निविदा करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम-1949 मधील कलम 5(2)2 नुसार मंजूर केला आहे. त्यामध्ये गणेशोत्सव व नवरात्र हे सण जवळ आले असल्याने सदर काम दोन टप्प्यात म्हणजेच ऑक्टोबर पूर्वी व ऑक्टोबर नंतर करावे. त्यानुषंगाने रुपये 1.91 कोटीचे काम मे.जयभारत कन्ट्रक्शन, उल्हासनगर यांना विना निविदा मंजूर करण्यात आले. सदर काम हे तातडीचे असल्याने विना निविदा दिले आहे. परंतु स्थायी समितीचा ठराव दि. 10/08/2011 असून कार्यादेश क्र.3251 दि.2/9/2011 अन्वये खड्डे भरणे या कामाचे आदेश विलंबाने दिले आहेत. कामासाठी 9 महिने कालावधी दिला आहे. परंतु नस्तीतील अभिलेख पाहता कामाच्या साहित्याचे तपासणी अहवाल व विम्याचा कालावधी नुसार सदर काम दि.21/3/12 ते 20/5/12 या कालावधीत केले आहे. त्यामुळे सदर तातडीची बाब होऊ शकत नाही. स्थायी समितीने गणेशोत्सव व नवरात्र हे सण जवळ आले असल्याने काम विना निविदा मंजूर केली आहे. विभागाने सदर बाब स्थायी समितीने मंजूर केली आहे. असे अनुपालनात विभागाने पत्र क्र.68 दि.29/06/2015

अन्वये कळविले आहे. परंतु प्रत्यक्ष काम दि.21/3/12 ते 20/5/12 कालावधीत केले आहे. त्याचे पालन विभागाने केले नाही. काम अपूर्ण असल्याचे नस्तीवरून दिसून आले. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम-1949 मधील कलम 5(2)2 चा गैरवापर झाला आहे.

2.स्थायी समिती ठराव क्र.74 दि.10/8/2011 अन्वये विना निविदा काम देण्याबाबत उल्लेख आहे. त्यामध्ये 7 ठेकेदारांची नावे खड्डे भरणेचा अनुभव असल्याचे नमूद केले आहेत. हे काम कोणास द्यावे याचा उल्लेख समितीच्या सदस्य यांनी केला नाही. परंतु नगरसचिव यांनी मे. जयभारत कन्ट्रक्शन, यांना काम देणेबाबत आदेशात नमूद केले आहे. इतर ठेकेदारांचे काम करणे बाबतचे अभिप्राय घेऊन अंतिम करणे आवश्यक होते. त्यामुळे ठराविक ठेकेदाराचे हित जोपासले गेले असे लेखापरीक्षणात दिसून आले.

3.सदर रस्त्यावर खड्डे भरण्याचे काम केव्हा केले होते. त्याचा दोष निवारण कालावधी पूर्ण झाला आहे का याबाबतचे कोणतेही अभिप्राय नस्तीत नोंदवले नाहीत. तसेच पूर्वी काम केल्याची नोंदवही ठेवली नाही. रु.1.91 कोटी या रक्कमेचे काम विना निविदा दिले आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 165 नुसार जागेवर प्रत्यक्ष मोजमापे घेऊन नंतर अंदाजपत्रक बनविणे आवश्यक होते. त्याचे मेजरमेंट शिट नस्तीत समाविष्ट नाही. प्रत सोबत जोडली असल्याचे नमूद आहे. परंतु प्रत जोडली नाही. त्यामुळे अंदाजपत्रक वास्तववादी बनविल्याची खातरजमा करता आली नाही.

4.कामाची मोजमापे कोणत्या कालावधीतील आहेत. याबाबत उल्लेख मोजमाप पुस्तिकेत नाहीत. कामाची कच्ची मोजमापे नाहीत. तसेच कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष कामावर भेट दिल्याची दिनांकित कागदपत्रे लेखापरीक्षणात दिसून आली नाहीत. कामाचे फोटो नाहीत. मोजमापे नोंदविल्याचा कालावधी नमूद केला असल्याचे विभागाने कळविले आहे. परंतु प्रत सोबत जोडली नाही. त्यामुळे काम कोणत्या कालावधीत झाले आहे. याची खात्री करता आली नाही.

5.कामाचा कालावधी दि. 2/9/11 ते 1/6/12 असा असून विमा दि. 21/3/12 ते 20/5/12 रु. 44,978/- चा दि. ओरियेंटल insuranse कंपनी मर्या. यांचेकडे उतरविला आहे. शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक होते. सदर कंपनी बरोबर सह-करार केल्याची कागदपत्रे नाहीत. उर्वरित 7 महिन्याची विमा रक्कम रु.1,57,423/- वसूल करण्यात यावी. तसेच कंत्राटी कामगाराचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. परंतु विमा उतरविला नसल्याने नगरविकास विभाग शासन पत्र.क्र. जीईएन-1018/1357/प्र.क्र166/98/नवि-28 दि.3/11/2003 अन्वये अंदाजपत्रक रक्कम रुपये 1,91,00,000/- च्या 1% विम्याची रक्कम रु.1,91,000/- देयकातून वसूल करणे आवश्यक आहे. सदर बाब विभागाने मान्य केली आहे.

6.कामाची किमंत रु.1.91 कोटी इतकी असून करारनामा रु.50/- च्या दोन मुद्रांक पेपर वर केला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार पहिल्या 10 लाखास 100/- व पुढील प्रत्येक लाखास 100 रुपये याप्रमाणे रु.18100/- मुद्रांक शुल्क वसुली व्याजासह करणे आवश्यक आहे.

7.कामाची एकूण खोदाई 2932.34 घ.मी. असून वाहतूक 3424.53 घ.मी. केली आहे. जादा वाहतूक ही रस्त्यावर पडलेला राडारोडा उचलेला आहे. त्यामुळे जादा वाहतूक झाली आहे. असे खुलासात नमूद आहे. परंतु तशी मोजमापे मोजमाप नोंदवहीत नोंदविली नाहीत. त्यामुळे सदर बाबतचे अनुपालन मान्य करता येत नाही.

त्यामुळे 492.19 घ.मी रु. 82.47/- प्रमाणे जादा वाहतुकीचे रु.40591/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

8.कामाची किमंत रु.1.91 कोटी असून कामाची गुणवत्ता राखणेसाठी वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक होते. अंतिम बिलाच्या वेळी तपासणी करण्यात येईल असे अनुपालनात विभागाने पत्र क्र. 68 दि.29/06/2015 अन्वये कळविले आहे. नगर विकास विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र. संकीर्ण-2008/1338/प्र.क्र.171/08/ नवि-20 दि.02/03/2009 नुसार 50 लाखावरील कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण किमान 10% करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन केलेले नाही. त्यामुळे केलेले काम हे गुणवत्ता पूर्ण झाल्याचे तपासणीत दिसून आले नाही.

9.खड्डे भरणे कामामध्ये जेसीबी 177 तास वापरले आहे. जेसीबीने कोणते काम केले याची मोजमापे मोजमाप नोंदवहीत कामाच्या स्थळदर्शक निहाय नोंदविली नाहीत. एकूण तास अशी नोंद केली आहे. प्रतिदिनी किती तास जेसीबी वापरला त्याची नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. तशी निविदा अटी शर्तीमध्ये तरतूद आहे. परंतु विभागाने प्रभाग निहाय ठेवली आहे. असे अनुपालनात नमूद केले आहे. परंतु नोंदवही उपलब्ध झाली नाही. प्रमाणक क्र. 943 दि. 2/6/2012 रु. 49.50 लाख रकमेचे बिल प्रदान केले आहे. त्यामध्ये एकूण 177 तास जेसीबी वापरल्याचे प्रदान दर रु. 750/- प्रती तास प्रमाणे बिलाची रक्कम प्रदान केली आहे. त्यामुळे रुपये 132750/- ही रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

10.खड्डे भरण्याच्या कामात गौण खनिज साहित्य 11963.41 घ. मी. इतके परिमाण वापरले आहे. त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री कामाचे प्रदान करताना केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाही. रॉयल्टी भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. भविष्यात दक्षता घेण्यात येईल असे कळविले आहे. परंतु रॉयल्टी भरल्याची खात्री करून प्रदान करणे प्रदानकर्त्याची जबाबदारी आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांची अधिसूचना दि.15/1/2003 व शासन परिपत्रक दि. 10/2/2010 चे पालन केले नाही. (रु.11963.41 x70.67 = 845454) त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.1,73,04,093/- (कामावरील खर्च )

वसूलपात्र रक्कम रु.4,07,114/- (विमा रु.348423+मुद्रांक शुल्क रु.18100+रु.40591 जादा वाहतूक)

DATDDZM6901 (Ref No : 105, Hmm No : 23)

## *11 उल्हासनगर-3 येथील गुरुद्वारा सी ब्लॉक्स ते अमित टॉवर पर्यंत मधुबन हॉटेल रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण व रुंदीकरण करणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :C-4-26 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4723619.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 488661.00/-

***कामामध्ये मूल्यवर्धित कर 1%, सेवाकर 4.42% पुढे होणारी महागाई 12% तसेच कामाच्या दरम्यान वाहतूक व बराच काळ काम करावे लागते त्यामध्ये साहित्य वेस्टेज जाते त्यासाठी 5 टक्के वाढ धरलेली आहे. ह्या बाबी विचारात घेऊन अंदाजपत्रक बनविले आहे. ते वास्तववादी नाही. सिमेंट कॉंक्रीट काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र क्र. 1232 दि.22/3/12 रोजी कळविले आहे. कामाची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी नगर विकास विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र. संकीर्ण- 2008/1338/प्र.क्र./171/08/ नवि-20 दि.02/03/2009 नुसार 50 लाखावरील कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण किमान 10% करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झाले नाही. कामामध्ये एकूण गौण खनिज साहित्य 2751.67 घ. मी. रुपये 194461/- इतके परिमाण वापरले आहे. सदर रॉयल्टी रक्कम भरल्याची खात्री करून प्रदान केले नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाही. मान्य निविदा रु.5,86,14,500/- या रकमेची असून करारनामा नस्तीत समाविष्ट नाही. त्यामुळे मुद्रांक शुल्काबाबत तपासणी करता आली नाही. रु.9,23,100/- ची बँकहमी दि.1/12/10 नुसार घेतली आहे. त्याची विधीग्राहिता दि.1/12/11 पर्यंत आहे. त्याचे नुतनीकरण 2012-13 या कालावधीचे केलेले नाही. वाढीव कामाचे सुधारीत अंदाजपत्रक व कामाची मोजमाप पुस्तिका मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.***

अंदाजपत्रक रक्कम रु. 4,61,53,150/- तांत्रिक मान्यता मंजुरी आदेश नाहीत.

प्रशासकीय व वित्तीय मान्यता रु.4,61,53,150/- स्थायी समिती ठराव क्र. 47 दि.15/7/2010 निविदा मान्य रु. 5,86,14,500/- स्थायी समिती ठराव क्र. 47 दि.15/78/ 2010 (27% जास्त दराने) प्रसिद्धी दि. 11/8/2010 ( वर्तमानपत्राची प्रत नाही.)

कार्यादेश क्र. 2393 दि. 21/3/2011 मुदत 12 महिने

ठेकेदार :- मे. ईगल कन्ट्रक्शन कामाचा कालावधी दि. 2/7/11 ते दि.31/3/13 पर्यंत अपूर्ण काम

प्रमाणक क्र. 4604 दि.26/2/2013 कामावर झालेला खर्च रु, 1,60,62,211/-

सदर कामाची निविदा नस्ती, बिले तपासली असता अर्धसमास क्र. 53 दि.11/6/2015 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे दि. 29/06/15 अन्वये अनुपालन प्राप्त झाले असून ते विचारात घेऊन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.अंदाजपत्रक बनविताना सार्वजनिक बांधकाम विभागाची 2009-10 ची दरसूची मध्ये सर्वसाधारण टीप-3 नुसार मूल्यवर्धित कराचे 4% सह दरसूची निश्चित केली आहे. असे असताना 1% जादा मूल्यवर्धित कराचा (vat) चा समावेश केला आहे. त्यानुसार अंदाजपत्रक बनवून निविदा 27% जास्त दराने मंजूर केली आहे. परंतु ठेकेदाराच्या देयकातून 2% मूल्यवर्धित कराची (vat) ची वसुली केली आहे. त्यामुळे 3% रक्कम रु.4,81,866/- जादा प्रदान ठेकेदारास झाले आहे.

2. सार्वजनिक बांधकाम विभागाची 2009-10 ची दरसूची मध्ये प्रत्येक बाबींचे दर हे पूर्ण बाब म्हणून अंतिम केले आहेत. त्यामध्ये लेबरचा समावेश असताना अंदाजपत्रक तयार करताना 4.42% लेबर वरील सेवाकर धरून

अंदाजपत्रक बनविले आहे. 27% जादा दराच्या निविदेमध्ये त्याचा समावेश आहे. अंदाजपत्रक वाढीव बनविले आहे. त्यामुळे कामाची किंमत वाढली आहे.

3.एकूण 4 निविदा प्राप्त झाल्या असून अनुक्रमे जयभारत कन्ट्रक्शन 52.52% जास्त इंदरदीप 46.30% जास्त मे. ईगल कन्ट्रक्शन 44.10% जास्त व मोनिका ईगल कन्ट्रक्शन 49.50% जास्त आहेत. त्यामध्ये मे. ईगल कन्ट्रक्शन यांची सर्वात कमी दराची निविदा असून दराबाबत प्रथम वाटाघाटीनुसार 9.75% दर कमी केले असता 39.96% जास्त दराची निविदा आहे. तद्नंतर 27% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. सदर प्रकरणी कारणमिमांसा मध्ये कामाच्या दरम्यान वाहतूक व बराच काळ काम करावे लागते त्यामध्ये साहित्य वेस्टेज जाते त्यासाठी 5% वाढ धरलेली आहे. प्रत्यक्षात दिली नाही असे विभागाने अनुपालनात दिले आहे. परंतु 27% निविदा मंजूर करताना 5% वेस्टेज हिशोबात धरले आहे. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढली आहे.

4.मान्य निविदा रु.5,86,14,500/- या रकमेची असून करारनामा नस्तीत समाविष्ट नाही. अनुपालाना सोबत परंतु प्रती जोडली नाही. त्यामुळे मुद्रांक शुल्क रु.57800/- बाबत तपासणी करता आली नाही.

5.सुरक्षा अनामत रक्कमेपोटी रु. 9,23,100/- ची बँकहमी दि. 1/12/10 नुसार घेतली आहे. त्याची विधीग्राहिता दि.1/12/11 आहे. त्याचे नुतनीकरण केलेले असल्याचे विभागाने अनुपालनात नमूद केले आहे. परंतु प्रत अनुपालानासोबत जोडली नाही.

6.सिमेंट काँक्रीट काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र क्र. 1232 दि. 22/3/12 रोजी कळविले आहे. तसेच वीर जिजाबाई टेक्नीकल इन्स्टिट्यूट माटुंगा मुंबई यांचे पत्र क्र. 151/STUR/cmp/2011/08/दि 11/8/2011 चा तपासणी अहवाल पाहता एम-35 सिमेंट काँक्रीटची स्ट्रेथ (strength) कमी आहे. तसेच Aggregate are not confirming to IS-383 असा अहवाल दिला आहे. कामाची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी नगर विकास विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र. संकीर्ण-2008/1338/प्र.क्र./171/08/नवि-20 दि.02/03/2009 नुसार 50 लाखावरील कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण किमान 10% करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तपासणी केली नसल्याचे दिसून आले. ज्या कामाचा दर्जा निकृष्ट आहे त्याची थर्ड पार्टी तपासणी करण्यात येईल असे अनुपालनात नमूद केले आहे. त्याची देयके अदा केली नाहीत. परंतु काम सुरु असताना वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक होते. त्रयस्थ संस्थेकडून कामाची तपासणी करून त्यानुसार कामाचे प्रदान केले नाही.

7.झालेल्या कामाच्या मोजमापावर व बिलावर सल्लागार यांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक असल्याचे निविदा अट क्र.1.3 मध्ये नमूद आहे. बिलावर स्वाक्षरी घेतली आहे. असे विभागाने अनुपालाना मध्ये नमूद केले आहे. परंतु प्रत अनुपालानासोबत जोडली नाही.

8.निविदेतील अट क्र.2.10 मधील टीप नुसार गुणवत्ता तपासणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची आहे. परंतु अंदाजपत्रक बनविताना 1% गुणवत्ता तपासणी फी समाविष्ट केली आहे. त्यामुळे अंदाजपत्रक अवास्तव वाढलेले आहे.

9.डी-वॉटरींग 440 तास पाणी उपसणे साठी वापरले आहे. दर रु.43.05 नुसार रुपये 19140/- तसेच जेसीबी 69 तास वापरले आहे. प्रती तास रुपये 850/- असून रु.58650/- अशी एकूण रुपये 77790/- रक्कम ठेकेदारास प्रदान

केली आहे. त्याची नोंदवही ठेवली आहे. असे विभागाने खुलाशात नमूद केले आहे. परंतु प्रत सोबत जोडली नाही. त्यामुळे सदर बाबीची खात्री करता आली नाही.

10.कामामध्ये एकूण गौण खनिज साहित्य 2751.67 घ. मी. इतके परिमाण वापरले आहे. त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री प्रदान करताना केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाही. तसेच दरसूची बनविताना बेसिक रेट मध्ये रॉयल्टीचा समावेश केला आहे. रॉयल्टी भरल्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. परंतु ठेकेदाराने रॉयल्टी भरली असल्याची खात्री करून प्रदान करणे विभागाचे काम आहे. त्याचे पालन केले नाही. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांची अधिसूचना दि.15/1/2003 व शासन परिपत्रक दि.10/2/2010 चे पालन केले नाही. (2751.67 x70.67 = रु.194461) त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

11.कामाध्ये एकूण 18 बाबी 125% पेक्षा जादा परिमाण वापरले आहे. तसेच जादा बाबी (Extra Item) 4 असे एकूण रु,34,70,468/- इतक्या मोठया प्रमाणात जादा काम केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील परि. क्र. 227 नुसार जादा कामाबाबत कार्यकारी अभियंता यांची पूर्व परवानगी घेऊन काम करणे आवश्यक होते. परंतु यांच्या पूर्व परवानगी शिवाय काम केले आहे. मंजुरी घेतली असल्याचे विभागाने कळविले आहे. प्रत सोबत जोडली नाही. केलेले अंदाजपत्रक योग्य व वास्तववादी केले नाही.

12.वाढीव कामाचे सुधारीत अंदाजपत्रक व कामाची मोजमाप पुस्तिका मागणी करूनही उपलब्ध झाली नाही. अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असताना त्याची पूर्तता न केल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमाचे कलम 4(3) मधील तरतुदीचे पालन झाले नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 47,23,619/-

वसूलपात्र रक्कम रु. 488661/ (मुद्रांक शुल्क रु.57800+बँक हमी रु.923100+ डीवॉटरींग- /जेसीबी रु.77790+ रॉयल्टी रु.194461+जादा बाबी रु.3470468)

DATDDZM6901 (Ref No : 107, Hmm No : 53)

## *12 चोपडा पंपिंग स्टेशन येथील रोहीत्रच्या दुरुस्तीच्या केलेल्या कामा मध्ये महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 5(2)2 चे उल्लंघन झालेले आहे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :317-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 361414.00/-

| |
|---|
| ***चोपडा पंपिंग स्टेशन येथील रोहीत्रच्या दुरुस्तीचे काम महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949*** |

***मधील कलम 5(2)2 नुसार केले आहे परंतू महासभा व स्थायी समितीची मान्यता घेतली नाही***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या टप्पा क्र 1 अंतर्गत चोपडा पंपिंग स्टेशन 22/0.433 केव्ही उपकेंद्रा मध्ये कमी दाबाच्या 200 KVA रोहीत्रामध्ये व विद्युत वाहिन्यामध्ये झालेल्या बिघाडामुळे कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभागाकडील दि 2/07/2012 च्या पत्रानुसार मा आयुक्त यांनी दिनांक 29/08/2012 रोजी मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीस मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम-1949 मधील कलम 5(2)2 नुसार स्थायी समितीचा ठराव व महासभेच्या ठरावास मंजुरी घेण्याच्या शर्तीच्या अधीन राहून मंजुरी देण्यात आली आहे. सदरचे काम मे कल्पतरू इंजिनियरिंग पाणीपुरवठा विभागाकडील कामाचे आदेश क्रमांक UMC /WSD/EE/MECH/18 दि 05/01/2013 नुसार रुपये 361414/-मात्र रकमेचे काम देण्यात आले. परंतु वरील कामास स्थायी समिती चा ठराव व महासभेच्या ठरावास मंजुरी घेण्यात आल्याचे ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदर बाब तातडीची असल्याची खात्री करता आली नाही. वरील कामाचे देयकाचे प्रदान रोख प्रमाणक क्रमांक 4858 दि18/3/2013 ची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1.मे कल्पतरू इंजिनियरिंग याना पाणीपुरवठा विभागाकडील कामाचे आदेश क्रमांक UMC/WSD/ EE/MECH/18 दि.5/01/2013 नुसार निर्गमित करण्यात आले असून कामाचे आदेश देण्यास 5 महीने विलंबाने दिलेले असून त्यानंतर सदर काम दि.8/02/2013 रोजी काम पूर्ण केल्याचे मोजमाप पुस्तक क्रमांक 75(A) पृष्ठ क्रमांक 97 ते 98 मधील नोंदीवरून दिसले त्यामुळे कामाचे आदेश निर्गमीत करण्यास व काम पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधीस विलंब झालेला आहे. त्यामुळे सदर कामासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील कलम 5(2)2 चा दुरुपयोग झाला आहे.

2)महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहीता 1984 मधील परीशिष्ट 24 मधील अ.क्र.11 नुसार कामाची मोजमापे तपशीलवार नोंदविणे आवश्यक आहे. परंतु त्रोटक मोजमापे घेतली आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता 1971 मधील नियम क्रमांक 180 मधील 3 व 4 प्रमाणे मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेली मापे यावर काट मारून प्रत्येक नोंदीवर प्रदानाचा शेरा मारण्यात आलेला नाही. त्याप्रमाणे प्रदानाची रक्कम तसेच वसूल रकमेचा तपशील नोंदविण्यात आला नाही. सदर नियमाचे पालन झाले नाही..

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहीता 1984 मधील परीशिष्ट 24 मधील अ.क्र.11(2) नुसार कामाची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी 5% करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झाले नाही. त्यामुळे वरील कामावर झालेला खर्च रुपये 361414 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATASMM5901 (Ref No : 26, Hmm No : 05)

## *13 पाणीपट्टी थकबाकी रु.106.38 कोटी असल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :C-A मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 1063819492.00/-

***2012-13 आर्थिक वर्षा अखेर रु.1063819492 पाणीपट्टी थकीत असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 134 नुसार थकबाकी वसुलीची कार्यवाही केली नाही.***

1.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 130 अन्वये (कलम 134 च्या तरतुदीच्या अधिन राहून ) ज्या जागांना कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून खाजगीरीत्या पाणीपुरवठा होत असेल किंवा त्या जागा कोणत्याही जलव्यवस्था केंद्रांशी पाणी वाहून नेणाऱ्या नळांच्या सहाय्याने जोडल्या असतील अशा जागांच्या बाबतीत पाणीपट्टी किंवा पाणीपुरवठा लाभकर बसविण्यात येतो. या कराच्या मागणी, वसुल्या व बाकी या बाबत विभागाने उपलब्ध करून दिलेली स्वतंत्र माहिती पुढील प्रमाणे आहे

रु.कोटीत

| वर्ष | मागील शिल्लक | दंड | चालू मागणी | एकूण रु. | वसुली रक्कम रु. | थकबाकी रक्कम रु. | वसुलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2010-11 | 65.22 | 8.87 | 3.63 | 77.72 | 3.11 | 74.61 | 4% |
| 2011-12 | 74.61 | 10.43 | 3.56 | 88.6 | 1.62 | 86.98 | 2% |
| 2012-13 | 86.98 | 16.09 | 5.62 | 108.69 | 2.32 | 106.37 | 2.13 % |

उपरोक्त विवरण पत्रातील आकडेवारी पहाता पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी प्रमाणात आहे.

थकबाकी वसूल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 138 अन्वये विशेष मोहीम राबवून थकबाकी वसूल करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

DATRVVM5901 (Ref No : 35, Hmm No : 01)

## *14 पाणीपुरवठा विभागातील कॅम्प-4 मधील देखभाल दुरुस्ती साठी कुशल कामगार व मजूर पुरवणे कामातील अनियमितता.*

Ulhasnagar (M Corp.)

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :B-10 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 716760.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7167.00/-

***सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र. सीएटी-07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 अन्वये मजूर सोसायटी यांना बांधकाम संदर्भातील कामे. देणेबाबत आदेश आहेत. परंतु लेबर पुरवणेचे काम दिले आहे. हे नियमबाहय आहे. कुशल कामगार व मजदूर पुरवणे कामाचे अंदाजपत्रक बनविताना मजुरी दर निश्चित करताना इएसआय, पीएफ, सेवाकर, कामगार कल्याण निधी ह्या बाबी विचारात घेऊन निश्चित करणे आवश्यक होते. त्याचे पालन केले नाही. कामगार पुरवणेचे हजेरीपट व मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून दिले नाही. नगरविकास विभाग शासन पत्र 98/प्र.क्र166/1357/जीईएन-1018/नवि-28 दि:3/11/2003 कंत्राटी कामगाराचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. परंतु कामगारांचा विमा उतरविला नसल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रु.716760/- च्या 1% रक्कम रु. 7168/- विम्याची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.***

प्रशासकीय मान्यता रु. 7,16,760/- आयुक्त दि. 14/12/2010

तांत्रिक मान्यता रु.7,16,760/- कार्यकारी अभियंता ठराव क्र. 281 दि. 15/2/11

कार्यादेश क्र. 293 दि. 3/3/2011 कामाची मुदत 180 दिवस

कामाचा कालावधी दि. 3/3/2011 ते 31/8/2011

कामावरील खर्च रु. 7,16.760/- मोजमाप पुस्तिका क्र. 45

ठेकेदार:- श्रीरामदेवजी मजूर सहकारी संस्था

2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करताना पाणीपुरवठा विभाग मधील प्रमाणक क्र. 4931 दि. 2/3/12 ची तपासणी केली असता मजूर पुरवणे परवाना नसताना काम दिले आहे. कामगारांचे हजेरीपट ठेवले नाहीत. विमा काढलेला नाही. ह्या बाबी उणीवा म्हणून दिसून आल्या. याबाबत अर्धसमास क्र 27 दि.21/4/2015 अन्वये खुलासा मागविला असून लेखापरीक्षण कालावधी पर्यंत अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1.सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र. सीएटी-07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 अन्वये मजूर सोसायटी यांना बांधकाम संदर्भातील कामे देणेबाबत आदेश आहेत. परंतु लेबर पुरवणेचे काम दिले आहे. ते देय ठरत नाही.

2. कुशल कामगार व मजदूर पुरवणे कामाचे अंदाजपत्रक बनविताना मजुरी दर निश्चित करताना इएसआय, पीएफ, सेवाकर, कामगार कल्याण निधी ह्या बाबी विचारात घेऊन दर निश्चित करणे आवश्यक आहे. त्याचे

दर पृथ:करण जोडले नाही. तसेच किमान कामगार वेतन कायद्यानुसार वेतन दिल्याचे अभिलेख नाहीत.
3.मजूर सोसायटी यांचे कडे मजूर पुरवण्याचा परवाना नसताना काम देणे हे नियमबाह्य आहे.
4.कुशल कामगार यांचे तांत्रिक अर्हताचे कागदपत्रे नस्तीत समाविष्ट नाहीत.
5.श्री रामदेवजी मजूर सहकारी संस्था ही अ, किंवा ब वर्ग आहे. याचा उल्लेख डीडीआर ठाणे यांच्या पत्रात नाही. मर्यादेपेक्षा जास्त काम दिल्याची तपासणी करता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र. सीएटी-07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16 /11 / 2006 चे पालन झाले नाही.
6. कामगार पुरवणेचे हजेरीपट ठेवलेले नाही. तसेच मोजमाप पुस्तिका अर्धसमास क्र 27 दि. 27/4 / 2015 अन्वये मागणी करूनही उपलब्ध झाले नाही. त्यामुळे झालेल्या प्रदानाची खात्री करता आली नाही.
7.नगरविकास विभाग शासन पत्र 98/प्र.क्र166/1357/जीईएन-1018/नवि-28 दि.3/11/2003 कंत्राटी कामगाराचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. परंतु कामगारांचा विमा उतरविला नसल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रु.716760/- च्या 1% रक्कम रु. 7168/- विम्याची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.
आक्षेपाधीन रक्कम रु.7,16,760/-
वसूलपात्र रक्कम रु.7167/-

DATDDZM6901 (Ref No : 53, Hmm No : 27)

## *15 उल्हासनगर मनपा अंतर्गत असलेले विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालवणे व देखभाल दुरुस्ती कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :P-I मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 2891456.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 138160.00/-

***निविदेमधील अटीतील अनेक्शर-1 नुसार कर्मचारी याचे वय 18 ते 45 वर्ष असणे आवश्यक होते परंतु त्याचे अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. तसेच तांत्रिक कर्मचारी यांचे अर्हता पात्रतेचे व अनुभव दाखले नाहीत. तरी निविदा मान्य केली आहे. ईएसआयची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र निविदा अट क्र.17 नुसार घेणे बंधनकारक आहे. अन्यथा विलंब आकार प्रतिदिनी रु.100/- प्रमाणे 455 दिवसाचे रु.45500/- वसूल होणे आवश्यक आहे. वसुली कार्यवाही झाली नाही. अंदाजपत्रकात बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेतले आहेत. त्याचे दरपृथ: करणाचे अभिलेख उपलब्ध नाहीत. कामगार किमान वेतन कायद्यानुसार दर निश्चित केलेले आहेत. त्यामध्ये पीएफ, ईएसआय व लेबर लायसन्स फी समाविष्ट असून ती ठेकेदाराने भरल्याचे कागदपत्रे***

***नाहीत. निविदा अटी व शर्तीमधील अट 8 नुसार कामगाराचे हजेरीपत्र व कामाचा रोजच्या रोज अहवाल घेणे व तपासणी करणे हे विभागाचे काम बंधनकारक ठेवले आहे. त्याचे पालन केले नाही. देखभालीसाठी साहित्या करिता रु, 7,14,437/- खर्चाचे प्रदान केले आहे. त्याचे हिस्ट्रीशीट व काढलेले साहित्य (Dismetal) नोंदवही ठेवली नाही. मुद्रांक शुल्क रु.600/- व 92,060/ विम्याची रक्कम वसुलपात्र आहे.***

अंदाजपत्रक रक्कम रु. 9205964/- तां. मान्यता कार्यकारी अभियंता मान्यता क्र. 2 दि. 5/2/11
प्रशासकीय मान्यता रु.9776739/- स्थायी समिती ठराव क्र. 67 दि.10/8/11 (6.20% जास्त दराने)
प्रसिद्धी दैनिक मुंबई दि. 18/5/2011 प्राप्त निविदा 3
कार्यादेश क्र. 1479 दि. 15/9/2011 मुदत 12 महिने
ठेकेदार :- मे. हर्षल टेक्नीस नाशिक
कामाचा कालावधी दि. 15/9/11 ते 31/3/2013 प्रमाणक क्र.4402 व 4403 दि.12/2/13
कामावर झालेला खर्च रु.28,91,456/-

1.निविदा मान्यते बाबत तांत्रिक कर्मचारी यांचे अर्हता पात्रतेचे व अनुभव दाखले इ. अभिलेख नस्तीत समाविष्ट केलेले नाहीत.

2.ईएसआयची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. मान्य निविदेनंतर 3 महिन्यात घेण्यात यावे. अशी अट टाकण्यात आली होती. परंतु त्याची पूर्तता केली नाही. निविदा अट क्र.17 नुसार विलंब आकार प्रतिदिनी रु. 100/- वसूल करावे असे आदेश आहेत. कामाचा कालावधी हिशोबात घेता 455 दिवस विलंब झाला आहे. रु.45500/-वसूल होणे आवश्यक आहे.

3.निविदेमधील अटीतील अनेक्शर-1 नुसार कर्मचारी याचे वय 18 ते 45 असणे आवश्यक आहे. परंतु नस्तीत कागदपत्रे जोडले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही.

4.अंदाजपत्रकात बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेतले आहेत. त्याचे दरपृथ:करणाचे अभिलेख उपलब्ध नाहीत. त्यामुळे दर वाजवी असल्याची तपासणी करता आली नाही.

5.निविदेसोबत एफडीआर रु.2,93,302/- उपलब्ध झाली नसल्याने तपासता आली नाही.

6.कामगार किमान वेतन कायद्यानुसार दर निश्चित केलेले आहेत. त्यामध्ये पीएफ, ईएसआय व लेबर लायसन्स फी समाविष्ट असून ती ठेकेदाराने भरल्याची कागदपत्रे नाहीत. तसेच किमान वेतन कायद्यानुसार वेतन प्रदान केल्याचे प्रमाणपत्र अथवा बँक पासबुक अर्धसमास 43 दि. 30/5/2015 अन्वये मागणी करूनही उपलब्ध झाले नाही.

7.निविदा अटी व शर्तीमधील अट 8 नुसार कामगाराचे हजेरीपत्र ठेवले बंधनकारक आहे. त्याचे पालन केले नाही.

8.कामाच्या देखभाल दुरुस्तीसाठी निविदेमधील तरतुदीनुसार कामाचा रोजच्या रोज प्रगती अहवाल घेणे व त्याची वेळोवेळी तपासणी करणे विभागास काम बंधनकारक केले आहे. तशी कार्यवाही झालेले नाही.

9.मोजमाप पुस्तिक क्र. 78 नुसार दि. 1/9/12 ते दि. 31/1/13 च्या देयकांत फक्त आस्थापना खर्च दाखवला आहे. परंतु देखभालीसाठी साहित्या करिता रु.7,14,437/- खर्चाचे प्रदान केले आहे. त्याचे हिस्ट्रीशीट व काढलेले

साहित्याची (Dismetal) नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे झालेल्या खर्चाची अचूकता तपासता आला नाही.

10.कार्यादेशानुसार कामाची मुदत दि.14/9/2012 रोजी पूर्ण होत असून नस्तीत मुदतवाढ घेतल्याचे अभिप्राय नाहीत. निविदा अटी व शर्त क्र.6 अन्वये 30 दिवस अगोदरच मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक होते. त्याचे पालन झालेले नाही.

11.मान्य निविदा रु.97,76,739/- असून रु.8900/- रकमेचा मुद्रांक शुल्क रकमेचा करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु रु.8300/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम-1958 मधील कलम 63 नुसार रु.600/- वसुली करणे आवश्यक आहे.

12.कामगाराचा विमा काढलेला नाही. नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन-1018/1357/प्र.क्र. / 166/98/नवि-28 दि.3/11/2003 अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.92,05,969/- च्या 1% रु.92,060/- विम्याची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. अर्धसमास क्र.43 दि.30/5/2015 अन्वये खुलासा मागविला असता अनुपालन प्राप्त झाले नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 28,91,456/- (कामावरील खर्च)

वसूलपात्र रक्कम रु.138160/- (विलंब आकार रु.45500/-+मुद्रांक शुल्क रु.600/-+विमा रु.92060/-

DATDDZM6901 (Ref No : 54, Hmm No : 43)

## *16 13 व्या वित्त आयोगाच्या रु.13.02 कोटी जमा व खर्चाचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :C-28 केंद्र/राज्य/मनपा/ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 130219393.00/-

***13 व्या वित्त आयोगाच्या निधी वापराचे नियोजन, आराखडा व त्यास महासभेच्या मान्यतेचे अभिलेख तसेच प्राप्त निधी रु.12,22,61,232/- ची चलनो/ मंजूर आदेश व खर्च रु.130219393/- चे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केल्याचे अभिलेख मागणी करूनही उपलब्ध झाले नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमाचे कलम 4(3) मधील तरतुदीनुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. सदर जबाबदारीचे पालन झाले नाही.***

1.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. तेविआ-2010/प्र.क्र.131/2010/नवि-4 दि.25/10/2010 च्या मार्गदर्शक

सूचनेनुसार महानगरपालिकेस 2012-13 करिता रु.12,22,61,232/- इतका निधी केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून प्राप्त झाला आहे. दि.1/04/2012 ची आरंभीची शिल्लक रु.83,08,040/- व प्राप्त निधी रु.12,22,61,232/- असा एकूण रु.130569272/- रक्कम शिल्लक असून 2012-13 मध्ये पाणीपुरवठा योजनेसाठी रु.130219393/- खर्च केला आहे. सदर निधी वापराचे नियोजन, आराखडा व त्यास महासभेची मान्यता बाबतचे अभिलेख वारंवार मागणी करूनही उपलब्ध झाले नाहीत.

2.13 व्या वित्त आयोगाच्या रोखवहीची तपासणी केली असता सदर रक्कम रु.130219393/- ही जेएनएनयुआरएम या योजनेसाठी वर्ग केल्याचे दिसून आले आहे. त्यास केंद्र शासनाची मान्यता घेतली नाही. 13 व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त निधीतून स्वतंत्र काम प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तसे न करता सदर रक्कम जेएनएनयुआरएम अंतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी केंद्र शासनाची मान्यता न घेता वापरली आहे. हे नियमबाह्य आहे.

3.प्राप्त निधीचे एकूण 6 चलने रु.40591036/- व मंजूर आदेशाची रक्कम रु.81691547/- ची उपयोगिता प्रमाणपत्र नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. तेविआ-2010/प्र.क्र.131/2010/नवि-4 दि.25/10/2010 मधील क्र.5 अन्वये शासनास सादर केल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने तपासणी करता आली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमाचे कलम 4(3) मधील तरतुदीनुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. परंतु सदर जबाबदारीचे पालन झाले नाही. अर्धसमास क्र.87 दि.10/07/2015 अन्वये निर्गमित केला असून अनुपालन प्राप्त झाले नाही.
आक्षेपाधीन रक्कम रु.130219393/-

DATDDZM6901 (Ref No : 61, Hmm No : 87)

## *17 पाणीपुरवठा व मलनिःसारण विभागामधील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :332-2432 म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1966470.00/-

***पाणीपुरवठा व मलनिःसारण विभागामधील प्रकल्पाच्या कामासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास अदा***

***केलेल्या फी रुपये 1966470/-या रकमेची 2 प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व मलनिःसारण विभागाचे 2012-13 या वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी रुपये 1966470/-त्याचा तपशील या रकमेचे अभिलेखे उपलब्ध अर्धसमास पत्र क्रमांक 73 दिनांक 26/6/15 नुसार मागणी करण्यात आली आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नाव | प्रमाणक क्र व दिनांक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | मे मोनार्च सर्वक्षण अँड कंत्राट प्रा ली | 4602 दि.26/2/13 | 999900=00 |
| 2 | मे मोनार्च सर्वक्षण अँड कंत्राट प्रा ली | 4779 दि.13/3/13 | 966570=00 |
| | | एकूण रुपये | 19,66,470=00 |

वरील रक्कम पाणीपुरवठा व मलनिःसारण प्रकल्पाच्या कामासाठी नेमणूक केलेल्या सल्लागारास फी अदा करण्यात आली असून या बाबतची निविदा नस्ती व त्या बाबतचा पत्रव्यवहार करारनामा इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणासाठी मागणी करूनही उपलब्ध झाले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 4(3) मधील तरतुदीनुसार अभिलेखे सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. परंतु उक्त अधिनियमाच्या कलम 6 अन्वये मागणी करूनही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने अधिनियमातील सदर तरतुदीचे पालन झाले नाही. त्यामुळे सल्लागारास अदा करण्यात आलेली रक्कम रुपये 1966470/ आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.
आक्षेपाधीन रक्कम रुपये1966470/

DATASMM5901 (Ref No : 112, Hmm No : 73)

## *18 पावसाळ्यापुर्वी मशिनरी व्दारे मोठ्या नाल्यांची सफाई करणे व कचरा/गाळ वहातूक करणे या कामावर झालेल्या रु.42,21,206/- खर्चातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :341-2550 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4221206.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41212.00/-

***प्राकलनानुसार जेसीबी, पोकलेनव्दारे कचरा काढणे व वाहतूक करणे यांच्या नोंदी बांधकाम नियमावली नुसार मोजमाप नोंदवहीत नोंदविणे आवश्यक होते. परंतु वाहतुकीचे फेरे नुसार प्रमाणक क्र. 3625 दि. 22.12.2012 रु.***

***4121206/- अन्वये प्रदान केले आहे. त्यामुळे बांधकाम नियमावलीचे पालन झाले नाही. वाहतुकीसाठी वापरलेले डंपर तसेच एकूण झालेले वाहतुकीचे फेरे यांची रोजनोंदवही ठेवण्यात आलेली नाही. झालेले काम हे बी-1 निविदेच्या धर्तीवरील अटी व शर्तीनुसार झालेले नाही. त्यामुळे असे प्रदान कशानुसार झाले याची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. 1 टक्का उपकराची रक्कम रु.41,212/- वसुल करण्यात आलेली नाही.***

कामाचे नाव :- पावसाळ्यापुर्वी मशिनरी व्दारे मोठ्यानाल्यांची सफाई करणे व कचरा/गाळ वहातूक करणे
अंदाजपत्रकीय रक्कम रुपये :- 3780923/-
तांत्रिक मंजूरी :- कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग पत्र क्र. 299 दि. 30.03.2011
प्रशासकिय मजूरी :- स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 15.05.2012
जाहिरात प्रसिध्दी :- दै.सामना, दै.उल्हास विकास दि. 30.04.2012
ठेकेदार:- मे. व्ही.आर.पनवेलकर, अंबरनाथ अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा 9% जादा दराने वाटाघाटीने
कार्यादेश :- क्र. 51/12 दिनांक 16.05.2012 कामाची मुदत :- 45 दिवस
काम पूर्ण :- विहीत मुदतीत
प्रमाणक क्र. 3625 दि. 22.12.2012 रु. 41,21206/-
मोजमाप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.
लेखाशिर्ष :- ड (iv) नाला व गटार सफाई

प्रस्तूत कामासाठी दि. 30.04.2012 च्या दैनिक सामना, दैनिक उल्हास विकास या वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या असून सदर कामासाठी चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत. यांपैकी सर्वात कमी दर असलेली प्राकलन दराच्या 9% जास्त दराने (वाटाघाटीने) मे.व्ही.आर. पनवेलकर यांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. तसेच त्यांना दिनांक 16.05.2012 रोजी कार्यादेश देण्यात आले असून काम विहित मुदतीत पूर्ण झालेले आहे. सदर कामाचे ठेकेदार यांना उल्हासनगर कॅम्प 1 ते 5 येथील नाल्यांमधील पावसापूर्वी गाळ / कचरा पोकलेन या यंत्राच्या सहाय्याने काढणे व डंपरव्दारे डम्पिंग मैदानावर वाहतूक करणे इत्यादी कामासाठी रक्कम रु. 4121206/- प्रदान केलेले असून या कामावर एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1) सदरच्या कामासाठी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी रक्कम रु.3780923/- एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजूरी दिलेली आहे. तसेच पावसाळयापूर्वी पोकलेन व जेसीबीव्दारे एकूण 33601 घनमीटर एवढा गाळ/कचरा नालेसफाई करुन काढणे व त्याची 10 किलोमीटर अंतरावर वाहतूक करण्याचे अंदाजपत्रकात प्रस्तावित केले आहे. यामध्ये 25% कचऱ्याचे परिमाण वाहतूक न करता येण्याजोगा कचरा 8400 घनमीटर तसेच 45% सिक्रेज (voides) परिमाण वजाती 11340 घनमीटर असा एकूण 19740 घनमीटर कचरा जाती गृहीत धरुन 13860 घनमीटर कचरा वाहतूक करण्याचे प्राकलनात प्रस्तावित केले आहे. याबाबत अभिलेखे व खर्चाची तपासणी केली असता मंजूर प्राकलनानुसार कचरा पोकलेन व जेसीबी व्दारे काढणे व वाहतूक करणे याबाबतची मंजूर प्राकलनानुसार कामे केल्याची कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 मधील अ. क्र. 11 नुसार कामाची मोजमापे तपशीलवार नोंदवून नियम 11 (2) नुसार कार्याकारी अभियंता यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. परंतू ठेकेदाराने पावसाळ्यापूर्वी काढलेला गाळ/कचरा यांचे परिमाण मोजमापे नोंदवहीत नोंदवलेली नाहीत. अशी मोजमापे न नोंदवल्यामुळे किती

घनमीटर कचरा, गाळ काढण्यात आला याचा ताळमेळ प्रत्यक्ष खर्च व त्याप्रमाणे ठेकेदारास झालेल्या प्रदानाची रकम याची लेखा परिक्षणात निश्चित खात्री करता आली नाही. मोजमापे नोंदलेली नसतांना ठेकेदारास वाहतुकीचे फेरेच्या आधारे रक्कम प्रमाणक क्र. 3625 दि. 22.12.2012 रु. 4121206/- प्रदान केली आली आहे. हे नियमबाह्य आहे. विभागाचे दि.24/7/15 च्या अनुपालानासोबत प्रस्तुत कामाच्या मूळ मोजमाप नोंदवह्या सादर केल्या नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

2) पावसाळ्यापूर्वी पोकलेन, जेसीबी व्दारे कचरा, गाळ नाल्यांमधून बाहेर काढणे व डंपिग मैदानावर वाहतुक करणे या कामासाठी ठेकेदाराने वापरलेले पोकलेन, जेसीबी, डंपर इत्यादी वाहनांचे लॉगबुक (स्कंद नोंदवही) यांच्या मुळप्रती तपासणीस सादर केल्या नाहीत. विभागाचे दि.24/7/15 च्या अनुपालाना सोबतची कागदपत्रे जोडली असल्याचे नमूद केले आहे. परंतु सोबत कागदपत्रे जोडली नाहीत. त्यामुळे प्रत्येक वाहनाने गाळ काढण्यासाठी अथवा वाहतूकीसाठी वापरलेले तास तसेच किलोमीटर यांचा कोणताही मेळ न घेता, फे-याचा दर निश्चित न करता ठेकेदाराची देयके पारीत केली आहेत. ठेकेदाराने कचरा, गाळ वाहतूकीसाठी वापरलेली वाहने यांचे 2448 फे-याचे देयक मंजूरीसाठी सादर केल्याचे दिसून आले. कचरा निर्मीतीचे ठिकाण व डंपिग मैदान यामधील अंतर 10 किलोमीटर असल्याने प्रत्येक वाहनाने 13 ते 14 फेरे म्हणजेच दर दिवसाला सरासरी 130 ते 135 किलोमीटर धाव (कचरा लोडिंग करणे व अनलोडिंगसह) केल्याचे दिसते. तांत्रिक दुष्ट्या वेळेनूसार ही बाब अशक्यप्राय असल्याने तसेच वाहनांचे लॉगबुक सादर न केल्याने वाहनांच्या फे-याबाबत खात्री करता आली नाही.

3) प्रस्तूत कामासाठी प्राप्त मंजूर निविदा बी-1 या धर्तीवर असल्याने तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करणे ठेकेदारास बंधनकारक असल्याने निविदेतील शेड्यूल “बी” नुसार काम करणे आवश्यक होते. तसेच केलेल्या कामाचे देयक सादर करताना वापरण्यात आलेली पोकलेन, जेसीबी वाहन यांचे तास व तासाप्रमाणे देय असलेला दर कचरा निर्मीतीच्या ठिकाणी गोळा केलेला घनमीटर मधील कचरा तसेच कचरा वाहतूक दर नमूद करुन देयक पारीत करण्यासाठी पाठविणे बंधनकारक होते, परंतु अशी कार्यवाही न झाल्याने निविदेतील शेड्यूल “बी” नुसार अटी शर्तीचे उल्लंघन झाले आहे.

4) महाराष्ट् शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्ण्य क्रमांक बी.सी.ए. 2009 /प्र.क्र. 104/कामगार7अ/ दि.17.06.2010 अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनिमय व सेवाशर्ती) अधिनियम 1966 व कल्याण उपकर अधिनियम नुसार ठेकेदाराला देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकर घेण्यात यावा. परंतू सदरच्या कामामध्ये 1 टक्का उपकराची रक्कम रु 41212/- ठेकेदाराच्या देयकातून वसूल केली नाही. कामगार कल्याण उपकर वसुलीची कार्यवाही लेखा विभागाकडून केली जाते असे विभागाने दि. 24/7/2015 अन्वये कळविले आहे. परंतू लेखा विभागाने उपकराची रक्कम वसुल केलेले आढळून आले नाही. तरी उपकराची रक्कम वसूल करुन भरणा करावी.

अर्धसमास पत्र क्र.77 दि.30/06/2015 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता विभागाकडून प्राप्त उत्तराची पडताळणी केली असता प्राप्त खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्यामुळे मान्य करता येत नाही.

वसूलपात्र रक्कम रु 41212/-

आक्षेपाधीन खर्च 4221206/-

DATNDMM5801 (Ref No : 68, Hmm No : 77)

## *19 डंपिंग ग्राऊंड वरील घनकचरा सपाटीकरणासाठी पोकलेन, बुलडोजर, मशीनरीभाडेतत्वावर घेणे या कामी झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :341-2550 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4886374.00/-

***आयुक्तांनी दिलेल्या मान्यतेनुसार कचरा सपाटीकरणासाठी एक पोकलेन वापरणे वापरणेस मंजूरी असतांना दोन पोकलेन वापरण्यात आल्याने रक्कम रु.14,91,810/- एवढा अतिरिक्त खर्च झालाआहे. घनकचरा सपाटीकरणासाठी वापरण्यात आलेली मशिनरी यांची स्कंद नोंदवही ठेवलेली नाही. घनकचरा सपाटी करणाच्या नोंदी मोजमाप नोंदवहीत ठेवण्यात आलेल्या नाहीत. निरुपयोगी कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विकसित कलेल्या भूमीवर भूमी भराव करणे अशा गोष्टी सक्तीच्या करण्यात आल्या आहेत. परंतू अशी कार्यवाही झालेली नाही.***

महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाने डंपिंग ग्राऊंडवर शहरातील दैनंदिन सुमारे 320 टन येणा-या घनकच-याचे सपाटीकरण करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे आयुक्त् यांच्या दि. 03.07.2012 च्या मान्यतेनुसार पोकलेन, बुलडोजर या मशीनरी भाडयाने घेण्यासाठी दर पत्रके मागवली असून सदर कामी चार दरपत्रके प्राप्त झाली असून तुलनात्मक दृष्ट्या सर्वात न्युनतम दर असलेले मे.इगळ इंफ्रा इंडिया लिमिटेड यांना कार्यादेश क्र.151/12 दि.23.07.2012 अन्वये मशीनरी भाड्याने घेणेपोटी 2012-13 या वर्षात रक्कम रु.48,86,374/- एवढा खर्च झाला असून झालेल्या एकूण खर्चाबाबत लेखा परिक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत मशीनरी भाडयाने घेणे याबाबतची नस्ती व अभिलेखे यांची तपासणी केली असता आयुक्त यांनी दि.30.07.2012 रोजी दिलेल्या मान्यतेनुसार ठेकेदाराने घनकचरा सपाटीकरणासाठी एक नग पोकलेन-200 प्रति तास रु.1499/- प्रमाणे प्रतिदिन 6 तास चालविणे तसेच एक बुलडोजर प्रतितास रु.1395/- प्रमाणे प्रतिदिन 8 तास चालविणे अशा कामाला एक वर्षासाठी मंजूरी दिली असून ठेकेदाराला त्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आले आहेत. तसेच कार्यादेशामध्येही प्रमुख स्व्च्छता निरीक्षक (डंपिंग ग्राऊंड नियंत्रक) यांना उक्त ठेकेदाराकडून नमूद तपशीलाप्रमाणे तसेच परिमाणा इतकी मशीनरी उपलब्ध करुन घ्यावी तसेच दैनंदीन केलेल्या कामाच्या नोंदी नोंदवहीत ठेऊन त्याचा दैनंदिन अहवाल कार्यलयाकडे सादर करण्याविषयी सूचित केलेले आहे. याबाबत ठेकेदारांनी लेखा शाखेकडे पारित करण्यासाठी सादर केलेली देयके तसेच कागदपत्रे पाहता उक्त कार्यादेशानुसार घनकचरा सपाटीकरणासाठी दि. 09.07.2012 ते 15.01.2013 या कालावधीत दोन बुलडोजरचा वापर केला असून त्यानुसार ठेकेदारास देयकाचे प्रदान झालेले आहे. तथापि ज्यादा वापर केलेल्या एका बुलडोजर बाबत एक वर्षासाठी आयुक्तांची पूर्व मंजुरी घेण्यात आलेली नाही. सबब एक बुलडोजरचा सपाटीकरणसाठी रक्कम रु.1491810/- एवढा ज्यादा अतिरिक्त खर्च झाला आहे विभागाचे

दि.24/7/15 च्या अनुपालाना मध्ये आयुक्त यांच्या मंजुरीचा कोणताही उल्लेख नाही.
2) घनकचरा सपाटीकरणासाठी वापरण्यात आलेली मशीनरी एकूण वापरलेले तास यांचा अहवाल डंपिंग नियंत्रक यांच्याकडुन प्राप्त झाल्यानंतर ठेकेदारास प्रतितास धाव व निश्चित केलेल्या दरानुसार ठेकेदारास देयकाचे प्रदान करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात सपाटीकरणासाठी वापरलेल्या मशीनरीने प्रतिदिन किती प्रमाणात काम केले याचे नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 153 नमुना नं 127 नुसार वाहनासाठी ठेवलेल्या नोंदवह्या लॉगबुक (स्कंदनोंदवही) विहित नमुन्यात ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे ठेकेदारास प्रदान कशा आधारे करण्यात आले याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. विभागाचे दि.24/7/15 च्या अनुपालानासोबतची अनुषंगिक कागदपत्रे जोडली नाहीत. त्यामुळे घनकचरा सपाटीकरणाचे झालेले काम व त्यानुसार झालेले प्रदान यांचा मेळ अथवा खात्री लेखा परिक्षणात झालेली नाही.
3) महापालिका हद्दीत शहरामध्ये दररोज अंदाजीत 320 मेट्रीक टन कचरा निर्माण होत असतो. व सदरचा कचरा डंपिंग ग्राउंडवर वाहतूक केला जातो. व त्याचे ग्राउंडवर सपाटीकरण केले जाते. परंतु सपाटीकरणसाठी वापरण्यात येणारे मशीनरी, पोकलेन, बुलडोजर यांनी प्रतितास प्रतिदिन एकूण किती मेट्रीक कचरा सपाटीकरण केला यांची मोजमापे मोजमाप नोंदवहीत न नोंदविता ठेकेदाराने सादर केलेले देयक तसेच डंपिग ग्राउंड नियंत्रक यांनी दिलेल्या अहवालानुसार ठेकेदाराला वापरलेल्या मशीनरीप्रमाणे बिलाचे प्रदान करण्यात आलेले आहे. तश्या नोंदी ठेवल्याचे अनुपालनात कळविले आहे. परंतु प्रत जोडल्या नाहीत. तसेच तांत्रिक अधिकारी यांची नेमणूक बाबत दक्षता घेण्यात येईल असे नमूद केले आहे. सदर बाब आक्षेपात कायम ठेवण्यात येत आहे.
4) शहरातील नालेसफाई मधून निघणारा गाळ व अतिरिक्त कचरा गेले 14 ते 15 वर्षापासून म्हळगाव राणा ट्रेडिंग जवळ येथे डंपिंग ग्राउंडवर जमा करुन सपाटीकरण केले जाते असे टिपणीवरुन दिसून आले. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचा शासन निर्णय क्र.021/1006/ प्र.क्र. 531 नवि-16 दि.26.10.2006 नुसार नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 च्या प्रभावी अंमलबजावणी साठी करावयाच्या उपाययोजनांबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामधील क्र.1 नुसार सर्व नागरी संस्थांना शहरामध्ये घनकचरा इतरत्र टाकण्यावर बंदी करणे, कच-याची वाहतूक करणे योग्य कच-याचा पुनर्वापर करणे, कच-यावर कंपोस्टींग किंवा विहित केलेल्या पध्द्तीने प्रक्रिया करणे, ज्या कच-यावर कोणतीही प्रक्रिया करणे शक्य नसेल व प्रक्रियेतून निघणा-या निरुपयोगी कच-याची शास्त्रोक्त पध्द्तीने विकसित केलेल्या भूमीवर भराव करणे अशा गोष्टी बंधनकारक करण्यात आलेल्या आहेत. परंतु महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाने वरील नियम-2000 च्या नियमावलीचे कोणतेही पालन केल्याचे दिसून आले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.94 दि.14/07/2015 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता प्राप्त खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही.
आक्षेपाधीन खर्च रु.4886374/-

DATNDMM5801 (Ref No : 69, Hmm No : 94)

## ***20 जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक औषधे खरेदीवर केलेल्या रक्कम रु. 6858600/- खर्चातील अनियमिततेबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :617-2520 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6858600.00/-

***शासन दरकरारनुसार औषधांची खरेदी न करता निविदा मागवून खरेदी केल्याने अनियमितता झालीआहे. प्रचलित दरानुसार बाजार भाव मागवून अंदाजित खर्च निश्चित करुन त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणे आवश्यक असतांना तशी कायवाही झालेली नाही. त्यामुळे खरेदी दरकरारपेक्षा किफायतशिर झाली असे लेखा परिक्षणास म्हणता येणार नाही.***

महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य (घनकचरा) विभागाने शहराच्या स्वच्छता साफसफईच्या कामासाठी व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने किटकनाशक/जंतुनाशक औषधे खरेदी करण्यासाठी मा.आयुक्त यांची दि.01.08.2012 अन्वये मान्यता घेऊन सदर औषधे खरेदीची निविदा सुचना दै. पुढारी, दै. वार्ताहर या वृत्तपत्रात 5.08.2012 रोजी प्रसिध्द करुन व निविदा मागविण्यात आल्या आहेत. प्रस्तुत खरेदीसाठी मे. डॉल्फीन, मे.मित्र हर्षल, मे. रविराज केमिकल्स, मे. रॉयल अशा चार निविदा प्राप्त झाल्या असून ज्या ज्या ठिकाणी निविदा धारकांनी प्रत्येक औषधांच्या बाबींसाठी न्युनतम दर सादर केले आहेत. अशा निविदा धारकांना औषधांचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. 2012-13 या वर्षात एकूण रक्कम रु.68,58,600/- एवढा खर्च औषधे खरेदी करण्या साठी झाला असून झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत औषधे खरेदीमध्ये काळे फिनाईल, बॅक्टोक्लीन, साईथ्रिऑन 50% झिंक फॉक्साईट, उंदीरनाशके, माईक्रोफाईन पावडर, बॅक्टोफ्री किटकनाशक, फाईट आऊट अळीनाशक इत्यादी अनेक एकूण 18 बाबी औषधांचा समावेश असल्याने सदर औषधे खरेदीसाठी शासनाने वेळोवेळी दर करारा नुसार औषधे खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहेत परंतु आरोग्य विभागाने औषधांचे दरकरारानुसार खरेदी न करता जाहीर निविदा मागवून औषधे खरेदी केलेली आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 74(2) नुसार किफायतशिर असलेली निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू दरकरारपेक्षा खरेदी किफायतशीर झाली असल्याबाबत खात्री न करता जाहिर निविदा प्रसिध्द करुन खरेदी करण्यात आली आहे.

2) आरोग्य विभागाने सदरची खरेदी जरी स्पर्धात्मक निविदा स्विकारण्यापूर्वी अधिकृत विक्रेत्यांकडून सदर औषधांचे प्रचलित दर मागवून व कमीत कमी दर असलेल्या बाबी निश्चित करुन (कोटेशनप्रमाणे) त्याप्रमाणे जाहीरात प्रसिध्दी करुन सिलबंद निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही न केल्यामुळे औषधांची खरेदी किफायतशीर दराने केल्याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे खरेदीवर झालेला खर्च रक्कम रु.68,58,600/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबत अर्धसमास क्र.95 दि.14/07/2015 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता विभागाचे दि.24/7/15चा प्राप्त खुलाश्यामध्ये दरकरार बाबत कोणताही उल्लेख केला नाही. तसेच इतर महानगरपालिका यांचे दर विचारात घेऊन खरेदी केली जाते असे नमूद केले आहे. हे आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही.

आक्षेपाधीन खर्च रु. 6858600/-

DATNDMM5801 (Ref No : 70, Hmm No : 95)

## *21 कर निर्धारण चुकीचे करणे, मोठा निवासी कराची आकारणी न करणे व इतर अनियमितताबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 09**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 73933.00/-

***लेखापरीक्षणाकरीता निवडक महिना जुन 2012 मधील कर निर्धारण प्रकरणांची मुळ सादर नस्ती, कर निर्धारण नोंदवही, कर निरीक्षकांचे स्थळ पाहणी अहवाल, त्यांची क्षेत्रीय स्तरावरील नोंदवही इ.अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून दिले नाहीत. कर निर्धारण तपशिल नोंदवहीतील नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. कर निर्धारक तपशिल नोंदवहीत मोजमापे अपुर्ण नोंदविण्यात आली आहेत. कर मुल्यांकन, मिळकत कर रक्कम यांची परिगणना करण्यात आली नसून नोंदवहीतील याबाबतचे रकाने रिकामे आहेत. मोठा निवासी जागेकरीताची कर आकारणी करण्यात आली नाही. कमी कर मुल्यांकन करण्यात आले आहे.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचीतील प्रकरण 8 कराधान मधील नियम क्र.127 नुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मिळकतकर विभागातील माहे जुन 2012 या निवडक महिन्यातील कर निर्धारणांची एकूण 331 प्रकरणांची मुळ सादर नस्ती, कर निर्धारण नोंदवही, कर निरीक्षकांचे स्थळ पाहणी अहवाल, त्यांची क्षेत्रीय स्तरावरील नोंदवही इ. अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.101 दि.20/07/2015 अन्वये कळविण्यात आले होते. परंतू त्यापैकी 55 प्रकरणांच्याच मिळकतीची कर निर्धारण तपशिल असलेली नोंदवही व त्याची संगणकीय प्रिंट आऊट इतकेच अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उपलब्ध केलेली नोंदवही व प्रिंट आऊटमधील नोंदी यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोणतीही मिळकत (अधिकृत किंवा अनधिकृत) नवीन किंवा पुन्हा बांधण्यात आल्यास किंवा वाढविण्यात आल्यास किंवा रिकामी असेल अशा मिळकतीचा पुन्हा भोगवटा करण्यात आल्यास त्या मिळकतीवर आकारण्यात आलेला मालमत्ता कर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीने 15 दिवसाच्या आत महानगरपालिका आयुक्तांस लेखी नोटीस देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून जारी करण्यात आलेला

बांधकाम पुर्णत्वाचा दाखला किंवा सदर मिळकतीचा ताबा घेतल्याचा दिवस या दोन्हीपैकी जे अगोदर असेल त्या आर्थिक वर्षाच्या सुरूवातीपासून मिळकतधारक कर आकारणीस पात्र राहील. अशा सुचना आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आदेश क्र.उमपा/कर विभाग/ 115ए10 दि.19/08/2005 अन्वये दिल्या आहेत. परंतू कर निर्धारण प्रकरणांची मुळ नस्तीच लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून न दिल्याने आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही झाली असल्याची पडताळणी करता आली नाही.

2) कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी जाऊन मिळकतीच्या जागेचे मोजमाप केलेले स्थळ पहाणी अहवाल लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले नाहीत. सबब, कर निर्धारण प्रकरणांची अचुकता पडताळणी करता आली नाही.

3) कर निर्धारण तपशिल नोंदवहीवर कर निरीक्षक, कर अधिक्षक व कर निर्धारक अधिकारी यांनी स्वाक्षरी करून नोंदी प्रमाणित करणे आवश्यक असतांना त्यांच्या स्वाक्ष-या नाहीत. सबब, सदर नोंदवहीमधील नोंदी अधिकृत नाहीत.

4) कर निर्धारक तपशिल नोंदवहीत कर निरीक्षकांनी स्थळ पाहणी केलेल्या मिळकतीच्या क्षेत्रफळाचे मोजमाप अपुर्ण नोंदविण्यात आले आहेत. कर मुल्यांकन, मिळकत कर रक्कम यांची परिगणना करण्यात आली नसून नोंदवहीतील याबाबतचे रकाने रिकामे आहेत.

5) महाराष्ट्र इमारतीवरील कर (मोठया निवासी जागासह) अधिनियम 1979 मधील कलम 3 अन्वये 150 चौ.मी. (1675 चौ.फुट) पेक्षा जास्त् क्षेत्र असलेल्या मिळकतींवर 10 टक्के मोठा निवासी कराची आकारणी करणे आवश्यक आहे. खालील विवरणपत्रातील प्रकरणांत मोठा निवासी जागेकरीताचा कर आकारणी करण्यात आली नाही. सबब, त्यांचे सुधारीत कर निर्धारण व आकारणी करून मागील कालावधीची देखील वसुली होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | मिळकतीच्या मालकाचे नाव | मिळकत क्रमांक | मिळकतीचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | मिळकतीची कर मुल्यांकनाची रक्कम (रु.) | आकारणी न केलेला मोठा निवासी जागेचा कर (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती आर. आर.वासवानी | 49 सी ओ 018581700 | 2115 | 23945 | 2395 |
| 2 | श्रीमती व्ही. एस. वासवानी | 49 सी आय 019051000 | 2133 | 24081 | 2408 |
| 3 | श्रीमती कविता एस. चांदवानी | 49 सी आय 010640900 | 2133 | 24081 | 2408 |
| 4 | श्रीमती ए. एन.वासवानी | 49 सी आय 020223300 | 2133 | 24081 | 2408 |
| 5 | श्रीमती बरखा एम. वासवानी | 49 सी आय 020223400 | 2133 | 24081 | 2408 |

6) मिळकत कर विभागामार्फत करण्यात आलेल्या कर मुल्यांकनात खालीलप्रमाणे प्रकरणनिहाय कमी कर मुल्यांकन करण्यात आले आहे. सबब, योग्य कर आकारणी करून मागील कालावधीची प्रती माह 2 टक्के

व्याजासह वसुली होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | मिळकतीच्या मालकाचे नाव | मिळकत क्रमांक | करणे आवश्यक कर मुल्यांकन (रुपये) | केलेले कर मुल्यांकन (रुपये) | कमी करण्यात आलेले कर मुल्यांकन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती व्ही. एस. वासवानी | 49 सी आय 019051000 | 24081 | 20255 | 3826 |
| 2 | श्रीमती आर.आर.वासवानी | 49 सी ओ 018581700 | 23945 | 16968 | 6977 |
| 3 | श्रीमती कविता एस. चांदवानी | 49 सी आय 010640900 | 24081 | 20255 | 3826 |
| 4 | श्रीमती ए.एन.वासवानी | 49 सी आय 020223300 | 24081 | 20255 | 3826 |
| 5 | श्रीमती बरखा एम. वासवानी | 49 सी आय 020223400 | 24081 | 20255 | 3826 |
| 6 | श्री.नितीन दिनकर पाटील | 48 सी आय 010527200 | 7062 | 7032 | 30 |
| 7 | श्रीमनोज. गोकलानी | 05 अे आय 014408400 | 73873 | 69560 | 4313 |
| 8 | श्री.जगदिश के. नागरा | 26 बी ओ 004517100 | 46942 | 44430 | 2512 |
| 9 | डॉ.रिता रोचलानी | 28 बी आय 020204600 | 49620 | 49138 | 482 |
| 10 | श्री.महेंद्र रोचलानी | 28 बी आय 005003700 | 23008 | 22825 | 817 |
| 11 | श्रीमती मालती शहा | 29 सी ओ 020213000 | 9802 | 9791 | 11 |
| 12 | श्रीमती भारती हजारी | 30 सी ओ 005458700 | 22589 | 22493 | 96 |
| 13 | श्रीमती मंजुळा जोशी | 51 डी आय 010973500 | 102795 | 73454 | 29341 |
| 14 | श्री.ज्ञानप्रकाश विश्वकर्मा | 51 डी ओ 011111000 | 5223 | 5093 | 130 |
| 15 | श्री. जे.एन.पामनानी | 49 सी आय 020206300 | 8883 | 8252 | 631 |
| 16 | श्री. जे.एन.पामनानी | 49 सी आय 020206400 | 8883 | 8252 | 631 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 17 | श्री. जे.एन.पामनानी | 49 सी आय 020206500 | 8883 | 8252 | 631 |

7) मालमत्ता क्र. 49 सी ओ 018581700, मालमत्ता क्र. 49 सी आय 019051000, मालमत्ता क्र. 49 सी आय 010640900, मालमत्ता क्र. 49 सी आय 020223300, मालमत्ता क्र. 49 सी आय 020223400 या एकाच इमारतीमधील वेगवेगळया मिळकती असतांना मालमत्ता क्र.49सीओ 018581700 करीता प्रचलित भाडे दर रु.1.394 ऐवजी रु.1.115 प्रमाणे आकारणी केल्याने कर मुल्यांकन रु.6977 ने कमी करण्यात आले आहे. त्यामुळे मिळकत कराची आकारणी कमी झाली आहे.

8) श्री.परविण बाणू मदार कुरेशी, मालमत्ता क्र. 01एओ020222000 यांचेबाबत कर निर्धारण तपशिल नोंदवहीत 300 चौ.फुट इतक्या जागेची नोंद असतांना संगणकीय प्रिंट आऊटवर कर निर्धारण तपशिलात 75 चौ.फुट जागेची नोंद घेण्यात आली आहे व सन 2013-14 च्या कर निर्धारण बिलात 225 चौ.फुट प्रमाणे कर निर्धारण करण्यात आले आहे. कर निर्धारणात योग्य ती सुधारणा करून मागील कालावधीची देखील व्याजासह वसुली होणे आवश्यक आहे.

9) श्री.सुरज रतिलाल सरज, मालमत्ता क्र.10 ए ओ 004151400 यांचेबाबत कर निर्धारण तपशिल नोंदवहीत टिअर गर्डर बांधकाम 539 चौ.फुट व सिमेंट-पत्रयाचे बांधकाम 546 चौ.फुट असतांना अनुक्रमे 535.48 व 544.5 चौ.फुट इतक्या मोजमापाची नोंद संगणक प्रणालीत नोंदविल्याने मिळकत कराचे मुल्यांकन रु.9789.3 ऐवजी रु.9745 केल्याने रु.44.3 ने कमी मुल्यांकन केले आहे. सबब, मिळकत कराची आकारणी कमी झाली आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.115 दि.05/08/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 101, Hmm No : 115)

## *22 मिळकत कर निर्धारण, कराची संगणकात नोंद घेणे व कर निरीक्षकांच्या कामातील अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***दर पाच वर्षातून एकदातरी नविन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे परंतू ते करण्यांत आले नसून मिळकतींच्या नोंदी संगणकात घेण्यात आलेल्या आहेत. कर निरीक्षकांकडून प्रत्यक्ष जागेचे मोजमापे घेतली*** |

***जातात व त्याची नोंद संगणकात नोंदविण्यात येते. संगणकात नोंदविलेली मिळकतीची मोजमापे योग्य असलेबाबत खात्री कर निरीक्षकांनी प्रिंट आऊट तपासून करणे अपेक्षित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे प्राप्त कर निर्धारण प्रकरणांच्या नस्तीतील नोंदीवरून निदर्शनास येते.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम व महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिंतेच्या नियम 74 नुसार कराची आकारणी यादी नमुना क्रमांक 43 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. आकारणी पुस्तकांत शहरातील सर्व इमारती व जमिनींची नोंद घेवून प्रभागानुसार प्रत्येक इमारत किंवा जमिनी वेगळया दाखवून त्यांस मालमत्ता क्रमांक देणे आवश्यक आहे. या यादीत दर्शविलेल्या प्रत्येक मालमत्तेचे (इमारत,जमिनी) करयोग्य मुल्य, मनपाने प्रभागानुसार लावलेले कराचे दर, एकुण कराची होणारी रक्कम यांचा उल्लेख असणे आवश्यक आहे. मुबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8, कराधान विभाग, नियम क्रमांक 21 (2) नुसार दर पाच वर्षातून एकदातरी नविन आकारणी पुस्तक तयार करण्यांत आले पाहीजे. परंतू याबाबत कराची आकारणी यादी (नमुना क्रमांक 43) लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लेख्यांची अचुकता पडताळणी करता आली नाही.

2) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मिळकत कर विभागाने ठेवलेली कर आकारणी नोंदवही 2012-13 लेखा परिक्षणांस अर्धसमास ज्ञापन क्र.101 दि.20/07/2015 अन्वये मागणी करुनही उपलब्ध करून देण्यांत आली नाही. मिळकत कराची प्राप्त 55 प्रकरणांची तपासणी केली असता पुढीलप्रमाणे सर्वसाधारण अभिप्राय देण्यात येत आहेत. संगणकातील मिळकतीच्या नोंदीत बदल करणे जसे, मिळकतींचे Addition / Deletion / Modify करण्याचे अधिकार जबाबदार अधिका-याकडे प्रदान केलेले नाही. तसेच संगणकातील माहीतीची प्राधिकृतता तपासण्याची यंत्रणा महानगरपालिकेकडे नाही. याबाबत संगणकात नोंद केलेल्या कर निर्धारण प्रकरणांची मुद्रीत प्रत काढून करनिर्धारक व संकलक यांनी साक्षांकीत करणे गरजेचे आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. नगररचना विभागाकडून नविन अथवा पुनर्बांधणी झालेल्या इमारतीबाबत भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर करनिर्धारण करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. त्यापूर्वी संबंधित प्रभागातील कर निरीक्षकांकडून इमारतीचा स्थळ पाहणीचा अहवाल मागविला जातो व सदर पाहणी अहवालानुसार करनिर्धारण करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मोजलेल्या मिळकतीच्या क्षेत्रफळानूसार कर निर्धारण करून त्याप्रमाणे आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे व तसे निर्धारण केल्याप्रमाणे संगणक प्रणालीवर निर्धारणाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही झाली अथवा कसे याबाबतची पडताळणी कर निरीक्षकांकडून केली जात नाही. केलेल्या करनिर्धारणाप्रमाणेच अंमलबजावणी संगणक प्रणालीवर होते की नाही हे पाहणे हा सुध्दा करनिर्धारणाच्या कामाचा महत्वाचा भाग आहे. या महत्वाच्या भागाची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसलेने प्रत्यक्ष कर निर्धारणापेक्षा संगणक प्रणालीवरील कर निर्धारण कमी होणे. अशा खालीलप्रमाणे उदाहरणादाखल अनियमितता आढळल्या आहेत.

| अ.क्र. | मिळकतीच्या मालकाचे नाव | मिळकत क्रमांक | करणे आवश्यक कर मुल्यांकन (रुपये) | केलेले कर मुल्यांकन (रुपये) | कमी करण्यात आलेले कर मुल्यांकन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती व्ही. एस. वासवानी | 49 सी आय 019051000 | 24081 | 20255 | 3826 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | श्रीमती आर.आर.वासवानी | 49 सी ओ 018581700 | 23945 | 16968 | 6977 |
| 3 | श्रीमती कविता एस. चांदवानी | 49 सी आय 010640900 | 24081 | 20255 | 3826 |
| 4 | श्रीमती ए.एन.वासवानी | 49 सी आय 020223300 | 24081 | 20255 | 3826 |
| 5 | श्रीमती बरखा एम. वासवानी | 49 सी आय 020223400 | 24081 | 20255 | 3826 |
| 6 | श्री.नितीन दिनकर पाटील | 48 सी आय 010527200 | 7062 | 7032 | 30 |
| 7 | श्रीमनोज. गोकलानी | 05 अे आय 014408400 | 73873 | 69560 | 4313 |
| 8 | श्री.जगदिश के. नागरा | 26 बी ओ 004517100 | 46942 | 44430 | 2512 |
| 9 | डॉ.रिता रोचलानी | 28 बी आय 020204600 | 49620 | 49138 | 482 |
| 10 | श्री.महेंद्र रोचलानी | 28 बी आय 005003700 | 23008 | 22825 | 817 |
| 11 | श्रीमती मालती शहा | 29 सी ओ 020213000 | 9802 | 9791 | 11 |
| 12 | श्रीमती भारती हजारी | 30 सी ओ 005458700 | 22589 | 22493 | 96 |
| 13 | श्रीमती मंजुळा जोशी | 51 डी आय 010973500 | 102795 | 73454 | 29341 |
| 14 | श्री.ज्ञानप्रकाश विश्वकर्मा | 51 डी ओ 011111000 | 5223 | 5093 | 130 |
| 15 | श्री. जे.एन.पामनानी | 49 सी आय 020206300 | 8883 | 8252 | 631 |
| 16 | श्री. जे.एन.पामनानी | 49 सी आय 020206400 | 8883 | 8252 | 631 |
| 17 | श्री. जे.एन.पामनानी | 49 सी आय 020206500 | 8883 | 8252 | 631 |

सदरची बाब अत्यंत गंभीर असुन महानगरपालीकेच्या आर्थिक हितावर दुरगामी परिणाम करणारी आहे. याबाबतचे परिपुर्ण अभिलेखे लेखा परिक्षणांसाठी उपलब्ध करुन देण्यांत आले नाहीत. त्यामुळे कर विभागाने मालमत्ता कराची केलेली आकारणी बरोबर केली असल्याची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.116 दि.05/08/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

## *23 महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहनावरील खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :830-2560 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 9123223.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 33950.00/-

***भाडे तत्वावर वाहन ठेक्याच्या मुदतवाढीस आयुक्तांची प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही. ठेक्याच्या वाहनांची आरसी बुक, इन्शुरंन्स, टी परमिट यांच्या छायांकीत प्रती लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या नाहीत. अथवा ठेकेदाराने अशा प्रती सादर केल्या नाहीत. वाहनांच्या वापरासंबंधी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. वाहनांची सरासरी धाव विहित मर्यादेपेक्षा जादा झाल्यामुळे खर्च रक्कम रु.33950/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.***

महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावर वाहने ठेक्यावर पुरविणे कामी 2012-13 या वर्षात रक्कम रु.91,23,223/- एवढा खर्च् केला असून एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखापरिक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत वाहने एक वर्षाच्या कालावधीसाठी ठेक्याने पुरविणे कामी दिनांक 17/06/2010 च्या दैनिक सामना, द फ्री प्रेस जनरल, दै.प्रात:काल, दै.नगर न्युज या वृत्तपत्रांत जाहिरात प्रसिध्दी देऊन शिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी मे. अनमोल ट्रान्स्पोर्ट, उल्हासनगर यांची न्यूनतम दराची निविदा स्विकारण्यात येऊन स्थायी समिती ठराव क्र.138 दिनांक 20/02/2012 अन्वये मंजूरी दिली. परंतु निविदा एक वर्षाच्या कालावधी करिता मागविलेली असतांना स्थायी समितीने ठेकेदाराच्या विनंतीनुसार त्याच दरात सदर निविदेचा कालावधी 5 वर्षे असा केला. तथापी ठेकेदाराची एका वर्षाची भाडेतत्वावरील वाहने पुरविण्याची सेवा समाधानकारक असल्यास पुढील कालावधीचा *विचार करण्यात येईल व त्यानुसार अनमोल ट्रान्स्पोर्ट यांचा प्रस्ताव मंजूर केला. तसेच* दरवर्षी प्रशासकीय मान्यता घेऊनच मुदतवाढ देण्याचे आयुक्तांनी आदेश दिलेले असल्याचे नस्ती वरून दिसून आले. 2012-13 वर्षात या ठेक्याला मुदतवाढ दिलेली आहे. परंतु आयुक्तांच्या आदेशानुसार प्रशासकीय मान्यता घेतली नसल्याचे नस्तीवरुन निदर्शनास आले.

2) प्रस्तुत भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचा ठेका मे. अनमोल ट्रान्स्पोर्ट यांना वेळोवेळी आवश्यक असलेली वाहने पुरविणे बाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडून कराराकरारनामा करुन निविदा अटी शर्ती क्र 19 नुसार पुरवठा करण्यात येणारी वाहने ही नविन किंवा 2005 नंतरची (म्हणजे 2006 पासून) खरेदी

केलेली असावीत व सर्व वाहनांचे आर.टी.ओ. नियमाप्रमाणे सर्व पेपरची पुर्तता कार्यादेश देतेवेळी करावी असे नमूद करण्यात आले आहे. परंतू ठेकेदाराला कार्यादेश देण्यापुर्वी पुरवठा केलेली वाहने 2005 नंतरची असल्याबाबत खात्री करुन कार्यादेश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अटी व शर्तीचे पालन झाले नाही.

3) निविदा अटी शर्त क्र.20 नुसार निविदा स्विकारल्यानंतर वाहन पुरवठादार ठेकेदाराने वाहनांचे आर.सी.बुक, इन्शुरन्स्, टी-परमीट इत्यादींच्या छायांकित व साक्षांकित प्रती वाहन प्रमुख विभागाकडे सादर करणे बंधनकारक असताना कोणत्याही वाहनांचे अभिलेख उपलब्ध करून दिले नाहीत.

4) वाहन विभाग कार्यालयात पुरवठादाराकडून प्रत्येक महिन्यात कार्यादेश देऊन किती व कोणत्या प्रकारची वाहने ठेक्याने किती दिवसांसाठी मागविण्यात आली व अशा वाहनांचा वापर कोणत्या अधिका-यांनी केला याबाबतचा संपुर्ण तपशील ठेवणे बाबत निविदा अटी व शर्तीनुसार स्वतंत्र नोंदवही ठेवून अशा नोंदी नोंदविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे भाडयाने घेण्यात आलेली वाहने यांचा योग्य वापर झाल्याची खात्री करता येत नाही.

5) मा. आयुक्त यांच्याकडील कार्यालयीन आदेश क्र उमपा/आ.का/163 दि. 27/09/2012 नुसार भाडयाने घेण्यात आलेल्या वाहनांच्या वापराबाबत अधिकारी यांच्यावर निर्बंध घालण्यात आलेले असून त्यानुसार प्रतिमहा 1250 कि.मी. पेक्षा जास्त व प्रति दिवस 12 तासांपेक्षा जास्त वाहन वापर टाळावा तसेच सार्वजनिक सुट्या आणि दुसरा व चौथा शनिवार आणि सर्व रविवार या दिवशी वाहन वापरण्याची आवश्यकता भासल्यास वाहन विभागास पुर्व सुचना देऊन महानगरपालिकेचे वाहन वापरण्यात यावे. तसेच उपआयुक्त व वाहन विभाग प्रमुख यांनी ज्या वाहनाचा वापर जास्त किंवा अयोग्य होत आहे. असे वाटल्यास सदर बाब आयुक्तांच्या निदर्शनास आणावी असे आदेशात स्पष्ट सुचना देण्यात आल्या आहेत. याबाबत भाड्याने घेण्यात आलेली वाहने व ठेकेदारास केलेल्या प्रदानाबाबत काही निवडक महिन्यांतील प्रमाणकांचे लेखापरीक्षण करण्यात आले असता खालीलप्रमाणे 1250 कि.मी. पेक्षा जास्त धाव झालेली वाहने त्या अनुषंगाने ठेकेदारास रुपये 33950/- जादा प्रदान झालेले आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्र. व दिनांक | वाहनाचा प्रकार | प्रतिमहा | प्रत्यक्षात झालेली धाव | ज्यादा झालेली धाव | ज्यादा प्रदान रक्क्म रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | 2813/11.09.12 बील क्र.530 | इंडिका | 1250 | 1477 | 227 | 227 x 7=1589 ज्यादा तास 32 x 35=1120 |
| 2) | 2183/11.09.12 बील क्र.528 | इंडिका | 1250 | 1546 | 296 | 296x7=2072 ज्यादा तास 41x35=1450 |
| 3) | 5141/30.06.13 बील क्र.424 | इंडिका ए.सी. | 1250 | 3140 | 1930 | 1930x7=13510 ज्यादा तास 272x35=9520 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4) | 5147/30.03.13बील क्र.5147/30.03.13 बील क्र. 430 | इंडिका ए.सी. | 1250 | 1872 | 622 | 622 x 7=4354 ज्यादा तास 10 x 35 =350 |
| | | एकूण जादा प्रदान र.33950/- | | | | |

याबाबत अर्धसमास पत्र क्र.52 दि.11/06/2015 अन्वये विचारणा करण्यात आली होती. परंतू त्याचे अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.
आक्षेपाधीन खर्च रु 9123223/-
वसुलपात्र रक्कम रु.33950/-

DATNDMM5801 (Ref No : 66, Hmm No : 52)

## 24 महानगरपालिकेच्या असलेल्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :830-2560 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 4830696.00/-

***वाहनांच्या स्कंद नोंदवहयांमध्ये (log book) लेखा संहितेप्रमाणे नोंदी घेतलेल्या नाहीत. वाहनांची मासिक व वार्षिक सरासरी धाव याबाबत गोषवारा काढण्यात आलेला नाही. लेखा शाखेकडे सादर करण्यात येणारी देयके यांच्या नोंदी वाहन विभागाकडील देयक नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.***

महानगरपालिकेच्या वाहन विभागात 2012-13 या आर्थिक वर्षात जड वाहने 39 तसेच हलकी वाहने 11 अशी एकूण 50 वाहने कार्यरत होती. या वाहनांच्या इंधनासाठी महानगरपालिकेने रक्कम रु.4830696/- एवढा खर्च केलेला असून एकूण इंधनावर झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.
1) महापालिकेने नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 153 नुसार नमुना नं. 127 नुसार प्रत्येक वाहनासाठी ठेवलेल्या स्कंद नोंदवह्या (लॉगबुक) याची तपासणी करण्यात आली असता स्कंद नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवशी वाहन धावलेल्या किलोमीटर्सची संख्या नोंदविण्यात आलेली नाही. प्रवास कोठून कोठपर्यंत झाला याबाबतच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या नाहीत. एकूण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक अशा नोंदी घेण्यात आल्या नाहीत. प्रवासाचे प्रयोजन नोंदविण्यात आलेले नाही. वरील नियम 153

नुसार स्कंद नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

2) वाहनांच्या स्कंद नोंदवहीमध्ये वाहनांची दरमहा एकूण झालेली सरासरी धाव तसेच वार्षिक सरासरी धाव यांचा गोषवारा काढण्यात आलेला नाही. वाहनांचे मॉडेल वर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वाहनाची प्रतिलीटर इंधनामागे किलोमीटर धाव योग्य असल्याची तपासणी करता आली नाही. तसेच वर नमूद केलेला इंधनावरील खर्च रक्कम रु.4830696/- चा योग्य वापर झाल्याची खात्री करता आली नाही.

3) इंधन खर्चासाठी देयके वाहन विभागामार्फत लेखाशाखेकडे पारीत होण्यासाठी सादर केली जातात. परंतु अशा देयकांची नोंद वाहन विभागातील नोंदवहीत घेऊन सादर केली नसल्यामुळे लेखा शाखेकडे झालेला खर्च व प्रत्यक्ष वापरण्यात आलेले इंधन याचा मेळ तपासणीत घेता आला नाही.

अर्धसमास पत्र क्र.65 दि.18/06/2015 अन्वये निर्गमित केले असून त्याचे अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे सदर रक्कम रु 48,30,696/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.48,30,696/-

DATNDMM5801 (Ref No : 67, Hmm No : 65)

## *25 दलित वस्ती अंतर्गत कन्ट्रक्शन ऑफ नाला अँट मिलिंदनगर वार्ड क्र.48 मधील कामास प्रशासकीय मान्यता नसताना काम केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :C-4-31 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 999300.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9930.00/-

***जिल्हाधिकारी ठाणे यांची कामास प्रशासकीय मान्यता नसताना काम केले आहे. त्यामुळे शासन निर्णय दि. 5/3/2002 चे पालन झाले नाही. ठेकेदारास कामाचे बिल विलंबाने प्रदान केले आहे. कामात वापलेल्या गौण खनिज वसुलीची खात्री न करता प्रदान केले आहे. विम्याची रक्कम रु. 9930/- ची वसुली होणे आवश्यक आहे.***

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 9,99,300/-

प्रशासकीय मान्यता:- नाही तांत्रिक मान्यता शहर अभियंता क्र. 2059 दि.3/11/2006

कार्यादेश क्र. 1233 दि. 2/3/2009 कामाची मुदत 6 महिने

ठेकेदार:- शिवअमृत मजूर सहकारी संस्था

कामाचा कालावधी दि. 2/3/2009 ते 14/5/2009

प्रमाणक क्रमांक 3684 दि. 24/12/2012 कामावरील खर्च रु.9,99,300/-

दलित वस्ती अंतर्गत कन्ट्रक्शन ऑफ नाला अँट मिलिंदनगर वार्ड क्र. 48 या कामाची निविदा नस्ती व बिले तपासता प्रशासकीय मान्यता नसताना काम केले आहे. रॉयल्टी वसुली केलेली नाही. काम झाल्यावर विमा काढलेला आहे. ह्या उणीवा निदर्शनास आल्या. अर्धसमास क्र.37 दि.20/5/15 अन्वये खुलासा मागविला असून अनुपालन प्राप्त झाले आहे. ते विचारात घेऊन खालील अभिप्राय नोंदवले आहेत.

1.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. विघयो/102000/1592/प्र.क्र.181/नवीन दि.5/3/2002 मधील नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या मार्गदर्शक तत्वे मधील अ.क्र.7(इ) नुसार प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर काम सुरु करण्यात यावे. परंतु महानगरपालिकेने सदर काम दि.2/3/2009 पासून सुरु केले असून दि.14/5/2009 रोजी काम पूर्ण केले आहे. दलित वस्ती सुधार प्रस्ताव जिल्हाधिकारी ठाणे यांना दि.18/11/2008 रोजी पाठविल्याचे नस्तीत दिसून आले. सदर काम मान्यतेच्या अधीन राहून करण्यात आले आहे. विभागाचे दि. 29/6/15 च्या अनुपालनात प्रशासकीय मान्यतेनंतर काम सुरु केले आहे. परंतु प्रशासकीय मान्यता आदेशाची प्रत सोबत जोडली नाही. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन झाले नाही.

2.2008-09 मध्ये सदर योजनेस रु.7.41 कोटी निधी जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून धनाकर्षाद्वारे प्राप्त झाला आहे. काम दि.14/5/2009 रोजी पूर्ण झाले आहे. असे असताना सदर देयकाचे प्रदान 2012-13 मध्ये केले आहे. एवढ्या विलंबाने बिल खर्ची टाकण्याचा उदेश दिसून आला नाही.

3.कामामध्ये एकूण गौणखनिज साहित्य 281.66 घ.मी. वापरले आहे. त्याची रॉयल्टी भरल्याची खातरजमा व कागदपत्रे तपासणी केली नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मंजूर केलेल्या दरसूचीच्या बेसिक रेटमध्ये मनपाने रॉयल्टीच्या दराचा समावेश केला आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांची अधिसूचना दि. 15/1/2003 व शासन परिपत्रक दि. 11/2/2010 चे पालन झाले नाही. रॉयल्टी भरण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची आहे. असे दि. 29/6/15 च्या पत्रान्वये विभागाने नमूद केले आहे. परंतु दरसूची मध्ये बेसिक रेट मध्ये रॉयल्टी रकमेचा समावेश आहे. त्यामुळे ठेकेदारास रॉयल्टी रकमेसह प्रदान झाले आहे. परंतु सदर रॉयल्टी रकमेचा ठेकेदाराने भरणा केल्याची खात्री न करताच विभागाने ठेकेदारास प्रदान केले आहे. त्यामुळे ठेकेदारास केलेले बिल प्रदान नियमबाहय आहे.

4.कामामध्ये वापरलेल्या साहित्यापैकी 300 व 450 मी.मी. व्यासाचे पाईप, इंटरलॉकिंग ब्लॉक्स, खडी, यांच्या गुणवत्तापूर्व तपासणी अहवाल नाहीत. त्यामुळे कामाची गुणवत्ता राखल्या बाबतची खात्री करता आली नाही.

5.कामाचा कालावधी दि.2/3/2009 ते 14/5/2009 असा आहे. परंतु विमा 21/8/09 ते 20/2/2010 या कालावधीचा काढला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर विमा काढला आहे. ही बाब विभागाने मान्य केलेली आहे. नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन-1018/1357/प्र.क्र166 /98/ नवि-28 दि. 3/11/2003 अन्वये कामाचा व कंत्राटी कामगाराचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही. त्यामुळे अंदाजपत्रक रक्कम रु.9,99,300/- च्या 1% रु. 9930/- विम्याची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.9,99,300/-(कामावरील खर्च )

वसूलपात्र रक्कम रु. 9930/-(विमा )

DATDDZM6901 (Ref No : 75, Hmm No : 37)

## ***26 दलित वस्ती सुधारणा अंतर्गत योजनेवरील प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :C-4-31 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2016519.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3300.00/-

***नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. विघयो/102000/1592/प्र.क्र.181/नवीन दि.5/3/2002 मधील नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार एका वित्तीय वर्षात निधी वितरण करण्याची कमाल मर्यादा 1 कोटी रुपये आहे असे असताना चलन क्र.388 दि.12/7/12 अन्वये रुपये 16,00,000/-रोकडवहीत जमा केले आहेत. मंजुरी आदेश प्राप्त झाले नसल्याने रु.16 लाख रकमेची तपासणी करता आली नाही. तसेच योजनेचे उपयोगितता प्रमाणपत्र तपासले असता रुपये 9475553/-खर्च झाल्याचे प्रमाणपत्र शासनास सादर केले आहे. परंतु प्रत्यक्ष खर्च रु.2016519/- झाला आहे. प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केले आहे. रोकडवहीला स्थूल रक्कमा खर्ची दाखविणे आवश्यक असताना निव्वळ रक्कम खर्ची दाखविल्याने रुपये 311881/- ची तफावत दिसून येते. कामास प्रशासकीय मंजुरी नसताना काम केले आहे. वार्ड क्र.69 मधील योगेश्वर नगर, कृष्णानगरची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे अभिलेख नस्तीत नाहीत.***

दलित वस्ती सुधारणा योजने मधील कामाची निविदा नस्ती, बिले व प्राप्त निधी खर्च उपयोगिता प्रमाणपत्र तपासली असता रोकडवही मध्ये जमा रक्कमेत तफावत, उपयोगिता प्रमाणपत्रात विसंगती, निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त निधी जमा, तसेच प्रशासकीय मान्यता नसताना काम करणे अशा उणीवा निदर्शनास आल्या. याबाबत अर्धसमास क्र. 40 दि. 27/5/2015 चे अनुपालन प्राप्त झाले आहे. ते विचारात घेऊन खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1.जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र/सामान्य/टे-3 कावि-2 / नप /48004/ 2012 दि. 6/11/2012 नुसार रुपये 9991445/- चे कामाचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत त्यासाठी 1 कोटी निधी प्राप्त झाला असून त्याची जमा नोंद चलन क्र.393 दि.20/06/2012 अन्वये रोकडवहीत घेतली आहे. परंतु 2012-13 मध्ये रु.2016519/- खर्च झाला आहे. ही बाब विभागाने दि. 29/6/15 च्या अनुपालनाद्वारे मान्य केली आहे. परंतु सदर योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र तपासले असता रुपये 9475553/- प्रत्यक्ष खर्च झाला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र मुख्य लेखाअधिकारी यांचे पत्र क्र.उमपा/साबावि/शअ/-दि. निरंक अन्वये शासनास सादर केले आहे.

प्रत्यक्ष खर्चापेक्षा रुपये 7459034/- जास्त रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केले आहे.

2.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. विघयो/102000/1592/प्र.क्र.181/नवीन दि.5/3/2002 मधील नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार एका वित्तीय वर्षात निधी वितरण करण्याची कमाल मर्यादा 1 कोटी रुपये आहे. असे असताना चलन क्र.388 दि.12/7/12 अन्वये रुपये 16,00,000/-रोकडवहीत जमा केले आहेत. त्याचे मंजुरी आदेश प्राप्त झाले नसल्याने रु.16 लाख रकमेची तपासणी करता आली नाही.

3.एप्रिल-2012 ची सुरुवातीची शिल्लक रु.10,46,356/- असून 2012-13 मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचे आदेश क्र.सामान्य/कक्ष-3/टे-3/नपा/कावि/-48004/2012 दि.8/11/2012 अन्वये रुपये 1 कोटी प्राप्त झाले आहेत. व चलन क्र.388 दि.12/7/12 अन्वये रुपये 16,00,000/- cash book जमा केले आहेत. मागील शिल्लक धरून एकूण रु.1,26,46,356/- प्राप्त झाल्याचे रोकडवही मध्ये दिसून येते. कामाचे प्रस्ताव व निधी मंजूर असूनही फक्त रु.20,16,519/- खर्च केला आहे. सदर योजनेवर फक्त 2012-13 मध्ये 10 ते 11 टक्के खर्च केला आहे. त्यामुळे योजनेचा उदेश सफल झाला नाही.

4.रोकडवहीला स्थूल रक्कमा खर्ची दाखविणे आवश्यक असताना निव्वळ रक्कम खर्ची दाखविली आहे. खर्चामध्ये शासकीय वसुल्या उदा. मूल्यवर्धित कर, आयकर, कामगार कल्याण उपकर यांची रक्कम हिशोबात घेतली नाही. त्यामुळे cash book मध्ये रु, 3,11,881/- ची तफावत दिसून येते. तसेच सदर योजनेचे बँक पासबुक तपासणीसाठी मागणी करूनही प्राप्त झाले नाही. सदर बाब लेखा विभागाशी निगडीत असल्याचे विभागाचे म्हणणे आहे. असे अनुपालनात नमूद केले आहे.

5. प्रमाणक क्र. 4407 दि.12/3/13 रु.3,30,000/- ( कामाचे नाव:-योगेश्वरनगर कृष्णानगर वार्ड क्र. 59 मधील पँसेज पेव्हींग ब्लॉक्स व ड्रेनेजचे काम)

अ) जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र. सामान्य/कक्ष-3/टे-2/नप/कावि-48004/2012 दि. 6/11/2012 नुसार रु. 99,91,445/- चे कामाचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. त्यामध्ये सदर कामाचा उल्लेख नाही. विभागाने प्रशासकीय मान्यता प्राप्ती नंतरच काम करणे आवश्यक होते. परंतु त्याचे पालन झाले नाही. कामास प्रशासकीय मान्यता नसताना कामाचे बिल प्रदान केले आहे. ही वित्तीय अनियमितता आहे.

ब) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. विघयो/102000/1592/प्र.क्र.181/नवीन दि.5/3/2002 मधील तरतुदी नुसार कामाच्या ठिकाणची जागा ही मनपाच्या मालकीची असल्याबाबतची नोंद मालमत्ता नोंदवहीत नाही. तसेच प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्त क्र.8 नुसार जागा ताब्यात आल्या शिवाय कार्यादेश देऊ नये. परंतु त्याची खात्री न करता कामाचे आदेश दिले आहेत. जागा मनपाच्या मालकीची असल्याचे विभागाने खुलाशात नमूद केले आहे. परंतु त्याबाबत कागदपत्रे सोबत जोडली नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

क) पंचशील मजूर सहकारी संस्था लि. यांच्या देयकातून 4% मूल्यवर्धित कर कपात केलेला आहे. विक्रीकर विभाग यांची अधिसूचना क्र. 22 दि. 4 एप्रिल-12 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 5% मूल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक होते. परंतु 4% वसुली केल्याने 1% कमी वसुलीची रक्कम रु. 3300/- वसूलपात्र आहे.

6.कामात वापरलेले सिमेंट पाईप, खडी, पेव्हिंग ब्लॉक्स, एम-10 कॉक्रीट चे गुणवत्तापूर्ण तपासणी अहवाल नाहीत. अनुपालनात सदर साहित्याचे परिमाण कमी असल्याने तपासणी केली नाही. असे केलेले अनुपालन

योग्य नाही. तरी काम गुणवत्तापूर्ण झाल्याची खात्री करता आली नाही.

7.प्रमाणक क्र. 4407 व 4735 च्या देयकातील एकूण गौण खनिज साहित्य 403.10 घ. मी. इतके परिमाण वापरले आहे. त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाही. तसेच 2009-10 ची दरसूची बनविताना बेसिक रेट मध्ये रॉयल्टीचा समावेश केला आहे. रॉयल्टी भरण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची आहे. असे दि. 29/6/15 च्या पत्रान्वये नमूद केले आहे. परंतु दरसूची मध्ये बेसिक रेट मध्ये रॉयल्टी समावेश आहे. त्याची वसुली झाल्याबाबत खात्री करून विभागाने प्रदान करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांची अधिसूचना दि.15/1/2003 व शासन परिपत्रक दि.10/2/2010 चे पालन केले नाही. (403.10 x70.67 =28487) त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

8.प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्त क्र.5 नुसार काम सुरु करणे पूर्वी व काम पूर्ण झाले नंतर छायाचित्र काढावयाची आहेत. परंतु त्याचे पालन झालेले नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 2016519/--

वसूलपात्र रक्कम रु.3300/-

DATDDZM6901 (Ref No : 76, Hmm No : 40)

## *27 सुवर्ण जयंती योजनेच्या पुस्तकामधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :219-3229 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 82000.00/-

***सुवर्ण जयंती योजनेच्या पुस्तकामधील जमा व खर्चाच्या नोंदी वेळच्या वेळी घेतलेल्या नाहीत. तसेच ज्या दिवशी धनादेशाची रक्कम बँकेतून प्रदान केलेली आहे त्या दिवशी रोकड वहीत नोंदविलेली आहे त्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्रमांक 32 चे पालन झालेले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेस राज्य शासनाकडून शहरी विकास नेटवर्क कार्यक्रम महिला व बालके विकास गट डाक्वा गट स्वयंरोजगार योजना इत्यादी योजनेसाठी 2012-13 पर्यंत प्राप्त झालेल्या अनुदानाचे रुपये 5362454 रकमेचे व रुपये 2295000 खर्चाचे लेखापरीक्षण केले असता रोखीच्या पुस्तकामध्ये खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1.रोखीच्या पुस्तकाची तपासणी केली असता राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या रु. 5362454/- निधीची नोंद घेताना निधी कधी प्राप्त झाला त्याचे आदेश /पत्र क्रमांक नमूद केलेला नाही

2.रोखीच्या पुस्तकामध्ये (Cash book)प्रत्येक महिन्याची शेवटच्या दिवशी शिल्लक रकमेचा शेरा व प्रत्येक योजनेची शिल्लक रकमेचा गोषवारा काढण्यात आलेला नाही. रोख पुस्तकातील शिल्लक व बँक पासबुका मध्ये शिल्लक रक्कम याचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही त्यामुळे बँक व रोखीच्या पुस्तकामध्ये शिल्लक रकमेबाबतच्या फरकाची खातरजमा करता आलेली नाही

3.रोखीच्या पुस्तकामध्ये खर्च झालेल्या रक्कम रुपये 1909000/- च्या देयकास प्रमाणक क्रमांक देण्यात आलेले नाही.

4.रोखीच्या पुस्तकामध्ये प्रत्येक जमा व खर्चाच्या रकमावर सक्षम अधिकारी यांची दिनांकीत सही घेण्यात आलेली नाही

5.महानगरपालिकेकडून सुवर्ण जयंती या योजनेवर 2012 -13 या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या 2295000 खर्चाचा बँक खात्याशी ताळमेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे तफावती बाबत खातरजमा करण्यात आलेली नाही.

6.महानगरपालिकेकडून खर्चाच्या रकमेचे प्रदान ज्या दिवशी धनादेशाव्दारे करण्यात आले आहे त्या दिवशी रोखीच्या पुस्तकामध्ये नोंदी न घेता बँक खात्यामधून धनादेशाची रक्कम ज्या दिवशी खर्चा पडली त्या दिवशी रोखीच्या पुस्तकामध्ये नोंद घेतली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रदान केलेल्याचे नाव | धनादेश क्र.दिनांक | धनादेशाची रक्कम रु. | रोखीच्या पुस्तका मध्ये नोंद घेण्यात आलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती ललिता कांबळे | 622678 दि 17/7/12 | 19500 | 25/9/12 |
| 2 | श्रीमती वसुंधरा जामगडे | 622679 दि 23/8/12 | 18300 | 28/8/12 |
| 3 | श्रीमती संजीवनी असरोडकर | 622686 दि.7/11/12 | 5900 | 12/5/12 |
| 4 | श्रीमती संजीवनी असरोडकर | 622687 दि.7/11/12 | 5700 | 6/12/12 |
| 5 | श्रीमती ललिता कांबळे | 622688 दि.7/11/12 | 6500 | 7/12/12 |
| 6 | श्रीमती वसुंधरा जामगडे | 622689 दि.7/11/12 | 6100 | 8/12/12 |
| 7 | संघमित्र महिला बचत गट | 622682 दि.7/11/12 | 10000 | 29/10/12 |
| 8 | जयसदगुरू महिला बचत गट | 622683 दि.7/11/12 | 10000 | 30 /10/12 |

वरील नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्रमांक 39 नुसार रोखवही मध्ये दररोजच्या नोंदी घेणे व बँकेमधील शिल्लक रकमे बरोबर ताळमेळ घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही या बाबत अर्धसमास पत्र क्र 5 दिनांक 23/3/2015 नुसार कळविण्यात आले असून अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आक्षेप कायम आहे.

DATASMM5901 (Ref No : 10, Hmm No : 05)

## *28 महापालिका अनुदानीत शाळेतील विदयार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडा साहीत्य वाटप करणे खरेदीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 09**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 234600.00/-

***क्रिडा साहीत्य खरेदीकरीता मागणीपत्र किंवा प्रस्ताव लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध झालेली नाही. तसेच स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली नाही. अंदाजीत किंमत व मालाचा दर्जा बाजारभावानूसार योग्य असलेबाबत अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. साहीत्य ताब्यात दिल्याबाबत शाळेतील मुख्याध्यापकांची स्वाक्षरी शिक्यासह अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनुदानीत शाळेच्या विदयार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडा साहीत्य वाटप करणे खरेदीच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.10,00,000/- करीता दै.कलश, दै.मुंबई लक्षदिप या वर्तमानपत्रात निवीदा जाहीरात दिली असता मे.माऊंटमेरी एन्टरप्रायझेज, मे.मोहीत एन्टरप्रायझेज, मे. जे.पी. एन्टरप्रायझेज व मे.मोहीनी एन्टरप्रायझेज या चार निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. यापैकी भाला या क्रिडा साहीत्याचा दर मे. जे.पी. एन्टरप्रायझेज यांच्या दरपत्रकात लघुत्तम असल्याने सदर साहीत्य पुरवठा करणेचा आदेश मे.जे.पी.एन्टरप्रायझेज यांना कार्यादेश क्र.403 दि.31/03/2011 अन्वये मालाचा पुरवठा 10 दिवसात करण्याच्या अटीवर देण्यात आला.

कंत्राटदाराचे नाव- मे. जे.पी.कॉम्पुटर व एन्टरप्रायझेज

प्रमाणक क्रमांक 4872 दि.18/03/2013 रु. 2,34,600/-

क्रिडा साहित्य खरेदी कामाची नस्ती तपासली असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास क्र. 9 दि.30/03/2015 अन्वये खुलासा मागविला असता अनुपालन अप्राप्त आहे. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महापालिका अनुदानीत शाळेतील विदयार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडा साहित्य वाटप करणेकरीता क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती, उल्हासनगर महानगरपालिका यांचे मागणीपत्र किंवा प्रस्ताव तसेच स्थायी समितीची मंजूरी याबाबतचे अभिलेख/नस्ती लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे खरेदीचे परिमाण/निकड याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

2) भाला स्टँडर्ड साईझ (काठीसह) 600 नगाची मागणी व त्याची अंदाजीत किंमत रु.400/-प्रती नग ज्या आधारे निश्चित करण्यात आली, त्याचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे 600 नगाची मागणी व अंदाजीत दराची निश्चिती, मालाचा दर्जा व अंदाजीत किंमत बाजारभावानूसार योग्य असलेबाबतची सत्यता पडताळणी करता आली नाही.

3) निविदाकारांच्या तांत्रिक कागदपत्रांच्या तुलनात्मक तक्त्यावर उपायुक्त (मुख्यालय), मुख्य लेखाधिकारी,

मुख्य लेखापरीक्षक व आयुक्त यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

4) भांडार विभाग अधिकारी यांनी उपायुक्त (मुख्या.), मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरीक्षक यांचे समक्ष निवीदाकारांशी वाटाघाटी करणे आवश्यक असतांना त्यांचे अपरोक्ष केल्याचे भांडार विभागाच्या दि.22/02/2011 च्या टिपणीवरून दिसून आले आहे. निविदा प्रक्रिया पारदर्शक झाली नाही.

5) 2009-10 मध्ये शाळांना यापुर्वी साहीत्य वाटप करण्यात आल्याचे भांडार अधिकारी यांचे अभिप्रायावरून दिसून येते. परंतू पूर्वी केलेल्या खरेदीचा तपशिल व साठा नोंदवही इ. अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे पुर्वीचा साठा शिल्लक असतांना देखील अनावश्यक खरेदी करण्यात आली किंवा कसे त्याचप्रमाणे पुर्वीचा साठा संग्रही योग्य रीत्या ठेवण्यात आला किंवा कसे याबाबतची पडताळणी करता आली नाही.

6) निवीदा अटी व शर्तीमधील अट क्र.1 (ड) नूसार 2009-10 आर्थिक वर्षाअखेर भरणा केलेले आयकर चलनाची साक्षांकीत प्रत तांत्रिक कागदपत्रांसोबत सादर करणे आवश्यक असताना ॲसेसमेंट वर्ष 2009-10 कालावधीच्या चलनाची छायांकीत प्रत जोडण्यात आलेली आहे. यामुळे निविदा अटी व शर्तीचा भंग झाला आहे.

7) मे. जे.पी.कॉम्पुटर व एन्टरप्रायझेज या कंत्राटदाराचे आयकर चलन, व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र व मुंबई दुकाने व संस्था अधिनियम-1948 या तिन्ही प्रमाणपत्रांवरील पत्यात तफावत आहे. त्यामुळे कंत्राटदाराच्या व सादर प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत साक्षंकता निर्माण होते.

8) कार्यादेश क्र. 403 दि.31/03/2011 नूसार कंत्राटदारास मालाचा पुरवठा करणेचे आदेश देण्यात आले. करारनाम्यातील अट क्र. 4 नुसार मालाचा पुरवठा करारनाम्यानंतर 10 दिवसात करणेचे आवश्यक आहे. साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मालाचा पुरवठा 10 दिवसात झाली किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

9) कार्यादेशातील अट क्र.4 नुसार साहित्य ताब्यात दिल्याबाबत शाळेतील मुख्याध्यापकांची स्वाक्षरी शिक्यासह घेण्याची जबाबदारी पुरवठादाराची आहे. त्याची पोच नस्तीत नाही. त्यामुळे साहित्य मिळाल्याची खात्री करता आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 15, Hmm No : 09)

## *29 मनपा शाळेतील विद्यार्थ्यासाठी मे. जे.पी. कॉम्प्युटर यांचे कडून केलेल्या भाला खरेदीतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :110-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 234600.00/-

| |
|---|
| ***क्रिडा साहित्य विक्रीबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना मे. जे.पी. कॉम्प्युटर यांचे कडून 600 नग भाला*** |

***(स्टॅन्डरर्ड साईझ काठीसह) खरेदी करण्यात आलेले आहेत. निविदा जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात देण्यात आली आहे. निविदा मागविण्यापूर्वी बाजारभावाच्या दराबाबतची खात्री केलेली नाही.***

भांडार विभागाने मनपा शाळेतील विध्यार्थ्यासाठी 2011-12 मध्ये मे. जे.पी. कॉम्पुटर यांचे कडून 600 नग भाला (स्टॅन्डरर्ड साईझ काठीसह) खरेदी केले आहेत. सदर भाला खरेदीचे रु.234600/-चे प्रदान 2012-13 मध्ये प्रमाणक क्रमांक 4872 दिनांक 18/03/2013 अन्वये करण्यात आलेले आहे. वरील खरेदीतील अनियमितता बाबत अर्धसमास क्र.90 दि.13/07/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. विभागाचे अनुपालन प्राप्त झाले नाही. तरी सदर बाबत लेखा परीक्षणाचे खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर खरेदीबाबतची निविदा जाहिरात ही स्थानिक वृत्तपत्र दैनिक अमृत कलश व दैनिक मुंबई लक्षदीप या वर्तमान पत्रात दिनांक 7/01/11 व 8/01/2011रोजी रु.10 लक्ष अंदाजित खर्चासाठी प्रसिद्ध केलेली आहे. तथापि उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32 यांचा शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 अन्वये निविदा संबधी जाहिरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णय दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8.1 अन्वये खरेदी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे व वार्षिक खरेदी रु.50000/-पेक्षा जास्त असेल तर निविदा चौकशी राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्याचे महानगरपालिकेकडून पालन झालेले नाही.

2) निविदा सूचनेतील अट अ मधील क्र. 1 (ब) नुसार निविदाकाराकडे खरेदी करण्यात येणाऱ्या मालाचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तथापि मंजूर करण्यात आलेल्या निविदाकाराकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणीपत्र हे ऑफिस म्हणून नोंदलेले आहे. क्रिडा साहित्य विक्रीबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना मे. जे.पी. कॉम्प्युटर यांची निविदा पात्र ठरविली असून त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे केलेली निविदा प्रक्रिया चुकीची आहे. तसेच अट ब मधील क्र. 1 (ड) नुसार निविदाकाराकडे आयकर भरणा केलेले चलन असणे जरुरी आहे. तथापि वरील पुरवठादाराकडे दुकान किंवा संस्थेच्या नावे आयकर भरणा केलेले चलन नसून जयप्रकाश शहदादपुरी असे पर्सनल नावाने चलन सादर केलेले आहे. सदरहू बाब अट क्र. 1 (ड) चे उल्लंघन करणारी आहे.

3) निविदा मागविण्यापूर्वी बाजारभावाच्या दरा बाबत खात्री करणेसाठी बाजारातून संबंधित वस्तूचे दर मागवून त्यानुसार अंदाजे खर्च निश्चित करणे आवश्यक आहे परंतु तसे दरपत्रक मागवून कार्यवाही केल्याचे नस्तीत दिसून आले नाही. त्यामुळे पुरवठादाराचे दर मान्य करतांना सदर दर बाजारभावानुसार वाजवी असल्याची खात्री केली असल्याचे दिसून आले नाही.

4) करारनामा व पुरवठा आदेशात नमूद केलेल्या वस्तू पुरवठ्याच्या कालावधीत विसंगती दिसून आली आहे. करारनाम्यात मालाचा पुरवठा करारनाम्यानंतर 15 दिवसात करण्यात येईल असे नमूद आहे तथापि कार्यआदेशात पुरवठा 10 दिवसात करावा असे नमूद आहे. तसेच उशिराने केलेल्या पुरवठ्या बाबत दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

5) पुरवठादारास आदेश क्र.403 दि.31/03/2011 अन्वये पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. पुरवठा कार्यादेशानुसार मालाचा पुरवठा 10 दिवसात करणे आवश्यक आहे. तथापि मालाचा पुरवठा केल्या बाबत चलनावर माल प्राप्त झाल्याचा दिनांक नोंद नाही. भांडार विभागाच्या नोंदवहीत माल/साहित्य दि. 31/01/2012 रोजी मिळाल्याची नोंद आहे त्यामुळे माल विहित मुदतीत प्राप्त झालेला दिसून येत नाही. तसेच माल उशिरा प्राप्त होऊनही पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करून दंड वसूल केलेला नाही. तसेच शाळांना वस्तू (भाले) पुरवल्याबद्दल प्रत्येक शाळेची पोहोच घेतलेली नस्तीत/ नोंदवहीत आढळून आलेली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रुपये 234600/-

TRTARCM6001 (Ref No : 49, Hmm No : 75)

## *30 प्रलंबित अंतर्गत लेखापरीक्षण तसेच प्रलंबित आक्षेपा बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :A-28 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अंतर्गत लेखा परीक्षण सन 2009-10 वर्षापासून केले नाही. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधिल कलम 106 चे पालन झाले नाही.***

1.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 9 चे कलम 106(3) अन्वये प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यावर मुख्य लेखापरीक्षकाने मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तसेच कलम 106 (4) प्रमाणे आयुक्तांने उक्त अहवाल छापून त्याची प्रत प्रशासन अहवालाच्या व लेखा विवरण पत्राच्या छापील प्रतिसह प्रत्येक पालिका सदस्यास पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे अशी तरतूद आहे परंतु उल्हासनगर महानगरपालिकेने सन 2009-2010 पासूनचे मागील वर्षाच्या लेख्यावरील अहवाल स्थायी समितीस सदर करण्यात आलेले नाहीत परिणामी मागील

लेख्यातील अनियमितता व अन्य बाबी स्थायी समितीच्या निदर्शनास आणलेल्या नाहीत तसेच विभागाचे पत्र क्र. दि. निरंक अन्वये अहवाल सादर केला नसल्याचे कळविले आहे त्यामुळे कलम 106(3) चे पालन झाले नाही.

2. 2009-10 ते 2013 पर्यंतच्या कालावधीचे अंतर्गत लेखा परीक्षण सुरु असल्याचे विभागाने अनुपालनात नमूद केले आहे. परंतु लेखापरीक्षण अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने त्याबाबत खात्री करता आली नाही.

3) 2012-2013 वर्षाच्या लेखापरीक्षणाच्या वेळी महानगरपालीकेच्या अंतर्गत लेखापरीक्षण विभागाने उपलब्ध केलेले दस्त ऐवज पहाता खालील प्रमाणे लेखाआक्षेप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहेत.

| अक्र. | लेखापरीक्षण विभाग | लेखापरीक्षण वर्ष | एकूण आक्षेप | निकाली काढलेले आक्षेप | शिल्लक आक्षेप |
|---|---|---|---|---|---|
| 1 | स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग | 1960 ते1995-96 | 1001 | 287 | 714 |
| 2 | महालेखापाल मुंबई | 1997ते 2012 | 114 | - | 114 |
| 3 | स्थानिक निधी लेखा परीक्षा (मनपालेप) | 2011-2012 | 171 | - | 171 |

4) महालेखापाल यांचेकडील आक्षेपा व्यतिरीक्त आक्षेपांची नोंदवही ठेवणेत आलेली नाही.
2011-12 मध्ये लेखा आक्षेप नोंदवून देखील 2012-13 या वर्षात वरील एकाही आक्षेपांचा निपटारा केलेला नाही.

DATRVVM5901 (Ref No : 32, Hmm No : 04)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *31 परीभाषित अंशदान निवृतीवेतन योजनेच्या अंमलबजावणी व लेख्यातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :A-28 मनपा फंड निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 374421.00/-

***परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या लेख्यातील अनियमितता तसेच जमा रक्कम दिर्घ मुदती करिता गुंतवणूक न केल्याने महानगरपालिकेस मिळणाऱ्या व्याजाचे रु.374421/- चे नुकसान झाले आहे.***

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक अनियो/005/126/सेवा 4 मंत्रालय मुंबई दिनांक 31/10/2005 नुसार शासन सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्याना केंद्र शासनाच्या धर्तीवर परीभाषित अंशदान निवृतीवेतन योजना लागू करण्यात आली आहे त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या 479 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत माहे मे 2012 पासून परीभाषित अंशदान निवृतीवेतन योजना लागू करण्यात आली असल्याचे वेतन देयके तपासणी करताना दिसून आले. या योजनेच्या लेख्यांची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत

1) सदरची योजना उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याना लागू करणे बाबत महासभा /स्थायी समिती ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

2) सदर योजनेच्या वर्गणी जमा व भरणा अंशदान रकमां करीता रोकडवही ठेवण्यात आलेली नाही.

3) दिनांक 31/10/2005 च्या शासन निर्णयातील परीच्छेद क्र.3 (इ) प्रमाणे सदर योजनेची अंशदाने व गुंतवणूकी वरील प्राप्तीच्या रकमा आहरीत करता न येण्याजोगा (Non Withdrawable) असल्याने सदर योजनेच्या प्राप्त रकमा तात्काळ दीर्घ मुदती पर्यंत गुंतवणूक करणे आवश्यक आहे.तथापि उल्हासनगर महानगरपालिकेने वसूल करण्यात आलेल्या अंशदानाच्या रकमा रु. 12779363/- वेळीच दीर्घ मुदती करीता गुंतवणूक न केल्याने महानगरपालिकेस मिळणाऱ्या व्याजाचे रुपये 374421/-चे नुकसान झाले आहे.

| अ.क्र | प्राप्त दिनांक | रक्कम | गुंतवणूकीचा दिनांक | गुंतवणूककेलेला दिनांक | व्याज (अंदाजित 9%) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 14/09/2012 | 713346 | 13/03/2013 | 180 दिवस | 32011/- |
| 2 | 4/10/2012 | 721398 | 13/03/2013 | 160 दिवस | 28737/- |
| 3 | 18/10/2012 | 5808834 | 13/03/2013 | 146 दिवस | 210897/- |
| 4 | 21/11/2012 | 1461112 | 13/03/2013 | 103 दिवस | 37211/- |
| 5 | 20/12/2012 | 772646 | 13/03/2013 | 83 दिवस | 15813/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 5/1/2013 | 1806588 | 13/03/2013 | 67 दिवस | 29846/- |
| 7 | 18/1/2013 | 1495039 | 13/03/2013 | 54 दिवस | 19906/- |
| | | | | एकूण रक्कम | 374421/- |

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखांसहिता 2011 मधील नमुना क्रमांक 100 प्रमाणे( भविष्य निर्वाह निधी दिवस पुस्तिके सारखी) नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता 2011 मधील नियम क्रमांक 98 प्रमाणे योजनेकरीता खाते नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 2011 मधील नमुना क्रमांक 99 प्रमाणे बृहतपत्रक ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही

DATRVVM5901 (Ref No : 31, Hmm No : 41)

## *32 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर परतफेड केलेले व थकीत असलेल्या कर्जाच्या रकमेची विवरणपत्रे शासनास सादर केली नाहीत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :100-3213 म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***2012-13 या आर्थिक वर्षाअखेर परतफेडीची व थकीत रक्कम असलेल्या कर्जाच्या रकमेची विवरणपत्रे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील कलम 126(2) नुसार सादर करणे आवश्यक आहे. परंतु शासनास सादर केली नाहीत. त्यामुळे अधिनियमाचे पालन झाले नाही.***

महानगरपालिकेने घेतलेले कर्ज व त्यावर्षात फेडलेले कर्ज याबाबतचे नोंदवहीची तपासणी केली असता शिल्लक कर्जाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटीत )

| अ.क्र | कर्जाचा तपशील | कर्जाचे प्रयोजन | 31/03/2013 अखेर पर्यंतची शिल्लक रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र जिवन प्राधीकरण (ओ एम बी) | भुयारी गटार | 920 |
| 2 | महाराष्ट्र जिवन प्राधीकरण (ओ एम बी) | पाणीपुरवठा योजना | 765 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | महाराष्ट्र जिवन प्राधीकरण(एल आय सी) | पाणीपुरवठा योजना | 66 |
| | | एकूण | 1751 |

2012-13 या वर्षाचे सुरुवातीस शिल्लक कर्ज रुपये 1871 कोटी असून 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कर्जाची रक्कम रुपये 120 कोटी व त्यावरील व्याजाची रक्कम रु.109 कोटीची परतफेड करण्यात आलेली आहे. दि.31/03/2013 अखेर 1751 कोटी कर्ज शिल्लक आहे. याबाबतची विवरणपत्रे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील कलम 126(2) नुसार प्रत्येक वर्षाच्या शेवटी तयार करून महानगरपालिकेच्या बैठकीत ठेवणे आवश्यक आहे. मंजुरी नंतर ती शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करून त्यच्या प्रती राज्यशासन व महालेखापाल मुंबई याना पाठविणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 125 दिनांक 11/08/2015 नुसार कळविण्यात आले आहे. त्याबाबत अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे..

DATASMM5901 (Ref No : 104, Hmm No : 125)

## *33 बांधकाम विभागातील प्रभाग क्र. 52 मधील आर.के. कम्पाउंड जवळ 4 शीटचे शौचालय बांधणे कामाचे प्रदानातील अनियमितता*

**महानगरपालिका फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :210-2433 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 440000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8800.00/-

***महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम-2002 व विक्रीकर विभाग मुंबई यांची अधिसूचना क्र. 22 दि.04/04/2012 अन्वये अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 5% vat वसूल करणे आवश्यक होते परंतु ठेकेदार मेसर्स रविराज मजूर का. स. संस्था यांचे कडून प्र.क्र.52 मधिल आर.के. कम्पाउंड जवळ 4 शीटचे शौचालय बांधणे बाबतचे कामाचे देयकातून मूल्यवर्धित कर 1% कमी वसूल केलेला आहे.प्राकलानातील वाढीव बाबीकरिता कार्यकारी अभियंता यांची मंजुरी घेतलेली नाही. तसेच कामगारांचा विमा उतरविलेला नाही.***

ठेकेदाराचे नाव : रविराज मजूर का. स. संस्था

डी.डी.आर.काम वाटप आदेश क्र. : 5654 दि. 14/02/2011

कामाचा कार्यादेश : 2658 दि. 25/02/2011

कामाचा कालावधी : 90 दिवस काम पूर्ण झाल्याचा दिनांक : 18/04/2011

प्रमाणक क्र. 4824 दि. 15-03-2013 रु.440000/-

प्रमाणक क्र.4824 दि.15/03/2013 रु.440000/- तपासले असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) प्रदान देयक प्रमाणक क्र.4824 दि.15/03/2013 रु.440000/- वर महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम-2002 व विक्रीकर विभाग मुंबई यांची अधिसूचना क्र. 22 दि.04/04/2012 अन्वये अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 5% vat वसूल करणे आवश्यक असतांना 4% दराने वसुली केलेली आहे. त्यामुळे ठेकेदाराकडून 1% VAT रु. 4400/- वसूल करणे आवश्यक आहे.

2) निविदा मंजुरी नुसार कामाची प्राकलन रक्कम व कामाचा कार्यादेश रक्कम रु.399956/- असून एकूण कामाचा खर्च रु. 440000/- म्हणजेच 10% वाढ करून देण्यात आलेला आहे. परंतु रक्कम वाढी बाबतची सबळ कारणे नस्तीत नमूद नाहीत.

3) कामाचा कार्यादेश व खर्चाची तरतूद 2011-2012 मधिल आहे तथापि प्रत्यक्ष प्रदान हे 2012-2013 च्या तरतुदीतून केलेली आहे. स्पील ओव्हर कामासाठी तरतूद अर्थसंकल्पामध्ये समविष्ट नाही.

4) कामात गौणखनिज साहित्य 37.14 घ.मि. इतके वापरले आहे. परंतु त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही.अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांची अधिसूचना दि. 15/01/2003 व शासन परिपत्रकदि. 11/02/2010 चे पालन केलेले नाही.(37.14 * 70.67 = 2625) सदर तरतुदीचे पालन न करता ठेकेदारास देयक प्रदान केलेले आहे. हे नियमबाह्य आहे.

5)महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-32 दि. 3-11-2003 नुसार ठेकेदाराने कंत्राट कामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली उतरविणे आवश्यक आहे.तथापि सदरहू प्रकरणात फक्त कंत्राट कामाचा विमा उतरविलेला आहे. कंत्राटी कामगारांचा विमा उतरविल्या बाबतचे पेपर्स नस्तीत नाहीत. तरी 1% रक्कम रु. 4400/ ठेकेदाराकडून वसूल केल्याचे अभिलेख नाहीत.

6) मटेरीअल तपासणी अहवाल फक्त M 20 RCC BEAM मध्ये घेतलेला आहे. परंतु पेव्हर ब्लॉक 60 MM या बाबींचा तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

7) मोजमाप पुस्तिकेतील खालील काही बाबींचे परिमाण हे प्राकलनातील परिमाणापेक्षा 1 25% पेक्षा जास्त झालेले आहे. बाबींचे परिमाण वाढीची कारणे नमूद केलेली नाहीत. सदर काम करण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांची पूर्व मान्यता घेतली नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 नुसार मान्यता घेतली नसताना बिलप्रदान करणे हे नियमबाह्य आहे. त्यामुळे ठेकेदारास मंजूर प्राकलन रक्कमेपेक्षा रु.23356/- चे जादा प्रदान केलेले आहे.

| अ.क्र. | बाब व तपशिल | प्राकलनतील परिमाण | प्रदान दर रु. | मोजमाप पुस्तकातीलपरिमाण | प्रदान रक्कम रु. | देय रक्कम रु. | अतिप्रदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | पी 2nd cl BB Masonary cm 1.6 Foundation | 6.61 घ.मि. | 2996 घ.मि. | 13.22 | 39608 | 19804 | 19804 |
| 15 | पी/12 mm cementplaster with Neru | 18.90 | 127.24 | 46.82 | 5957 | 2405 | 3552 |
| | | | | | | एकूण | 23356/- |

वरील अनियमितते बाबत विभागास अर्ध समास क्र. 32 दि. 27/04/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. विभागाने पत्र क्र.71 दिनांक 29/06/2015 अन्वये खुलासा सादर केलेला आहे तथापि वसूलपात्र रक्कम वसूल झालेली नसल्यामुळे व इतर बाबींचा खुलासा सयुंक्तिक नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.440000/-

वसूलपात्र रक्कम रु. 8800/-

TRTARCM6001 (Ref No : 6, Hmm No : 32)

## *34 बांधकाम विभागातील ठेकेदारांची देयके प्रदान करतांना मूल्यवर्धित कर कमी व विमा रक्कम वसूल न केल्याबाबत*

**महानगरपालिका फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :210-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 68489.00/-

***महानगरपालिकेतील बांधकाम विभागातील ठेकेदारांची देयके प्रदान करतांना काही देयकांमधून महाराष्ट्र मुल्यवर्धित कर हा 5% ऐवजी 4% दराने वसूल केलेला आहे. तसेच 4 प्रकरणात ठेकेदाराने कामाचा विमा काढलेला नाही. विमा रक्कम रु.12351/- देयकातून वसूल केलेली नाही.***

1) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 व विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसूचना क्रमांक 22 दि. 4 एप्रिल 2012 अन्वये महाराष्ट्र मुल्यवर्धित कर हा (VAT)हा दिनांक 1 एप्रिल 2012 पासून 4 % ऐवजी 5% करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेतील बांधकाम विभागातील ठेकेदारांची प्रदान देयके व प्रमाणके तपासली असता खालील प्रदान देयकांमधून महाराष्ट्र मुल्यवर्धित कर हा 5% ऐवजी 4% दराने वसूल

केलेला आहे. तरी खालील ठेकेदाराकडून 1% कमी वसूल केलेला मुल्यवर्धित कर वसुलपात्र आहे. सदरहू त्रुटी बाबत विभागास अर्ध समास क्र.34 दि.12/05/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे.विभागाने दि. 04/06/2015 अन्वये खुलासा दिलेला आहे परंतु वसुली बाबत कार्यवाही झालेली नाही.

ठेकेदाराकडून वसुलपात्र मूल्यवर्धित कराचा तक्ता

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | प्रमाणक क्र. व दिनांक | देयकाची रक्कम रु | वसूल केलेला मु. कर रु. | देय मूल्यवर्धित कर रु. | वसूल करावयाचा 1% मु. कर रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रविराज म.का.स.संस्था | 4824/ 15-03-13 | 440000 | 17600 | 22000 | 4400 |
| 2 | शिवलिंग म.का.स.संस्था | 3231/ 26-11-12 | 659730 | 26389 | 32987 | 6598 |
| 3 | जय दुर्गा मा म. ग्राहक संस्था | 859/ 28-05-12 | 122025 | 4881 | 6101 | 1220 |
| 4 | शिव म.का.स.संस्था | 4966/ 21-03-13 | 447481 | 17899 | 22374 | 4475 |
| 5 | जागरूक महिला मंडळ | 1324/ 04-07-12 | 242504 | 9700 | 12125 | 2425 |
| 6 | जागरूक महिला मंडळ | 1789/ 09-08-12 | 239245 | 9570 | 11962 | 2392 |
| 7 | जागरूक महिला मंडळ | 1790/ 09-08-12 | 236125 | 9445 | 11806 | 2361 |
| 8 | जागरूक महिला मंडळ | 1104/ 14-06-12 | 156125 | 6245 | 7806 | 1561 |
| 9 | जागरूक महिला मंडळ | 1105/ 14-06-12 | 36326 | 1453 | 1816 | 363 |
| 10 | सूर्या ज्योती म. स.संस्था | 1069/ 12-06-12 | 660000 | 26400 | 33000 | 6600 |
| 11 | गुरुराज म. स.संस्था | 457/ 04-05-12 | 1078986 | 43159 | 53949 | 10790 |
| 12 | रेणुकामाता म.स.संस्था (विद्युत) | 4930/ 29-03-13 | 745252 | 29810 | 37263 | 7453 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | हरी हरेश्वर म.स.संस्था | 3853/ 08/01/13 | 550000 | 22000 | 27500 | 5500 |
| एकूण वसूलपात्र मुल्यवर्धित कराची रक्कम 56138/- | | | | | | |

2) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे पत्र क्र. जी.ई.एन. 1098/1357/प्र.क्र. 166/98 नवि-25 दिनांक 3/11/2013 अन्वये ठेकेदाराने कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा उतरविला नसल्यास ठेकेदाराच्या प्रदान देय रक्कमेतून 1% विमा रक्कम वसूल करून ती महाराष्ट्र शासनाच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. खालील नमूद केलेल्या प्रकरणात ठेकेदाराने कामाचा विमा उतरविलेला नाही व तरी देखिल त्यांच्या प्रदान देयकातून 1 % विमा रक्कम वसूल केलेली नाही. तरी खालील ठेकेदाराकडून विमा रक्कम वसूलपात्र आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रमाणक क्र. व दिनांक | देयकाची रक्कम | 1% वसूल करावयाची विमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | जागरूक महिला मंडळ | 1324/ 04/07/2012 | 242504 | 2425 |
| 2 | जागरूक महिला मंडळ | 1789/ 09/08/2012 | 239245 | 2392 |
| 3 | जागरूक महिला मंडळ | 1790/ 09/08/2012 | 236125 | 2361 |
| 4 | जागरूक महिला मंडळ | 2265/ 13/09/2012 | 517396 | 5173 |
| एकूण वसूलपात्र 1% विमा रक्कम रु. 12351 | | | | |

TRTARCM6001 (Ref No : 7, Hmm No : 34)

## *35 प्रभाग क्षेत्रात मुलभुत सेवा लेखाशिर्षांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर मनपा यांचे मार्फत करण्यात आलेल्या कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 09**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4182234.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 352129.00/-

***बांधकामांचे सर्व अंदाज तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह तयार करण्यात आले नाहीत. गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल केल्याची खात्री न करता व कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तिकेवरुन दिसून येत नाही. याप्रमाणे तपासणी न करता प्रदान केले आहे. बाजारातून मागविण्यात आलेले अंदाजीत दराबाबत दरपत्रके लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा रु.223416/-इतके जादा प्रदान करण्यात आले आहे. मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती व तारखेनूसार नोंदविणेत आलेल्या नाहीत.***

प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा या लेखाशिर्षांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचेमार्फत कामे करण्यात आली असून सदरची कामे मजूर सहकारी संस्था यांना विनानिवीदा जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांनी निर्गमित केलेल्या वितरण आदेशानूसार देण्यात आली आहे. या कामांवर वित्तीय वर्ष 2012-13 कालावधीत कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली असून त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

1)उल्हासनगर 5 येथील भगवान वायले यांच्या घरापासून हनुमान मंदिरापर्यंत पेव्हमेंट रस्ता आणि गटार बांधकाम करणे

अंदाजपत्रकीय रक्कम रु.599400/-

स्थायी समिती ठराव क्र.1 दि.13/05/2011

तांत्रिक मान्यता क्र.6059 दि.27/06/2011

जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.2134 दि.11/08/2011

कार्यादेश क्र.3254 दि.02/09/2011

कंत्राटदाराचे नाव- मे.जयभवानी मजूर सह. संस्था लि.

प्रमाणक क्र.4972 दि.22/03/2013 रु.631374/-

2) उल्हासनगर 3 येथील रामायणनगर येथील नाला बनविणे

अंदाजपत्रकीय रक्कम रु.450000/-

स्थायी समिती ठराव क्र.2 दि.19/05/2011

तांत्रिक मान्यता क्र.5802 दि.23/05/2011

जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.1234 दि.07/07/2011

कार्यादेश क्र.3109 दि.14/07/2011

कंत्राटदाराचे नाव- मे.शिवकृपा मजूर सह. संस्था लि.

प्रमाणक क्र.4962 दि.21/03/2013 रु.478737/-

3) उल्हासनगर 3 येथील बॅरॅक क्र.1070 मोटवानी पाडा, लक्ष्मीनगर, लासी पाडा व परीसरात नाल्या व पेव्हमेंटचे काम करणे

अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 400000/-

स्थायी समिती ठराव क्र.1 दि.19/05/2011
तांत्रिक मान्यता क्र.5792 दि.23/05/2011
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.1231 दि.07/07/2011
कार्यादेश क्र.3113 दि.14/07/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.शिलालेख मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.4957 दि.21/03/2013 रु.437770/-
4) पाल गॅरेज ते सागर निवास ,कमला निवास, संतोषी माता निवास परीसरात नाल्या व पेव्हमेंटचे काम करणे
अंदाजपत्रकीय रक्कम रु.599800/-
तांत्रिक मान्यता क्र.6014 दि.27/06/2011
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.2903 दि.22/09/2011
कार्यादेश क्र.3317 दि.05/10/2011
कंत्राटदाराचे नाव- मे. स्वस्तिक महीला मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.4949 दि.21/03/2013 रु.599418/-
5) प्रभाग क्र.38 हनुमान नगर परीसरात पेव्हमेंट चेन व पेव्हर ब्लॉकचे काम करणे
अंदाजपत्रकीय रक्कम रु.500000/-
तांत्रिक मान्यता क्र.5856 दि.23/05/2011
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.1262 दि.18/07/2011
कार्यादेश क्र.3128 दि.18/07/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.आदर्श मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.4974 दि.22/03/2013 रु.549935/-
6) प्रभाग क्षेत्र क्र. 7 मध्ये गोपाल समाज मंदीराच्या मागे भगत वकील बंगला ते विष्णु भोईर निवास पर्यंत सिमेंट कॉंक्रिट पायवाटा व नाली बांधणे
तांत्रिक मान्यता क्र.6048 दि.25/07/2011
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.2890 दि.22/09/2011
कार्यादेश क्र.3297 दि.23/09/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.गिता मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.754 दि.22/05/2013 रु.660000/-
7)प्रभाग क्र.11 मधील सावंत बंगला ,शिवाजी पाडा,ढाले पाडा,फुले नगर,पंजाबी चाळ व गायत्री इमारत येथे सिमेंट कॉंक्रिट पायवाटा व नाली बांधणे व आनंद दिघे प्रवेशद्वार बांधणे
अंदाजपत्रकीय रक्कम रु.750000/-
स्थायी समिती ठराव क्र.2 दि.03/01/2011
तांत्रिक मान्यता क्र.4846 दि.25/01/2011
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.6959 दि.25/03/2011
कार्यादेश क्र.2798 दि.14/02/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.अलका मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.2573 दि.04/10/2012 रु.825000/-
उपरोक्त कामातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज, नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर करणे आवश्यक आहे. परंतू याबाबतचा अभिलेख नस्तीत नसल्याने उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे सदर जागेवर यापुर्वी केलेल्या कामाची इतिहास नोंदवही (History Register) लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.

2. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील प्रकरण क्र.73 ड नुसार मा.आयुक्तांनी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजूरी दिलेल्या कामासंदर्भात मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्योत्तर मंजूरीची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

3. महसूल व वनविभाग शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. परंतु गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे खालीलप्रमाणे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | उल्हासनगर 5 येथील भगवान वायले यांच्या घरापासून हनुमान मंदिरापर्यंत पेव्हमेंट रस्ता आणि गटार बांधकाम करणे (परीमाण 244.88 घ.मी.) | रु.17306/- |
| 2 | उल्हासनगर रामायणनगर येथील 3 येथील नाला बनविणे (परीमाण 222.96 घ.मी.) | रु.15757/- |
| 3 | उल्हासनगर बॅरेक क्र.1070 व क्र.3 मोटवानी पाडा, लक्ष्मी नगर, लासी पाडा व परीसरात नाल्या व पेव्हमेंटचे काम करणे ( परीमाण 171.54 घ.मी.) | रु.12123/- |
| 4 | पाल गॅरेज ते सागर निवास ,कमला निवास, संतोषी माता निवास परिसरात नाल्या व पेव्हमेंटचे काम करणे(परिमाण 251.56 घ.मी.) | रु.17778/- |
| 5 | प्रभाग क्र.38 हनुमान नगर परीसरात पेव्हमेंट चेन व पेव्हर ब्लॉकचे काम करणे (परिमाण 81.64 घ.मी.) | रु.5770/- |
| 6 | प्रभाग क्षेत्र क्र. 7 मध्ये गोपाल समाज मंदीराच्या मागे भगत वकील बंगला ते विष्णु भोईर निवास पर्यंत सिमेंट कॉंक्रिट पायवाटा व नाली बांधणे (परिमाण 330.40 घ.मी.) | रु.23350/- |
| 7 | प्रभाग क्र.11 मधील सावंत बंगला ,शिवाजी पाडा,ढाले पाडा,फुले नगर,पंजाबी चाळ व गायत्री इमारत येथे सिमेंट कॉंक्रिट पायवाटा व नाली बांधणे व आनंद दिघे प्रवेशद्वार बांधणे(परिमाण 387.34 | रु.27374/- |

| | | |
|---|---|---|
| | घ.मी.) | |
| | एकूण रक्कम रुपये | रु.119458/- |

4.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता यांनी काम चालू असतांना जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल किंवा कामाच्या ठिकाणावरील नोंदवही(फिल्ड बुक) लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. परंतू उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल किंवा कामाच्या ठिकाणावरील नोंदवही लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसल्याने कामाचे पर्यवेक्षण योग्यप्रकारे झाल्याची खात्री होत नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका परि. क्र.24 मधील नियम क्र. 8 (एच) नूसार झालेल्या कामाची 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंद केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

5. उपरोक्त कामातील बाबींमधील वाळू व खडी यांची वाहतूक अनुक्रमे 150 किमी व 7 किमी वरील ठिकाणावरून केल्याचे दर पृथकरणपत्रात दर्शविले असून त्याप्रमाणात ठेकेदारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र. 12.82 (डी) नूसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतूकीचे पास इ. अभिलेख रक्कम प्रदान करणेपुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतू सदर अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने साहित्यांची खरेदी खरोखरच केल्याची व वाहतूक 150 किमी व 7 किमी वरून केल्याची खात्री होत नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता येत नाही.

6. प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक तपासले असता यामधील कामाच्या अनेक बाबींचे दर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचे सन 2010-2011 च्या दर सूचीमध्ये उपलब्ध नसलयामुळे बाजारातून सदर बाबींचे अंदाजीत दर मागवून न्युनतम दरपत्रकाचे दर पृथकरण करून त्याप्रमाणे दर निश्चित करणेत आले आहेत. त्याप्रमाणे मोजमाप नोंदवहीतील मोजमापानुसार ठेकेदारास रक्कम अदा करण्यात आली आहे. परंतू बाजारातून मागविण्यात आलेले अंदाजीत दर, त्यासंबंधित अभिलेख व दर पृथ्थकरण पत्रके नस्तीसोबत जोडणेत आलेले नाही. त्यामुळे देयकाव्दारे वरील बाबींचे ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमांच्या योग्य दरांबाबत लेखा परीक्षणास पडताळणी करता आलेली नाही.

7. मजूर कामगार सहकारी संस्थांना जिल्हा दरसुचीमधील मुळ दराने कामे देण्यात आलेली आहेत. परंतू प्रत्यक्ष रक्कम अदा करताना मोजमाप नोंदवहीतील मोजमापानुसार कामाच्या अंदाजपत्रकीय एकूण रकमेपेक्षा सरसकट 10 टक्के जादा रकमेचे कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे. याबाबत जिल्हा उपनिबंधक यांचे शिफारसीनूसार मजूर सहकारी संस्थांना जिल्हा दर सुचीमधील दरानेच कामाचे प्रदान करावयाचे असतांना 10 टक्के जादा दराची मान्यता असल्याचे नमूद करून कामाचे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा प्रदान करण्यात आले आहे. अशाप्रकारे केलेल्या जादा प्रदान करणेबाबतची आवश्यकता, कारणमिमांसा इ. बाबत ठोस अभिप्राय न नोंदविता जादा रक्कम रु.223416/-प्रदान करण्यात आली आहे.

8. सार्व.बांधकाम विभाग लेखा संहिता परिच्छेद क्र. 10.01.04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती व तारखेनूसार नोंदविणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे मोजमाप पुस्तिका नोंदविण्याची कार्यवाही होत नाही.

9. पाल गॅरेज ते सागर निवास, कमला निवास, संतोषी माता निवास परिसरात नाल्या व पेव्हमेंटच्या कामात

एकूण खोदाई 215.33 मीटर लांबीची केली असून प्रत्यक्ष नाल्याच्या पेव्हमेंटचे काम 204.03 मीटर लांबीचे केले आहे. 11.30 मीटर जादा खोदाई केल्याने खालीलप्रमाणे एकूण रु.9255/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे.
अ) जादा खोदाई 35.47 घ.मी. करीता रु.94.50/- प्रती घ.मी.प्रमाणे एकूण अतिप्रदान रु.3351/-
ब) प्लेन सिमेंट काँक्रिट 1.3.6 ग्रेडच्या 1.08 घ.मी. करीता रु.3649.23 प्रती घ.मी. प्रमाणे एकूण अतिप्रदान रु.3963.06/-
क) हाफ राऊंड पाईप 11 मीटर करीता रु.205 प्रती मीटर प्रमाणे एकूण अतिप्रदान रु.2255/-
उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 38 दि.21/05/2015 रोजी दिले असून अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 20, Hmm No : 38)

## *36 आमदार विकास निधी अंतर्गत कॅम्प क्र.3 येथील रॉयल एमरोल्ड बिल्डिंग ते पारस रेसिडेन्सी पर्यंत नाली व रस्ता तयार करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :210-2110 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 999427.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9994.00/-

***बांधकाम केलेली रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याची कागदपत्रा अभावी खात्री झाली नाही. कामाचा विमा विहित मुदतीत काढलेला नाही. कामाचा कालावधी दि.24/01/2013 ते 27/02/2013 असा आहे. परंतु सदर डांबरीकरण कामासाठी बी.एम. व ए.सी. डांबर मिक्स खडी हे साहित्य मे. जयभारत कंन्ट्रक्शन यांचेकडून आणल्याची चलने जोडली आहेत. ती तपासली असता सदर चलने हे दिनांक 04/06/12 ते 07/06/12 या कालावधीची आहेत. कामाचा कालावधी दि.24/01/2013 ते 27/02/2013 असा आहे. त्यामुळे बी.एम. व ए.सी. डांबर मिक्स खडी खरेदी केल्याचा कालावधीमध्ये तफावत आहे. त्यामुळे प्रस्तुत काम हे गुणवत्तापूर्ण झाल्याचे लेखा परीक्षणाची खात्री झाली नाही.***

2012-13 साठी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत उल्हासनगर म.न.पा.हद्दीतील कॅम्प क्र.3 येथील रॉयल एमरोल्ड बिल्डिंग ते पारस रेसिडेन्सी पर्यंत नाली व रस्ता तयार करण्याचे काम करण्यात आलेले आहे. सदर कामाकरिता मे. आदर्श मजूर कामगार सहकारी संस्था, यांना प्रमाणक क्र.4644 दि.01/03/2013 अन्वये रु.999427/-प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर कामात खालील अनियमितता आढळून आलेल्या

आहेत. अनियमितता बाबत विभागास अर्धसमास पत्र क्र. 55 दिनांक 17/06/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर खर्चाची रक्कम रु. 999427/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

1) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता आदेशातील अट क्र. 5 नुसार आमदार विकास निधी कार्यक्रमा अंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतच घेता येईल असे नमूद आहे. बांधकाम केलेली रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याची कागदपत्रे नस्तीत समाविष्ट नाहीत. त्यामुळे वरील बांधकाम केलेली जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याची खात्री करता आली नाही.

2) कार्यआदेश क्र.81दि.24/01/2013अन्वये वरील संस्थेस काम दिलेले आहे व ते दि.27/02/2013 रोजी पूर्ण झालेले आहे तथापि कामाचा विमा दि.14/02/2013 रोजी उशिराने काढलेला आहे विम्याचा कालावधी नमूद नाही फक्त विमा पावती जोडलेली आहे. वित्त विभाग शासन निर्णय क्र.1098/प्रकरण क्र.2289/ शासन हमी दि.19/08/1998 व नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीइएन/1198/1356/प्रक्र.166/8/नवि-24/दि.3/11/2003 अन्वये विमा काढला नसल्याने ठेकेदाराच्या देयकातून 1% विमा निधी रु.9994/- कपात करण्यात यावी.

3)बांधकाम केलेल्या रस्त्याची महानगरपालिकेच्या मालमत्ता नोंदवहीत नोंद झाल्या बाबत खात्री करण्या साठी सदर नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

4) बांधकामात गौणखनिज साहित्य 423.86 घ.मी. इतके वापरले आहे. परंतू त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडलेले नाहीत. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मुंबई यांची अधिसुचना दि.15/01/2003 व शासन परिपत्रक दि.11/02/2010 चे पालन केलेले नाही. (423.86 x 70.67 = 29954/-) सदर तरतूदीचे पालन न करताच ठेकेदारास प्रमाणक क्र.4644 दि.01/03/2013 अन्वये रु.999427/- चे प्रदान केल्याने झालेले प्रदान हे नियमबाहय आहे.

5) जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दि.31/12/2012 अट क्र. 6 नुसार प्रशासकीय मंजुरी दिलेल्या कामामध्ये अपरिहार्य तांत्रिक बदल / जागेमधील बदलास वेळीच मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही असे नमूद आहे तथापि वरील प्रकरणात जादा परिमाणाचा वापर केला असून त्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधिल क्र.227 नुसार कार्यकारी अभियंता यांची पूर्व परवानगी घेऊन तद्नंतर जादा काम करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

VARIATION STATEMENT

As Estimated                As Executed

| S.N | Discription of item | Unit | Qty | Rate | Amt | Qty | Amt | Diff |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excav Found Soft Murum | Cmt | 101 | 99.75 | 10075 | 190.20 | 18973 | 8898 |
| 2 | P/L WBM Road layers of 75/100mm | Cmt | 71.25 | 907.40 | 64652 | 189.34 | 171807 | 107155 |
| 3 | P/L tackcoat with bitumen 0.5kg | Cmt | 950 | 24.47 | 23246 | 1885.88 | 46147 | 22901 |
| | एकूण बदल केलेल्या बाबींची रक्कम | | | | | | | 138954 |

6)रस्त्याच्या डांबरीकरण कामामध्ये bitumen macadam (बी.एम.) व अस्फाल्ट कॉंक्रीट (ए.सी.) चा वापर केलेला आहे. कामाचा कालावधी दि.24/01/2013 ते 27/02/2013 असा आहे. परंतु सदर कामासाठी बी.एम. व ए.सी. हे जयभारत कंन्ट्रक्शन यांचेकडून आणल्याची चलने जोडली आहेत. ती तपासली असता सदर चलने हे दिनांक 04/06/12 ते 07/06/12 या कालावधीची आहेत व कामाच्या कालावधीत व प्राप्त साहित्याच्या कालावधी तफावत असल्याने काम गुणवत्तापूर्ण झाल्याची खात्री करता आली नाही. निविदा अटी व शर्तीनुसार काम सुरु करणेपुर्वी व काम पूर्ण झालेनंतर कामामध्ये bitumen macadam (बी.एम.) व Asphaltic concrete (ए.सी.) आदेश दिनांक 24/01/2 ची तपासणी करणे आवश्यक आहे. सबब सदर रक्कम रु.869785/- चा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

बी.एम. व ए.सी. वापर केल्याचा तक्ता

| S.N | Discription of item | Unit | Qty | Rate Rs | Amt Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1 | P/L WBM Road layers of 75/100mm | cmt | 189.34 | 907.40 | 171807 |
| 2 | P/L leveled bitumen macadam on Road surface of 2%of wt. | | 60.95 | 4608.14 | 280866 |
| 3 | P/L bitumen macadam withitumen 3.3%of wt. | | 47.50 | 4767.81 | 226470 |

Ulhasnagar (M Corp.)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | P/L Asphaltic concrete with bitumen 5.75%wt. | | 23.32 | 8175 | 190641 |
| | Total= | | | | 869785 |

वसूलपात्र रक्कम रु.9994/-

TRTARCM6001 (Ref No : 30, Hmm No : 55)

## *37 साईबाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबीघाट मंडळ रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 05**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5335253.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 86764.00/-

***कार्यादेशानूसार 150 दिवसात काम पुर्ण करणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण वर्षाखेरपर्यंत काम पुर्ण झाले नाही. कामाची बँक गॅरंटीची वैधता वाढविलेबाबत अभिलेख नस्तीत प्राप्त न झालेने त्याबाबत पडताळणी करता आली नाही. कामाचा व कामगारांचा विमा रक्कम रु.53353/- वसुल केलेली नाही. स्वामित्वधनाची रक्कम रु.33411/-वसुल करण्यात आली नाही. कार्यकारी अभियंता यांचे कंत्राटदारास दिलेले पत्र क्र.3501 दि.28/04/2014 अन्वये काम गुणवत्तापुर्वक झालेले नाही. कामाची त्रयस्थ पार्टीकडून तपासणी केलेली नाही.***

| 70 | 6 | मे मनोहर एच वाढवा | U6/w39/04/035 | 118519 |
| | | | एकूण रक्कम | 3621486 |

व्यापारी वर्गाकडून स्थानिक संस्था कराची पूर्ण रक्कम भरणा केलेली नाही. तसेच स्थानिक संस्था कर भरल्या बाबतच्या पावत्या पुरावा म्हणून सादर केलेल्या नाहीत. महानगरपालिकेने सदर व्यापाऱ्याबाबत नोटीस बजावणे, दावा दाखल केला नसल्याचे नस्तीवरून दिसून आले. सदर व्यापाऱ्याकडून रक्कम रु.36,21,486/- वसूल करण्यात यावी. याबाबतचा अर्धसमास पत्र क्रमांक 107 दिनांक 20/07/2015 नुसार कळविण्यात आले असता अनुपालन प्राप्त झालेले नाही त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रुपये 3621486

DATASMM5901 (Ref No : 83, Hmm No : 107)

## *47 कामगार कल्याण उपकर व स्थानिक संस्था कराची शुल्क आकारणी करून वसुल न केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 769601.00/-

***उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7अ, मंत्रालय मुंबई दि.17/06/2010 अन्वये इमारत व इतर बांधकामावर रक्कम रु.24007/- कामगार कल्याण उपकर वसूल करण्यात आला नाही. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.स्थासंक-8209 /प्र.क्र.65 /09/नवि-34 दि.06/08/2012 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम रु.745594/- रकमेची वसुली करण्यात आली नाही.***

उद्योग , उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7अ, मंत्रालय मुंबई दि.17/06/2010 अन्वये इमारत व इतर बांधकामावर बांधकामाच्या एकूण मुल्यानूसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करावयाचा आहे. तसेच सदर उपकर विहित वेळेत न भरल्यास उपकराच्या रकमेवर प्रतिमहा 2 टक्के व्याज भरावे लागेल, अशी तरतूद आहे. त्याचप्रमाणे नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.स्थासंक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.06/08/2012 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम खालीलप्रमाणे आकारणी करून वसूल करणे आवश्यक आहे.

4 थ्या मजल्यापर्यंत रु.100/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र

5-7 व्या मजल्यापर्यंत रु.150/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र

7 च्या वरील मजल्याकरीता रु.200/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र

परिशिष्ट क्र. 3 मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांवर उपकर व स्थानिक संस्था कराची आकारणी न केल्याने उपकराची रक्कम रु.23270/- व त्यावरील प्रतिमहा 2 टक्के व्याजाची रक्कम रु.737/- वसूलपात्र आहे. तसेच स्थानिक संस्था कराची रक्कम रु.745594/- वसूलपात्र आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.81 दि.30/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम करण्यात येत आहे.

वसूल पात्र रक्कम रु. 769601/- (उपकर रु.23270+स्थानिक संस्था कर रु.746331/-)

DATPVWM7501 (Ref No : 43, Hmm No : 81)

## 48 इमारत बांधकाम प्रकरणांत विकास शुल्क रु.1595291/- व जमीन विकास शुल्क रु.527435/- ची आकारणी करून वसुली न केल्याबाबत...

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2343997.00/-

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम 2010 चे कलम 124 अन्वये विकास***

***शुल्काबाबत नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.टिपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि1/3/2011 ची अधिसुचनेनुसार इमारत बांधकामाच्या निवासी वापराच्या चटई क्षेत्राकरीता 2% विकास कर व वाणिज्य वापराच्या चटई क्षेत्राकरीता 4% विकास कर व 0.5% जमीन विकास शुल्काची आकारणी करणे आवश्यक आहे. परंतु वसुली करण्यात आली नाही.***

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम 2010 चे कलम124 अन्वये विकास शुल्काबाबत नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.टिपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि1/3/2011 ची अधिसुचनेनुसार इमारत बांधकामाच्या निवासी वापराच्या चटई क्षेत्राकरीता 2% विकास कर व वाणिज्य वापराच्या चटई क्षेत्राकरीता 4% विकास कर व 0.5% जमीन विकास शुल्काची आकारणी करणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाकडून देण्यात आलेल्या काही निवडक इमारत बांधकाम परवानगीच्या प्रकरणांची तपासणी केली असता उपरोक्त शासन निर्णयानूसार बांधकाम विकास शुल्काची आकारणी न केल्याने सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र.4 मधील रकाना क्र.11 नूसार एकूण रु.1595291/- इतकी निवासी/ वाणिज्य वापराकरीता विकास शुल्क, रकाना क्र.12 नूसार एकूण रु.527435/- इतकी जमीन विकास शुल्काची आकारणी कमी केल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. तसेच सदर विकास शुल्क शासन जमा करणेस विलंब झाल्याने महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 124 (ड) नुसार व्याजाची परीगणना केली असता वार्षिक 18 टक्के दराने एकूण रु.221271/- इतकी व्याजाची रक्कम वसुलपात्र आहे.
अर्धसमास ज्ञापन क्र.80 दि.30/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब आक्षेप कायम करण्यात येत आहे.
वसूलपात्र रक्कम रु. 2343997/-(इमारत बांधकाम शुल्क रु.1595291/-+ जमीन विकास शुल्क रु.527435/- +व्याज रु.221271/-)

DATPVWM7501 (Ref No : 44, Hmm No : 80)

## *49 जीना, पॅसेज व लॉबी इ.बाबींच्या सवलतीकरीता प्रचलित दराने अधिमुल्य शुल्काची आकारणी न केल्याने महानगरपालिकेचे रु.6154807/-नुकसान झालेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 6154807.00/-

***इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ जीना,लॉबी , पॅसेज इ.बाबींच्या सवलतीकरीता शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराने अधिमुल्य***

***शुल्काची आकारणी करून वसुली केली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.91 दि.10/03/2010 अन्वये इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ जीना,लॉबी, पॅसेज इ.बाबींच्या सवलतीकरीता शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या 150 टक्के (रहिवास प्रयोजनार्थ) व 250 टक्के (वाणिज्य प्रयोजनार्थ) अधिमुल्य शुल्क आकारणेचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.
उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून 2012-13 मध्ये इमारत बांधकाम परवानगी दिल्या आहेत. त्यामध्ये जिना, लॉबी, पॅसेजच्या क्षेत्राचे अधिमुल्य शुल्काची आकारणी केली आहे. त्यापैकी काही निवडक प्रकरणांची तपासणी केली असता उपरोक्त ठराव तसेच शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमीनीच्या ठरविलेल्या प्रचलीत दराने (रेडीरेकनर) अधिमुल्य शुल्काची आकारणी न केल्याने सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र.5 मधील रकाना क्रमांक 11 मधील एकूण रुपये 61,54,807/- इतकी रक्कम कमी आकारण्यात आल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे.
अर्धसमास ज्ञापन क्र. 79 दि.30/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 45, Hmm No : 79)

## *50 उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 9107927.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2477769.00/-

***उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना कामासाठी एकूण 3 निविदाधारकानी निविदा सादर केल्या असून EOI च्या clause 5.4 अन्वये 70% पेक्षा जास्त गुण असणाऱ्या सल्लागार संस्था पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकाच संस्थेस 70% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही. अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम घेणेपासून आयुक्त यांनी सुट दिली आहे. अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास सूट देणे नियमबाहय आहे. त्यामुळे मान्य निविदेच्या 5% अनामत व सुरक्षा अनामत वसूल करणे आवश्यक आहे. मुद्रांक शुल्क रु.9600/- वसुल करणे आवश्यक आहे. करारनामा अट क्र.2.6.4. नुसार सर्व दर करासहित असल्याचे नमूद आहेत. असे असताना बिले प्रदान करताना 10.30% व 12.36% सेवाकर रु.11,05,120/- जादा प्रदान झाले आहे. ते वसूल होणे आवश्यक आहे. आयकर अधिनियम***

***1961 मधील कलम 194(J) सल्लागार फी म्हणून 10% आयकर कपात करणे बंधनकारक आहे. परंतु रु.78994/- वसूल केला आहे. उर्वरित रु.8.31,799/- व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे. तसेच वाढीव फी रु.41,65,000/- मंजूर करण्याची करणे नमूद नाहीत. तरी देखील ठेकेदारास बिल प्रदान केले आहे.***

स्थायी समिती ठराव क्र. 116 दि.5/2/2010 नुसार उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे काम “CEPT” अहमदाबाद यांना दिलेले आहे. सदर कामाबाबतची नस्ती व प्रमाणक क्र. 4390 दि. 8/2/2013 ची तपासणी केली असता 3 निविदा पात्र नसतानाही “CEPT” अहमदाबाद यांची निविदा मान्य केली आहे. सर्व दर हे करासहित असताना सेवाकर बिलात वेगळा नमूद केला आहे. आयकर कमी कपात केला आहे. वाढीव फी बाबतची करणे नमूद केली नाहीत. ह्या उणीवा निदर्शनास आल्या. याबाबत अर्धसमास क्र.46 दि. 9/6/2015 नुसार खुलासा मागविला असून विभागाचे दि. 4/7/2015 चे अनुपालन विचारात घेऊन खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1.कामाची वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे अभिलेख नाहीत. एकूण 3 निविदाधारक यांनी निविदा सादर केल्या असून EOI च्या clause 5.4 अन्वये 70% पेक्षा जास्त गुण असणाऱ्या सल्लागार संस्था पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकच संस्थेस 70% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही. सहाय्यक संचालक नगररचना विभागाचे पत्र क्र. उमपा / नरवि/45/122 दि. 4/5/2015 अन्वये कमी गुणांबाबत आयुक्त यांच्या निदर्शनास आणले होते त्यांनी अंतिम निर्णय घेतला आहे. असे विभागाने कळविले आहे. तसेच अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम घेणेपासून सूट आयुक्त यांनी दिली असल्याचेही नमूद केले आहे. अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास सूट देणे नियमबाह्य आहे. त्यामुळे मान्य निविदेच्या 5% अनामत व सुरक्षा अनामत रक्कम रु.5,31,250/-वसूल करणे आवश्यक आहे.

2.निविदेपुर्व बैठक दि.18/12/2009 ची कागदपत्रे नस्तीत समाविष्ट केलेली नाहीत.

3.मान्य निविदा फी व वाढीव फी असे एकूण रु.10625000/- असून प्रत्येकी रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम-1958 मधील कलम 63 नुसार रु. 9800/- या रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते परंतु रु.100/- च्या दोन मुद्रांक पेपरवर केला आहे. उर्वरित रु.9600/- वसुलपात्र आहे.

4).निविदाधारक CEPT अहमदाबाद यांनी वाटाघाटीनुसार दिलेले दर हे एकत्रीत असल्याने सर्व करांसहीत आहेत. ह्या बाबी विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 116 दि. 5/2/10 निविदा मान्य केली आहे. तसेच करारनामा अट क्र.2.6.4. नुसार सर्व दर करासहित असल्याचे नमूद आहे. असे असताना बिले प्रदान करताना 10.30% व 12.36% सेवाकर सबंधित यंत्रणेला अदा केला आहे. त्यामुळे सेवाकरापोटी रु. 11,05,120/- जादा प्रदान झाले आहे. सदर बाब लेखा विभागाशी सबंधित असल्याचे अनुपालानामध्ये विभागाने कळविले आहे. ही बाब मान्य करता येत नाही. त्यामुळे सेवाकरापोटी रु.11,05,120/- जादा केलेले प्रदान वसूल होणे आवश्यक आहे

5.उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे कामासाठी रु, 91,07,927/- इतका खर्च झाला असून फक्त रु.78,994/- आयकर कपात केला आहे. सदर बाब लेखा विभागाशी निगडीत असल्याचे नगररचना

विभागाने कळविले आहे. आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194(J) सल्लागार फी म्हणून 10% आयकर कपात करणे बंधनकारक आहे. परंतु रु.78994/- वसूल केला आहे. उर्वरित रु.8.31,799/- व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे.

6.कामाची मुदत 28 महिने असून 4/8/2012 रोजी पूर्ण झाली आहे. पहिली मुदतवाढ संपणेपूवी दुसरी मुदतवाढ घेणे आवश्यक होते. परंतु दि. 4/6/2013 रोजी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. त्यास महासभेने दि. 5/2/14 अन्वये मंजुरी दिली आहे. विलंब कालावधीसाठी दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते त्याचे पालन झाले नाही. तसेच वाढीव फी रु, 41,65,000/- मंजूर करण्याची करणे नमूद नाहीत. ही बाब आयुक्त व महासभेने मान्य केली असल्याने त्यानुसार विभागाने कार्यवाही केली असे उत्तर दिले आहे. ही बाब योग्य नाही. कामाच्या स्कोप प्रमाणे काम झाल्याचे प्रमाणित केलेले नाही. सुधारीत विकास आराखडा बनविण्यास विलंब झाल्याने वाढीव फी द्यावी लागली. त्यामुळे रु. 41,65,000/- खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडलेला आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.91,07,927/- (कामावरील खर्च )

वसूलपात्र रक्कम रु.24,77,769/- (सुरक्षा अनामत रु.531250/-+मुद्रांक शुल्क रु.9600/-+जादा प्रदान रु.1105120/-+आयकर रु.831799/-)

DATDDZM6901 (Ref No : 55, Hmm No : 46)

## *51 बांधकाम परवानगी मंजूरी देताना जिन्याचा प्रिमियम आकारणी करताना रेडीरेकनर दर चुकीचा घेतल्याने झालेले मनपाचे आर्थिक नुकसान रुपये 69,03,266/-*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 6903266.00/-

***बांधकाम परवानगी मंजूरीच्या वेळी जिन्याचे प्रिमियम आकारणी करताना महानगरपालिका महासभा ठराव क्र. 91 दि.10/3/2010 नुसार त्या त्या वेळच्या रेडीरेकनर दर विचारात घेऊन रहिवासी चटई क्षेत्रासाठी 1.5 पट व वाणिज्य वापराच्या चटई क्षेत्रासाठी 2.5 पट घेऊन आकारणी करावी असे आदेश आहेत. त्याचे पालन झाले नसल्याने महानगरपालिकेचे रु.6903266/-चे नुकसान आर्थिक झाले आहे.***

1.नगरचना विभागातील 2012-13 मधील मंजूर बांधकाम परवानगी नस्तींचे लेखापरीक्षण केले असता मंजूर नकाशातील जिन्याचे मोफत चटई क्षेत्र (FSI) चे प्रिमियम भरून त्याचा चटई क्षेत्र (FSI) म्हणून बांधकाम

क्षेत्रात समावेश केला आहे. जिन्याचे प्रिमियम आकारणी करताना महानगर पालिका महासभा ठराव क्र.91 दि.10/3/2010 नुसार त्या वेळच्या रेडीरेकनर दर विचारात घेऊन रहिवासी चटई क्षेत्रासाठी 1.5 पट व वाणिज्य वापराच्या चटई क्षेत्रासाठी 2.5 पट आकारणी करावी असे आदेश आहेत. जिना प्रीमियम आकारणी करताना त्या त्या सिटीएस क्रमांकास वेगवेगळे रेडीरेकनर दर नोंदणी महानिरीक्षक म. रा. पुणे यांनी मंजूर केले आहेत. परंतु नगररचना विभागाने महानगरपालिका महासभा ठराव क्र.91 दि.10/3/2010 चे पालन केले नसल्याने मनपाचे रु. 69,03,266/- चे नुकसान झाले आहे. सोबत परिशिष्ट क्र. “ 6 “ जोडले आहे.

वसूलपात्र रक्कम रु. 69,03,266/-

DATDDZM6901 (Ref No : 58, Hmm No : 82)

## *52 बांधकाम परवानगी मंजूरी देताना इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कराची आकारणी रेडीरेकनरच्या दरानुसार केली नसल्याने मनपाचे रुपये 18,71,286/- आर्थिक नुकसान झाल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :B-1 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1871286.00/-

***इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कराची आकारणीची रक्कम भरणा केला नसल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम-1966 मधील कलम 124 ड (3) नुसार 18% दराने प्रति वर्षी व्याज वसूल करणे आवश्यक आहे. नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र. टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि.1/3/2011 नुसार इमारत बांधकाम विकास कर रहिवासी चटई क्षेत्रासाठी रेडीरेकनर मधील जमिन मूल्याच्या 2%, वाणिज्य वापराच्या चटई क्षेत्रासाठी 4% व जमिन विकास कर रहिवासी वापरासाठी 0.5% व वाणिज्य वापरासाठी 1% विकास कर आकारणे बाबत शासन आदेश आहेत. परंतु महानगरपालिकेने कमी दराने वसूल केली आहे.***

नगररचना विभागातील 2012-13 मधील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक नस्तींचे लेखापरीक्षण केले असता बांधकाम परवानगी मंजूर करताना बांधकाम विकास कर व जमिन विकास कर यांची आकारणी नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम-2010 ची अधिसूचना दि. 27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई

अधिसूचना क्र. टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि. 1/3/2011 नुसार इमारत बांधकाम विकास कर रहिवासी क्षेत्रासाठी रेडीरेकनर मधील जमिन मूल्याच्या 2%, वाणिज्य वापरासाठी 4% व जमिन विकास कर रहिवासी वापरासाठी 0.5% व वाणिज्य वापरासाठी 1% इमारत बांधकाम विकास कर आकारणे बाबत शासन आदेश आहेत. परंतु महानगरपालिकेने रहिवासी वापराच्या चटई क्षेत्रासाठी 120 पट व वाणिज्य वापराच्या चटई क्षेत्रासाठी 240 पट याप्रमाणे इमारत बांधकाम विकास कर आकारणी केली. त्यामुळे शासन आदेशातील तरतुदीचे पालन झाले नाही. तसेच महानगरपालिका महासभा ठराव क्र.57 दि. 6/3/2013 मधील पीठासन अधिकारी सर्वसाधारण महासभा यांनी इमारत बांधकाम विकास कर रहिवासी क्षेत्रासाठी रेडीरेकनर मधील जमिन मूल्याच्या 2%, वाणिज्य वापरासाठी 4% व जमिन विकास कर रहिवासी वापरासाठी 0.5% व वाणिज्य साठी 1% विकास कर आकारणी दि.1/12/2010 पासून करणेचे आदेश आहेत. त्याचे पालन झाले नाही. त्यामुळे मनपाचे रु.18,71,286/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. सोबत परिशिष्ट क्र “ 7 “ जोडले आहे.

इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कराची आकारणीची रक्कम कमी वसूल केल्याने सदर रकमेवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मधील कलम 124 ड (3) नुसार 18% दराने प्रति वर्षी व्याज वसूल करणे आवश्यक आहे.
वसूलपात्र रक्कम रु.18,71,286/- (इमारत बांधकाम विकास कर +जमिन विकास कर )

DATDDZM6901 (Ref No : 59, Hmm No : 83)

## *53 बांधकाम परवानगी मंजूरी देताना इमारत बांधकाम कामगार कल्याण उपकर व स्थानिक संस्था कराची आकारणी कमी केल्याने मनपाचे रु.4,93,391/- आर्थिक नुकसान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :B-1 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 493391.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7अ दि.17/6/10 तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्थासक-8209/प्र.क्र.65 /09/नवि-34 दि.6/8/12 अन्वये कामगार कल्याण उपकर व स्थानिक संस्था कर वसूल करणे आवश्यक होते.1.बांधकाम इमारत कामगार कल्याण उपकर हा मंजूर परवानगीच्या दिनांकास असलेला बांधकामाचा दर विचारात घेऊन परिगणना करणे आवश्यक होते. परंतु 2012 चा दर हिशोबात घेऊन आकारणी केली आहे. त्यामुळे रु.51,879/- उपकर कमी वसूल केला आहे. उद्योग***

***उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. बीसीए-2009 /प्र.क्र.108/कामगार-7अ दि.17/6/10 च्या शासन निर्णयातील कलम 8 नुसार प्रतिमाह 2% प्रमाणे व्याज वसूल करणे आवश्यक आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्थासक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.6/8/2012 नुसार स्थानिक संस्था कर (LBT) वसूल केला आहे. परंतु दि.1/1/13 पासून केला आहे. 2012-13 मधील निवडक प्रकरणाचा रु.4,93,391/- वसूल करण्यात यावा.***

नगरचना विभागातील 2012-13 मधील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक नस्तींचे लेखापरीक्षण केले असता बांधकाम परवानगी मंजूर करताना बांधकाम इमारत कामगार कल्याण उपकर व स्थानिक विकास कर यांची आकारणी उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. बीसीए-2009 /प्र.क्र.108/कामगार-7अ दि.17/6/2010 तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्थासक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.6/8/12 अन्वये केली नसल्याबाबत अर्धसमास क्र.84 दि.09/07/2015 अन्वये खुलाशा मागविला असता अनुपालन प्राप्त झाले नाही. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1.बांधकाम मंजूर परवानग्या ह्या 2013 मधील असून त्या वर्षाच्या दिनांकास असलेला बांधकामाचा रेडीरेकनरचा दर विचारात घेऊन बांधकाम इमारत कामगार कल्याण उपकर परिगणना करणे आवश्यक होते. परंतु 2012 चा बांधकामाचा दर हिशोबात घेऊन आकारणी केली आहे. त्यामुळे रु. 51,879/- बांधकाम इमारत कामगार कल्याण उपकर कमी वसूल केला आहे. शासन निर्णयातील कलम 8 नुसार प्रतिमाह 2% प्रमाणे व्याज वसुलीच्या दिनांकापर्यंत करणे आवश्यक आहे. उर्वरित प्रकरणांचा आपल्या स्तरावर तपासणी करून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

2.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्थासक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.6/8/2012 नुसार स्थानिक संस्था कर वसूल करणे आवश्यक आहे. परंतु दि.1/1/2013 पासून महानगरपालिकेने केला आहे. 2012 मधील निवडक प्रकरणाचा रु.4,41,512/- वसूल करणे आवश्यक आहे. सोबत परिशिष्ट क्र. "8 " जोडले आहे.

वसूलपात्र रक्कम रु.493391/-(उपकर रु.51879+ स्थानिक संस्था कर रु.441512)

DATDDZM6901 (Ref No : 60, Hmm No : 84)

## ***54 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा गोळा करून वाहतूक करणे कामातील अनियमितता...***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 10**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3730688.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 583556.00/-

***कंत्राटदाराने घनकच-याची वाहतूक करून क्षेपणभुमीवर त्याची अंतिम विल्हेवाट लावणेचे असतांना फक्त घनकचरा गोळा करून क्षेपणभुमीपर्यंत वाहतूक केलेली आहे. कंत्राटदारास रक्कम ठोक स्वरुपात दिल्याने कंत्राटदाराने क्षेपणभुमीवर किती मेट्रीक टन कचरा गोळा करून वाहतूक केली किंवा कसे याची पडताळणी होत नाही. तांत्रिक कागदपत्रे अप्राप्त आहे. कमी मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. घनकचरा वाहतूक करणा-या वाहन व कामगारांचा विमा उतरविणे कागदपत्रांअभावी पडताळणी करता आली नाही. स्वच्छता निरीक्षक यांचे अहवाल लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे. पुर्ण 8 तासाकरीता डंपरचा वापर करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात कमी वेळेकरीता काही दिवशी वापर केला आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा गोळा करून वाहतूक करणेकामी निविदा क्र. 584 दि.17/02/2003 अन्वये दै.लोकमत, दै.सकाळ, नवभारत टाईम्स व फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीकरीता दिली असता मे.कोनार्क इन्फा्स्ट्रक्चर,मे.अॅन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि., मे. व्ही.आर.पनवेलकर व मे.अर्जुन कंस्ट्रक्शन या 4 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. यापैकी मे.अॅन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. यांची निविदा रु.6,93,60,867/- प्रति वार्षिक इतकी न्युनतम असल्याने वाटाघाटीअंती रु.1,19,979/- प्रती दिन(रु.500/-प्रती टन कचरा) प्रमाणे रु.4,37,92,537/- प्रती वार्षिक इतक्या रकमेवर स्थायी समिती ठराव क्र. 45 दि.09/07/2003 अन्वये 10 वर्षे कालावधीकरीता मंजूर करण्यात आली. सदर कामाचे कार्यादेश जावक क्र.10 दि.14/08/2003 अन्वये देण्यात आले आहे. परंतू मे.अॅन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. हे निविदेतील अटी व शर्तीनूसार काम करत नसल्याने उमपा महासभा ठराव क्र.20 दि.20/12/2012 अन्वये नवीन निविदा काढणेस व तात्पुरती व्यवस्था इतर ठेकेदारांकडून करण्यास मान्यता देण्यात आली. सदर कामाच्या अनुषंगाने प्राप्त नस्ती व प्रमाणकांची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) निविदा अटी व शर्ती मधील क्र.2 ई नूसार मे.अॅन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. यांनी महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा गोळा करणे व वाहतूक करून क्षेपणभुमीवर त्याची अंतिम विल्हेवाट लावणेचे काम करणे आवश्यक असतांना कंत्राटदाराने फक्त घनकचरा गोळा करून क्षेपणभुमीपर्यंत वाहतूक केलेली आहे. कच-याची अंतिम विल्हेवाट लावलेली नाही.

2) निवीदा अटी व शर्तीनूसार तसेच कार्यादेशानूसार कंत्राटदाराने घनकचरा गोळा करून क्षेपणभुमीपर्यंत वाहतूक करणे व वाहतूक केलेल्या कच-याच्या वजनानूसार प्रती मे.टन रु.500/- प्रमाणे रक्कम अदा करणे आवश्यक आहे. परंतू कंत्राटदारास प्रती दिन रु.119979/- इतकी रक्कम ठोक स्वरुपात प्रदान केली आहे. कंत्राटदारास उचलेल्या कच-याच्या वजनानूसार प्रदान केले नाही.

3) न्युनतम निविदाकार मे. अॅन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. यांनी सादर केलेल्या निविदेच्या अनुषंगाने तांत्रिक कागदपत्रे लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहेत. त्यामुळे निविदा प्रक्रियेच्या योग्यतेची पडताळणी करता आली नाही.

4)निविदा अटी व शर्तीमधील क्रमांक 8.3 बी नूसार घनकचरा गोळा करणे व वाहतूकीचे काम करणा-या

कामगारांचे हजेरी पत्रक, गाडयांचे लॉग शिट, प्रभाग निहाय केलेल्या कामाचा दैनंदिन अहवाल, कंत्राटदाराने गोळा केलेल्या घनकच-याच्या ठिकाणी फवारणी केलेल्या जंतूनाशकांची नोंदवही, स्वच्छता निरीक्षकांचा दैनंदिन अहवाल व क्षेपणभुमीवर कचरा भरून आणणा-या गाडयांच्या नोंदी करण्याकरीता नोंदवही इ. अभिलेख ठेवणे आवश्यक असतांना सदर अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने कंत्राटदारास केलेल्या प्रदानाच्या योग्यतेची पडताळणी करता आली नाही.

5) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम 1959 मधील कलम 63 नूसार कंत्राट रकमेच्या रु. 10 लक्षकरीता रु.100/- व पुढील प्रत्येक लक्ष रुपयास रु.100/- प्रमाणे कमाल रु.500000/- इतक्या रकमेच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. निवीदेचा कालावधी दहा वर्ष इतका असल्याने कंत्राटाची रक्कम रु.50,20,30,043/- वर मुद्रांक नोंदणी शुल्क कमाल रक्कम रु.5,00,000/- इतकी आकारणे आवश्यक असतांना रु.100/- च्या मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. उर्वरीत रक्कम रु.499900/- शासन जमा करणे आवश्यक आहे.

6) निविदा अटी व शर्ती क्र. 27 नूसार निविदाकाराने कंत्राटाच्या 5 टक्के सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. त्यानूसार कंत्राटदाराने प्रथम वर्षी रु.21,89,617/- व पुढील प्रत्येक वर्षी 3 टक्के भाववाढप्रमाणे येणा-या वार्षिक रकमेच्या 5 टक्के इतक्या रकमेची सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. परंतू याबाबतचा अभिलेख नस्तीत आढळून आला नसल्याने प्रत्येक वर्षी सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात आली किंवा कसे याबाबतची पडताळणी करता आली नाही.

7) उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.93 दि.26/01/2003 सोबतच्या जोडपत्र-ब मधील क्र.9 नुसार घनकचरा वाहतूक करणा-या वाहन व कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतू तदसंबंधी अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. त्यामुळे घनकचरा वाहनांचा व कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसून आले नाही.

8) भाडयाने घेतलेल्या जेसीबी व डंपर यांच्या वापराबाबत स्वच्छता निरीक्षक यांचे दैनंदिन अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने प्रदानाच्या योग्यतेची पडताळणी करता आली नाही.

9) प्रमाणक क्र.4983 व 4984 दि.22/03/2013 ची तपासणी केली असता जेसीबी व डंपर भाडयाने घेतल्याने मे.शुभम कंस्ट्रक्शन यांना माहे फेब्रुवारी 2013 मध्ये केलेल्या कामाकरीता अनुक्रमे रक्कम रु.2027056/- व रु.1703632/- अदा करण्यात आली आहे. कार्यादेश क्र.354/13 दि.14/01/2013 अन्वये भाडयाने घेतलेल्या डंपरचा 8 तासाकरीता रु.3000/- प्रमाणे दर निश्चित करण्यात आला असल्याने पुर्ण 8 तासाकरीता वापर करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात कमी वेळेकरीता काही दिवशी वापर केला असतांना देखील डंपरकरीता पुर्ण 8 तासाची रक्कम अदा केली आहे. त्यामुळे कंत्राटदारास रक्कम रु. 83656/- जादा प्रदान करण्यात आली आहे.

10) मे.शुभम कं.यांनी कार्यादेशानूसार प्रती दिन आठ तास काम करणे आवश्यक असताना दि.14/02/ 2013 रोजी सकाळी 10 ते 6 व संध्या.6 ते रात्री 2 पर्यंत जेसीबी व डंपरद्वारे कचरा वाहतूकीचे काम केल्याचे निदर्शनास आले आहे. एकाच दिवशी जादा काम करणेबाबत मनपामधील सक्षम अधिका-यांचे आदेश नस्तीत दिसून आले नाही. त्यामुळे जादा कामाची आवश्यकता व सत्यता पडताळणी करता आली नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.98 दि.17/07/2015 रोजी दिले असता प्राप्त् अनुपालनात आक्षेपाच्या अनुषंगाने सोबत कागदपत्रे जोडण्यात आली असल्याचे अभिप्राय दिले आहेत. परंतू अनुपालनासोबत कागदपत्रे जोडण्यात आली नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल

1)मुद्रांक नोंदणी शुल्क रक्कम रु.499900/-
2) डंपरचा कमी कालावधीकरीता वापर केल्याने झालेले जादा प्रदान रु.83656/-

DATPVWM7501 (Ref No : 40, Hmm No : 98)

## *55 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पॉवर स्विपिंग् मशीनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 05**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 2541513.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 1256966.00/-

***कमी रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. पॉवर स्विपींग मशीन गाडीच्या लॉग शिटवर मनपाने नियुक्त केलेल्या स्वच्छता निरीक्षक व कंत्राटदाराचा प्रतिनिधी यांची संयुक्तीक स्वाक्षरी नाही. दि:08/09/2010 ते दि:26/09/2011 व दि. 27/09/2011 ते दि. 02/11/2012 या कालावधीची बँक गॅरंटी नस्तीत आढळून आली नाही. मुल्यांकन विवरणपत्रातील गुणांची परिगणना चुकीची झाल्याने जादा प्रदान झाले आहे. काही रस्त्यांवर मशीनद्वारे साफसफाईच करण्यात आली नसल्याचे तसेच काही दिवशी मशीनद्वारे साफसफाई केली नसतांना सदर दिवसाची रक्कम अदा केली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पॉवर स्विपिंग मशीनद्वारे साफसफाई करणे या कामासाठी 10 वर्ष इतक्या कालावधीकरीता स्थायी समिती ठराव क्रमांक 16 दि.01.06.2009 अन्वये प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. त्यानुसार दै.अमृत कलश, दै.नगर न्युज, एशियन एज व मुंबई लक्षदिप या वर्तमानपत्रात निविदा जाहीरात दिली असता मे.ऑल सर्व्हिसेस, मे.ॲन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि., मे. लायन सर्व्हिसेस व मे. राम इंजिनिअरींग यांच्या निविदा प्राप्त् झाल्या. त्यापैकी मे.ॲन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. यांची निविदा न्युनतम दर रु.1375/- प्रती किलो मीटर असल्याने स्थायी समिती ठराव क्र. 52 दि.20.08.2009 अन्वये त्यांचेशी संविदा करण्यास मान्यता दिली व क्र.196 दि. 24/08/2009 नूसार कार्यादेश देण्यात आले आहे. घनकचरा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

1) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09 दि.20/07/2009 नूसार एकूण कंत्राट रकमेच्या रु.10 लक्षकरीता रु.100/- व पुढील प्रत्येक लाख रुपयास रु.100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. निवीदाकाराच्या दहा वर्ष कालावधीकरीता कंत्राटाची एकूण रक्कम

रु.16,06,97,811/- वर रु.159798/- इतकी मुद्रांक नोंदणी शुल्क रक्कम आकारणे आवश्यक असतांना रु.100/- च्या मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. उर्वरित रक्कम रु.159698/- निविदाकाराकडून वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे.

2) निविदा अटी व शर्तीनुसार घनकचरा विभागाकडून ठेवण्यात आलेल्या पॉवर स्विपींग मशीन गाडीच्या लॉग शिटवर मनपाने नियुक्त केलेल्या स्वच्छता निरीक्षक व कंत्राटदाराचा प्रतिनिधी यांची संयुक्तीक स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतू वाहनाच्या खालील दिनांकाच्या लॉग शिटवर स्वच्छता निरीक्षकांची स्वाक्षरी नाही.

दि. 02/06/2012, दि. 05/06/2012 ते दि.25/06/2012

दि. 04/07/2012, 07/07/2012, 14/07/2012, 16/07/2012,

दि. 09/08/2012, 11/08/2012,

3) सदर ठेका दहा वर्षे इतक्या कालावधीकरीता दिला असल्याने ठेकाच्या कालावधी पर्यंत बँक गॅरंटीची वैधता वाढविणे आवश्यक आहे. दि.08/09/2010 ते दि.26/09/2011 व दि. 27/09/2011 ते दि. 02/11/2012 या कालावधीची बँक गॅरंटी नस्तीत आढळून आली नाही.

4) Performanace Evaluation Sheet नूसार दि.16/09/2012 ते दि.30/09/2012 या कालावधीचे कामाचे मुल्यमापन 95.4% इतके असणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 96.05% प्रमाणे रक्कम अदा केल्याने कंत्राटदारास रु.3401/- इतकी जादा रक्कम अदा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दि. 16/10/2012 ते दि.31/10/2012 या कालावधीचे कामाचे मुल्यमापन 83.10% इतके असणे आवश्यक असतांना 84.12% प्रमाणे रक्कम अदा केल्याने रु.5948/- इतकी जादा रक्कम अदा करण्यात आली आहे.

5) प्रमाणक क्र.4868 दि.18/03/2013 रु.2541513/- इतक्या निव्वळ प्रदान रकमेच्या प्रमाणकाची तपासणी केली असता माहे जुन 2012 ते ऑक्टोबर 2012 या कालावधीत पॉवर स्विपींग मशीनद्वारे साफसफाई केलेल्या रस्त्यांच्या कामाची रक्कम अदा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जुन 2012 ते ऑगस्ट 2012 कालावधीच्या स्विपींग मशीन गाडीच्या लॉग शिटची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या परिशिष्ट "2" नूसार काही रस्त्यांवर मशीनद्वारे साफसफाईच करण्यात आली नसल्याचे तसेच काही दिवशी मशीनद्वारे साफसफाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर न केलेल्या कामाच्या बाबीवर कंत्राटदारास माहे जुन 2012 करीता रु.2,99,039/- जुलै 2012 करीता रु.4,83,860/- व ऑगस्ट 2012 करीता रु.3,05,020/- अशी एकूण रु.10,87,919/- इतकी जादा रक्कम अदा करण्यात आली आहे. माहे सप्टेंबर 2012 व ऑक्टोबर 2012 चे लॉग शिट लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले नसल्याने प्रदानाच्या योग्यतेबाबत पडताळणी करता आली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.97 दि.16/07/2015 रोजी दिले असता प्राप्त् अनुपालनाची तपासणी करून आक्षेप कायम करण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल- रु.1256966/-

1) मुद्रांक शुल्क रु. 159698/- 2) मुल्यांकन अहवालापेक्षा अतिप्रदान रक्कम रु.9349/-

3) लॉग शिटप्रमाणे न केलेल्या कामाची प्रदान केलेली रक्कम रु.1087919/-

DATPVWM7501 (Ref No : 41, Hmm No : 97)

## *56 अनाधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला रु. 46.61 लाख खर्च संबंधिताकडून वसूल केला नसल्याबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :B-2 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 4661862.00/-

***महानगरपालिकेने प्रभाग क्र. 1 ते 4 मार्फत एकूण 131 अनाधिकृत बांधकामे क्षेत्र 74474 चौरस फुट निष्कासित केले. त्याचा रु. 46.61 लाख खर्च महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 260 नुसार अनाधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल करणे आवश्यक आहे. परंतु वसूल केला नसल्याने मनपाचे रु.46.61 लाख नुकसान झाले आहे.***

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधिल कलम 260 (2) नुसार अनाधिकृत इमारतीच्या बाबतीत सदर इमारत किंवा काम काढून टाकण्यांत येऊ नये. त्यात फेरफार करण्यात येऊ नये किंवा काम पाडण्यात येऊ नये याबाबत आयुक्तांची खात्री होईल अशा रीतीने कारण दाखविण्यात जर अशी व्यक्ती कसूर करील तर आयुक्तांस इमारत काढून टाकता येईल. त्यात फेरफार करता येतील किवा ते पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 264(4) पोटकलम 3 अन्वये धोकादायक बांधकामाच्या निष्कासनाचा खर्च इमारत मालक/भोगवटादाराने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उल्हासनगर महापालिका आयुक्तांचे आदेश क्र.उमपा/अवानिवी/अतिक्रमण/196/2001 दिनांक 30/10/2001 उल्हासनगर महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागाकडून अनधिकृत बांधकाम निष्कासित करतांना होणारा खर्च 1 (प्रती) चौरस फूट चटई क्षेत्राचे बांधकामास रु. 63/- या प्रमाणे अनधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल करण्यात यावेत असे नमूद करण्यात आले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2012-2013 या वित्तीय वर्षीच्या लेखापरीक्षणाच्या वेळी प्रभाग समिती स्तरावरील अनधिकृत बांधकामांची नोंदवही पहाता खालील तपशिलाप्रमाणे बांधकामांचे निष्कासन महानगरपालिकेने केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर अनधिकृत बांधकामांच्या मालकांकडून निष्कासनाचा खर्च रु. 46.61 लाख वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे महापालिकेच्या महसूलाचे रु.46,61,862 नुकसान झाले आहे. निष्कासनाचा खर्च वसूल होणे आवश्यक आहे.

| प्रभाग समिती क्र. | निष्कासित केलेले क्षेत्र स्क्वेप्रकरणे व फूट. | दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 18855 30 प्रकरणे | रु.63 | 11,87,865 |
| 2 | 14719 17 प्रकरणे | रु.63 | 9,27,297 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 77 89 24 प्रकरणे | रु.63 | 4,90,707 |
| 4 | 33111 60 प्रकरणे | रु.63 | 20,85,993 |
| | | एकूण | 46,61,862 |

2) प्रभाग सामित्याकडील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या नोंदवह्यातनुसार 12-13 वर्षात खालील प्रमाणे एकूण 193 बांधकामांचे निष्कासन केले आहे. परंतु नोंदवहीत 131 बांधकामांच्या निष्कासनाचेच क्षेत्र नमूद करण्यांत आले असून 62 निष्कासनाचे क्षेत्र नमूद करण्यांत आलेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणांच्या निष्कासनाच्या खर्चाची परिगणना करता आली नाही.

| प्रभात समिती क्र. | एकूण प्रकरणे | क्षेत्र नमूद प्रकरणे | क्षेत्र नमूद नसलेली प्रकरणे |
|---|---|---|---|
| 1 | 61 | 30 | 31 |
| 2 | 24 | 17 | 7 |
| 3 | 33 | 24 | 9 |
| 4 | 75 | 60 | 15 |
| एकूण | 193 | 131 | 62 |

3)उल्हासनगर महानगरपालिकेने 2012-2013 या वित्तीय वर्षामध्ये अतिक्रमण निष्कासनाकरीता पोलीस संरक्षण शुल्कापोटी प्र.क्र.4206 दि.29/1/13 रोजी रु.50,0000 व प्र.क्र.5105 दि.28/3/13 रोजी रु.5,00,000/- असे एकूण रु. 10 ,00,000/- चा खर्च महानगरपालिका निधीतून केला आहे, महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 260 व कलम 264 प्रमाणे निष्कासनाचा खर्च अनाधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल केला नसल्याने महानगरपालिकेस नाहक भुर्दंड पडला आंहे.

वसूलपात्र रक्कम रु.46,61,862/-

DATRVVM5901 (Ref No : 14, Hmm No : 64)

## *57 सुवर्ण जयंती योजनेच्या शासन निधीचा वापर केलेला नसल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :219-3229 केंद्र/राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2460000.00/-

***शासनाकडून शहरी मजूर कार्यक्रमासाठी प्राप्त झालेल्या रु. 2460000/- निधीचा वापर केला नसल्याने सदर शासन अनुदान गेल्या 16 वर्षापासून गुंतून पडले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासनाकडून सुवर्ण जयंती योजने अंतर्गत शहरी मजूर कार्यक्रम या योजनेसाठी खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

| प्राप्त झालेले अनुदानाचे वर्ष | प्राप्त झालेल्या अनुदानाची रक्कम रु. |
|---|---|
| 1996-97 | 1500000 |
| 2012-13 | 960000 |
| एकूण रक्कम रुपये | 2460000 |

2012-13 या आर्थिक वर्षामध्ये लेखापरीक्षण केले असता रक्कम रुपये 2460000 शिल्लक असल्याचे आढळून असल्याचे निदर्शनास आले आहे. 2012-13 आर्थिक वर्षापर्यंत वरील रक्कम खर्च न केल्यामुळे शिल्लक असल्याचे आढळले आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्रक्र128/अर्थोपाय दिनांक 6/6/2008 नुसार अखर्चित निधी शासनास परत करणे आवश्यक होते .परंतु त्याचे पालन झालेले नाही. सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्रमांक 06 दिनांक 23/03/2015 नुसार कळविण्यात आले असता अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे

आक्षेपाधीन रक्कम रुपये 2460000

DATASMM5901 (Ref No : 12, Hmm No : 06)

## ***58 समावेषक आरक्षणाच्या माध्यमातून महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या मालमत्ता महानगरपालिकेने ताब्यात घेतल्यानसल्या बाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :450-1426 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***उल्हासनगर महानगरपालिकेस समावेषक आरक्षणाच्या माध्यमातून महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या मालमत्ता महानगरपालिकेने ताब्यात घेतल्या नसल्याबाबत***

उल्हासनगर महानगरपालिकेस शासन निर्णय क्रमांक स-1094/सीआर-4/रापी 9 दि.7/4/94 नुसार समावेषक आरक्षणाच्या माध्यमातून मूळ मालकांना प्लँटचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आलेल्या मालमत्तापैकी 25% मालमत्ता ह्या मूळ मालकाकडून महानगरपालिकेच्या नावावर करणे आवश्यक आहे. परंतु खालील नमूद केलेल्या जागा ह्या मनपाच्या नावावर झाल्या नाहीत. अद्यापही सदर जागा मूळ मालकांच्या नावे आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र | जागेच्या मूळ मालकाचे नाव | जागेचा पत्ता | जागेचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती गीता हेनाणी | राधा कॉम्प्लेक्स दसेरा मैदान उल्हासनगर-3 | 257.14 चौ.मी. |
| 2 | श्री मुकेश वाधवानी | प्लॉट क्र 619(भाग) शीट क्र 60 व 76 उल्हासनगर-3 | 300 चौ.मी. |
| 3 | श्री पुरुषोत्तम भागचंदानी | भूखंड क्र 170(भाग)शीट क्र.32 ते 52 उल्हासनगर-3 | 830 चौ.मी. |
| 4 | श्री चंदर अहुजा<br>श्री विनोद पंजाबी | यु क्र 76(भाग) प्लॉट क्र 14/24 शीट क्र 49 उल्हासनगर-3 | 133 चौ.मी. |
| 5 | श्री जयराम कल्याणी | प्लॉट क्र 583,584,592,593.(भाग)शीट क्र 49 उल्हासनगर-3 | 545.47 चौ.मी. |
| 6 | श्री जयराम ठाकुर | यु क्र 75(भाग) यु.क्र.76 शीट क्र.49 उल्हासनगर क्र 3 | 258.64 चौ.मी. |
| 7 | श्री मनोहर नेभवाणी<br>श्री संजय नीचलानी | सबप्लॉट क्र 3 ते 6 सर्वे क्र 75हिस्सा क्र 27 सर्वे क्र 176 हिस्सा क्र 1 शीट क्र 75 उल्हासनगर क्र 3 | 1484.28 चौ.मी. |
| 8 | श्रीमती कमल माखीजा | यु क्र 76(भाग) प्लॉट क्र 14/24 शीट क्र 49 उल्हासनगर क्र,3 | 154.95 चौ.मी. |
| 9 | श्री श्रीचंद कुकरेजा | प्लॉट क्र 14/25 ते 14/28(भाग)शीट क्र 49 उल्हासनगर क्र,3 | 85.37 चौ.मी. |
| 10 | श्री सुनील राजवाणी<br>इतर रीजन्सी | प्लॉट क्र 14/25 ते शीट क्र 49 उल्हासनगर क्र 5 | 317.72 चौ.मी. |
| 11 | श्री मन्नान के गोरे | यु क्र 132 प्लॉट क्र 2 उल्हासनगर क्र 3 | 373 चौ.मी. |
| 12 | श्री सुंदरदास रीझसिंघानी | यु क्र 16 शीट क्र 49 उल्हासनगर क्र 5 | 1177.88 चौ.मी. |
| 13 | श्री हिरानंद बी कल्याणी | यु क्र 75 प्लॉट क्र 14/29 (भाग) 75 प्लॉट क्र 14/27(भाग) शीट क्र 49 उल्हासनगर क्र 3 | 176.63 चौ.मी. |
| 14 | श्री हिरू नामा मढवी | प्लॉट क्र 619 यु क्र 28 शीट क्र 75 व 76 उल्हासनगर क्र 3 | 293.79 चौ.मी. |
| 15 | श्री मनीष के गोकलानी | यु क्र75 प्लॉट क्र14/25(भाग) 75 प्लॉट | 266 चौ.मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | क्र14/27(भाग) शीट क्र.49 उल्हासनगर-3 | |
| 16 | श्री बसीमल धीरमलानी | प्लॉट क्र.1100,1094,1095 शीट क्र.77 उल्हासनगर-3 | 66.96 चौ.मी |
| 17 | श्री सुनील रीझवाणी | सर्वे क्र174 शीट क्र 59 उल्हासनगर-5 | 200 चौ.मी. |

महानगरपालिकेकडील मालमत्ता विभागाच्या मालमत्ता नोंदवही मधील अभिलेख्यावरून सदर मालमत्ता ह्या मूळ मालमत्ताधारकाकडे असल्याचे दिसून आले. त्या महानगरपालकेने अद्याप ताब्यात घेतल्या नाहीत.अर्धसमास पत्र क्रमांक 13 दि.1/04/15 नुसार कळविण्यात आले असता अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे .

DATASMM5901 (Ref No : 22, Hmm No : 13)

## *59 शहीद अरुणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) चे थकीत भाडे व करारनाम्यातील अटी व शर्तीची पूर्तता नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :450-1427 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 849999.00/-

***शहीद अरुणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) ची भाडे वसुली थकीत असून करारनाम्यातील अटी व शर्तीची पूर्तता नसल्याबाबत.***

1)उल्हासनगर महानगरपालिकेचे मालकीचे असलेले शहीद अरुणकुमार वैद्य सभागृह(टाऊन हॉल) हे महासभा ठराव क्रमांक 9 दिनांक 20/8/2000 व स्थायी समिती ठराव क्रमांक 145 दिनांक 25/10/2000 नुसार 30 वर्षाच्या कराराने रुपये 235200000/-एवढ्या रकमेस श्री कुमार चैनानी यांना बीओटी तत्वावर मालमत्ता विभागाने कामाचे आदेश क्रमांक उमप/मालमत्ता/9 दिनांक 20/8/2000 नुसार देण्यात आले आहे. श्री कुमार चैनानी यांना टाऊन हॉलचे नुतनिक्रण करण्यासाठी करारामधील अटी व शर्ती नुसार दिनांक 20/8/2003 पर्यंत मुदत देण्यात आली होती. नुतनीकरण कालावधी संपल्या नंतर दिनांक 20/8/2003ते 19/8/2004 पर्यंतच्या कालावधीचे भाडे करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे रुपये 30000/- भाडे वसूल करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु.30000/- वसूलपात्र आहे.

2) कंत्राटदाराकडून निविदेमधील अटी व शर्ती नुसार स्वराज अर्बन को ऑप बँक लि. यांचे कडून बँक हमीपत्र (Bank Guarantee) क्रमांक 1/02 दिनांक 16/8/2000 नुसार घेण्यात आली असून त्याची मुदत

दिनांक 16/09/2003 रोजी कालबाह्य झालेली असल्यामुळे सदर बँक गॅरंटीची मुदत वाढवून घेणे आवश्यक आहे. परंतु मुदतवाढ वाढवून दिलेली नाही. त्यामुळे निविदेमधील अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.
3) श्री कुमार चैनानी यांनी निविदेमधील अटी व शर्तीची पूर्तता केलेली असल्यामुळे वरील कामाचे आदेश देण्यात आले असून कंत्राटदाराने महानगरपालिकेशी दिनांक 19/8/2002 रोजी करण्यात करारामध्ये अट क्रमांक 8(P) मध्ये जर कंत्राटदाराने कंत्राटामध्ये भागीदार घेण्याबाबत विनंती केल्यास परवानगी देण्यात येईल अशी अट नमूद करण्यात आलेली आहे. वरील अटीचा निविदेमध्ये अंतर्भाव नसताना व निविदेमध्ये संबधित कंत्राटदाराची आर्थिक क्षमता असल्यामुळे कंत्राटदाराने निविदेमध्ये भाग घेतलेला आहे. त्यामुळे वरील अट निविदेमध्ये समाविष्ट नसताना करारामध्ये नमूद करणे हे नियमबाह्य आहे.
4) करारामधील अट क्र 8(f) (ii) मध्ये नमूद केल्या प्रमाणे जर नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी भाडे भरण्यात आले नसल्यास 18% प्रती वर्षी व्याजाची आकारणी करण्यात येईल. याप्रमाणे सन 2010-11 मधील रुपये 2499990/- व 2011-12 मधील भाड्यापोटी रुपये 300000/-असे एकूण रक्कम रुपये 549999/- रक्कम वसूल झाली नाही. सदर रकमेवर व्याज वसूल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संबधितांकडून वरील रकमा व्याजासह वसूल करून महानगरपालिकेच्या खात्यामध्ये भरणा करणे बाबत अर्धसमास पत्र क्र17 दि.8/04/2015 नुसार कळविण्यात आले असून अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रुपये 849999/-

DATASMM5901 (Ref No : 23, Hmm No : 17)

## *60 शिधा वाटप कार्यालयास जागा भाड्याने देण्यात आलेली अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :450-1426 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 9616447.00/-

***शिधावाटप कार्यालयास जागा भाड्याने देण्यास महासभेची मान्यता घेतलेली नाही. जागा भाडे करारनामा करण्यात आलेला नाही तसेच सेवाकर रु.1057843/ वसूल करण्यात आलेला नाही व दिनांक 13/8/2004 ते 12/8/2014 पर्यंतच्या कालावधीचे भाडे रु.8558604/- एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.***

1)उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये असलेली वुडलँड इमारतीच्या मधील दुसऱ्या मजल्यावरील 507.01 चौ.मी. ची जागा शिधा वाटप कार्यालयासाठी भाड्याने देण्याबाबत मालमता विभागाकडील पत्र क्रमांक उमपा/मालमत्ता /558/2004 नुसार महासभेची मंजुरीच्या अधिन राहून दिनांक13/08/2004 पासून करार न

करता महासभेचा ठराव व स्थायी समिती ठराव न करता आणि जागेचे भाडे न ठरविता देण्यात आलेली आहे. वरील जागेचे बाजार भावाप्रमाणे उपभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग उल्हासनगर यांचे कडील पत्र क्रमांक उअ/साबाउवि/3/रेशा/1356 दिनांक 11/08/2008 नुसार जागेचे भाडे निश्चित केले असून दिनांक 13/8/2004 ते 12/8/2014 पर्यंतच्या कालावधीचे भाडे रुपये 8558604/- एवढी रक्कम वसूल केली नाही. थकीत भाडेबाबत महानगरपालिकेने संबधित कार्यालयास नोटीस दिल्याचे अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. सदर रक्कम 8558604/- वसूल करणे आवश्यक आहे.
2) शिधावाटप कार्यालयाकडून प्रलंबित असलेल्या भाड्याच्या रकमेवर सेवाकर केंद्र शासनाकडील अधिसूचना क्रमांक 3/2012 दि 7/03/2012 नुसार भाड्याची रक्कम रुपये 8558604/- वर सेवाकर 12.36% प्रमाणे रुपये 1057843/- वसूल करणे आवश्यक आहे.
वसुलपात्र रक्कम रु 8558604 + 1057843= 9616447/-

DATASMM5901 (Ref No : 24, Hmm No : 05)

## *61 वाहनतळाची जागा भाड्याने देण्याचे कामामधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :251-1516 म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 12571.00/-

***महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम क्रमांक 79(ड) नुसार भाड्याने द्यावयाच्या जागेचे भाडे चालू बाजारभाव किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशा प्रकारची तरतूद आहे. वाहनतळाचा ठेका देताना अधिनियमातील तरतुदीचे पालन न करता चालू बाजारभावापेक्षा कमी रकमेस भाड्याने जागा दिली आहे. तसेच कंत्राटदाराकडून सेवाकर वसूल केलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची असलेली वाहनतळाची जागा स्थायी समिती ठराव क्र 126 दिनांक 27/02/2009 नुसार 5 वर्षीच्या कालावधीसाठी कराराने (Pay And Park) या अटीवर रुपये 190000/- एवढ्या रकमेची जाहिराती व्दारे निविदा मागवून वाहन तळाची जागा भाड्याने देण्यात आली आहे. श्री मिलिंद भास्कर वैद्य यांनी भरण्यात आलेला दर हा न्यूनतम असल्यामुळे श्री मिलिंद भास्कर वैद्य याना मालमत्ता विभागा कडील आदेश क्रमांक 288 दिनांक 31/11/2009 नुसार कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. वरील कामाच्या धारिकेची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.
1)महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील नियम क्रमांक 79(ड) नुसार भाड्याने द्यावयाच्या जागेचे भाडे चालू बाजारभाव किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशा प्रकारची तरतूद आहे.

वाहनतळाचा ठेका देताना अधिनियमातील सदर तरतुदीचे पालन न करता चालू बाजारभाव किंमतीपेक्षा कमी भावाने जागा भाड्याने देण्यात आली आहे. याबाबतचा अर्धसमास पत्र क्रमांक 15 दि.01/04/2015 नुसार कळविण्यात आले आहे. प्राप्त झालेल्या अनुपालनाचे पत्र क्रमांक 32 दिनांक 09/04/2015 मध्ये वरील जादा ही एम.एम.आर.डी.ए. तर्फे स्कायवॉक चे काम सुरु होते. संबधितांना पर्यायी जागा देण्यात आली आहे. त्यामुळे जागेचे बाजारमूल्य निश्चीत करण्यात आलेले नाही. असे विभागाने अनुपालनात नमूद केले आहे. परंतु वाहनतळाची जागा भाड्याने देण्यापूर्वी जागेचे बाजारमूल्य निश्चीत करणे आवश्यक होते. असे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील नियम क्रमांक 79(ड) मध्ये नमूद केले आहे. सदर अधिनियमातील तरतुदीचे पालन झालेले नाही.

2)संबधित कंत्राटदाराकडून 2010-11 ते 2011-12 या कालावधीची सेवाकराची रक्कम रुपये 76000/-च्या 10.36% रुपये 7834/- व 2012-2013 मधील रुपये 38000/-च्या 12.36%=4697 असे मिळून रुपये 12571/- एवढ्या रकमेची संबधित कंत्राटदाराकडून सेवाकराची वसुली केलेली नाही. वसूल करणेबाबत ठेकेदारास कळविले असल्याचे विभागाने अनुपालनात नमूद केले आहे. परंतु रक्कम अद्यापही वसूल झाली नाही. त्यामुळे घेण्यात आलेला आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रुपये 12571/-

DATASMM5901 (Ref No : 25, Hmm No : 15)

## *62 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरुस्तीवर विहीत मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :362-2460 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1135908.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरुस्तीवर करण्यात आलेल्या विहित मर्यादेपेक्षा जादा खर्च केला आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण /2007/वाहन खरेदी /प्र.क्र27/2008/नवि-26 दिनांक 18/02/2008 अन्वये आयुक्त यांना खर्चाचे अधिकार आहेत. परंतु उपआयुक्त वाहन विभाग यांनी अधिकारात नसतांना वाहन दुरुस्तीवरील खर्चास मंजुरी देलेली असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे. वाहन दुरुस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधून दरपत्रके मागवून करणे आवश्यक होते परंतु सर्व वाहनांची दुरुस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून करून घेण्यात आलेली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांच्या दुरुस्तीवर 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये एकूण रक्कम रुपये 11,35,908/- मात्र खर्च करण्यात आलेला असून एकूण झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महानगरपालिकेच्या मालकीची 2012-13 या आर्थिक वर्षात एकूण 39 अवजड वाहने व 11 हलकी वाहने असून प्रस्तुत वाहनाच्या दुरुस्तीचे अभिलेख यांची तपासणी केली असता वाहनाच्या दुरुस्तीवरील खर्चाबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण /2007/ वाहन खरेदी / प्र.क्र27/2008/नवि-26दिनांक 18/02/2008 नुसार काटकसरीचे धोरणाची उपाययोजना करून उपलब्ध निधीचा जास्तीत जास्त सुयोग्य वापर होण्यासाठी व महानगरपालिकेकडील असलेली वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्याच्या दुरुस्तीच्या खर्चास मंजुरी देण्यासाठी काही विहित पद्धती अंमलात आणलेल्या असून त्यानुसार अतिरिक्त आयुक्त, यांना पेट्रोल वर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी रुपये 25000/- व डिझेल वर चालणाऱ्या वाहनासाठी रुपये 30000/-(टायर ट्यूब बॅटरी इत्यादी खर्चासह) खर्च करण्याच्या मंजुरीच्या शक्ती प्रदान केलेल्या आहेत. त्यापैकी निवडक वाहनाच्या नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वर्ष | एकूण झालेला खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | MH05 A-9462 | जे सी बी | 2012-13 | 60553/- |
| 2 | MH05 P-634 | अँम्बूलंस | 2012-13 | 75594/- |
| 3 | MH05 N-216 | एस एल सी एम | 2012-13 | 41818/- |
| 4 | MH05 P-9090 | होंडा सिटी | 2012-13 | 125431/- |
| | | | एकूण रुपये | 303396/- |

वाहनांचे दुरुस्तीच्या खर्चास मंजुरी देण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिका आयुक्त याना शासन निर्णया व्दारे दिलेले असताना वरील झालेल्या खर्चास उपआयुक्त वाहन विभाग यांनी अधिकारात नसतांना मंजुरी देलेली असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

2) सदरच्या शासन निर्णयामध्ये सर्व वाहनाच्या दुरुस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधून तीन दरपत्रके मागवून न्यूनतम दर असलेल्या गॅरेजवाल्या कडून वाहन दुरुस्ती करावयाची असताना सर्व वाहनाची दुरुस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहने दुरुस्त करून घेण्यात आलेली आहेत.

3) महानगरपालिकेच्या सर्व वाहनाच्या दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चाचे हिस्ट्रीशीट (इतिहास पुस्तक) यांची तपासणी केली असता अशी नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही प्रतिमहा वाहनाच्या दुरुस्तीचा गोषवारा तसेच वाहनावरती झालेल्या खर्चाची बेरीज घेऊन मेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वर्षामध्ये प्रत्येक वाहनावर दुरुस्ती साठी झालेल्या खर्चाची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

4)वाहनांचे हिस्ट्री शीट (इतिहास पुस्तक) मध्ये वाहनाचे मॉडेल, वर्ष, इंजिन चेसी क्रमांक, विमा

इत्यादी बाबतची माहिती आरटीओ पासिंग,आरसी बुकची प्रत इत्यादी नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच नोंदवहीवर वाहन प्रमुख यांनी तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.
अर्धसमास क्रमांक 69 दिनांक 23/06/2015 नुसार निर्गमित केला असून अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.
आक्षेपाधीन रक्कम रु.1135908/-

DATNDMM5801 (Ref No : 36, Hmm No : 69)

## *63 मोबाईल टॉवर बसविणेच्या मंजूरी व थकीत रकमेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 16038415.00/-

***मोबाईल टॉवरच्या कर निर्धारण, थकीत रक्कम इत्यादीच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत मागणी करूनही उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. एकूण 71 मोबाईल टॉवरची एकूण रक्कम रु.1,60,38,415/- मिळकत करापोटी थकीत आहे. एकूण कार्यान्वीत मोबाईल टॉवरपैकी अनधिकृत टॉवरची माहीती, त्यांचेबाबत केलेली कार्यवाही केली. याबाबतचा अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाला नाही.***

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीएस-1810/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13 दि.26/07/2011 अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात शासनाने धोरण निश्चित केले आहे. त्यानूसार मोबाईल कंपनीच्या मालकाने अधिकृत आर्किटेक्चर मार्फत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस अर्ज करणे आवश्यक असून त्यासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

1) मोबाईल कंपनीच्या मालकाने आर्किटेक्चरची नेमणूक केलेबाबत कागदपत्र,
2) मिळकत कर ज्याचे नावे असेल त्याचे किंवा सहकारी संस्थेशी केलेला करारनामा,
3) मोबाईल ज्या ठिकाणी बसविणार तेथील नकाशा,
4) स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून प्राप्त् केलेले स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र,
5) स्थानिक प्रशासन संस्थेकडे जमा केलेले शुल्क,
6) टेलिकम्युनिकेशन विभागाचे परवानापत्र,
7) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र व इत्यादी

त्याचप्रमाणे नियम क्र.6 नुसार मोबाईल कंपनीने प्रत्येक तीन वर्षानंतर स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.
उपरोक्तप्रमाणे तसेच मोबाईल टॉवरच्या कर निर्धारण, थकीत रक्कम इत्यादीच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत मागणी करूनही उपलब्ध करून देण्यात आले नाहीत.
2) 2012-13 अखेर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण 71 मोबाईल टॉवरची एकूण रक्कम रु.16038415/- मिळकत करापोटी थकीत असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेतील संगणक विभागाकडून प्राप्त विवरणपत्रानूसार दिसून येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 140 व 141 नुसार थकबाकीच्या वसुलीच्या अनुषंगाने नोटीस व दंडात्मक कार्यवाही केल्याचे अभिलेख दिसून आले नाही. (परिशिष्ट क्र.9)
3) तसेच एकूण कार्यान्वीत मोबाईल टॉवरपैकी किती मोबाईल टॉवर अनधिकृत आहेत. अनधिकृत मोबाईल टॉवरवर निष्कासनाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतू अनधिकृत मोबाईल टॉवर बाबत मालमत्ता कर विभागाने कोणती कार्यवाही केली? किती मोबाईल टॉवर कंपनीकडून दंडासह मालमत्ताकर वसूल केला व किती मोबाईल टॉवर निष्काशीत केले याबाबतच्या माहीतीचा तपशिल लेखापरीक्षणाकरीता मागणी करूनही उपलब्ध झाला नाही. सबब, त्याबाबतच्या प्रकरणांची सत्यता पडताळणी करता आली नाही.
उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.114 दि.05/08/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 99, Hmm No : 114)

## *64 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अवैध बांधकामास शास्ती न लावलेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 4678117.00/-

***अनधिकृत इमारतींच्या बांधकामावर शास्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 (अ) प्रमाणे कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल, अशी तरतूद आहे. नगरविकास विभागाचे पत्र क्र. एमयुबी/एमयुपी-2009/197/प्र.क्र.40/90/नवि-19

दि.05/02/2009 अन्वये शहरातील अवैध बांधकाम व पुनर्बांधकामास शास्ती लावणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिका जावक पत्र क्र.उमपा/कर विभाग/121/2014 दि.14/11/2014 अन्वये उक्त तरतुदी अंतर्गत मालमत्ता करात समाविष्ठ असलेले सर्वसाधारण कर, मलप्रवाह कर, पथ कर, पाणी पुरवठा लाभ कर, मलप्रवाह सुविधा लाभ कर इत्यादीवर शास्तीची रक्कम निश्चीत करणेबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सन 2008-2009 , 2009-2010, 2010-2011 व 2012-13 कालावधीत खालीलप्रमाणे बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र देण्यात आली असून भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेल्या इमारत बांधकामांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र दिलेल्या प्रकरणांची संख्या | जोता तपासणी दाखला दिलेल्या प्रकरणांची संख्या | भोगवटा/बांधकाम पुर्ण प्रमाणपत्र दिलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2008-09 | 182 | 12 | 13 |
| 2 | 2009-10 | 271 | 72 | 22 |
| 3 | 2010-11 | 167 | 19 | 92 |
| 4 | 2011-12 | माहिती अप्राप्त | माहिती अप्राप्त | माहिती अप्राप्त् |
| 5 | 2012-13 | 141 | अप्राप्त | 6 |

उपरोक्तप्रमाणे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेल्या इमारतींच्या संख्या यांची तुलना करता भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेल्या इमारतींची संख्या फारच कमी आहे. या विवरणपत्रावरून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ब-याच इमारतींचे काम अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सन 2012-2013 कालावधीत एकूण 2724 नविन/जुनी/सुधारीत पक्क्या/कच्च्या इमारतींचे कर निर्धारण केले असून त्यापैकी माहे जुन 2012 मधील 330 प्रकरणे आहेत. सदर प्रकरणांची मुळ नस्ती लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् झालेली नाही. तसेच सन 2012-2013 मधील भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या प्रकरणांची संख्या पाहता माहे जुन 2012 मधील सर्व प्रकरणे अनधिकृत असल्याचे दिसून आले आहे. अनधिकृत इमारतींवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 (अ) प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. माहे जुन 2012 मधील कर निर्धारणांच्या प्रकरणांवर कलम 267 (अ) प्रमाणे शास्तीची परिगणना केली असता एक वर्षाकरीता एकूण रु.46,78,117/- इतकी रक्कम वसुलपात्र आहे. (परिशिष्ट क्र.10) याप्रमाणे इतर महीन्यांतील प्रकरणांवर तसेच यापुर्वीच्या वर्षातील प्रकरणांवर सुध्दा शास्तीची आकारणी करून वसुली होणे आवश्यक आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 113 दि.05/08/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 103, Hmm No : 113)

## *65 मनपा कर्मचाऱ्यांकरिता मे.मोहित एन्टरप्राइजेस यांचे कडून केलेल्या गणवेष व कापड खरेदीतील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :110-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 800800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 966000.00/-

***महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या गणवेषाकरिता मे. मोहित एन्टरप्राइजेस यांचे कडून 2760 मिटर गणवेष कापड (खाकी,सफेद व नेव्ही ब्लू) खरेदी करण्यात आलेले आहेत. सदर खरेदी ही महाराष्ट्र राज्य वस्रोद्योग महामंडळ/ महाटेक्स/ टेक्सकॉम/ महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ यांचे कडून मागणी नोंदवून करणे बंधनकारक आहे. तथापि महानगरपालिकेने त्याची अंमलबजावणी केलेली नाही. व गणवेष व कापड खरेदी मे. मोहित एन्टरप्राइजेस यांचेकडून केली आहे.***

मनपा कर्मचारी यांचे करिता 2011-12 मध्ये मे. मोहित एन्टरप्राइजेस यांचे कडून 2760 मिटर गणवेष कापड (खाकी,सफेद व नेव्ही ब्लू) खरेदी करण्यात आलेले आहेत. सदर गणवेष कापड खरेदीचे रु.966000/-चे प्रदान 2012-13 मध्ये प्रमाणक क्रमांक 2966 दिनांक 30/10/2012 अन्वये करण्यात आलेले आहे. त्यामध्ये खरेदीत दिसून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास क्र. 88 दिनांक 10/07/2015 अन्वये विभागास कळविण्यात आलेले आहे तथापि विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर खरेदीबाबतची निविदा जाहिरात ही स्थानिक वृत्तपत्र दैनिक अमृत कलश व दैनिक मुंबई लक्षदीप यात दिनांक 26/07/2011 रोजी रु. 46 लक्ष अंदाजित खर्चासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापि शासन निर्णय दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 अन्वये निविदा संबंधी जाहिरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णय दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8.1 अन्वये खरेदी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. व वार्षिक खरेदी रु.50000/-पेक्षा जास्त असेल तर निविदा चौकशी राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणात जाहिरात राजपत्रात प्रसिद्ध न करता स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात आली आहे.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस-1088 उद्योग-6 दि. 02/01/1992 परिच्छेद 7 मधिल परिशिष्ट- 5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच शासन पत्र क्र. संकीर्ण-2005/46/प्र.क्र.3 /06/नवि-20 दि.31/07/2006 नुसार गणवेषाचे कापड महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ/ महाटेक्स/ टेक्सकॉम/महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ यांचे कडून मागणी नोंदवून खरेदी करणे बंधनकारक आहे. तथापि त्याची अंमलबजावणी केलेली नाही.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस-1088 उद्योग-6 दि.02/01/1992 मधील परिच्छेद 8.4 मधिल तरतुदी नुसार खरेदी केलेले कापड विहित दर्जाचे पुरवल्याबाबत महाराष्ट्र

राज्य वस्त्रोद्योग महामंडळ/ महाटेक्स/ टेक्सकॉम/महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ यांचेकडून तपासणी करून तसा तपासणी अहवाल ठेवणे आवश्यक आहे. परंतु तशी तपासणी केलेली दिसून आली नाही. त्यामुळे विहित दर्जाचे कापड पुरवठा झाल्याची खात्री झाली नाही.

4) निविदा सूचनेतील अट व शर्त अ मधील क्र.1(ब) नुसार निविदाकाराकडे खरेदी करण्यात येणाऱ्या मालाचे संस्था नोंदणी अथवा दुकान नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तथापि मंजूर करण्यात आलेल्या निविदाधारक मे. मोहित एन्टरप्राइजेस यांचेकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणीपत्र स्टेशनरी, इलेक्ट्रिक गुड्स, हार्डवेअर, फर्निचर व कन्झुमर गुड्स, म्हणूनं नोंदलेले आहे. गणवेष कापड साहित्य विक्रीबाबतचा नोंदणी प्रमाणपत्रात उल्लेख नसताना पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुरवठादाराकडे गणवेष कापड पुरवठा केल्या बाबतचे अनुभव प्रमाणपत्र नाही. तसेच अट ब मधील क्र.1(ड) नुसार निविदाकाराकडे आयकर भरणा केलेले चलन असणे जरुरी आहे. पुरवठादाराकडे दुकान किंवा संस्थेच्या नावे आयकर भरणा केलेले चलन श्री हिरो रमेशलाल पंजाबी असे पर्सनल नावाने चलन सादर केलेले आहे सदर बाब ही अट क्र. 1 (ड) चे उल्लंघन करणारी आहे.

5) निविदा मागविण्यापूर्वी बाजारभावाच्या दराबाबत खात्री करणेसाठी बाजारातून संबंधित वस्तूचे दर मिळवून विचारात घेणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केलेली नस्तीत दिसून आली नाही. त्यामुळे पुरवठादाराचे मान्य केलेले दर बाजारभावानुसार वाजवी असल्याची खात्री करता आली नाही.

6) करारनामा व पुरवठा आदेशात वस्तू पुरवठ्याच्या कालावधीत विसंगती दिसून आली आहे. मालाचा पुरवठा आदेश दिनांक 31/12/2011 रोजीचा आहे तथापि करारनाम्यावरील तारीख 04/01/2011 अशी पुरवठा आदेशा पूर्वीची नोंद केलेली आहे.

7) पुरवठादारास आदेश क्र.263 दि.31/12/2011 अन्वये पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि मालाचा पुरवठा केल्याबाबत चलनावर माल प्राप्त झाल्याची दिनांक नोंद नाही त्यामुळे माल विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

8) 2011-12 व 2012-13 मधील गणवेष कापड वाटप नोंदवही तपासली असता 2011-12 अखेर 1463 व 2012-13 अखेर 2288 मिटर कापड शिल्लक राहिलेले दिसून आले आहे. त्यामुळे मागणी पेक्षा जास्त गणवेष कापड खरेदी केलेले आहे. मागील शिल्लक व आवश्यक गणवेष याचा ताळमेळ घेऊन मगच खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचे पालन केले नाही त्यामुळे 2288 मिटर कापड विना वापर पडून आहे. त्यामुळे रु.800800/-चा निधी नाहक गुंतून पडला आहे. तसेच कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष गणवेष मिळाल्याच्या पोच पावत्या नस्तीत नाहीत त्यामुळे कर्मचाऱ्यांना गणवेष प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रुपये 966000/-

TRTARCM6001 (Ref No : 51, Hmm No : 88)

### *66 कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींना वाटप केलेल्या डिनर सेट, प्रेशरकुकर व इस्त्री वाटपातील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :343-2110 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 475000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 475000.00/-

***शासनाचे परिपत्रक अथवा महानगरपालिकेचा ठराव नसतांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींना डिनर सेट,प्रेशरकुकर व इस्त्री चे वाटप करण्यात आलेले आहे.शासन निर्णय 02/01/1992 मधील तरतूद व उद्योग संचालनालय मंत्रालय मुंबई यांचे कडील परिपत्रक क्र.उस/शा.निम. शा.वख./ परिपत्रक/2009/बी-15279 दि. 03/06/2009 मधील तरतुदी नुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.***

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींना (लाभार्थी) आरोग्य विभागाकडून डिनर सेट, प्रेशरकुकर व इस्त्री चे वाटप करण्यात आलेले आहे. त्याकरिता मे. अमर ज्योत इंटरप्राइजेस यांचेकडून 500 डिनर सेट व मोहित एन्टरप्राइजेस यांचे कडून 500 प्रेशरकुकर खरेदी करण्यात आलेले आहे. व सदरहू खरेदीचे रु.250000/ व रु. 225000/--चे प्रदान 2012-13 मध्ये प्रमाणक क्रमांक 4977 व 4964 दिनांक 22/03/2013 अन्वये करण्यात आलेले आहे. वस्तू वाटपात व खरेदीत खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत. अनियमितते बाबत विभागास अर्ध समास क्र. 96 दिनांक 16/07/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. विभागाकडून पत्र क्र. 398 दिनांक 5/08/2015 नुसार खुलासा प्राप्त झालेला आहे. तथापि खुलासा सयुंक्तिक व समाधानकारक नाही त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे परिपत्रक क्र.कुनिश/2007/प्रक्र.197/07/कुक-1दिनांक 13/12/2007 अन्वये निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या मजुरीची भरपाई म्हणून रोख मोबदला व प्रोत्साहानात्मक अनुदान (पुरुष-रु.1500/- व स्त्री रु.1000/- व रु.650/- प्रोत्साहानात्मक अनुदान देण्याची योजना शासनाने सुरु केली आहे. महानगरपालिकेने सदरहू अनुदानाव्यतिरिक्त कुटुंब-नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींना डिनर सेट, प्रेशरकुकर व इस्त्री चे वाटप केलेले आहे. वस्तू वाटपाविषयीचे शासनाचे असे आदेश किंवा परिपत्रक नस्तीत दिसून आले नाही. तसेच स्थायी समितीचा ठराव देखील पारित केलेला आढळून आलेला नाही.

2) निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तींची (लाभार्थीची) नावे, यादी व संख्याविषयीची माहिती नस्तीत आढळून आलेली नाही.

3) वरील खरेदीसाठीची निविदा वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. पुरवठा आदेश क्र. 166 व 168 दिनांक 31/03/2011 मध्ये निविदा दिनांक 5/07/2008 चा संदर्भ दिलेला आहे. पूर्वी केलेल्या पुरवठा दाराकडूनच खरेदी करण्यात आलेली आहे. परंतु नविन निविदा काढून खरेदीची प्रक्रिया केलेली नाही. शासन निर्णय 02/01/1992 मधील तरतूद व उद्योग संचालनालय मंत्रालय मुंबई यांचे कडील परिपत्रक क्र.उस/शा.निम.शा.वख./परिपत्रक/2009/बी-15279 दि. 03/06/2009 मधील तरतुदी नुसार एकूण वार्षिक खरेदी रु.50000/-किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी निविदा चौकशी राजपत्रात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे तथापि अशी कार्यवाही सदरहू खरेदी प्रक्रियेत करण्यात आलेली नाही.

Ulhasnagar (M Corp.)

4) प्राप्त वस्तूंच्या डिलिव्हरी चलनावर क्रमांक व दिनांक नोंद नाही. वस्तू प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावतीवर दिनांक नाही. त्यामुळे माल विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही. तसेच माल उशिरा प्राप्त झाल्यास दंडात्मक कार्यवाही बाबत पुरवठा आदेशात उल्लेख नाही. पुरवठादारा बरोबर करारनामा केलेला नाही. लाभार्थींना वस्तू मिळाल्याची पोहोच नस्तीत नाहीत.

TRTARCM6001 (Ref No : 65, Hmm No : 96)

## *67 आरोग्य विभागाकडून श्वानांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविणे कामातील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :662-2579 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1788080.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 524480.00/-

***आरोग्य विभागाने 1060 श्वानांची शस्त्रक्रिया केल्याचे नोंदवहीवरून दिसून येते. तथापि 1500 श्वानांची शस्त्रक्रिया केल्याबाबत रु.1788080/-चे प्रदान केलेले आहे. शस्त्रक्रिया नोंदवही पाहता 440 श्वानांची शस्त्रक्रिया केल्याचे दिसत नाही. त्यामुळे 440 श्वानांचे रु.1192 प्रती श्वान प्रमाणे एकूण रु. 524480/-चे जादा प्रदान ठेकेदारास झाले आहे. सदर रक्कम वसूलपात्र आहे.***

महानगरपालिका क्षेत्रातील 1500 श्वानांची निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्याचे काम हे मे. ॲनिमल वेलफेअर सोसायटी या संस्थेस कार्यादेश क्र. 165 दिनांक 31/03/2011 अन्वये देण्यात आलेले आहे. सदर काम हे 11 महिन्यात करणे बंधनकारक आहे. सदर कामात खालीलप्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत.

1) प्रमाणक. क्र.2967 दि.23/09/2011 रु.432096/- प्रमाणक. क्र.3696 दि.15/11/2011 रु.215000/- प्रमाणक. क्र.2196 दि.12/09/2012 रु.185000/- व प्रमाणक. क्र.5113 दि.28/03/2013 रु.955984/- असे एकूण रु 1788080/-चे प्रदान मे. ॲनिमल वेलफेअर सोसायटी यांना केलेले आहे. निर्बीजीकरण शस्त्रक्रिया नोंदवही तपासली असता त्यात 1 ते 698 श्वानांची (7/04/2011 ते 28/04/2011) व 1 ते 362 श्वानांची (1/06/2011 ते 22/06/2011) अशी एकूण 1060 श्वानांची शस्त्रक्रिया केल्याचे नोंदवहीवरून दिसून येते. तथापि प्रदान हे 1500 श्वानांची शस्त्रक्रिया केल्याबाबत रु.1788080/-चे केलेले आहे. तरी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया नोंदवही पाहता 440 श्वानांची शस्त्रक्रिया केल्याची नोंद नाही. त्यामुळे 440 श्वानांचे रु.1192 प्रमाणे एकूण रु.524480/-चे जादा प्रदान केल्याचे दिसून आले.

2) मे. ॲनिमल वेलफेअर सोसायटी यांचेशी केलेला रु.1788080/ चा करारनामा हा फक्त 100/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर केलेला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 63 अन्वये अन्वये रुपये 10 लाखांवरील

प्रत्येक लाखास 100/- रुपये मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मुद्रांक शुल्क भरलेले नाही. रु.800/- मुद्रांक शुल्क ठेकेदाराकडून वसूल करून शासनास जमा करावे.

3) करारनाम्यातील अट क्र. 7 नुसार कामाचा तपशिल हा दर 15 दिवसांनी महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक आहे. तथापि तसा तपशिल किंवा अहवाल नस्तीत दिसून आला नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 1788080/-

वसूलपात्र रक्कम रु. 524480/-

TRTARCM6001 (Ref No : 95, Hmm No : 122)

## *68 मे. नमन इंटरप्राईजेस यांचे कडून अँन्टी रॅबीज इंजेक्शन खरेदीतील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :662-2579 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2888980.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 951800.00/-

***महानगरपालिकेने अँन्टी रॅबीज इंजेक्शनची खरेदी ही शासनाच्या दर करार पत्रकानुसार केलेली नसून निविदा प्रक्रिया राबवून केलेली आहे. वैद्यकीय संचालक यांचे परिपत्रक क्र.DMER/DPC/4483//4495/10 दिनांक 30/12/2010 नुसार अँन्टी रॅबीज इंजेक्शन खरेदीचा दर हा रु.198/- प्रति इंजेक्शन असा आहे तथापि महानगरपालिकेने रु.290/- प्रति इंजेक्शन दराने खरेदी केलेली आहे त्यामुळे प्रति इंजेक्शन रुपये 92/- प्रमाणे एकूण10200 इंजेक्शन चे रु.938400/-महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

महानगरपालिकेने अँन्टी रॅबीज इंजेक्शन खरेदीचा ठेका आरोग्य विभागाकडील कामाचे आदेश क्रमांक ९७ दिनांक 31/12/2011 अन्वये मे. नमन एन्टरप्राइजेस वसई यांना दिलेला आहे व प्रमाणक.क्र.1154 दि.19/06/2012 रु.916980/- प्र.क्र.4348 दि.06/02/2013 रु.1392000/- प्र.क्र.4996 दि.25/03/2013 रु.275500/- व प्र.क्र.4997 दि.25/03/2013 रु.304500/- असे एकूण रु 2888980/-चे अँन्टी रॅबीज इंजेक्शन खरेदीचे प्रदान मे. नमन एन्टरप्राइजेस यांना केलेले आहे. सदरहू खरेदीत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1)महानगरपालिकेने अँन्टी रॅबीज इंजेक्शनची खरेदी ही शासनाच्या दर करार पत्रकानुसार केलेली नसून निविदा प्रक्रिया राबवून केलेली आहे. तसेच निविदेतील दरांची शासनाच्या दरांबरोबर तुलना केलेली दिसून आली नाही. त्यामुळे दरात मोठी तफावत दिसून येत आहे. वैद्यकीय संचालक यांचे परिपत्रक

क्र.DMER/ DPC/4483/4495/10 दिनांक 30/12/2010 नुसार अँन्टी रॅबीज इंजेक्शन खरेदीचा दर हा रु.198/- प्रति इंजेक्शन असा आहे तथापि महानगरपालिकेने रु.290/- प्रति इंजेक्शन दराने खरेदी केलेली आहे त्यामुळे प्रति इंजेक्शन 92 प्रमाणे जादा दराने खरेदी केलेली आहे व एकूण 10200 इंजेक्शन खरेदी केलेले आहेत व त्यामुळे एकूण रु.938400/-महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले दिसून येत आहे.

2) अँन्टी रॅबीज इंजेक्शन प्राप्त झाल्याची नोंद घेतल्याची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही त्यामुळे शिल्लक साठा व प्राप्त साठा याची माहिती उपलब्ध झाली नाही.

3)पुरवठा आदेशातील अटी प्रमाणे औषधांचा पुरवठा हा कार्यादेशाच्या दिनांकापासून 15 दिवसात करावयाचा आहे तथापि खालील प्रकरणात मालाचा पुरवठा विहित मुदतीत केलेला नाही तरी देखिल पुरवठा दाराकडून दंड वसूल करण्यात आलेला नाही.

| **अ.क्र** | **कार्यादेश क्र. व दिनांक** | **अँन्टी रॅबीज इंजेक्शन प्रमाण** | **रक्कम रु.** | **माल प्राप्त दिनांक** | **माल प्राप्त होण्यास झालेला उशीर** | **दंड रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 97/31-12-11 | 3400 | 986000 | 03-04-12 | 86 | 8600 |
| 2 | 69/15-12-12 | 4800 | 1392000 | 18-12-12 | - | - |
| 3 | 69/15-12-12 | 950 | 275500 | 15-01-13 | 24 | 2400 |
| 4 | 69/15-12-12 | 1050 | 304500 | 15-01-13 | 24 | 2400 |
| | | | | **एकूण वसूलपात्र दंड** | | **13400** |

आक्षेपाधीन रक्कम रु. 2888980/-

वसूलपात्र रक्कम रु. 951800/-

TRTARCM6001 (Ref No : 96, Hmm No : 123)

## *69 अग्निशमन विभागाने ना-हरकत दाखल्याची कमी रक्कम स्विकारलेबाबत तसेच इतर अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :811 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 12300.00/-

***आग विझविण्याची रक्कम वसुल करण्यात आली नाही. अग्निशमन विभागातील फायरमन पदाची मंजूर पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 13 अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या 1 टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणी करण्यात आली नाही. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3(4) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महीन्यात महानगरपालिकेकडून घेतलेले नाही.***

अग्निशमन विभाग,उल्हासनगर महानगरपालिका येथील लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) उल्हासनगर नगरपालिका ठराव क्र. 639 दि.08/06/1977 अन्वये उल्हासनगर मनपा क्षेत्रात रु.300/- तसेच क्षेत्राबाहेर रु.400/- प्रमाणे आग विझविण्याची रक्कम वसुल करण्यात येते. सदर ठरावास बराच कालावधी झाला असल्याने त्यात सुधारणा होणे आवश्यक आहे. 2012-13 कालावधीत एकूण 106 आग विझविण्याची प्रकरणे झाली असून मनपा क्षेत्रातील 94 तर क्षेत्राबाहेरील 12 प्रकरणे आहेत. परंतू संबंधितांकडून वरीलप्रमाणे रक्कम वसुल करण्यात आली नसल्याने एकूण रु.33000/- इतकी रक्कम वसुलपात्र असलेबाबत अर्धसमास ज्ञापनाद्वारे कळविले असता विभागाच्या प्राप्त् अनुपालनात महासभा ठरावानूसार फक्त व्यावसायिक ठिकाणांची आग विझविण्याच्या प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येत असल्याने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील 31 प्रकरणांची रु.300/- प्रमाणे व महानगरपालिका क्षेत्राबाहेरील 4 फायर प्रकरणांची रु.400/- प्रमाणे असे एकूण रु.10900/- वसुल होणेचे प्रलंबित असल्याचे कळविले आहे. वसुली बाबत कार्यवाही करण्यात यावी.

2) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे/1407/360/211 दि.31/08/2009 मधील परिच्छेद क्र.3 अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवायचा आहे. उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.65 दि.08/09/2011 अन्वये अग्निशमन विभागात एकूण 60 फायरमनच्या मंजूर पदापैकी केवळ 18 पदे कार्यरत असून एकूण 42 पदे रिक्त आहेत. तरी अग्निशमन विभाग कार्यक्षम

ठेवणेकरीता महानगरपालिकेकडून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3)उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.26 दि.09/07/2012 अन्वये सन 2012-13 करीता विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना-हरकत दाखला घेणेकरीता प्रथमवेळी रु.1000/- व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी नुतनीकरणाकरीता रु.500/- इतके शुल्क आकारणे आवश्यक आहे. याबाबत अनुपालनासोबत प्राप्त् विवरणपत्रानूसार श्री.हरेश कुंदनानी, मे.शालीमार क्रॅकर्स, नेहरू चौक यांचेकडून रु.500 वसूल होणे शिल्लक असल्याचे दिसून येते. तरी वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

4) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 13 अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या 1 टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे. श्री.प्रेमकुमार जेसवानी यांना अग्निशमन विभागाकडून ना-हरकत दाखला परवाना क्र.254 दि.22/11/2012 रोजी देण्यात आला आहे. परंतू सदर दाखल्याचे वार्षिक नुतनीकरण करण्यात आले नसून 1 टक्के शुल्क अदयापपर्यंत वसुल करण्यात आले नाही. तरी 1 टक्के रक्कम रु.300/- सन 2013 व 2014 ची एकूण रु.600/- वसुल करण्यात यावी. याप्रमाणे इतर प्रकरणांची देखील तपासणी करून वसुली करण्यात यावी.

5) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3(4) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महीन्यात महानगरपालिकेकडून घेणे बंधनकारक आहे. परंतू उपरोक्त अ.क्र.1 मधील क्रमांक 1 वगळता इतर भोगवटादारांनी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेतले नसून अग्निशमन दलाचा अंतिम ना-हरकत दाखला घेतलेला नाही. त्याचप्रमाणे क्रमांक 1 च्या भोगवटादाराने कलम 3(4) नूसार यंत्रना सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 74 दि.30/06/2015 रोजी दिले असता प्राप्त् अनुपालनाची तपासणी करून आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 46, Hmm No : 74)

## *70 मे.केअरटेल इन्फोटेक लि. कंपनीकडून महानगरपालिकेसाठी कॉल सेंटर सेवा पुरवणे कामातील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :343-2110 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 792730.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 18708.00/-

***महापालिका क्षेत्रातील नागरिकांना संगणकावर विविध सेवा उपलब्ध करून देणे करिता मे. केअरटेल इन्फोटेक लि. या कंपनीस ठेका देण्यात आलेला आहे. ठेकेदाराने देयकात सेवाकर 10.30 % ऐवजी 12.36% आकारलेला आहे. त्यामुळे ठेकेदारास रु.18708 चे जादा प्रदान झाले आहे. निविदा अट क्र.17 अन्वये दरमहा दाखल तक्रार अर्जांची संख्या व तक्रार निवारण केलेल्या अर्जांची संख्या यांचा अहवाल ठेकेदाराने महानगरपालिकेस सादर करावयाचा आहे. ठेकेदाराने सदर अहवाल सादर केलेला नाही.***

महापालिका क्षेत्रातील नागरिकांना संगणकावर विविध सेवा उपलब्ध करून देणे करिता मे. केअरटेल इन्फोटेक लि. या कंपनीस ठेका कार्यादेश क्र.UMC/IT/15 दिनांक 17/06/2010 अन्वये देण्यात आलेला आहे. व करारनामा दिनांक 17/06/2010 रोजी करण्यात आलेला आहे. 2012-13 मध्ये सदर कंपनीस सेवा पुरविण्याचे दिनांक 06/04/2010 ते 05/04/2011 या कालावधीचे रु.792730/-चे प्रदान प्रमाणक क्रमांक 4883 दिनांक 18/03/2013 अन्वये करण्यात आलेले आहे. कंपनीस दिलेल्या ठेक्यात अनियमितता आढळून आलेल्या आहेत. विभागास अर्धसमास क्र. 102 दिनांक 220/7 2015/अन्वये सदर अनियमितते बाबत कळविण्यात आलेले आहे. विभागाकडून पत्र क्र.973 दिनांक 24/07/2015 अन्वये खुलासा करण्यात आलेला आहे तथापि विभागाकडून आलेला खुलासा सयुंक्तिक नाही त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) निविदा अट 17 अन्वये ठेकेदार कंपनीने दररोज व दरमहा दाखल तक्रार अर्जांची संख्या व तक्रार निवारण केलेल्या अर्जांची संख्या यांचा अहवाल पालिकेस सादर करून संबंधित महानगरपालिकेतील अधिकारी यांनी ठेकेदार कंपनीने केलेले काम हे समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

परंतु तसे ठेकेदार कंपनीचा अहवाल व पालिकेचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडलेले नाही. विभागाने सदर तक्रार अर्ज व तक्रार निवारण बाबतची माहिती संगणकीय सिस्टीम वर ठेवत असल्याने त्याची स्थळप्रत ठेवली नाही. असे विभागाने अनुपालनात नमूद केले आहे.

2) निविदा अट क्र.14 अन्वये ठेकेदार कंपनीने एकूण कॉल्सच्या 98% कॉल्स रिसीव्ह करणे बंधनकारक आहे. परंतु नागरिकांकडून किती कॉल्स आले याची नोंदवही ठेवलेली नाही. 98% पेक्षा कमी कॉल्स रिसीव्ह केल्यास 1.5% दंड वसूल करण्याची तरतूद आहे. तथापि अशा प्रकारचा अहवाल देयकासोबत नस्तीत ठेवलेला नसल्याने ठेकेदाराने काम समाधानकारक केल्याची खात्री करता आली नाही. अनुपालनासोबत माहिती उपलब्ध झाली नाही.

3) स्थायी समिती ठराव क्र. 124 दि. 10/02/2010 नुसार मे केअरटेल इन्फोटेक लि. यांना निविदा मंजूर केली आहे. त्यामध्ये 12.36% सेवाकर समाविष्ट आहे. सेवाकर 12.36% हा दिनांक 01/04/2012 पासून अंमलात आलेला असताना दि. 10/02/2010 पासून सेवाकर समविष्ट केला आहे. त्यापूर्वी 10.3% सेवाकर देय होता. त्यामुळे 2.36% रु.18708/-चे जादा प्रदान ठेकेदारास झालेले आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु, 792730/-

वसूलपात्र रक्कम रु. 18708/-

## *71 मे.मासटेक लि. कंपनीकडून महानगरपालिकेसाठी स्थानिक संस्था कराची आयपॅड द्वारा स्कॅनिंग संगणक प्रणाली अद्ययावत करणे कामातील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :343-2110 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 337080.00/-

***महापालिका क्षेत्रातील व्यापारी यांचेकडून स्थानिक संस्था कर वसूल करणेसाठी संगणीकरणाच्या माध्यमातून आयपॅडच्या द्वारे व्यापाऱ्याकडून आयात होणाऱ्या देयकाचे छायाचित्रण करून ते संबधित आयातधारकाच्या खात्यात नोंद करण्याचे कामाचा ठेका दरपत्रके व निविदा न मागविता मे.मासटेक लि. कंपनीस दिला आहे. तसेच कंपनीस कामाचा मोबदला म्हणून पूर्ण देयकाची रक्कम रु.337080/- आगाऊ रक्कम म्हणून दिलेली आहे.***

महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांकडून स्थानिक संस्था कर वसूल करणेसाठी संगणीकरणाच्या माध्यमातून आयपॅड उपलब्ध करण्यात आला असून सदर आयपॅडच्या द्वारे व्यापाऱ्याकडून आयात होणाऱ्या देयकाचे छायाचित्रण करून ते संबधित आयातधारकाच्या खात्यात नोंद करण्याचा ठेका मासटेक लि. या कंपनीस दिलेला आहे. त्यांनी सदरहू काम हे दिड महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. त्या करिता कंपनीस आगाऊ रक्कम म्हणून 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रु.337080/-चे प्रदान प्रमाणक क्रमांक 3727 दिनांक 26/12/2012 अन्वये करण्यात आलेले आहे. विभागास अर्धसमास क्र.103 दिनांक 23/07/2015 अन्वये वरील अनियमितते बाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर कामाकरिता निविदा काढण्यात आलेली नाही. किंवा दरपत्रके देखील मागवलेली नाहीत. त्यामुळे मे. मासटेक लि. कंपनीस दिलेले काम हे नियमबाह्य आहे.

2) ठेकेदार कंपनीस कामाचा मोबदला म्हणून पूर्ण ठेका रक्कम रु. 337080/- आगाऊ रक्कम म्हणून देण्यात आलेली आहे. त्यास स्थायी समितीची मान्यता घेतली नाही.

3) ठेकेदार कंपनीने किती व्यापाऱ्यांची देयके स्कॅनिंग करून आयातधारकाच्या खात्यात नोंद केली व त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली याबाबतची माहिती, अहवाल देयकासोबत नस्तीत आढळून आलेला नाही. व्यापाऱ्यांनी आयात केलेल्या मालाचे देयक स्कॅन करून व्यापाऱ्यांच्या खात्यात नोंद करण्याचे उद्दिष्ट माहिती अभावी सफल झाल्याची खात्री करता आली नाही.

4) देयकावर विभागप्रमुख/खाते प्रमुख यांची ठेकेदाराच्या प्रदानासाठी स्वाक्षरी केलेली नाही. तसेच

कामाबाबतचा कंपनीचा प्रस्ताव नस्तीत दिसून आलेला नाही.
आक्षेपाधीन रक्कम रु.337080/-

TRTARCM6001 (Ref No : 72, Hmm No : 103)

## *72 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत "ई" गव्हर्नस प्रकल्पाच्या कामात अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : एम-2-2217 केंद्र/राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4481654.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 53700.00/-

***सुरक्षा अनामत रक्कम रु. 81.97 लाखाचे बँकहमीचे नूतनीकरण केले नाही. मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 अन्वये रु.53,700/- मुद्रांक शुल्क वसूलपात्र आहे. सेवाकर 10% शिक्षण कर 3% व उच्च शिक्षण कर 1% असे उपप्रमाणक (बिलात) नमूद केले आहे. परंतु बाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास दिली नाहीत. दि.31/3/2012 अखेर लेजरची शिल्लक रक्कम रु.1,79,86,947/- आहे. तथापि सदर रक्कम दि.1/4/2012 ची सुरुवातीची शिल्लक घेतली नाही. त्यामुळे 2012-13 जमा रक्कम व खर्चाचा ताळमेळ घेता नसल्याचे दिसून आले.***

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत "ई" गव्हर्नस प्रकल्पाचे तपशीलवार अहवालास (DPR) राज्यस्तरीय सुकाणू समितीने दि.22/12/2008 रोजी मंजुरी दिली असून अंतिम मान्यतेसाठी नगरविकास मंत्रालय दिल्ली येथे मंजुरीसाठी पाठविला असता केंद्रीय सुकाणू समितीने दि. 26/6/2009 रोजी रु.5.62 कोटी रकमेच्या प्रकल्पास मान्यता दिली आहे.

तपशीलवार अहवालामध्ये पाणीपट्टी वसुली, मार्केट लायसन्स, नागरी सुविधा केंद्र, नगररचना,व लेखा विभागाची अश्या संगणक प्रणालीचा समावेश केला आहे. प्रकल्पासाठी केंद्र शासन 35% हिस्सा राज्य शासन 15% हिस्सा व स्थानिक संस्था 50% हिस्सा असे निधीची तरतूद केली आहे. सदर प्रकल्पावर 2012-13 मध्ये रु.1,25,21,899/- इतका खर्च झाला असल्याचे दिसून आले. प्रकल्पाची निविदा क्र. 5/2009 ची कागदपत्रे नोंदवह्या, व बिले तपासली असता अर्धसमास 110 दि.3/8/2015 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे पत्र क्र.974 दि.24/7/2015 अन्वये अनुपालन प्राप्त झाले आहे. ते विचारात घेऊन खालील अभिप्राय देण्यात येत

आहे.

1.निविदा अटी शर्तीनुसार कामाची हमी म्हणून सुरक्षा अनामत रक्कम रु.81.97 लाखाची ICICI बँकेची हमी घेतल्याचे उपलब्ध झाले परंतु 2012-13 या वित्तीय वर्षात बँक हमीचे नुतनीकरण केलेले नाही.

2.मान्य निविदा रु.5,46,48931/- इतक्या रकमेची असून मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 अन्वये रु.53,800/- मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. परंतु रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. उर्वरित रक्कम रु.53,700/- वसूली बाबत ठेकेदारास कळविले आहे. असे विभागाने अनुपालनात नमूद केले आहे. परंतु वसुली झाली नसल्याने सदर रक्कम रु 53700/- वसूलपात्र आहे.

3.प्रमाणक क्र. 1065 दि. 11/6/2012 रु. 44,81,654/- असून त्यामध्ये सेवाकर 10% शिक्षण कर 3% व उच्च शिक्षण कर 1% असे उपप्रमाणक (बिलात) नमूद केले आहे. परंतु बिलाची रक्कम प्रदान करताना 2% आयकर व 2% व्हॅट वसूल केला आहे. सेवाकर व त्यावरील कर कसे आकारण्यात आले याबाबत संदर्भ दिलेले नाहीत. आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 (जे) मधील तरतुदीनुसार तांत्रिक सेवा ही व्यावसायिक फी मध्ये समाविष्ट असल्याने 10% आयकर आकारला जातो. परंतु देयकातून 2% आयकर कपात केला आहे. सदर बाब लेखा विभागाशी सबंधित असल्याचे विभागाने नमूद केले आहे. लेखा विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले नाही. तरी प्रकरणी झालेला खर्च रु. 44,81,654/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4.दि.31/3/2012 अखेर लेजरची शिल्लक रक्कम रु.1,79,86,947/- असून सदर रक्कम दि.1/4/2012 ची सुरुवातीची शिल्लक घेतली नाही. दि.31/3/2013 अखेर रु.1,25,21,899/- लेजरमध्ये शिल्लक दाखविली आहे. त्यामुळे तफावतीची रक्कम रु.54,65,048/- दिसून येते. 2012-13 मधील जमा रक्कम व खर्चाचा ताळमेळ घेता नसल्याचे दिसून आले.

5.केंद्र शासन हिस्सा रु.42.16 लाख व राज्य शासन हिस्सा रु.21.08 लाख असे प्रत्येकी दोन हिस्साची रक्कम रु.126.48 लाख शासनाकडून प्राप्त झालेली नसल्याचे नस्तीतील कागदपत्रावरून दिसून आले. प्राप्त करून घेणेविषयी पाठपुरावा चालू असल्याचे अनुपालनात कळविले आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.44,81,654/-
वसूलपात्र रक्कम रु.53700/-

DATDDZM6901 (Ref No : 110, Hmm No : 110)

## *73 मिळकत कराची रुपये 202.84 कोटी रक्कम वसूल केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

Ulhasnagar (M Corp.)

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2028400000.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतीची मार्च-2013 अखेर एकूण रुपये 202.84 कोटी इतकी मिळकत कराची थकबाकी प्रलंबित आहे. 12-13 मधील थकबाकीच्या फक्त 20% वसुलीचे प्रमाण आहे. वसुलीसाठी विशेष मोहीम राबवून मिळकतकर भरणेसाठी प्रोत्साहन देणे, नोटिशीद्वारे कळविण्याचे प्रयत्न केले नसल्याचे दिसून आले नाहीत.***

1.उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मिळकत कर धारकांकडून 12-13 मधील थकीत वसुली एकूण रुपये 202.84 कोटी आहे. मिळकत कर थकबाकीचे विवरणपत्र तपासले असता मागील तीन वर्षातील मिळकत कर आकारणीचे प्रमाण सरासरी फक्त 22% इतके असल्याचे दिसून आले. 12-13 अखेर रु. 202.84 कोटी इतकी मिळकत कराची वसुली प्रलंबित आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगर पालिका अधिनियम-1949 मधील कलम 140 व 141 नुसार मिळकत कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे अधिनियमाचे पालन झाले नाही.

2.2010-11 अखेर रु.128.53 कोटी इतकी थकबाकी होती. परंतु 2011-12 च्या सुरुवातीस रु.131.27 कोटी थकबाकी दाखविली आहे. थकबाकी रु. 2.74 कोटी जादा घेतली आहे. तसेच 2011-12 च्या अखेरीस रु.158.54 कोटी आहे. परंतु 2012-13 च्या आरंभीची शिल्लक रु.158.22 कोटी घेतली आहे. रु. 31.97 लाख कमी घेतली आहे. तसेच मागील तीन वर्षाचे थकबाकी विवरणपत्रा मध्ये दाखविलेली थकबाकी कोणत्या वर्षापासून प्रलंबित आहे. व एकूण किती मिळकत कर धारकांकडून येणे बाकी आहे. याची माहिती उपलब्ध झाली नसल्याने खातरजमा करता आली नाही. अर्धसमास क्र.118 दि.5/8/2015 अन्वये निर्गमित केला असून अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु. 2028400000/-

DATDDZM6901 (Ref No : 113, Hmm No : 118)

## *74 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभूत सुविधा पुरवणे (बी.एस.यु.पी.) कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :C-4-39   केंद्र/राज्य निधी*

*अनियमितता कलम  : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 20566707.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 373344.00/-

***प्रमाणक क्र.3433, 3434 दि.1/11/2010 अन्वये रुपये 1.64 कोटी मोबिलायजेशन अग्रिम ठेकेदारास प्रदान केले आहे. याबाबतची बँकहमी घेतली नाही. त्यामुळे केंद्रीय दक्षता आयोग यांचे दि.17/2/2010 च्या परिपत्रकाचे पालन झाले नाही. दिलेले अग्रिम किती टक्के व्याज दराने दिले याचा उल्लेख नस्तीत नसून मोबिलायजेशन अग्रिम व व्याज वसुली केली नाही. मोबिलायजेशन अग्रिम रक्कम रु.1.64 कोटी व व्याज वसूल करण्यात आले नाही. मान्य निविदा अनुक्रमे रु.21,47,00708/- व रु,11,35,81,536/- दोन स्वतंत्र असून प्रत्येकी रु,100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामे केले आहेत. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार रुपये 3,27,300/- चे मुद्रांक शुल्क वसुली होणे आवश्यक आहे. रु.92,08,715/- बँक हमी घेतली आहे. त्याची वैधता दि.24/8/2011 रोजी समाप्त झाली आहे. त्याचे 2012-13 या कालावधीसाठी नुतनीकरण केलेले नाही. कामाचा विमा काढलेला नाही. नगरविकास विभाग शासन पत्र क्र. जीईएन-1018/1357 /प्र.क्र 166/98/नवि-28 दि.3/11/2003 अन्वये कामाचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही. राहुलनगर येथे घरकुल योजना सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु येथील जागा ताब्यात आली नाही. महानगरपालिका यांच्या पाठपुराव्या अभावी सदर योजना शासनाने रद्द केली असून योजनेसाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून रु.6,25,77,000/- वितरीत केलेला निधी व्याजासह परत करण्यात आला. गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक जनेवा-2007/प्र.क्र.52/गृनिधा-2 दि.25/6/ 2007 मधील अंमलबजावणी क्र.5 नुसार वाल्मिकी वसाहत येथील लाभार्थींचा 10% हिस्सा घेतलेला नाही.***

प्रशासकीय मान्यता  रु. 35.38 कोटी केंद्रीय सुकाणू समिती दि. 3/2/2009

निविदा मान्य रु.32,83 कोटी (2 कामे) स्थायी समिती ठराव क्र. 74 दि. 24/6/2009

कार्यादेश क्र. 1630,1361 दि. 25/8/2009 (2कामे) कामाची मुदत  18 महिने

ठेकेदारः- कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. मुंबई

कामावर झालेला खर्च  रु. 46782336/-

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभूत सुविधा पुरवणे (बी.एस.यु.पी.) अंतर्गत राहुलनगर, वाल्मिकी वसाहत येथील ठिकाणी सदर योजनेनुसार 600 घरकुले बांधण्याचे प्रस्तावित असून त्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर कामाची निविदा नस्ती व खर्चाची प्रमाणके तपासली असता जागा ताब्यात नसताना निविदा काढणे, मुद्रांक शुल्क कमी वसुली, विमा काढलेला नसणे, बँक हमीचे नुतनीकरण केले नाही. लाभार्थीचा हिस्सा वसूल केला नाही. ह्या उणीवा दिसून आल्या. अर्धसमास क्र 35 दि. 16/5/2015 अन्वये अनुपालन मागविले असून प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1.राहुलनगर येथे 387 घरकुल व वाल्मिकी वसाहत येथील 213 घरकुल अशी एकूण 600 घरकुले बांधण्याचे कार्यादेश दि. 25/8/2009 रोजी कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. मुंबई यांना दिले आहेत. कामे सुरु करणेसाठी व कामात सातत्य राखण्यासाठी मोबिलायजेशन अग्रिम देणेबाबत निविदा पूर्व बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार रुपये 1.64 कोटी मोबिलायजेशन अग्रिम प्रमाणक क्र. 3433, 3434 दि.1/11/2010 अन्वये ठेकेदारास प्रदान केले आहे. याबाबतची बँकहमी घेतली नाही. त्यामुळे केंद्रीय दक्षता आयोग यांचे दि.17/2/2010च्या परिपत्रकाचे पालन झाले नाही.

2.दिलेले अग्रिम किती टक्के व्याज दराने दिले याचा उल्लेख नस्तीत नसून मोबिलायजेशन अग्रिमाचे मुद्दल व व्याज अद्याप वसुल केले नाही. मुद्दल रक्कम रु.1.64 कोटी व्याजासह वसूल करण्यात यावी.

3.मान्य निविदा अनुक्रमे रु.21,47,00708/- व रु,11,35,81,536/- दोन स्वतंत्र असून रु.327500/- या रकमेचा करारनामा करणे आवश्यक होते परंतु प्रत्येकी रु.100/- च्या दोन मुद्रांक पेपरवर करारनामे केले आहेत. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार रुपये 3,27,300/- चे मुद्रांक शुल्क वसुली होणे आवश्यक आहे.

4.निविदा अटी शर्तीनुसार सुरक्षा अनामत रक्कम 2.5% बँकहमी स्वरुपात घेणे आवश्यक असून त्या नुसार अनुक्रमे रु.63,69,175/- व 28,39,540/- अशी एकूण रु,92,08,715/- बँक हमी घेतली आहे. त्याची वैधता दि. 24/8/2011 रोजी समाप्त झाली आहे. त्याचे 2012-13 या कालावधीसाठी नुतनीकरण केलेले नाही. तसेच बँक हमीचे दस्तऐवज नोंदणीकृत करून मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 40 नुसार प्रति हजारास रु.5/- प्रमाणे रु.46044/- मुद्रांक शुल्क वसूल केले नाहीत.

5.राहुलनगर येथील कामगाराचा विमा दि.3/3/2010 ते 2/9/2010 या कालावधीचा 40 कामगाराचा उतरविला आहे. कामाचा विमा काढलेला नाही. तसेच वाल्मिकी वसाहत येथील दि. 19/8/13 ते 18/2/15 असा कामाचा विमा आहे. कार्यादेश दि. 25/8/2009 च्या आदेशापासून कामाचा विमा काढलेला नाही. नगरविकास विभाग शासन पत्र क्र. जीईएन-1018/1357/प्र.क्र166/98/नवि-28 दि. 3/ 11/2003 अन्वये कामाचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

राहुलनगर येथील इमारत बांधकाम खर्चाचा दर रु.14121/- प्रती चौरस मीटर मंजूर केला असल्याचे नस्तीत दिसून येते. परंतु स्थायी समितीची मंजुरीची प्रत जोडली नाही.

6.महानगरपालिका यांनी घरकुल योजना राहुलनगर येथे सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु येथील जागा ताब्यात आली नाही. तसेच रहिवासी यांचा विरोध यामुळे काम बंद असल्याचे नस्तीवरून दिसते. व महानगरपालिका यांच्या पाठपुराव्या अभावी सदर योजना शासनाने रद्द केली असून योजनेसाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून रु.6,25,77,000/- निधी वितरीत झाला होता. निधी वेळेत खर्च केला नाही. त्याचा जनतेस फायदा झाला नाही. म्हणून निधी व्याजासह परत करण्याचे नोडल एजन्सी एम.एम.आर.डी. मुंबई यांनी आदेश दिले. त्यानुसार रकमा व्याजासह परत केल्या आहेत. परंतु रु.41,52,586/- व्याज परिगणना कशी केली याचे अभिलेख उपलब्ध नाहीत.

7.गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक जनेवा-2007/प्र.क्र.52/गृनिधा-2 दि.25/6/2007 मधील

अंमलबजावणी क्र.5 नुसार वाल्मिकी वसाहती मधील लाभार्थी 10% हिस्सा घेतलेला नाही. शासन निर्णयाचे पालन झाले नाही.

वसूलपात्र रक्कम रु.373344/- (मुद्रांक शुल्क)

आक्षेपाधीन रक्कम रु.2,05,66,707/-(मोबिलायजेशन अग्रिम रु.1,64,00,000+व्याज रु. 41,52,586+बांधकाम खर्च रु.14121)

DATDDZM6901 (Ref No : 74, Hmm No : 35)

## *75 महानगरपालिका यांनी मंजूर केलेल्या दरापेक्षा स्थानिक संस्था कराची रक्कम कमी भरणा केल्याने रु.76109/-चे नुकसान झाले आहे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :951-1150 म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 76109.00/-

***नगरविकास विभागाकडील अधिसूचना दि.1/7/12 नुसार स्थानिक संस्था कराची दरसूची दि 1/07/2012 च्या अनुषंगाने महानगरपालिका यांनी मंजूर केलेल्या दरापेक्षा स्थानिक संस्था कराची रक्कम कमी भरणा केल्याने रु.76109/- चे नुकसान झाले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेने नगरविकास विभागाकडील अधिसूचना दि 1/7/12 नुसार स्थानिक संस्था कराची दरसूची दि 1/07/2012 पासून मंजूर करून अंमलात आणण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीतील युनिट क्र 7 मध्ये खालील व्यापारी वर्गाकडून स्थानिक संस्था कर कमी भरणा करण्यात आलेला आढळून आले आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1)मे. के.व्ही ट्रेंडर्स यांचा स्थानिक संस्थाकर क्र. 07/44/04/265 यांनी 2012-13 या वर्षाचे सादर केलेल्या विवरणाची तपासणी केली असता महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दराप्रमाणे एकूण खरेदीच्या रकमेवर 2% या दराने वसुली करणे आवश्यक आहे. वार्षिक विवरणपत्रामध्ये नमूद करण्यात आलेली कपड्याची किमत रुपये 1,71,04,866/- च्या 2% प्रमाणे रक्कम रुपये 342097/- वसूल करणे आवश्यक असताना संबधित व्यापाऱ्यांने 129521 मीटर कापडावर रुपये 2.10 प्रती मीटर या दराने रुपये 2,71,998/- इतका स्थानिक संस्था कर भरणा करण्यात आला आहे. त्यामुळे रुपये 70103/- रक्कम कमी भरणा केल्याचे आढळून आले आहे. त्याची व्याजासह वसुली करण्यात यावी.

2) मे. हंस गारमेंट्स स्थानिक संस्था कर क्र. 07/44/04/584 यांनी 2012-13 या वर्षाचे सादर केलेल्या विवरणाची तपासणी केली असता महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दराप्रमाणे खरेदीची किंमत रुपये

7,77,757/- या रकमेच्या 2% या दराने रुपये 15,555/- वसुली करणे आवश्यक आहे. संबधित व्यापाऱ्यांने 4547 मीटर कापडावर रुपये 2.10 प्रती मीटर दराने रुपये 9549 /- स्थानिक संस्था कराची रकम भरणा करण्यात आल्यामुळे रुपये 6006 /- कमी भरणा केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वरील रक्कम संबधित व्यापाऱ्याकडून व्याजासह वसूल करावी. यांचप्रमाणे इतर युनिट मधील व्यापाऱ्यांकडील स्थानिक कराबाबत ताळमेळ घेण्यात यावा. अर्धसमास पत्र क्रमांक 106 दिनांक 30/07/2015 नुसार कळविण्यात आले असता अनुपालन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे घेण्यात आलेला आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रुपये 70103+6006=76109/-

DATASMM5901 (Ref No : 82, Hmm No : 106)

## *76 स्थानिक संस्था कराची आकारणी चुकीची झाल्याने महानगरपालिकेचे रु 882822 आर्थिक नुकसान झाले बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :951-1150 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 882822.00/-

***स्थानिक संस्था कराची आकारणी कमी केल्यामुळे महानगरपालिकेचे रु 882822/-आर्थिक नुकसान झाले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेने नगरविकास विभागाकाडील दिनांक 1/7/12 च्या अधिसूचना नुसार स्थानिक संस्था कराची दरसूची दिनांक 1/7/12 पासून मंजूर करून अंमलात आणलेली आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीमधील युनिट क्रमांक 9 मध्ये खालील व्यापारी वर्गाकडून स्थानिक संस्था कर कमी भरण्यात आल्याचे आढळून आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1)मे राजेश अग्रवाल HUF यांचा स्थानिक संस्थाकर क्रमांक 09/NR/168 यांनी 2012-13 या वर्षाचे सादर केलेल्या विवरणपत्राची तपासणी केली असता महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दराप्रमाणे एकूण खरेदीच्या रकमेवर 2%या दराने वसूल करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी विवरणपत्रामध्ये नमूद केलेली कपड्याची खरेदीची किंमत रुपये 73093232/- नुसार 2%रक्कम रुपये 1461865/-मात्र एवढी रक्कम त्यांच्याकडून वसूल करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी 472908 मीटर कापडावर रुपये 2.10 प्रती मीटर या दराने रुपये 993107/- स्थानिक संस्था कराची रक्कम भरणा करण्यात आल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कराची प्रत्यक्षात रुपये 468758/- कमी भरणा केल्याचे आढळून आले आहे,

2) मे. राजेश टेक्सटाईल्स याचा स्थानिक संस्थाकर क्रमांक 09/NR/262 यांनी 2012-13 या वर्षाचे सादर केलेल्या विवरणपत्राची तपासणी केली असता महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दराप्रमाणे एकूण खरेदीच्या

रकमेवर 2%या दराने वसूल करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी विवरणपत्रामध्ये नमूद केलेली कपड्याची खरेदीची किंमत रुपये 70110758/- च्या 2% रक्कम रु.1402215/- स्थानिक संस्था कर त्यांच्याकडून वसूल करणे आवश्यक असताना त्यांनी 470548 मीटर कापडावर रुपये 2.10 प्रती मीटर या दराने रुपये 998150/- स्थानिक संस्था कराची रक्कम भरणा केली आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कराची प्रत्यक्षात रुपये 414064/- कमी भरणा केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कराची रक्कम त्यांच्या कडून वसूलपात्र आहे. याप्रमाणे इतर युनिट मधील व्यापाऱ्यांकडून देखील स्थानिक संस्था कर कमी भरणा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी कर निर्धारण करून ताळमेळ घेण्यात यावा. अर्धसमास पत्र क्रमांक 111 दिनांक 5/08/15 अन्वये निर्गमित केले असून अनुपालन प्राप्त झाले नाही त्यामुळे रक्कम रुपये 882822/- ही वसूलपात्र ठेवण्यात येत आहे .

वसूलपात्र रक्कम रुपये 882822/-

DATASMM5901 (Ref No : 84, Hmm No : 111)

## *77 स्थानिक संस्था कर कराची रक्कम कमी भरणा करणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :951-1150 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1373213.00/-

***स्थानिक संस्था कराची रक्कम रु.1373213/- कमी केली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये नगरविकास विभागाकडील दि.1 जुलै 2012 नुसार जकात रक्कम वसूल करण्या बाबतचा पर्याय म्हणून स्थानिक संस्था कर योजना दि 1/07/2012 पासून अंमलात आणण्यात आली आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीमधील युनिट क्रमांक 8 ते 9 मध्ये 2012-13 या आर्थिक वर्षाची खरेदी व विक्री बाबतच्या हिशोबाबतची विवरणपत्रे काही व्यापारी वर्गाकडून महानगर पालिकेकडे सादर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी काही उदाहरणा दाखल विवरणपत्राची तपासणी केली असता खाली दर्शविण्यात येत असलेल्या व्यापाऱ्यांकडून स्थानिक संस्था कर कमी प्रमाणात भरणा केल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | युनिट क्र | व्यापारी वर्गाचे नाव | स्थानिक संस्था कर क्र (ONTBL) | स्थानिक संस्था करकमी भरण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 9 | मे कृष्णा एनशुलेशन वर्क्स | U9/NR/036 | 365 |
| 2 | 9 | मे शिवम सेल्स कोर्पोरेशन | U9/NR/037 | 2476 |
| 3 | 9 | मे अंबिका सिमेंट ली. | U9/NR/041 | 9328 |
| 4 | 9 | मे तुलीप इंटरनॅशनल | U9/NR/22 | 12463 |
| 5 | 9 | मे दीपक ट्रेडिंग कंपनी | U9/NR/023 | 28970 |
| 6 | 9 | मे अँमको स्पेअर्स | U9/NR/036 | 71168 |
| 7 | 9 | मे डी एस टेक्सटाईल्स | U9/NR/189 | 263339 |
| 8 | 9 | मे मीरा परफ्युमर्स वर्क्स | U9/NR/036 | 6624 |
| 9 | 9 | मे रॉयल सिगारेट सेंटर | U9/NR/127 | 205989 |
| 10 | 9 | मे विशाल विडीयो व अप्लायसेन्स | U9/NR/147 | 8553 |
| 11 | 9 | मे खोडीयार टेक्सटाईल्स | U9/NR/171 | 275024 |
| 12 | 9 | मे जयपी सिमेंट | U9/NR/174 | 15226 |
| 13 | 9 | मे ग्रीन गारडन प्रोडक्ट्स | U9/NR/215 | 1163 |
| 14 | 9 | मे नवयुग डीस्ट्रीब्यूटर्स | U9/NR/246 | 14679 |
| 15 | 9 | श्री अविनिश पुरुषोत्तम वैद्य | U9/NR/220 | 690 |
| 16 | 9 | मे कोन ईलेव्हेटर ई प्रा ली | U9/NR/222 | 30692 |
| 17 | 9 | मे एस ए ईलेव्हेटर | U9/NR/227 | 307247 |
| 18 | 8 | मे कमल मेडीकल एजन्सी | U8/51/5/67 | 9755 |
| 19 | 8 | मे एच कन्हैयालाल | U8/54/051/189 | 2862 |
| 20 | 8 | मे मोहन एजन्सीज | U8/54/051/196 | 165 |
| 21 | 8 | मे एम लक्ष्मीचंद | U8/56/05/174 | 40400 |
| 22 | 8 | मे मनिष थ्रेड वर्क्स | U8/57/05/182 | 10477 |
| 23 | 8 | मे महालक्ष्मी टेक्सटाईल्स | U8/51/05/174 | 4100 |
| 24 | 8 | मे सुनील मेडिको सेंटर | U8/51/05/141 | 14557 |
| 25 | 8 | मे कॉमन वेल्थ ईलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज | U8/51/05/146 | 17288 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | 8 | मे एम पी टेक्सटाईल्स | U8/51/05/255 | 2677 |
| 27 | 8 | मे महालक्ष्मी ट्रेडर्स | U8/51/05/260 | 16936 |
| | | | एकूण रक्कम रु | 1373213 |

स्थानिक संस्था कराची वरील रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. वसुलीबाबतच्या चलनाचा पुरावा सादर करावा. अन्यथा रक्कम रु.13,73,213/- संबधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे. याबाबतचा अर्धसमास पत्र क्रमांक 112 दिनांक 05/08/2015 नुसार कळविण्यात आले असता अनुपालन प्राप्त झालेले नाही त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.
वसुलपात्र रक्कम रुपये 13,73,213/-

DATASMM5901 (Ref No : 85, Hmm No : 112)

## *78 स्थानिक संस्था कराच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला स्थानिक खरेदी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :951-1150 म.न.पा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***स्थानिक संस्था कराच्या विवरण पत्रामध्ये दर्शविण्यात आलेला स्थानिक खरेदी बाबतचा तपशील उपलब्ध झाला नसुन व्यापाऱ्यांनी भरण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये स्थानिक खरेदीचा उल्लेख करण्यात आलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेने नगरविकास विभागाकडील अधिसूचना दि.1/7/2012 नुसार स्थानिक संस्था कराची दरसूची दि.1/07/2012 पासून मंजूर करून अंमलात आणण्यात आलेली आहे. स्थानिक खरेदीस स्थानिक संस्था करातून सूट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीतील युनिट क्रमांक 9 मध्ये खालील व्यापाऱ्यांनी स्थानिक खरेदी करण्यात आली. परंतु विवरणपत्रामध्ये ज्या स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी करण्यात आली आहे. त्याचे नाव व एल,बी.टी क्र. नमूद केले नाहीत. सोबत तपशील जोडला नाही. तो खालीलप्रमाणे

| अक्र. | युनिट क्र | व्यापाऱ्याचे नाव | स्थानिक संस्थाकर क्रमांक(ONTBL) | स्थानिक खरेदी करण्यात आलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | मे कोरल इंजीनीयरींग वर्क्स | U1/W-5/C-1/001 | 1059229 |
| 2 | 1 | मे सायबर फार्मा | U1/W-5/C-1/007 | 111723 |
| 3 | 1 | मे पारस मेडीकल स्टोअर्स | U1/W-5/C-1/60 | 900000 |
| 4 | 1 | मे सोनम कलेक्शन | U1/W-9/C-1/64 | 218037 |
| 5 | 1 | मे सनराज हार्डवेअर अँड ईलेक्ट्रिकल | U1/W-9/C-1/72 | 6401277 |
| 6 | 1 | मे गणेश ट्रेडर्स | U1/03/C-1/76 | 800000 |
| 7 | 1 | मे हिरा ट्रेडर्स | U1/w7/s-1/79 | 276216 |
| 8 | 1 | मे महेष प्लायवुड अँड हार्डवेअर | U1/w7/s-1/81 | 3315023 |
| 9 | 1 | मे ज्योती किराणा स्टोअर्स | U1/w7/s-1/84 | 525000 |
| 10 | 1 | मे सायली मेडीकल अँडजनरल स्टोअर्स | U1/W-1/C-1/95 | 4197929 |
| 11 | 1 | मे कैलाश एंटरप्रायझेस | U1/W-1/C-1/98 | 1062817 |
| 12 | 1 | मे पी एस बॅग हाउस | U1/1/1/101 | 197600 |
| 13 | 1 | मे डॉली प्लास्टीक इंडस्ट्रीज | U1/w8/c1/104 | 4119624 |
| 14 | 1 | मे शिव ईलेक्ट्रीकॅल्स | U1/w7/c1/113 | 10369235 |
| 15 | 1 | श्री बै टी घोलप | U1/3/1/116 | 1306931 |
| 16 | 1 | मे महालक्ष्मी मेडीकल अँड जनरल स्टोअर्स | U1/10/3/119 | 3150000 |
| 17 | 1 | मे धर्मदास किराणा स्टोअर्स | U1/7/1/118 | 63000 |
| 18 | 1 | मे पापु मेडीकल अँड जनरल स्टोअर्स | U1/W7/c1/123 | 1245587 |
| 19 | 1 | मे न्यू हिंदुस्तान प्लास्टिक | U1/W7/c1/251 | 1663790 |
| 20 | 1 | मे कोहिनूर प्लास्टिक | U1/W7/c1/252 | 1616959 |
| 21 | 1 | मे जे बी फरसाण | U1/6/1 /254 | 1367616 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | 1 | में हिरालाल क्लॉथ व रेदिमेंड गारमेंट्स | U1/7/1 /241 | 12094663 |
| 23 | 1 | मे आहुजा हिरानंद टोपणदास | U1/7/1 /242 | 5215770 |
| 24 | 1 | मे प्रीतम गोपालदास आहुजा | U1/7/1 /244 | 2118160 |
| 25 | 1 | मे प्रीतम ट्रेडर्स | U1/7/1 /243 | 13153567 |
| 26 | 1 | मे टोपणदास आहुजा | U1/W7/C1 | 2659387 |
| 27 | 2 | मे सबवे शर्ट | U2/13/2/100 | 158168 |
| 28 | 2 | मे सद्‌गुरू मेडिको | U2/12/2/86 | 733248 |
| 29 | 2 | मे श्री बालाजी | U2/16/1/83 | 1449842 |
| 30 | 2 | मे सत्यनारायण प्रोविझन अँड जनरल स्टोअर्स | U2/16/1/71 | 2743451 |
| 31 | 2 | मे सत्यनारायण पापड आटा मिल्स | U2/16/1/70 | 1186994 |
| 32 | 2 | मे जयभवानी डॉलर शॉप | U2/12/1/60 | 225000 |
| 33 | 2 | मे माणक किराणा | U2/13/1/124 | 488653 |
| 34 | 2 | मे भक्ती युनीफॉर्म | U2/21/2128 | 257568 |
| 35 | 6 | मे लॉर्डस फ्रेम वर्क्स | U6/39/4/052 | 2053857 |
| 36 | 3 | मे सर्वोत्तम फुड इंडिया | U3/18/2/054 | 3366406 |
| 37 | 3 | मे लक्ष्मी फॅन्सी | U3/22/2/56 | 3492187 |
| 38 | 3 | मे मनीष स्टील | U3/22/02/092 | 549797 |
| 39 | 3 | मे वीरा प्लास्टिक | U3/19/02/057 | 1405663 |
| 40 | 3 | मे प्रेस्टीक | U3/18/02/058 | 1367366 |
| 41 | 3 | मे के व्ही के प्लास्ट | U3/18/02/059 | 1353541 |
| 42 | 3 | मे भगत एजन्सीज | U3/24/02/061 | 169538 |
| 43 | 3 | मे भाटीया हार्डवेअर मार्ट | U3/24/02/071 | 9131127 |
| 44 | 3 | मे नॅशनल प्रोडक्टस | U3/19/02/072 | 1446254 |
| 45 | 3 | मे स्टोअर्स किराणा. | U3/23/02/81 | 3420195 |
| 46 | 3 | मे जयस्काय ट्रेडिंग प्रा ली | U3/22/02/091 | 846919 |
| 47 | 3 | मे सुशील फुट वेअर्स | U3/18/02/047 | 904201 |
| 48 | 3 | मे एमसोन्स | U3/18/02/015 | 2728416 |
| 49 | 3 | मे किशोर शूज | U3/22/02/014 | 1227142 |
| 50 | 3 | मे ॲपेक्स इंडस्ट्रीज | U3/19/02/038 | 4151964 |
| 51 | 3 | मे मोहन सुईंग मशिन | U3/22/02/034 | 201752 |
| 52 | 3 | मे अंबिका ट्रेडर्स | U3/22/02/127 | 193160 |
| 53 | 3 | मे महादेव एंटरप्रायझेस | U3/19/02/473 | 1473818 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 54 | 3 | मे कमलेश क्लॉथ स्टोअर्स | U3/19/02/470 | 1024636 |
| 55 | 3 | मे बिजलानी हाय ईलेक्ट्रीकॅल्स | U3/w31/C3/002 | 303889 |
| 56 | 5 | मे डिम्पल इंडस्ट्रीज | U3/34/C3/004 | 819351 |
| 57 | 5 | मे सेन्ट्रल बर्नर इंडस्ट्रीज | U5/34/C3/005 | 1304753 |
| 58 | 5 | मे रोनक लाईट हाऊस | U5/34/C3/005 | 700641 |
| 59 | 5 | मे कपिल गोल्ड प्लास्ट | U5/34/C3/015 | 3832495 |
| 60 | 5 | मे कॉलिटी प्रोडक्ट | U5/34/C3/018 | 4719261 |
| 61 | 5 | मे मनीष बर्नर इंडस्ट्रीज | U5/34/C3/020 | 1601062 |
| 62 | 5 | मे झेड कॉम कॉम्पुटर | U5/35/C3/033 | 2440939 |
| 63 | 5 | मे राजवीर ऑटो सेंटर | U5/37/C3/039 | 1162103 |
| 64 | 5 | मे प्रकाश रोलिंग शटर्स अँड ईंजिनिरिंग | UMCBT/36/042 | 589690 |
| 65 | 5 | मे विजय प्लास्टिक इंडस्ट्रीज | U5/37/C3/230 | 4630055 |
| 66 | 5 | मे रूम डेकोर | U5/31/C3/045 | 808686 |
| 67 | 5 | मे अल टेक इंजीनियरिंग सर्विस | U5/31/C3/049 | 2603256 |
| 68 | 5 | मे कोमल प्लास्ट | U5/38/C3/054 | 1382614 |
| 69 | 5 | मे जगदीश एंटरप्रायझेस | U5/34/C3/055 | 3037450 |
| 70 | 5 | मे पायोनियर्स प्लास्टिक | U5/31/C3/083 | 1019685 |
| 71 | 4 | मे स्वस्तिक मेडिकल अँड जनरल स्टोअर्स | U4/30/C3/560 | 922495 |
| 72 | 4 | मे एस एस इलेक्ट्रॉनिक | U4/30/C3/565 | 2378607 |

विवरणामध्ये नमूद केलेली स्थानिक ख्ररेदी ज्या दुकानदाराकडून खरेदी केलेली आहे त्याचा तपशील विवरणपत्रा सोबत जोडण्यात आलेला नसल्यामुळे संबधित स्थानिक खरेदीदारांनी स्थानिक संस्था कराचा महानगरपालिकेस भरणा केला आहे किंवा नाही यांची लेखापरीक्षणास तपासणी करता आलेली नाही अशाच प्रकारच्या इतर व्यापांऱ्याची अभिलेख नस्तीत दिसून आले नाही. त्यामुळे संबंधित स्थानिक खरेदीदारांनी स्थानिक संस्था कराचा महानगरपालिकेस भरणा केला आहे किंवा नाही याची लेखापरीक्षणास तपासणी करता आलेली नाही. अशाच प्रकारच्या इतर व्यापाऱ्याच्या विवरणपत्राची देखील तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 117 दिनांक 05/08/2015 नुसार कळविण्यात आले आहे. अनुपालन प्राप्त झालेले नसल्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

## 79 महानगरपालिका अंतर्गत जकात विभागातील जकात ठेक्यामधील अनियमितता.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :A-1 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 28834135.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 431571.00/-

***निविदेमध्ये दोन ठेकेदारांनी निविदेत भाग घेतला होता त्यामध्ये मे.मोनार्च इं यांना किमान देकार देण्यास दि.17/4/12 अन्वये कळविले आहे. मे.मोनार्च इं यांनी किमान देकारची ऑफर दिली होती. परंतु ती बाब विचारात घेतलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मनपास झाला नाही. महासभा ठराव क्र.4 दि.19/4/12 अन्वये मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना जकात ठेका मान्य केला आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक-2011/प्र.क्र.11/नवि-34 दि.19/4/2011 नुसार 10% सुरक्षा अनामत रक्कम रु.2,88,34,135/-ची बँक हमी आवश्यक आहे. परंतु तशी बँकहमी घेतलेली नाही. त्यामुळे बँकहमीच्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 40 नुसार प्रती हजार 5/-प्रमाणे मुद्रांक शुल्क रु,144171/- चे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे. वाढीव करारनामा रु.28,83,41,352/-चा असून रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर केला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियम-1958 मधील कलम 63 नुसार रु.2,87,400/- मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. करारनामा सील केलेला नसताना ठेका सुरु केला आहे. शासन परिपत्रक मधील अ.क्र.3 नुसार पावती पुस्तक मनपाने पुरवणे व त्याचा हिशोब स्थळप्रतीसह ठेकेदाराने देणे बंधनकारक आहे. वापरलेली पावती पुस्तके व जमा रकमांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.***

नगरविकास विभाग मुंबई शासन परिपत्रक क्र. जकात/2011/प्र.क्र.11/नवि-34 दि. 19/4/2011 नुसार जकात, पारगमन शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणूक करण्याची कार्यपद्धती दिली असून 2011-12 मध्ये मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. उल्हासनगर यांना जकात वसुलीचा ठेका दिला असून दि. 31/3/2012 रोजी ठेक्याची मुदत संपलेली आहे. शासन परिपत्रकानुसार निविदा प्रकिया दि. 25/2/12 अन्वये राबविली होती परंतु दि.1/4/2012 पासून स्थानिक कर सुरु होणार असल्याची अधिसूचना निघाल्याने निविदा प्रकिया रद्द केली आहे. स्थानिक कर आकारणी दि.1/7/2012 पासून अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्यामुळे दि.1/4/12 ते 30/6/12 या कालावधीसाठी जकात वसुलीच्या ठेक्यास मुदतवाढ दिलेली आहे. त्यामध्ये खालील अनियमितता दिसून आल्या. याबाबत अर्धसमास क्र.99 दि.13/7/ 2015 अन्वये खुलासा मागविला असून अनुपालन प्राप्त झाले नाही. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1.मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना जकात ठेक्यास मुदतवाढ देणेपुर्वी दि.25/2/2012 रोजी निविदेद्वारे दोन

ठेकेदारांनी निविदेत भाग घेतला होता त्यामध्ये मे.मोनार्च इं यांनी किमान देकार देण्यास दि. 17/4/12 अन्वये कळविले आहे. ती बाब विचारात घेतलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मनपास झाला नाही.

2.महासभा ठराव क्र. 4 दि.19/4/2012 अन्वये मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना दि.20/4/12 ते 30/6/12 (72 दिवस) प्रतिदिनी रु. 40,04,741/- रक्कम मनपास भरणा करण्याच्या अधिन राहून जकात ठेका मान्य केला आहे. शासन परिपत्रकानुसार 10% सुरक्षा अनामत रक्कम रु.2,88,34,135/-ची बँक हमी आवश्यक आहे. परंतु तशी बँकहमी घेतलेली नाही. त्यामुळे बँकहमीच्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 40 नुसार प्रती हजार 5/-प्रमाणे मुद्रांक शुल्क रु,144171/- चे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

3.वाढीव करारनामा रु.28,83,41,352/-चा असून रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर केला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियम-1958 मधील कलम 63 नुसार रु.2,87,400/- वसूल करणे आवश्यक आहे.

4.महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 5(1)2 नुसार करारनामा सील केल्यानंतर जकात ठेका सुरु करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे कलम 5(1)2 चे उल्लंघन झाले आहे.

5. नगरविकास विभाग मुंबई शासन परिपत्रक क्र. जकात/2011/प्र.क्र.11/नवि-34 दि. 19/4/2011 मधील अ.क्र.3(10) नुसार जकात वसुलीच्या बाबत प्रत्येक जकात नाक्यावर पर्यवेक्षक नेमण्याचे आदेश आहे. परंतु दि.20/4/12 ते 30/6/12 या कालावधीत नेमलेल्या पर्यवेक्षकांची यादी व त्यांनी केलेल्या जकात नाक्याची तपासणी अहवाल नस्तीत उपलब्ध नाही.

6. नगरविकास विभाग मुंबई शासन परिपत्रक क्र. जकात/2011/प्र.क्र.11/नवि-34 दि. 19/4/2011 मधील अ.क्र.3 (5) नुसार पावती पुस्तक मनपाने पुरवणे व त्याचा हिशोब स्थळप्रतीसह ठेकेदाराने देणे बंधनकारक आहे. तसेच वापरलेली पावती पुस्तके व रक्कमा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 28834135/- (बँकहमी) वसूलपात्र रक्कम रु,431571/-(मुद्रांक शुल्क )

DATDDZM6901 (Ref No : 108, Hmm No : 99)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

------------------- **निरंक** -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *80 भविष्य निर्वाह निधीच्या लेख्यामधील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : अ-4 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 11343316.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 24010.00/-

***भविष्य निर्वाह निधीतून अग्रिमे मंजूर करतांना भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्रमांक 13(3) चे पालन केलेले नाही तसेच सेवानिवृतीच्या दिनांकापर्यंत भ.नि.नि वर्गणी वसूल केली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या लेख्याची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.21 दिनांक 9/4/2015 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने अनुपालन दिलेले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्रमांक 13(3) अन्वये भविष्य निर्वाह निधीतून एकदा अग्रिम दिल्यानंतर 12 महिने झाल्याशिवाय किंवा त्या अग्रीमाचा शेवटचा हप्ता यापैकी जो आधी असेल त्याची परतफेड करेपर्यंत विशेष कारण लेखी नोंदवून भविष्य निर्वाह निधीचे अग्रिम मंजूर करता येणार नाही अशी तरतूद आहे. परंतु महानगरपालिकेने एका वर्षीत एकाच कर्मचाऱ्यास अधिक वेळा अग्रिम मंजूर केला आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक | अग्रिम मंजूर केल्याच्या वेळा |
|---|---|---|---|
| 1 | श्री भिमावारा खैरे | 975 | 3 वेळा |
| 2 | श्री ओमी कंजानीया | 1039 | 7 वेळा |
| 3 | श्री मामीलाल ननुराम | 1180 | 3 वेळा |
| 4 | श्री मुरली अहुजा | 1158 | 6 वेळा |

2) शासन निर्णय क्रमांक 1185/प्र 52/13-अ/दिनांक 28/05/1986 मधील परिच्छेद क्रमांक 3(2) नुसार सेवानिवृत्ती पूर्वीच्या 3 महिन्याच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसूल न करणे बंधनकारक आहे. तथापी महानगरपालिकेकडून कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृतीच्या महिन्या पर्यंत भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी वसूल केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याची उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | भविष्य निर्वाह निधी | निवृत्तीचा महिना | वर्गणी वसूल केल्याचा |
|---|---|---|---|---|

| | | खाते क्रमांक | | महिना |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री रा मुखी.प. | 1168 | फेब्रुवारी 2013 | फेब्रुवारी 2013 पर्यंत |
| 2 | मनीषा अहुजा | 1203 | ऑगस्ट 2012 | ऑगस्ट 2012 पर्यंत |
| 3 | एल एस चावल | 1300 | जुलै 2012 | जुलै 2012 पर्यंत |
| 4 | मीना करवे | 1459 | नोव्हेंबर 2012 | नोव्हेंबर 2012 पर्यंत |

3) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खातेवही (Ledger) पाहता 298 कर्मचारी सेवानिवृत्त /मयत /सेवा सोडून गेल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु अशा कर्मचाऱ्याच्या लेख्यामधील 2012-13 अखेर रुपये 139209/- इतकी रक्कम शिल्लक दर्शविण्यात आलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांचे भ.नि.नि. लेखे बंद केलेले नाहीत.
4) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खातेवही तपासले असता 36 सेवानिवृत्त /मयत झालेल्या कर्मचाऱ्यांकडून जादा प्रदानाची रक्कम रुपये 24010/- वसुली प्रलंबित आहे. सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.
5) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खातेवही प्रमाणे शिल्लक रक्कम रुपये 210956241/- इतकी आहे बृहतपत्रका प्रमाणे शिल्लक रक्कम रुपये 199612925/- इतकी आहे तफावत रक्कम रुपये 11343316/- इतकी असून त्याचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

DATRVVM5901 (Ref No : 13, Hmm No : 21)

## *81 प्रभाग क्र. 56 मधील शिव मार्ग परिसरात एम 250 रोड बांधणे, पायवाट व नाला बांधणे, पेव्हर ब्लॉक बसवणे कामातील अनियमितता बाबत*

**महानगरपालिका फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :210-2433 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 444000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 46426.00/-

***ठेकेदार मेसर्स चंदा मजूर का. स. संस्था यांनी प्र.क्र.56 मधिल शिव मार्ग परिसरात एम 250 रोड बांधणे, पायवाट व नाला बांधणे, पेव्हर ब्लॉक बसवणे बाबतचे काम विहित मुदतीत केलेले नाही. ठेकेदाराने कामास मुदतवाढ अर्ज सादर न करताच महानगरपालिकेने मुदतवाढ दिलेली आहे. प्राकलन रक्कमेपेक्षा 10% वाढ करून देयक प्रदान केलेले आहे. प्राकलनातील बाब वाढीचे सबळ कारण दिसून आले नाही.***

ठेकेदाराचे नाव : मेसर्स चंदा मजूर का. स. संस्था

डी.डी.आर.काम वाटप आदेश क्र. : 1012 दि. 9/07/2010

कामाचा कार्य आदेश : 2084 दि.12/07/2010

कामाचा कालावधी : 90 दिवस

काम पूर्ण झाल्याची तारिख : दि.16/03/2011

प्रमाणक क्र.4939 दि.20/03/2013 रु. 440000/- तपासले असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) वरील ठेकेदारास दिलेले एम 250 रोड बांधणे, पायवाट व नाला बांधणे, पेव्हर ब्लॉक बसवणे बाबतचे काम हे विहित मुदतीत ( 90 दिवसात दि.11/10/2010 पर्यंत) पूर्ण झालेले नाही. तसेच कामाची मुदत वाढ मिळणे बाबत ठेकेदाराचा अर्ज सादर न करताच कामास मुदतवाढ दि. 16/03/2011 पर्यंत म्हणजेच 156 दिवस मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढी बाबतचे सबळ कारण व पुरावे नस्तीत दाखल केलेले नाहीत. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार विलंब आकार प्रति दिन रु.50/- प्रमाणे एकूण रु.7800/-( एकूण 156 दिवस विलंब) ठेकेदाराच्या देयकातून वसूल करणे आवश्यक आहे.

2) ठेकेदाराचे देयकात काम उशिराने केले बाबतची नोंद घेतलेली नाही.

3) एम.बी. क्र. 3252 वर सहाय्यक अभियंता यांचे नाव नमूद नाही. एम.बी. नोंद सुरुवात केल्याची तारीख व काम संपण्याची तारीख नमूद नाही.

4) निविदा मंजूरी नुसार कामाचा कार्यादेश व कामाची प्राकलन रक्कम रु.399937/-एवढी आहे. तथापि कामाचा एकूण खर्च रु. 440000/- म्हणजेच 10% वाढ करून देण्यात आलेला आहे. परंतु रक्कम वाढी बाबतची सबळ कारणे नस्तीत नमूद नाहीत.

5) कामाचा कार्यादेश व खर्चाची तरतूद 2010-2011 मधिल आहे तथापि प्रत्यक्ष प्रदान हे 2012-2013 च्या तरतुदीतून केलेले आहे.तरी स्पील ओव्हर कामासाठी तरतूद अर्थसंकल्पामध्ये समविष्ट नाही.

6 )काम केल्या पूर्वीचे व काम झाल्या नंतर संबधित कामाचे फोटो काढलेले नाहीत.

7) कामात गौणखनिज साहित्य 167.49 घ.मि. इतके वापरले आहे. परंतु त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही.अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांची अधिसूचना दि. 15/01/2003 व शासन परिपत्रक दि. 11/02/2010 चे पालन केलेले नाही.(167.49 * 70.67 = 11836.51) सदर तरतुदीचे पालन न करता ठेकेदारास देयक प्रमाणक क्र.4939 दि.20/03/2013 रु. 440000/- चे प्रदान केलेले आहे. हे नियमबाहय आहे.

8) प्रदान देयकातील मोजमाप पुस्तकातील बाबींची तपासणी केली असता काही बाबीचे दर हे 2008-09 च्या दर सूचीपेक्षा जास्तीचे लावलेले दिसून येत आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. तसेच तक्त्यात क्रमांक 8 मध्ये दर्शवलेली रक्कम रु. 38626/- ठेकेदारास जादा प्रदान केल्याचे दिसून येत आहे.

तक्ता

| अ.क्र. | बाब व तपशिल | जिल्हा दर सूची दर | प्रदान दर रु. | परिमाण | प्रदान रक्कम रु. | देय रक्कम रु. | अतिप्रदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |

| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1.3.6.पी.पी.सीबेडिंग पाया | 2928 घ.मि. | 3397 घ.मि. | 31.03 | 105409 | 90856 | 14553 |
| 2 | पी.पी.सी. एम-10 गटरवाल मेटल | 2928 घ.मि. | 3464.95 घ.मि. | 24.44 | 84683 | 71560 | 13123 |
| 3 | पी एल WBM Road layrs 75/100 mm | 682 | 794.80 | 63.21 | 50239 | 43109 | 7130 |
| 4 | पी/6 mm cement plaster | 66 | 91.80 | 148.06 | 13592 | 9772 | 3820 |
| | | | | | | एकूण | 38626/- |

वरील अनियमितते बाबत विभागास अर्धसमास क्र. 26 दि. 2 0/04/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. खुलासा प्राप्त न झाल्याने विलंब शुल्क रक्कम रु.7800/- व अति प्रदान रक्कम रु.38626/- असे एकूण रु.46426/- वसूलपात्र आहे.

TRTARCM6001 (Ref No : 5, Hmm No : 26)

## *82 आमदार विकास निधी अंतर्गत प्रभाग क्र.57 सेक्शन 32 येथील नाभिक समाजाचे सामाजिक सभागृह बांधणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :210-2110 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 499697.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4997.00/-

***आमदार विकास निधीतून नाभिक समाजाकरिता सामाजिक सभागृह महानगरपालिकेची मालकी नसलेल्या जागेत नियमबाह्य बांधले आहे.***

2011-12 साठी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत नाभिक समाजाची वस्ती असलेल्या भागात सामाजिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. बांधकामाबाबतचे मे. प्रतेश मजूर कामगार सहकारी संस्था यांना प्रमाणक क्र.1416 दि.17/07/2012 अन्वये रु.499697/-चे प्रदान केलेले आहे. सदर कामात खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मंजुरी आदेशातील अट क्र. 5 नुसार आमदार विकास निधी कार्यक्रमा अंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतच घेता येईल असे नमूद आहे. बांधकाम हे खाजगी संस्थेच्या जागेवर घेता येणार नाही. तथापि वरिल सामाजिक सभागृहाचे बांधकाम हे खाजगी नाभिक समाजाच्या संस्थेच्या मोडकळीस आलेल्या इमारतीवर केल्याचे नस्तीतील अभिलेख्यावरून दिसून आले आहे. नाभिक संस्थेने सामाजिक सभागृह संस्थेच्या नावे असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र महानगरपालिकेस दिलेले आहे. जागा मनपाच्या मालकीची असल्याची खात्री झाल्यानंतर बांधकाम करणेचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश आहेत. परंतु जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मंजुरी आदेशातील अटीचे पालन झालेले नाही. बांधकाम केलेली जागा महानगरपालिकेच्या मालकीची नसून नाभिक समाजाच्या संस्थेच्या मालकीची आहे. त्यामुळे केलेले बांधकाम हे नियमबाह्य आहे.

2) कार्यआदेश क्र.3625 दि.2/01/2012अन्वये दिलेले आहे कामाची मुदत दि.01/04/2012 रोजी संपलेली आहे. कामाचा विमा दि.25/06/2012 रोजी काम संपल्यावर उशिराने काढलेला आहे. वित्त विभाग शासन निर्णय क्र.1098/प्रकरण क्र.2289/शासन हमी दि.19/08/1998 व नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीइएन/1198/1356//प्रक्र.166/8/नवि-24/दि.3/11/2003 अन्वये ठेकेदाराने विहित मुदतीत विमा काढला नाही तर महानगरपालिकेने ठेकेदाराच्या देयकातून 1% विमा निधी रु.4997 वसूल करणे अपेक्षित आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

3) कामाची मुदतवाढ दि.10/07/2012 पर्यत दिलेली आहे परंतु मुदत वाढीच्या अर्जावर दिनांक/आवक क्रमांक नाही. कार्यालयीन टिपणीवर दिनांक नाही. जागेवरील परिस्थितीचे कारण मुदतवाढीसाठी दिलेले आहे. हे सयुंक्तिक नाही. कार्यादेशातील कामाची मुदत 90 दिवस असून ती दिनांक 01/04/2012 रोजी संपली असून विलंब कालावधीसाठी निविदा अटी व शर्ती नुसार दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

4) बांधकाम केलेले सामाजिक सभागृह महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याची नोंद घेतल्याचे अभिलेखे (मालमत्ता नोंदवही) लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे बांधकाम केलेले सामाजिक सभागृह महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याची खात्री करता आली नाही.

5) बांधकाम केलेले सामाजिक सभागृहाचे परिरक्षण व देखभाल दुरुस्ती महानगरपालिका स्वत करते किंवा अन्य संस्था या बाबतची माहिती उपलब्ध करण्यात आली नाही.

6) बांधकामात गौणखनिज साहित्य 84.95 घ.मी. इतके वापरले आहे. परंतू त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री झालेली नाही. अथवा रॉयल्टी भरल्या चे पुरावे देयकासोबत जोडलेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांची अधिसुचना दि. 15/01/2003 व शासन परिपत्रक दि.11/02/2010 चे पालन झालेले नाही. ( 84.95 x 70.67 = 7347/-) सदर तरतूदीचे पालन न करताच ठेकेदारास प्रमाणक क्र.1416 दि.17/07/2012 अन्वये रु.499697 प्रदान केलेले आहे. हे नियमबाहय आहे.

वरील अनियमितता बाबत विभागास अर्धसमास क्र.44 दिनांक 7/06/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही. त्यामुळे खर्चाची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.499697/-(कामावरील खर्च)

वसूलपात्र रक्कम रु.4997/(विमा)

TRTARCM6001 (Ref No : 28, Hmm No : 44)

## *83 आमदार विकास निधी अंतर्गत उल्हासनगर कँम्प नं -3 शांतीनगर व कँम्प नं 2 येथील स्मशानभूमी बांधकामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :210-2110 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1798661.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17986.00/-

***आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत उल्हासनगर कँम्प नं -3 शांतीनगर व कँम्प नं 2 येथील स्मशानभूमीत केलेले बांधकाम महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत केल्याची कागदपत्रांअभावि खात्री झाली नाही. कामाचा विमा काम संपल्यावर काढलेला आहे. कामात केलेले फेरबदलास जिल्हाधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही.***

2011-12 साठी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत उल्हासनगर कँम्प नं -3 शांतीनगर व कँम्प नं 2 येथील स्मशानभूमी मध्ये लोकांना थांबण्यासाठी शेड बांधणे व फरशी बसवणेचे बांधकाम करण्यात आलेले आहे. वरील दोन्ही ठिकाणाचे बांधकामाबाबतचे प्रदान मे. वैशाली मजूर कामगार सहकारी संस्था यांना प्रमाणक क्र.4752 दि.08/03/2013 अन्वये रु.1198661/- व प्रमाणक क्र.4306 दि.04/02/2013 अन्वये रु.600000/-चे प्रदान केलेले आहे. व सदर दोन्ही कामात खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत. अनियमितता बाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.54 दि.15/06/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि विभागाचा खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे .

1)जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मंजुरी आदेशातील अट क्र. 5 नुसार आमदार विकास निधी कार्यक्रमा अंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतच घेता येईल असे नमूद आहे. खाजगी संस्थेच्या जागेवर बांधकाम करता येणार नाही. तथापि बांधकाम केलेली जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याची कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे बांधकाम केलेली स्मशानभूमीच्या जागेची मालकी महानगरपालिकेची असल्याची खात्री करता आली नाही.

2) कार्यआदेश क्र.21 दि.7/09/2012अन्वये स्मशानभूमी शेड उभारणी व फरशी बसविणे बाबतचे काम दिलेले आहे. सदर काम दि.20/12/2012 रोजी पूर्ण झालेले आहे तथापि कामाचा विमा दि. 27 /02/2013 रोजी काम पूर्ण झाल्यावर काढलेला आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.1098/प्रकरण क्र.2289/शासन हमी दि.19/08/1998 व नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीइएन/1198/1356/प्र.क्र. 166/8/नवि-24/दि.3/11/2003 अन्वये जर ठेकेदाराने कामाचा विमा काढला नसल्यास ठेकेदाराच्या देयकातून 1% विमा निधी रु.17986/- वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही झाली नाही.

3) जिल्हाधिकारी ठाणे यांचे आदेश क्र.1460 दि.21/07/2012 मधील अट क्र. 6 नुसार मंजूर प्राकलन कामात फेरबदल करता येणार नाही असे नमूद आहे. तरी देखिल खालील बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्यात

Ulhasnagar (M Corp.)

आलेले आहेत.

तफावत तक्ता (Veriation)

| अक्र. | बाब व तपशिल | Estiemte Quntity | Rate Rs | Total Amt Rs. | Excute. Quntity | Total Amt Rs. | Differ Amt. Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | P/F Granite stone slab work of req.size | 60.00 smt. | 4570 | 274200 | 164.94 | 479593 | 205393 Excess |
| 2 | P/F powder coated GI sheet of req.size | 165 Smt | 3100 | 511500 | 97.65 | 302715 | 208785 Saving |

आक्षेपाधीन रक्कम रु.1798661/-
वसूलपात्र रक्कम रु.17986/-

TRTARCM6001 (Ref No : 29, Hmm No : 54)

## *84 उल्हासनगर मनपा अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या कामांतील सर्वसाधारण अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 13**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिकेने प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागाराची नेमणूक केली नाही. कामाचे पर्यवेक्षण शहर अभियंता व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी संयुक्तीकरित्या केले नाही. मोजमापाची नोंद उल्हासनगर महानगरपालिकेचा प्रतिनिधी, प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी कंत्राटदाराच्या उपस्थित मोजमाप पुस्तिकेत नोंदविली नाही. कामाची प्रगतीसुची कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता यांना सादर केलेली नाही. मालाचा कामात वापर करणेपुर्वी शहर अभियंता व सल्लागार यांची मंजूरी घेतली नाही. कंत्राटदाराने बिल सादर करतांना कामाची मोजमापे साहित्याच्या गुणवत्ता चाचणी अहवालासह सादर केली नाही. कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण केले नाही.काम सुरू करणेपुर्वी कामाच्या जागेवर प्रत्यक्ष घेण्यात आलेला स्थळ पाहणी अहवाल***

***लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही. कंत्राटदाराने देयकासोबत मालाच्या खरेदी पावत्या व वाहतूक पास जोडले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक बांधकाम विभाग,उल्हासनगर महानगरपालिका यांचे मार्फत बांधकामाच्या संदर्भात भांडवली कामे 2012-2013 कालावधीत निविदा पध्दतीने करण्यात आली आहेत. पुढील काही कामांचे लेखापरीक्षण केले असता सर्वसाधारण अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

* उल्हासनगर क्र.3 हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन अपार्टमेन्ट पर्यंत रस्ता रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
* उल्हासनगर क्र.3 राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉर्किटीकरण करणे.
* उल्हासनगर 1 ते 5 मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे
* उल्हासनगर क्र.5 दुधनाका ते गणेश नगरपर्यंत रस्ता रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण व नाला बांधणेचे काम करणे
* उल्हासनगर 4 ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोल पंपपर्यंत रस्ता रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे
* साईबाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबीघाट मंडळ रस्त्याचे पुनर्पुष्ठांकन करणे
* वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुनर्पुष्ठांकन करणे
* नेताजी चौक ते बॅरेक 2108 व्हाया तहसिलदार ऑफीस रस्त्याचे पुनर्पुष्ठांकन करणे

1) कामाच्या संदर्भात निवीदा जाहीरात ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती त्या वर्तमानपत्राची प्रत लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने जाहीरात प्रसिध्दी शासन निर्णयाप्रमाणे झाली असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

2) प्रस्तावित कामाच्या आवाका (स्कोप ऑफ वर्क) मधील 2.2.20 व सर्वसाधारण सुचना क्र.3.1.2 नूसार महानगरपालिकेने निविदेद्वारे दिलेल्या कामाकरीता प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. परंतू यासंदर्भात अभिलेख नस्तीत नसल्याने सल्लागाराच्या नेमणूकीबाबत पडताळणी करता आली नाही.

3) सर्वसाधारण अटी व शर्तीमधील 1.2 नूसार रस्त्याचे कामाचे पर्यवेक्षण शहर अभियंता व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी संयुक्तीकरित्या करणे आवश्यक असताना पर्यवेक्षणाचे अहवाल व तदसंबंधी अभिलेख नस्तीत उपलब्ध न झाल्याने कामाच्या पर्यवेक्षणाबाबत व प्रगतीबाबत पडताळणी करता आली नाही.

4) सर्वसाधारण अटी व शर्तीमधील 1.3 व 2.7 नूसार कामाच्या मोजमापाची नोंद उल्हासनगर महानगरपालिकेचा प्रतिनिधी, प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी कंत्राटदाराच्या उपस्थित मोजमाप पुस्तिकेवर नोंदविणे आवश्यक आहे. परंतू लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेल्या मोजमाप नोंदवहीवर अशाप्रकारे संयुक्तीकरित्या नोंदी झाल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे.

5) सर्वसाधारण अटी व शर्तीमधील 2.4 नूसार कार्यादेशानंतर करण्यात येणा-या कामाची प्रगतीसुची (प्रोग्रेस शेडयुल) शहर अभियंता यांना कंत्राटदाराने सादर करणे आवश्यक असतांना सदर अभिलेख कंत्राटदाराने शहर अभियंता यांना सादर केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

6) सर्वसाधारण अटी व शर्ती क्र.2.10 नूसार कामाकरीता वापरण्यात आलेल्या सर्व मालाची किंवा साहित्याची मंजूरी मालाचा कामात वापर करणेपुर्वी शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिकेने नेमणूक केलेले

प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांची संयुक्तीकरित्या घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

7) विशेष अटी व शर्तीमधील क्र.13 नूसार कंत्राटदाराने बिल सादर करतांना त्याने नोंदविलेल्या कामाची मोजमापे साहित्याच्या गुणवत्ता चाचणी अहवालासह सादर करणे आवश्यक असतांना त्याचे पालन झाले नाही.

8) विशेष सुचनामधील क्र.3 नूसार कंत्राटदाराने वापरलेल्या साहीत्याचा व कामाचा चाचणी अहवाल शहर अभियंता व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांचे स्वाक्षरीसह ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त् न झाल्याने त्याबाबत पडताळणी करता आली नाही.

9) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2008/1338/प्रक्र.171/नवि20 दि.02/03/2009 अन्व्ये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरीक्षण केल्याचे दिसून आले नाही.

10) विशेष अटी व शर्ती क्र.6 नूसार कंत्राटदाराने साहित्यांचा चाचणी परीक्षण अहवाल नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत खात्री झाली नाही.

11) तांत्रिक स्पेशिफिकेशन मधील 14.6.2 नूसार कंत्राटदाराने त्याच्या नियोजित कामाचा कार्यक्रम अहवाल महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

12) काम सुरू करणेपुर्वी कामाच्या जागेवर प्रत्यक्ष घेण्यात आलेला स्थळ पाहणी अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त् न झाल्याने कामाचे अंदाजपत्रकाची योग्यता पडताळणी करता आली नाही.

13) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितामधील नियम 12.82 (डी) नुसार कंत्राटदाराने देयका सोबत कामाकरीता वापरलेले डांबर, असल्फाल्ट सिमेंट, वाळु, खडी, स्टिल, काँक्रिट इ. मालाच्या खरेदी पावत्या व वाहतूक पास जोडणे आवश्यक आहे.परंतू त्याचे पालन झालेले नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 60 दि.17/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 47, Hmm No : 60)

## *85 उल्हासनगर 1 ते 5 मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1784213.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 94200.00/-

***विहीत कालावधीत काम पुर्ण झाले नाही. बँक गॅरंटीची वैधता वाढविलेबाबत कागदपत्रे प्राप्त झाले नाहीत. कामाचा व कामगारांचा विमा काढलेला नाही. उत्खननातून प्राप्त खनिजापेक्षा जादा खनिजापोटी वाहतूक***

***केल्याने अतिप्रदान झाले आहे. कमीत कमी तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक असतांना दोन प्राप्त निविदाकारामधून निवड करण्यात आली आहे. अंदाजपत्रक अचूक व वास्तववादी नाही. त्रयस्थ पार्टीकडून कामाची तपासणी झालेली नाही. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम वसुल केलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील 12 रस्त्यांच्या पुनर्पृष्ठांकनाचे काम अंदाजपत्रकीय रक्कम रु.8,48,00,365/-च्या कामास स्थायी समिती ठराव क्र.101 दि.19/10/2011मान्यता देण्यात आली आहे. निविदा जाहीरात डि.एन.ए., दै.नगर न्युज, दै.फ्रि प्रेस व लोकसत्ता या वर्तमानपत्रात देण्यात आली असता मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन, मे.कोणार्क कंन्स्ट्रक्शन, मे.जयहिंद रोड बिल्डर्स व आर.के. चंदनानी या चार निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. महानगरपालिका क्षेत्रातील 12 रस्त्यांच्या पुनर्पृष्ठांकनाचे कामासाठी त्याच ठेकेदारांनी निविदा भरल्या असल्याचे दिसून आल्या. त्यामुळे स्पर्धा झालेली नाही. यापैकी मे.जयहिंद कंन्स्ट्रक्शन या एकाच निविदाकाराची निविदा तांत्रिकदृष्टया पात्र झाल्याने फेरनिविदा जाहीरात इंडियन एक्सप्रेस, लोकसत्ता व धनुष्यधारी या वर्तमानपत्रात दिली असता मे.कोणार्क कंन्स्ट्रक्शन (अधिक 39.60%) व मे. जयहिंद रोड बिल्डर्स (अधिक 46.80%) या दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. अशावेळी अजून एकवेळा फेरनिविदा जाहीरात देणे आवश्यक असतांना शहर अभियंता यांनी कामाची निकड असल्याची शिफारस केल्याने न्युनतम निविदाकार मे.कोणार्क कंन्स्ट्रक्शन यांचेशी दि.20/12/2011 रोजी वाटाघाटी केल्या असता त्यांनी 7% जादा दराने(एकूण निविदा रक्कम रु.9,07,36,390.55/-) काम करण्यास तयारी दर्शविली. कार्यादेश क्र.3501 दि.16/03/2012 अन्वये काम सुरू करण्याचे व 150 दिवसात काम पुर्ण करण्याचे आदेश कंत्राटदारास देण्यात आले आहे.

सदर 12 रस्त्यांपैकी उल्हासनगर 1 ते 5 मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुनर्पृष्ठांकन करणे कामाच्या नस्तींचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,83,14,450/-

कंत्राटदाराचे नाव- मे.कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि.

तांत्रिक मान्यता क्र. व दि. 6244 दि.27/09/2011

स्थायी समिती ठराव क्र.101 दि.19/10/2011

कार्यादेश क्र. व दिनांक- 3501 दि.29/12/2011 (+7 टक्के)

कामाचा कालावधी- 150 दिवस मोजमाप नोंदवही क्र.2780

चौथे धावते देयक प्रमाणक क्र.3039 दि.03/11/2012 रु.17,84,213/-

1) कामाचा कालावधी 150 दिवस असूनदेखील कार्यादेशाचा दि.29/12/2011 नंतर 15 महीने होवूनही लेखापरीक्षण वर्ष अखेरपर्यंत काम पुर्ण झालेले नाही. त्याचप्रमाणे कामाच्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीच्या मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे काम विलंबाने केल्याबाबत दंडात्मक कार्यवाही केल्याची खातरजमा करता आली नाही. बँक गॅरंटीची वैधता वाढविलेबाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

2) वित्त विभाग शा.नि.विकास/1098/प्र.क्र.29/98/शासन हमी दि.19.08.1998 नुसार कामाचा व कामगारांचा विमा काढणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कामाचा विमा काढलेबाबत अभिलेख लेखापरीक्षणा प्राप्त् झाले नाहीत. तसेच,1% विमा रक्कम रु.19,394/- देयकातून कपात करण्यात आलेली नाही.

3) अर्थ सॉईल मधील उत्खननातून 1018.21 घ.मी. माती निघाली असल्याने तेवढयाच गौण खनिजाची वाहतूक होणे अपेक्षित असतांना 1777.21 घ.मी. खनिजाची वाहतूक केली आहे. त्यामुळे जादा वाहतूक 759 घ.मी.ची रु.82.47/- प्रती घ.मी.प्रमाणे एकूण रुपये 62,595/- इतक्या रकमेचे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम वसुलपात्र आहे.

4) प्रथम वेळी चार निविदाकारांच्या निवीदा प्राप्त् झाल्या होत्या. चार मधील फक्त जयहिंद रोड बिल्डर्स वगळता इतर तिघांची निवीदा तांत्रिक कागदपत्रे अपुर्ण असल्यामुळे अपात्र झाल्याने निविदा प्रक्रियेस मुदतवाढ दिली असता मे.कोणार्क इन्फास्ट्रक्चर लि. व मे. जयहिंद रोड बिल्डर्स यांची निविदा प्राप्त् झाली. उदयोग,उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दि.02/01/1992 नूसार कमीत कमी तीन निवीदा प्राप्त होणे आवश्यक असतांना शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांनी कामाची निकड असल्याने निविदा उघडणेस शिफारस केली व मे.कोणार्क इन्फास्ट्र. लि. यांची निवीदा +7टक्के दराने मान्य करण्यात आली.

5) मुळ अंदाजपत्रकानूसार सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.1,83,14,450/- इतकी निश्चित असतांना खालील अतिरिक्त कामाकरीता अंदाजपत्रकात सुधारणा करून अंदाजपत्रकीय रक्कम रु.2,48,38,500/- करण्यात आली आहे. त्यास मान्यता घेतल्याचे अभिलेख प्राप्त झाले नाहीत.

पाणी पुरवठा वाहिन्यांच्या खंदकांची दुरूस्ती कामे रु.5734966/-

महानगर गॅस वाहिन्यांचे खंदकांचे पुनर्पृष्ठांकन करणे रु.835666/-

एमएसईबी वाहिन्यांचे खंदकांचे पुनर्पृष्ठांकन करणे रु.835666/-

नाली सफाई खर्च रु.703000/-

बीबीएम, थर्माप्लॉस्टिक पेंट खर्च रु.1824147/-

उपरोक्तबाबी दर्शवून अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ केली आहे. प्रथम अंदाजपत्रक तयार करतांना उपरोक्त सर्व बाबी विचारात घेवून अंदाजपत्रक बनविणे आवश्यक होते. त्यामुळे अंदाजपत्रक अचूक व वास्तवादी नाही.

6) निविदेतील विशेष अटी व शर्तीमधील क्र.7नुसार डांबरीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायबीलीटी कालावधी 3 वर्षाचा आहे. शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांचे पत्र क्र.419/2013 दि.05/09/2013 अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी खडडे पडले असल्याचे शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निदर्शनास आले असल्याचे नमूद आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झालेले नाही. नगरविकास विभाग, शासन निर्णय दि.02/03/2009 नूसार त्रयस्थ पार्टीकडून कामाची तपासणी झालेली नाही.

7) महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि.10/02/2003 व शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/ सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रु.70.67 प्रती घ.मी. दराने शासन खाती भरणा केल्याची खात्री करणे आवश्यक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे 172.80 घ.मी.करीता शासनाचे रु.12,212/- चे नुकसान झाले आहे.अर्धसमास क्र.58 दि.17/06/15 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल

1) कामगार व कामाचा विमा रक्कम रु.19,394/-

2) उत्खननातून प्राप्त खनिजापेक्षा जादा वाहतूकीपोटी खर्च रु.62,594/-

3) गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम रु.12,212/-

## *86 प्रभाग क्र.11 मधील सावित्रीबाई फुले नगर येथे समाज मंदिर बांधणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 06**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 660000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 12522.00/-

***काम कार्यादेशानुसार विहीत कालावधीत पुर्ण झालेले नाही. समाजमंदिराची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आलेबाबत पडताळणी करीता मालमत्ता नोंदवही प्राप्त झाली नाही. काम सुरू करणेपुर्वी नियोजित बांधकामांचे सर्व प्राथमिक अंदाज रेखांकित नकाशेसह प्राप्त झाले नाही. गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम वसुल करण्यात आली नाही. कामाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून पर्यवेक्षण केलेची प्रमाणीत नोंद प्राप्त झाली नाही. वाळू व खडी यांचे दर पृथकरण प्राप्त झाले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील समाज मंदिरांचे बांधकाम लेखाशिर्षातर्गत कामे करण्यात आली असून सदरची कामे मजूर सहकारी संस्था यांना विनानिवीदा जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांनी निर्गमित केलेल्या वितरण आदेशानूसार देण्यात आली आहे. प्रभाग क्र.11 मधील सावित्रीबाई फुले नगर येथे समाज मंदिर बांधणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.6,00,000/-, तांत्रिक मान्यता क्र.3695 दि.17/03/2010 चे काम जिल्हा उपनिबंधक यांचे काम वितरण आदेश क्र.4581 दि.23/12/2010 अन्वये सुर्यज्योत मजूर सहकारी संस्था मर्या. यांना उल्हासनगर महानगरपालिका यांचे कार्यादेश क्र.2535 दि.04/01/2011अन्वये देण्यात आले आहे. प्रमाणक क्र.1069 दि.12/06/2012 अन्वये रु.5,80,800/-इतकी रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आहे. सदर कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

कंत्राटदाराचे नाव - सुर्यज्योत मजूर सह. संस्था मर्या.
अंदाजपत्रकीय रक्कम- रुपये 600000/-
तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक- 3695 दि.17/03/2010
जिल्हा उपनिबंधक यांचे कामाचे वाटप पत्र क्र.4581 दि.23/12/2010
कामाचा कालावधी 120 दिवस काम पुर्ण दि.10/08/2011
कार्यादेश क्र.2535 दि.04/01/2011

1) कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार सदर काम कार्यादेशानंतर 120 दिवसात( दि.05/05/2011 पर्यंत) पुर्ण करणे आवश्यक असतांना दि.10/08/2011 रोजी विलंबाने पुर्ण झाले आहे. काम विलंबाने पुर्ण केलेबाबत

कंत्राटदारावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) बांधण्यात आलेल्या समाजमंदिराची नोंद महानगरपालिकेच्या मालमत्ता नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. सदर नोंद घेण्यात आल्याची पडताळणी करण्याकरीता मालमत्ता नोंदवहीची मागणी केली असता नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने त्याची पडताळणी करता आली नाही.

3) समाजमंदिराचे काम सुरू करणेपुर्वी नियोजित बांधकामांचे सर्व प्राथमिक अंदाज रेखांकित नकाशेसह सादर होणे आवश्यक आहे. परंतू सदर प्राथमिक अंदाजानूसार मोजमापे व नकाशा प्राप्त न झाल्याने मोजमाप नोंदवहीतील मापे योग्य असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

4) महसूल व वनविभाग यांची अधिसुचना 10/02/2003 व शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर /309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून महानगरपालिकेने शासन सदरी भरणा न केल्याने रु.70.67/- प्रती घ.मी. प्रमाणे 177.19 घ.मी.करीता शासनाचे रु.12,522/- चे नुकसान झाले आहे.

5) सार्व.बांधकाम विभागाच्या अधिनियमातील परीच्छेद क्र.24 मधील नियम क्र. 8 (एच) नूसार झालेल्या कामाचे 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. परंतू झालेल्या कामांबाबतचे कार्यकारी अभियंता यांचे निरीक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणावरील भेट नोंदवही लेखा परीक्षणाकरीता प्राप्त न झाल्याने कामाच्या पर्यवेक्षणाबाबत पडताळणी होत नाही. त्याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेवर नोंदविले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

6) उपरोक्त कामाकरीता वाळू व खडी यांची वाहतूक अनुक्रमे 160 किमी व 7 किमी वरील ठिकाणावरून आणल्याचे दर पृथकरणपत्रात दर्शविले आहे. परंतू त्याबाबत वाळू व खडी यांचे वाहतूक पास व बांधकामात वापरलेल्या साहीत्याचे खरेदी चलन इ. अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने साहित्यांची प्रत्यक्ष खरेदी झाल्याचे व वाहतूक 160 किमी व 7 किमी वरून करण्यात आल्याची पडताळणी होत नाही. उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.48 दि.10/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 90, Hmm No : 48)

## *87 गटारे, नाला बांधणे लेखाशिर्षांतर्गत कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 08**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1392480.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 97259.00/-

***काम विलंबाने पुर्ण करण्यात आले असून दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. स्वामित्वधनाची रक्कम वसुल केलेली नाही. दरात तफावतीमुळे रक्कम रु.40264/- चे अतिप्रदान झाले आहे. दरपत्रकाच्या अनुषंगाने केलेल्या खरेदीबाबत कागदपत्रे अप्राप्त आहेत. अंदाजपत्रकापेक्षा जादा काम करण्यात आले आहे. त्यास मंजूरी घेण्यात आली नाही.***

सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे मार्फत गटारे व नाला बांधणे लेखाशिर्षांतर्गत काम करण्यात आली आहे. सदरची कामे मजूर सहकारी संस्था यांना विनानिवीदा जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांनी निर्गमित केलेल्या वितरण आदेशानूसार देण्यात आली आहे. प्रभाग क्र.7 मधील सचदेव नगर ते डॉल्फिन क्लबच्या मागची बाजूचा नाला दुरूस्त् करणे व प्रभाग क्र.46 उल्हासनगर 3 येथील खेमी डाईंग कंपनीलगत नाला बनविणे या कामांवर वित्तीय वर्ष 2012-13 कालावधीत कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली असून त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

1)प्रभाग क्र.7 मधील सचदेव नगर ते डॉल्फिन क्लबच्या मागची बाजूचा नाला दुरूस्त् करणे.
तांत्रिक मान्यता क्र.5197 दि.26/04/2011
अंदाजपत्रकीय रक्कम रु.9,99,900/-
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.1001 दि.27/06/2011
कार्यादेश क्र.3073 दि.05/07/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.धनलक्ष्मी मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.2361 दि.24/09/2012 रु.956903/-

2) प्रभाग क्र.46 उल्हासनगर 3 येथील खेमी डाईंग कंपनीलगत नाला बनविणे.
तांत्रिक मान्यता क्र.4131 दि.14/07/2010
अंदाजपत्रकीय रक्कम रु.2,75,000/-
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.5243 दि.28/01/2011
कार्यादेश क्र.2769 दि.24/03/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.विजयालक्ष्मी मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र.2436 दि.25/09/2012 रु.251626/-

उपरोक्त कामांच्या नस्तींचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

1. प्रभाग क्र.7 मधील सचदेव नगर ते डॉल्फिन क्लबच्या मागची बाजूचा नाला दुरूस्त् करणे कामाचे कार्यादेशानूसार दि. 05/07/2011 पासून 180 दिवसांत (दि.31/12/2011 पर्यंत) कंत्राटदाराने काम पुर्ण करणे आवश्यक असतांना सदर काम विहित कालावधीत पूर्ण झाले नसून दि.2/2/2012 रोजी विलंबाने पुर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे प्रभाग क्र.46 उल्हासनगर क्र.3 येथील खेमी डाईंग कंपनीलगत नाला बनविणे कामाचे कार्यादेशानूसार दि.24/03/2011 पासून 90 दिवसांत कंत्राटदाराने (दि.21/06/2011 पर्यंत) काम पुर्ण करणे आवश्यक असतांना सदर काम विहित कालावधीत पूर्ण झाले नसून दि.09/03/2012 रोजी विलंबाने पुर्ण झाले आहे. विलंबाकरीता करारनाम्यातील अटी व शर्तीनूसार प्रती दिवस रु.50/- प्रमाणे अ.क्र.1 च्या कामाकरीता रु.1,150/- व अ.क्र.2 च्या कामाकरीता रु.12,650/- वसूली होणे आवश्यक असतांना कंत्राटदारावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. महसूल व वनविभाग अधिसुचना दि.10/02/2003 व शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर /309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांच्या स्वामित्व धनाची (रॉयल्टी) रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. परंतु अश्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे ते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.7 मधील सचदेव नगर ते डॉल्फिन क्लबच्या मागची बाजूचा नाला दुरूस्त् करणे.(परीमाण 475.38 घ.मी.) | रु.33,595/- |
| 2 | प्रभाग क्र.46 उल्हासनगर 3 येथील खेमी डाईंग कंपनीलगत नाला बनविणे. (परीमाण 112.16 घ.मी.) | रु.7,926/- |
| | एकूण रक्कम रुपये | रु.41,521/- |

3. उपरोक्त अ.क्र 1 च्या कामातील एम-10 गटरवॉल ट्रॅपमेटल बाबीचा दर जिल्हा दरसुची 2010-11 मध्ये लिडसह रु.3364.68 प्रती घ.मी.असतांना रु.3685.23 प्रती घ.मी. इतक्या दराने प्रदान झाल्याने रु.320.55 प्रती घ.मी. फरकाने 85.24 घ.मी.करीता एकूण रु.27324/-अतिप्रदान झाले आहे. त्याचप्रमाणे अ.क्र.2 च्या कामाकरीता 40.37 घ.मी.करीता रु.12940/- अतिप्रदान झाले आहे.

4. उपरोक्त अ.क्र.1 व 2 च्या कामाकरीता हाफ राऊंड पाईप वापरण्यात आले आहेत. त्यांचे दर जिल्हा दरसुचीत नसल्याने बाजारातून दरपत्रके मागवून दर निश्चित करण्यात आले आहेत. परंतू तदसंबंधी अभिलेख लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झाल्याने दराची अचुकता पडताळणी करता आली नाही.

5. उपरोक्त अ.क्र.2 चे काम श्री. ननावरे, आरोग्य निरीक्षक यांचे पत्राच्या अनुषंगाने करण्यात आले आहेत. परंतू सदर कामाचा कनिष्ठ अभियंता यांचा स्थळ पाहणी अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही. यामुळे कामाची निकड लक्षात येत नाही.

6. अ.क्र. 2 चे कामाकरीता खोदाई मंजूर प्राकलनानूसार 40 मी. लांबीचे करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात 108.49 मी. लांबीचे केल्याने 68.49 मी. जादा काम केले आहे. जादा कामाची कारणमिमांसा व जादा कामास घेण्यात आलेल्या मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. जादा कामाकरीता प्रदान केलेल्या रकमेची कंत्राटदाराकडून वसूली होणे आवश्यक आहे.

7. अ.क्र.2 च्या कामातील बाब क्र.6 व 7 करीता अंदाजपत्रकानूसार अनुक्रमे 300 एमएम चे 40 मी. व 400 एमएम चे 10 मी. हाफ राऊंड पाईप वापरणे आवश्यक असतांना अनुक्रमे 44 मी. व 12 मी. पाईप वापरल्याने बाब क्र. 6 करीता रु.221/- प्रती मी.प्रमाणे रु.884/- व बाब क्र. 7 करीता रु.395 प्रती मी.प्रमाणे रु.790/- अतिप्रदान झाले आहे.

8. अ.क्र.2 च्या कामात मोजमाप नोंदवहीनूसार 2.71 घ.मी.(21.59 मी. लांबी) जादा खोदाई नोंदविण्यात आल्याचे दिसून येते. सदर जादा खोदाई मुळ अंदाजपत्रकात नसल्याने खोदाईचे कारण स्पष्ट होत नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.50 दि. 10/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल

1) कामाच्या विलंबापोटी रक्कम रु.13,800/-
2) स्वामित्वधनाची रक्कम रु.41,521/-
3) दरातील फरकाची रक्कम रु.40,264/-
4) अंदाजपत्रकापेक्षा जादा कामाची रक्कम रु.1,674/-

एकूण वसुलपात्र रक्कम रु.97,259/-

DATPVWM7501 (Ref No : 92, Hmm No : 50)

## *88 उदयानांचे बांधकाम या लेखाशिर्षांतर्गत कामातील अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1879692.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 62573.00/-

***मुळ अंदाजपत्रकानूसार काम करण्यात आले नाही. स्वामित्वधनाची रक्कम रु.25073/- शासन जमा करण्यात आल्याची खात्री करून प्रदान केले नाही. बांधकामाकरीता खरेदी केलेल्या साहित्याच्या चलनाच्या प्रती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाल्या नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांचे बांधकाम लेखाशिर्षांतर्गत कामे करण्यात आली असून सदरची कामे मजूर सहकारी संस्था यांना विनानिवीदा जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांनी निर्गमित केलेल्या वितरण आदेशानूसार देण्यात आली आहे. प्रभाग क्र.3 मधील धोबीघाट कमला नेहरू बाल शिवाजी उदयान समोरील कोसळलेली संरक्षण भिंत पुन-र्बांधणी करणे व उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे या कामांवर वित्तीय वर्ष 2012-13 कालावधीत कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली असून त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

1) कामाचे नाव- प्रभाग क्र.3 मधील धोबीघाट कमला नेहरू बाल शिवाजी उदयान समोरील कोसळलेली संरक्षण भिंत पुन-र्बांधणी करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.9,80,900/-

तांत्रिक मान्यता क्र.5124 दि.13/04/2011

जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.633 दि.23/05/2011

कार्यादेश क्र.3036 दि.30/06/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.गुरूराज मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र. 457 दि.04/05/2012 रु.9,38,718/-
2) कामाचे नाव-उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे.
अंदाजपत्रकीय रक्कम रु.9,94,900/-
तांत्रिक मान्यता क्र.4203 दि.21/07/2010
जिल्हा उप निबंधक यांचे काम वितरण क्र.5261 दि.28/01/2011
कार्यादेश क्र.2618 दि.10/12/2011
कंत्राटदाराचे नाव- मे.गुरूदेव मजूर सह. संस्था लि.
प्रमाणक क्र. 3876 दि.07/01/2013 रुपये 9,40,974/-
उपरोक्त कामातील अनियमितता पुढीलप्रमाणे आहेत.

1) प्रभाग क्र.3 मधील धोबीघाट कमला नेहरू बाल शिवाजी उदयान समोरील कोसळलेली संरक्षण भिंत पुन-बांधणी करणे कामासंदर्भात सादर टिपणीनूसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.30 लक्ष इतकी अपेक्षित असल्याचे नस्तीतील सादर टिपणीवरून निदर्शनास येत असतांना 20 मीटर लांबीची संरक्षण भिंत बांधणेकरीता रु.9,80,896/- इतक्या अंदाजित खर्चास मंजूरी घेण्यात आली आहे. तफावतीबाबत अर्धसमास ज्ञापनद्वारे स्पष्टीकरण सादर करण्यास कळविले असता अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे याबाबत निश्चित कारणमिमांसा लेखापरीक्षणात तपासता आली नाही.

2) प्रभाग क्र.3 मधील धोबीघाट कमला नेहरू बाल शिवाजी उदयान समोरील कोसळलेली संरक्षण भिंत पुन-बांधणी करणेचे पुर्वी बांधण्यात आलेली संरक्षण भिंत सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत सन 2009-10 कालावधीत बांधण्यात आली होती. सदर भिंत दि.16/06/2010 रोजी कोसळल्याचे टिपणीत नमूद आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांनी बांधलेल्या संरक्षण भिंतीचा डिफेक्ट लायबीलीटी कालावधी संपणेपुर्वी भिंत पडली असल्यास सदर काम सार्व. बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून होणे आवश्यक होते. असे असतांना महानगरपालिकेने सदर काम केल्याने मनपाचा निधी अनावश्यक खर्च झाला आहे.

3) महसूल व वनविभाग शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. परंतु अशी गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे खालीलप्रमाणे एकूण रु.25,073/- रकमेचे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.3 मधील धोबीघाट कमला नेहरू बाल शिवाजी उदयान समोरील कोसळलेली संरक्षण भिंत पुर्न-बांधणी करणे. (परीमाण 339.25 घ.मी.) | रु.23975/- |
| 2 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील | रु.1098 /- |

| | | |
|---|---|---|
| | डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे.(परीमाण 15.53 घ.मी.) | |
| | एकूण रक्कम रुपये | रु.25073/- |

4) उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे कामासंदर्भात अंदाजपत्रकानूसार लांबी 100 मी., रुंदी 0.50 मी. व खोली 0.10 मी. मोजमापानूसार खोदाईचे काम करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात खालीलप्रमाणे अपुर्ण काम करण्यात आले आहे. मुळ अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्यात आले नाही.

| | लांबी | रुंदी | खोली |
|---|---|---|---|
| 1 | 8.80 मी. | 1.47 मी. | 0.2 मी. |
| 2 | 3.4 मी. | 3.7 मी. | 0.2 मी. |
| 3 | 3.95 मी. | 1.8 मी. | 0.2 मी. |
| 4 | 2 मी. | a. मी. | 1मी. |
| एकूण | 18.15 मी. | .मी 8.67 | 0.8 मी. |

5) उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे कामासंदर्भात सदर उदयानात यापुर्वी केलेल्या कामाची हिस्ट्री नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने डॉ.आंबेडकर उदयानात पुर्वी केलेल्या कामाचा तपशिल इ.बाबत माहीती लेखापरीक्षणाकरीता पडताळणी करता आली नाही. त्यामुळे सदर कामाची निकड लक्षात येत नाही.

6) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहीता (नॅम) मधील 12.82 (डी) नुसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल/इनव्हाईसची नोंद केल्यानंतरच कंत्राटदारांना रक्कम अदा करणे आवश्यक असतांना सदर बिल/इनव्हाईस प्राप्त न करता कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली आहे. बांधकामाकरीता खरेदी केलेल्या साहीत्याच्या चलनाच्या प्रती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाल्या नाहीत. चलनाच्या प्रती प्राप्त् न झाल्याने कंत्राटदाराने केलेली खरेदी व मालाची गुणवत्ता इ.बाबत पडताळणी करता आली नाही.

7) उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे कामाच्या मोजमाप नोंदवहीतील तपशिलात मोनोब्लॉक पंप पुरवठा करणे व बसविणे बाबीची नोंद घेण्यात आलेली नाही. सदर नोंद मोजमाप पुस्तिकेतील गोषवा-यात नोंदविलेली आहे. सदर बाबीकरीता रु.37,500/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली असून ती रक्कम वसुलपात्र आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.49 दि.10/06/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशिल

1) स्वामित्वधनाची रक्कम रु.25073/-

2) मोनोब्लॉक पंप पुरवठा करणे व बसविणेकरीता केलेला खर्च रु.37500/-

एकूण वसुलपात्र रक्कम रु.62573/-

1) प्रभाग क्र.3 मधील धोबीघाट कमला नेहरू बाल शिवाजी उदयान समोरील कोसळलेली संरक्षण भिंत पुन-बांधणी करणे. (आक्षेपाधिन रक्कम रु.938718/-)

2) उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र.64 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानाचे सुशोभिकरण करणे.

(आक्षेपाधिन रक्कम रु.940974/-)

DATPVWM7501 (Ref No : 97, Hmm No : 49)

## *89 पाणीपुरवठा विभागातील विद्युत वाहिनीच्या दुरुस्ती व buster पंप कार्यान्वित करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :B-26 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 554042.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 22509.00/-

***पाणीपुरवठा विभागातील विद्युत वाहिनीच्या दुरुस्ती व buster पंप कार्यान्वित करणे या कामाचे रु. 554042/- चे प्रदान केले आहे. परंतु मोजमाप पुस्तिका क्र.72(A) मागणी करूनही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदर प्रमाणाकांन्वये केलेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करता आले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम चे कलम 4(3) मधील तरतुदीनुसार अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. परंतु सदर जबाबदारीचे पालन झाले नाही तसेच देखभाल व दुरुस्तीच्या कामात मूल्यवर्धित कर, कामगार उपकर व विमा अशी एकूण रक्कम रु.22509/- कपात केली नाही. त्यामुळे रु.22509/- रक्कम वसूलपात्र आहे.***

1.मलप्रकिया केंद्र खडेगोळवली 22 KVAयंत्र दुरुस्ती करणे या कामाचा शाखा अभियंता (यांत्रिकी) यांचा दि.30/7/11 रोजीचा अहवाल तपासला असता सदर यंत्रणा दि.12/6/11 रोजी बंद पडली आहे. तातडीची बाब म्हणून मे. कल्पतरू Engg मुंबई यांना काम करण्यास सांगितले आहे. असे नस्तीत अभिप्राय नोंदवले आहेत. परंतु सदर काम कार्यादेश क्र.55 दि.3/1/12 रोजी 6 महिने विलंबाने काम सुरु केले आहे. त्या कालावधीत यंत्रणा बंद असल्याची नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे काम कधी केले याची खात्री करता आली नाही.

अ) प्रमाणक क्र. 930 दि.1/6/12 रु.2,68,692/- चे प्रदान केले आहे. परंतु मोजमाप पुस्तिका क्र.72 (A) मागणी करूनही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदर प्रमाणकाचे लेखापरीक्षण करता आले नाही.

ब) देखभाल व दुरुस्तीच्या कामात मूल्यवर्धित कर, कामगार उपकर व विमा कपात केला नाही. त्यामुळे रु.11,095/- ही रक्कम वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

क) बाब क्र.5 supply of tran oil 550 लिटर रु.73050/- व बाब क्र.7 provinding 200 kva transformer rental basic 29 दिवस घेतली आहे. त्याची नोंदवही ठेवली नाही. तसेच वापराचा तपशिल नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.268692/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

Ulhasnagar (M Corp.)

**2) वार्ड क्र. 28 प्रभागातील नवीन buster पंप बसविणे व कार्यान्वित करणे रु. 2,85,350/-**

अ) सदर कामावर रु.2,85,350/- खर्च केला आहे. परंतु त्यामधून Vat 2% कामगार उपकर 1% व विमा 1% कपात केला नाही. अशी एकूण रक्कम रुपये 11414/- वसूलपात्र आहे.

ब) मोजमाप पुस्तिका क्र.72(A) मागणी करूनही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे रुपये 285350/- खर्चाचे लेखापरीक्षण करता आले नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमाचे कलम 4(3) नुसार लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. परंतु मागणी करूनही लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध केले नसल्याने सदर जबाबदारीचे पालन झाले नाही. अर्धसमास क्र.91 दि.13/7 /2015 अन्वये निर्गमित केला असून अनुपालन प्राप्त झाले नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 554042/-

वसूलपात्र रक्कम रु. 22509/-

DATDDZM6901 (Ref No : 109, Hmm No : 91)

## *90 नगररचना विभागातील जमा पावती, पावती नोंदवही, चलने व भरणा नोंदवहीतील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :110-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 245000.00/-

***नगररचना विभागात बांधकाम विकास शुल्क, स्टेअर केस/ लिफ्ट चार्जेस, अनामत रक्कम, स्थानिक संस्था कर, इ. जमा होणाऱ्या रक्कमांची जमा पावत्यांची नोंद पावतीच्या दिनांकानुसार (डे टू डे) घेतलेली नसून 8 ते 10 दिवसांच्या पावत्याची नोंद एकाच दिवशी नोंदवहीत एकत्रित घेण्यात आलेली आहे विभागात जमा होणाऱ्या रोख रक्कमा/ डी डी/ चेक दररोज रोखपाल यांचे कडे न भरता 8 ते 10 दिवसांनी जमा केल्या आहेत.***

नगररचना 2012-13 मधील विभागात बांधकाम विकास शुल्क, स्टेअर केस/लिफ्ट चार्जेस, अनामत रक्कम, स्थानिक संस्था कर, इ. जमा होणाऱ्या रक्कमांची जमा पावती, पावती नोंदवही, चलने व भरणा नोंदवही तपासली असता त्यात खालील अनियमितता दिसून आल्या आहेत. सदर अनियमितता बाबत विभागास अर्धसमास पत्र क्र. 75 दिनांक 30/06/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)जमा पावती नोंदवहीत पावत्यांची नोंद पावतीच्या दिनांकानुसार (डे टू डे) घेतलेली नसून 8 ते 10 दिवसांच्या

पावत्याची नोंद एकाच दिवशी एकत्रित नोंदवहीत उशिराने घेण्यात आलेली आहे. विभागात जमा होणाऱ्या रोख रक्कमा/डीडी/चेक दररोज रोखपाल यांचे कडे न भरता 8 ते 10 दिवसांनी जमा करण्यात आल्या आहेत. उदा.

| अ.क्र. | दिनांक | पावती क्रमांक | रक्कम रु. | रोखपालाकडे जमा केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | 23/04/2012 | 057928 | 183225 | 30/04/2012 |
| 2 | 02/05/2012 | 059933 | 33850 | 10/05/2012 |
| 3 | 13/03/2013 | 142418 | 360025 | 26/03/2013 |
| 4 | 16/03/2013 | 142428 | 489830 | 26/03/2013 |
| 5 | 25/03/2013 | 142436 | 1398489 | 02/04/2013 |

2)रोखपालाकडे चलनाने भरणा करताना चलनावर रोख रक्कम/डीडी/चेक एकत्रची रक्कम दर्शविण्यात आल्या आहेत. त्यामुळे चलनातील रक्कमेत रोख रक्कम किती, डीडी रक्कम किती व धनादेश रक्कम किती याची पडताळणी करता आली नाही.

3) महानगरपालिकेकडे दि. 31/03/2013 अखेर पर्यंत एकूण 67 वास्तुविशारद/स्थापत्य अभियंता यांनी नोंदणी केलेली आहे. महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. 91 दि. 10/03/2010 अन्वये नवीन वास्तुविशारद/स्थापत्य अभियंता नोंदणी करिता रु.7500/- व वार्षिक नुतनीकरणाकरिता रु.5000/-असे शुल्क/फी ठरविण्यात आलेले आहे. तथापि 2012-13 एकूण 67 पैकी फक्त 18 वास्तुविशारद/स्थापत्य अभियंता यांनी नुतनीकरण केल्याचे पावती पुस्तकावरून दिसून आले आहे. व उर्वरित 49 अभियंता यांनी नुतनीकरण केलेले नाही. त्यामुळे रु.5000/-प्रमाणे एकूण रु. 245000/- नुतनीकरण फी वसूल करावयाची बाकी आहे. त्यामुळे महानगरपालिकेस सदर उत्पन्न मिळालेले नाही. वसूलपात्र रक्कम रु 245000/-

TRTARCM6001 (Ref No : 39, Hmm No : 75)

## *91 नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 05**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***जोता तपासणी केल्यानंतर सामासिक अंतरात सुट देण्यात आली आहे. वास्तुविशारद परिषद (कॉन्सिल ऑफ आर्किटेक्ट) यांनी दिलेल्या परवाना पत्राची वैधता संपली असतांना वास्तुविशारद यांची नेमणूक करून नियमबाहयता झाली आहे. शासनाची बिन-शेती सा-याची रक्कम शासनखाती जमा केल्याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. विकास नियंत्रण नियमावलीनूसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र***

***दिल्यानंतर एक वर्षात संबंधित बांधकाम सुरू करणे बंधनकारक असून पुढील तीन वर्षात इमारत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतू ब-याच प्रकरणांत जोता तपासणी दाखला व भोगवटा/बांधकाम पुर्ण प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.***

नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका येथील बांधकाम परवानगी प्रकरणांच्या निवडक नस्ती तपासल्या असता खालीलप्रमाणे सर्वसाधारण अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

1) सुधारीत बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र क्र.54/09/846 दि.25/03/2013, मे.कविता एन्टरप्रायझेज यांनी सामासिक अंतरात सुट मिळणेबाबत दि.31/08/2012 रोजी केलेल्या विनंती अर्जा अन्वये नगररचना विभागाने 12.19 चौ.मीटर क्षेत्राकरीता सुट दिल्याचे दि.05/09/2012 च्या पत्रावरून निदर्शनास आले आहे. विकास नियंत्रण नियमावलीनूसार जोता तपासणीपुर्वीच सामासिक अंतरात सुट देणे आवश्यक असतांना नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र.1021 दि.24/11/2009 नूसार जोता तपासणी झाल्यानंतर सामासिक अंतरात सुट दिल्याने विकास नियंत्रण नियमावालीचे पालन झाले नाही. सदर प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्र विकासकाकडून घेण्यात आलेले नाही.

2) बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र क्र.9/12/360 दि.28/08/012, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था-श्री.एस.आर.अभंग यांनी श्री.व्ही.एस.वैदय ,वास्तुविशारद यांची दि.18/04/2012 च्या पत्रान्वये वास्तुविशारद म्हणून नेमणूक केली आहे. परंतू वास्तुविशारद परिषद (कॉन्सिल ऑफ आर्किटेक्ट) यांनी श्री.व्ही.एस.वैदय यांना दिलेल्या परवाना पत्राची वैधता दि.31/12/2011 पर्यंत असतांना दि.18/04/2012 रोजी त्यांची नेमणूक करून नियमबाहयता झाली आहे. त्याचप्रमाणे सदर बांधकामाचा जोता तपासणी दाखला व भोगवटा प्रमाणपत्र विकासकाकडून घेण्यात आलेले नाही.

3) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे ज्ञापन क्र.जमीन 2706/प्रक्र. 125 दि.31/08/2009 व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र.महसूल/कक्ष1/टे-14 दि.23/11/2009 अन्वये श्री.छत्रपती शिक्षण संस्था,उल्हासनगर, कॅम्प नंबर 4, प्लॉट क्र.249 मधील शासकीय जमीनीचा शैक्षणिक प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण नियमाकुल करणेसाठी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट), नियम 1971 मधील तरतूदीनूसार सदर जमीन सवलतीच्या दराने संस्थेला देण्यात आली आहे. जमीन विल्हेवाटीच्या शासन अटी व शर्तीनूसार तत्पुर्वी सदर संस्थेने प्रस्तुत जमीन संस्थेच्या ताब्यात असल्यापासूनच्या कालावधीची बिन-शेती सा-याची रक्कम शासन खाती जमा करणे बंधनकारक आहे. परंतु संस्थेने बिन-शेती सा-याची रक्कम शासन जमा केलेबाबत कोणतेही अभिलेख नस्तीत आढळून आले नसल्याने शासनाची बिन-शेती सा-याची रक्कम शासनखाती जमा झाल्याची खात्री करता नाही.

4) विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.7.2 नूसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षात संबंधित बांधकाम सुरू करणे बंधनकारक असून पुढील तीन वर्षात इमारत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. सन 2008-2009 , 2009-2010, 2010-2011 व 2012-13 कालावधीत खालीलप्रमाणे बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तथापि जोता तपासणी दाखला व भोगवटा/बांधकाम पुर्ण प्रमाणपत्र घेण्यात आले नसल्याची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र दिलेल्या | जोता तपासणी दाखला दिलेल्या | भोगवटा/बांधकाम पुर्ण प्रमाणपत्र दिलेल्या |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रकरणांची संख्या | प्रकरणांची संख्या | प्रकरणांची संख्या |
| 1 | 2008-09 | 182 | 12 | 13 |
| 2 | 2009-10 | 271 | 72 | 22 |
| 3 | 2010-11 | 167 | 19 | 92 |
| 4 | 2011-12 | माहिती अप्राप्त | माहिती अप्राप्त | माहिती अप्राप्त् |
| 5 | 2012-13 | 141 | अप्राप्त | 6 |

उपरोक्तप्रमाणे बांधकाम प्रारंभ परवानगी प्रमाणपत्र देण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या पाहता फारच कमी प्रकरणांचा जोता तपासणी दाखला व बांधकाम पुर्ण/भोगवटा दाखला घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.
5) सन 2012-13 कालावधीतील भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात आलेल्या 3 प्रकरणांची तपासणी केली असता सन 2008, 2009 व 2010 चे शिघ्रगणक पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदर प्रकरणांमध्ये विकास शुल्क, उपकर,जिना-लिफट अधिमुल्य शुल्काची आकारणी योग्य दराने केली असल्याची पडताळणी करता आली नाही.
उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.85 दि.09/07/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 42, Hmm No : 85)

## *92 मिळकत कर विभागातील जमा रक्कम वसुलीतील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :343-2110 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 208235.00/-

***मिळकत कर विभागाकडील रोकडवही नुसार मालमत्ता कराची माहे डिसेंबर-2012 ची एकूण जमा रक्कम रु. 101352710/- जमा झाल्याचे तपासणीत दिसून आले. तथापि जनरल कॅश बुकामध्ये मालमत्ता कराची जमा रक्कम रु.101144475/- अशी आहे त्यामुळे रु.208235/- चा फरक दिसून आला आहे. त्यामुळे जमा रकमांचे ताळमेळ घेतल्याचे दिसून आले नाही. न वटलेले धनादेशाची नोंदवही ठेवलेली नाही.***

महानगरपालिकेच्या मिळकत कर विभागातील माहे डिसेंबर-2012 चे जमा रकमांचे लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अनियमितता दिसून आलेल्या आहेत.
1) मालमत्ता कर विभागाकडील कॅश बुका नुसार मालमत्ता कराची माहे डिसेंबर-2012 ची एकूण जमा रक्कम

रु.101352710/- जमा झाल्याचे दिसून येत आहे. तथापि जनरल कॅश बुकामध्ये मालमत्ता कराची जमा रक्कम रु.101144475/- अशी आहे त्यामुळे रु.208235/- चा फरक दिसून आला आहे. त्यामुळे जमा रकमांचे ताळमेळ घेतल्याचे दिसून आले नाही.
2) 2012-13 मधील मिळकतकराचे एकूण 231 न वटलेले धनादेशाची रक्कम रु.4241886/- जे बँकेकडून रद्द करण्यात आले आहेत. सदरहू रद्द करण्यात आलेल्या धनादेशाची नोंदवही ठेवलेली नाही. तसेच बँकेतील धनादेशाद्वारे जमा झालेल्या रकमांचा रोकडवहीशी (cash book) ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे रद्द झालेल्या धनादेशाच्या रक्कमा संबंधित करधारकाकडून वसूल केल्याची खात्री करता आली नाही.
3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 7 मधिल नियम 75 ते 78 अन्वये नगरपालिकेला प्राप्त झालेली सर्व रक्कमेची तीन प्रतीत पूर्वीच क्रमांक घालून देण्यात आलेल्या पावतीने पोच देण्यात येईल. यामधील मूळ पावती अदात्याला देण्यात येईल आणि नक्कल प्रत पावती पुस्तकामध्ये ठेवण्यात येईल आणि तिसरी प्रत संबंधित विभागाला पाठविण्यात येईल असे नमूद आहे. परंतु मालमत्ता कर विभागाने करधारकांना रोख रक्कम भरणा केल्याची पावती म्हणून मूळ पावती करधारकाला न देता कार्बन कॉपी दिली आहे. व मूळ पावती विभागाकडे ठेवली आहे.
4) मालमत्ता कर विभागाने भांडार विभागाकडून पावती पुस्तके घेतल्यावर त्याची नोंदवहीत नोंद ठेवलेली नाही त्यामुळे किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून घेतली व किती वाटप केली व शिल्लक पुस्तके किती याचा ताळमेळ घेता आला नाही.
5) कर वसूल लिपिक श्री. राठोड यांचे बुक क्र. 39 पावती क्र.3879 व 3892 मध्ये अक्षरी व अंकी रक्कमेत रु.1892/-ची तफावत आहे.
आक्षेपाधीन रक्कम रु. 208235/-

TRTARCM6001 (Ref No : 94, Hmm No : 109)

## *93 लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने मालमत्ता (मिळकत) कर विभागातील अभिलेखे उपलब्ध न झालेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***कर निर्धारणाची मुळ प्रकरणे नस्ती, कर निर्धारणाची नोंदवही, कर निरीक्षकांचे स्थळ पाहणी अहवाल, त्यांची क्षेत्रीय स्तरावरील अहवालाची नोंदवही इ. अभिलेख तसेच मालमत्ता करामध्ये सुट किंवा परतावा देण्याची कार्यवाही केलेली प्रकरणांची नस्ती, मनपाच्या मालकीच्या परंतू भाडयाने दिलेल्या व शासनाच्या मालमत्ता यांचे कर निर्धारणांची प्रकरणे, मिळकत कराच्या अनुषंगाने विवाद व कोर्टातील दावे प्रकरणे , मोबाईल टॉवर***

***प्रकरणी मिळकत कराची प्रकरण नस्ती व नोंदवही, कर निरीक्षकांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेल्या ठिकाणाचा स्थळ पहाणी अहवाल व नोंदवही इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.***

स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 मधील कलम 4 व 6 अन्वये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थेने लेखापरीक्षणाकरीता लेखे सादर करणे बंधनकारक आहे. उक्त अधिनियमातील कलम 6 अन्वये खालीलप्रमाणे दस्त्ऐवज लेखापरीक्षणाकरीता सादर करणे बाबत उल्हासनगर महानगरपालिकेतील मिळकतकर विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.101 दि. 20/07/2015 व मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना अग्रेषित दिनांक 22/07/2015 च्या पत्राअन्वये कळविण्यात आले होते. परंतू तरीसुध्दा खालीलप्रमाणे अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

1) मिळकत कर विभागातील 2012-2013 मधील कर निर्धारणांची एकूण 2724 प्रकरणे असून त्यामधील लेखापरीक्षणाकरीता निवडक महीना जुन 2012 ची 331 कर निर्धारणाच्या मुळ प्रकरणे नस्ती , कर निर्धारणाची नोंदवही, कर निरीक्षकांचे स्थळ पाहणी अहवाल, त्यांची क्षेत्रीय स्तरावरील अहवालाची नोंदवही इ. अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे मिळकत कर निर्धारणांच्या योग्यता व अचुकतेबाबत लेखापरीक्षण करता आले नाही.

2) मिळकत कराची कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्यामधील नोंदीची अचुकता पडताळणी करता आली नाही.

3) मालमत्ता करामध्ये सुट किंवा परतावा देण्याची कार्यवाही केलेली प्रकरणांची नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने मिळकत करात देण्यात आलेली सुट किंवा परताव्याची कारणमिमांसा, कार्यवाहीची योग्यता/अचुकता यांची पडताळणी करता आली नाही.

4) 2009-10. 2010-11 व 2011-12 या तीन वर्षांत बांधकाम प्रारंभ परवानगी देण्यात आलेली प्रकरणे व त्यांची संख्या, त्यानंतर त्यापैकी किती प्रकरणे मिळकत कर निर्धारणाकरीता घेण्यात आली व उर्वरीत कर निर्धारण न केलेल्या मिळकतींवर केलेल्या कार्यवाही संबंधात प्रकरणे व अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. सबब, भोगवटा प्रमाणपत्र घेतलेल्या इमारतींवर कर निर्धारण विहीत मानकांनुसार झाले किंवा कसे तसेच भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेल्या परंतू वापर सुरू केलेल्या इमारतींवर अवैध बांधकाम समजून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(अ) प्रमाणे शास्तीची कार्यवाही केली किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही. कलम 267 (अ) प्रमाणे 2009-10 पुर्वीच्या अवैध बांधकामांवर देखील शास्तीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे मालमत्ता असलेले परंतू भाडेतत्वावर दिलेल्या प्रकरणांवर केलेल्या कार्यवाहीबाबत अभिलेख. तसेच शासनाच्या मालमत्तेवर कर आकारणी केलेल्या कराची प्रकरणे व अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 139 प्रमाणे महानगरपालिकेने भाडयाने दिलेल्या स्थावर मालमत्तेवर तसेच शासनाच्या मालमत्तेवर कर निर्धारण करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) अनधिकृत बांधकामांवर कर निर्धारणाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेख तसेच मिळकत कराची थकबाकी वसुलीकरीता कोणकोणत्या सवलतीच्या योजना राबविण्यात आल्या त्यांच्या मंजूरीचे व त्याप्रमाणे झालेल्या कार्यवाहीचे अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने राबविण्यात आलेल्या

योजनेची फलश्रुती तसेच योजना राबविल्यामुळे देण्यात आलेल्या दंडाच्या सुटीमुळे महानगरपालिकेस किती रकमेचा तोटा सहन करावा लागला, या इतर बाबींचे लेखापरीक्षण करता आले नाही.

7) मिळकत कराच्या अनुषंगाने विवाद व कोर्टातील दावे प्रकरणे व अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. सबब, लेखापरीक्षणात सदर प्रकरणांची तपासणी करता आली नाही.

8) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 च्या नियम 21(2) नुसार आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पाच वर्षांतून एकदा तरी आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. अशी तरतूद आहे. याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे नव्याने कर निर्धारण केले किंवा कसे. केले असल्यास त्यासंबंधीचे अभिलेख नस्ती. जर केले नसल्यास त्यामागील कारणमिमांसा. याबाबतचे अभिलेख उपलब्ध लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. जुन्या मिळकतींचा पुर्नविकास/ जादा बांधकाम/ नुतनीकरण झाले असल्यास सुधारीत कर निर्धारण न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत तपासणी करता आली नाही.

9) मिळकत कर विभागातील सन 2012-13 मधील खर्चाचे कागदपत्रे व नोंदवहया लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

10) शासनाच्या वतीने मिळकत करात समाविष्ठ असलेला मोठा निवासी कर, रोजगार हमी योजना कर, शिक्षण उपकर इ. शासनास भरणा करण्याच्या रकमांचे अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने मिळकत धारकांकडून वसूल केलेला उपरोक्त कर शासनास विहीत कालावधीत भरणा केला किंवा कसे याबाबत लेखापरीक्षण करता आले नाही.

11) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीएस-1810/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13 दि.26/07/2011 अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात शासनाने धोरण निश्चित केले आहे. मोबाईल टॉवर प्रकरणी मिळकत कराची प्रकरण नस्ती व नोंदवही, कर निरीक्षकांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेल्या ठिकाणाचा स्थळ पहाणी अहवाल व नोंदवही, त्याप्रमाणे तसेच विहीत पध्दतीनूसार मिळकत कर आकारणीचे देयक तयार होते किंवा कसे इ. अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने शासन धोरणाचे उल्हासनगर महानगरपालिकेकडून पालन होते किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.121 दि.06/08/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 98, Hmm No : 121)

## *94 महानगरपालिकेच्या मालकी हक्काच्या परंतू भाडेतत्वावर दिलेल्या तसेच शासनाच्या मालमत्तेवर मिळकत कर न लावलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीचे परंतू भाडेतत्वावर दिलेल्या मालमत्तेचे तसेच शासनाच्या मालमत्तेवर मिळकत कराचे निर्धारण करण्यात आले नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 139(1)(अ) नुसार जागा प्रत्यक्ष (शासनाकडून) किंव महानगरपालिकेकडून धारण केल्या असतील तर त्यांच्या प्रत्यक्ष भोगवटादाराकडून मिळकत कर वसूल करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

1) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले अरुणकुमार वैदय सभागृह (टाऊन हॉल) व तरण तलाव भाडयाने दिले आहेत. परंतू सदर मालमत्तेचे कर निर्धारण करण्यात आले नसून मिळकत कराची रक्कम भोगवटादाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

2) तसेच उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे एकूण शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. परंतू सदर मालमत्तेचे कर निर्धारण करण्यात आले नसून मिळकत कराची रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे इतर शासकीय व निम-शासकीय कार्यालयाच्या जागांचेसुध्दा कर निर्धारण करून मिळकत कराची वसुली होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | शासकीय कार्यालयाचे नाव | | अ..क्र | शासकीय कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | नगर भुमापन कार्यालय | | 14 | सह दिवानी न्यायालय |
| 2 | उप विभागीय कार्यालय | | 15 | मुलांची शाळा, कुर्ला कॅम्प |
| 3 | तहसिलदार कार्यालय | | 16 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्टेल |
| 4 | तहसिलदार एस.जी.वाय. कार्यालय | | 17 | शारीरीक अपंग केंद्र |
| 5 | तालुका कृषी कार्यालय | | 18 | शांतीभवन महीला वस्तीगृह |
| 6 | प्रशिक्षण कार्यालय | | 19 | मुलींचे शासकीय निरीक्षणगृह |
| 7 | शासकीय तांत्रिक माध्यमिक शाळा | | 20 | एकात्मिक बाल विकास कार्यालय |
| 8 | मध्य्वर्ती रुग्णालय | | 21 | अ.जा./अ.ज.मुलींचे शास.वस्तीगृह |
| 9 | शासकीय प्रसुतीगृह व रुग्णालय | | 22 | औदयोगिक प्रशिक्षण केंद्र |
| 10 | नागरी कुष्ठरोग संस्था | | 23 | मुलांची शाळा, शांती भवन |
| 11 | राज्य कामगार विमा योजना कार्यालय | | 24 | शास. मागासवर्ग मुलींचे हॉस्टेल |
| 12 | नागरी कुटूंब कल्याण केंद्र | | 25 | उप कोषागार कार्यालय |
| 13 | सार्वजनिक बांधकाम विभाग | | 26 | दिवानी न्यायालय |

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.120 दि. 06/08/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 100, Hmm No : 120)

## *95 महानगरपालिकेतील न्यायालयीन कामाकरिता वकीलांची नेमणूक व वकील फी देयके प्रदानातील अनियमितता*

**महानगरपालिका फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :762-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1542943.00/-

***महानगरपालिकेतील न्यायालयीन कामाकरिता वकीलांची पॅनलवर नेमणूक करतांना पारदर्शक पद्धतीने उच्चतम व्यावसायिक पात्रतेच्या व्यक्तीची स्पर्धात्मक पद्धतीने निवड केलेली दिसून येत नाही. तसेच वकीलांची फी प्रदान करतांना महाराष्ट्र लॉ ऑफीसर्स नियमानुसार व महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय दि. 16/01/2008 नुसार निश्चित केलेल्या दरानुसार केलेले नाही.***

विधी विभागातील वकीलांची फी प्रदानाची प्रमाणके व नस्ती तपासली असता वकीलांची पॅनलवर नेमणूक करतांना विधी विभागाचा दि. 16/01/2008 चा शासन निर्णय विचारात घेतला नसल्याचे दिसून आलेले आहे. याबाबत अर्धसमास क्र. 20 दि. 9/04/2015 अन्वये खुलासा मागविला असता खुलासा प्राप्त झाला नसल्याने खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.प्रमाणकांचा तपशिल अ.क्र. 2 मध्ये नमूद केलेला आहे.

1) महानगरपालिकेच्या वतीने विविध न्यायालयात बाजू मांडणे करीता महानगरपालिकेच्या पॅनलवर वकीलांची (विधिज्ञ) निवड केली जाते. सदरहू निवड करतांना निवड प्रक्रिया हि अधिकाधिक पारदर्शक करून उच्चतम व्यावसायिक पात्रतेच्या व्यक्ती स्पर्धात्मक पद्धतीने निवड करावयास हवी परंतु तशी कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. उदा. 2012-13 मध्ये वकील श्री. संजय वि ससाणे व श्री. अनिकेत उ. निकम यांची पॅनलवर वकील म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर वकीलांची पॅनलवर नेमणूक करतांना वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. पॅनलवर नेमणूकीकरीता अर्ज सादर केलेला नस्तीत दिसून आलेला नाही. किंवा नेमणूकी करीता मुलाकत घेतलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक पद्धतीचा अवलंब केलेला आढळून आलेला नाही.

2) वकीलांना प्रदान करण्यात आलेल्या खालील फीच्या देयकांच्या संबधित केसची न्यायालयीन दावे नोंदवहीत नोंदी घेतलेल्या नाहीत. उदा.

| अ.क्र. | वकीलाचे नाव | प्रमाणक क्र. व दिनांक | प्रदान केलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | श्री. एस.एम.कांबळे | 923 दि.01/06/12 | 372379 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | श्री. एस.एम.कांबळे | 3363 दि.04/12/12 | 110000 |
| 3 | श्री. एस.एम.कांबळे | 3449 दि.10/12/12 | 94035 |
| 4 | श्री. एस.एम.कांबळे | 3453 दि.10/12/12 | 82972 |
| 5 | श्री. आर एस.देसाई | 3362 दि.04/12/12 | 162000 |
| 6 | श्री. आर एस.देसाई | 3451 दि.10/12/12 | 180000 |
| 7 | श्रीमती सोनिया मिस्कीन | 3450 दि.10/12/12 | 66000 |
| 8 | श्री. अशोक कदम | 3361 दि.04/12/12 | 51300 |
| 9 | श्री. विजय पाटील | 3452 दि.10/12/12 | 35000 |
| 10 | श्री. विजय पाटील | 4233 दि.30/01/13 | 67500 |
| 11 | श्री अनिकेत निकम | 3646 दि.20/12/12 | 25000 |
| 12 | श्री किशोर हेमरजानी | 1042 दि.11/06/12 | 26010 |
| 13 | श्री किशोर हेमरजानी | 3454 दि.10/12/12 | 27720 |
| एकूण | | | 1299916 |

3) विधी विभागात वकीलांच्या फी प्रदाना बाबत तरतूद नोंदवही व देयक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4) वकिलांना महाराष्ट्र लॉ ऑफीसर्स नियमानुसार महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय दि. 16/01/2008 नुसार निश्चित दर ठरवून देण्यात आले आहेत त्या नुसार वकिलांना फी प्रदान होणे आवश्यक आहे. 2012-13 आर्थिक वर्षामध्ये रु.1542943/- इतका वकील फी चा खर्च झालेला आहे. महानगरपालिकेने वकीलांची फी प्रदान करतांना महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय दि.16/01/2008 मधिल वकील फी पत्रक अ,ब,क,ड,इ व फ प्रमाणे करणे आवश्यक आहे.तथापि त्यानुसार वकील फी प्रदान करतांना कार्यवाही केलेले नाही. तसेच वकील फी प्रदानाबाबत महानगरपालिकेचे निश्चित असे धोरण किंवा नियम तयार केलेले नाहीत.

5) वकीलांची फी प्रदान करतांना संदर्भित केसच्या न्यायालयीन निकालाच्या प्रमाणित प्रती केसमध्ये आढळून आलेल्या नाहीत. वरील बाबी विचारात घेता सदर प्रकरणी झालेला खर्च रु.1542943/- हा आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

TRTARCM6001 (Ref No : 2, Hmm No : 20)

## *96 प्रभाग कार्यालय क्र.1 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**महानगरपालिका फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :502-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्रभाग कार्यालय क्र.1 मध्ये पावती पुस्तकांचा हिशेब ठेवलेला नाही. प्रभाग कार्यालयाने 2012-13 मध्ये एकूण 68 अनधिकृत बांधकामे निष्कासित केलेली आहेत. व त्याकरीता एकूण रु.11,87,865/- एवढा खर्च महानगरपालिकेकडून करण्यात आलेला आहे. परंतू सदरहू खर्च संबधितांकडून वसूल करण्यात आलेला नाही. पदपथावरील फेरीवाल्यांवर कारवाई अनुसरण्यात येते. तथापि कारवाईत जप्त केलेल्या मालाची नोंदवही प्रभाग कार्यालय स्तरावर ठेवण्यात आलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.1 कार्यालयातील निष्कासन केलेल्या बांधकामाची व पावती पुस्तकांचा साठा नोंदवही तसेच विवाह नोंदणीच्या जमा रक्कमा यांचे अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

1) प्रभागाकडून विवाह नोंदणी शुल्क,पदपथ दंड,दुरुस्ती परवानगी शुल्क इ. बाबत रक्कम जमा केली जाते. वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये सदर रक्कम जमा करण्याकरीता वापरलेल्या पावती पुस्तकांची साठा नोंदवही प्रभागाने न ठेवल्याने प्रत्यक्षात किती साठा पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग समिती कार्यालयास प्राप्त् झाली होती. किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 267 व 478 अन्वये पदनिर्देशित अधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय केलेले बांधकाम अनधिकृत असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही वेळी लेखी नोटीशीद्वारे अशा रीतीने हे काम काढून टाकण्यास फर्मावता येईल. अशा लेखी नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत संबंधिताने बांधकाम काढून टाकले नसतील तर पदनिर्देशित अधिका-यास असे बांधकाम काढून टाकता येईल आणि त्याचा खर्च यथास्थिती अशा व्यक्तिस दयावा लागेल. अशी तरतूद आहे.

उमपा प्रभाग समिती क्र. 1 अंतर्गत 2012-13 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 68 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. परंतू त्याकरीता आलेल्या रु.11,87,865/- खर्चाची परिगणना करण्यात आलेली नाही. तसेच उपरोक्त नियमान्वये संबंधिताकडून सदर रु.11,87,865/- खर्चाची मागणी व वसूली करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे या वित्तीय वर्षाच्या अगोदरच्या कालावधीतील सुध्दा अनधिकृत बांधकाम निष्कासन खर्चाची परीगणना व मागणी व वसूली संबंधित व्यक्तिकडून करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

3) महाराष्ट नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 7 मधील नियम 75 ते 78 अन्वये नगरपालिकेला प्राप्त् झालेली सर्व रकमेची तीन प्रतीमधील पूर्वीच क्रमांक घालून देण्यात आलेल्या पावतीने पोच देण्यात येईल. यामधील मुळ पावती अदात्याला देण्यात येईल आणि नक्कल प्रत पावती पुस्तकामध्ये

ठेवण्यात येईल आणि तिसरी प्रत संबंधित विभागाला पाठविण्यात येईल. असे नमूद आहे. उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र.4 मधील पावती पुस्तके तपासली असता उपरोक्त नियमाप्रमाणे पावती पुस्तकातील पावत्यांवर पुस्तक क्रमांक हस्तलिखित करून नोंदवले जातात त्याचप्रमाणे पावती पुस्तकांत फक्त् दोनच प्रती असून अदात्याला त्यामधील नक्कल प्रत देण्यात आल्या असून मुळ प्रती पावती पुस्तकात ठेवण्यात आलेल्या आहेत.

4) प्रभाग समिती कार्यालय क्र.1 अंतर्गत जमा केलेली पदपथ दंड, विवाह नोंदणी शुल्क, दुरूस्ती परवानगी शुल्क, वृक्ष तोडणे परवानगी शुल्क व अनधिकृत बांधकाम निष्कासन खर्च वसुली परिगणना इ.बाबत उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव, महानगरपालिका आयुक्त यांचे परिपत्रकाची किंवा उपविधीची प्रत लेखापरीक्षणाकरीता मागणी करुनही उपलब्ध न झाल्याने प्रभाग समितीमार्फत संबंधिताकडून स्विकारलेली/आकारलेली रक्कम योग्य असल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही.

5) प्रभाग समिती क्र. 1 यांचेमार्फत पदपथावरील फेरीवाल्यांवर कारवाई अनुसरण्यात येते. अशावेळी जप्त् केलेल्या मालाची नोंदवही प्रभाग कार्यालय स्तरावर ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे पदपथ् कारवाईत जप्त केलेल्या मालाचा तपशिल, दंड भरून सोडविलेल्या मालाचा तपशिल, आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम व जप्त् केलेला माल न सोडविल्यामुळे शिल्लक असलेल्या साठा इ.बाबतच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करता आले नाही.

त्याचप्रमाणे पदपथावरील फेरीवाल्यांवर केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने जप्त् केलेल्या मालावरील दंडाची रक्कम किती आकारणी करावी याबाबत उल्हासनगर मनपाचे स्थायी समिती ठराव/ उपविधी/ परीपत्रक लेखापरीक्षणाकरीता मागणी करुनही उपलब्ध न झाल्याने संबंधित फेरीवाल्याकडून स्विकारलेली रक्कम योग्य असलेबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही. वरील बाबत प्रभागास अर्ध समास क्र.18 दि. 8/04/2015 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे तथापि प्रभागाकडून उत्तर प्राप्त नाही.

TRTARCM6001 (Ref No : 3, Hmm No : 18)

## *97 प्रभाग कार्यालय क्र.4 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***जमा रकमाकरीता वापरलेली पावती पुस्तके यांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.*** |

***अनधिकृत बांधकामे निष्कासनाकरीता झालेल्या खर्चाची परिगणना करून संबंधिताकडून वसूली करण्यात आलेली नाही. जप्त केलेल्या मालाची नोंदवही प्रभाग कार्यालय स्तरावर ठेवण्यात आलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.4 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

1) वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये जमा झालेल्या रकमेकरीता वापरलेल्या पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती साठा पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

2) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 267 व 478 अन्वये पदनिर्देशित अधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय केलेले बांधकाम अनधिकृत असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही वेळी लेखी नोटीशीद्वारे अशा रीतीने हे काम काढून टाकण्यास, पाडून टाकण्यास फर्मावता येईल. अशा लेखी नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत संबंधिताने बांधकाम काढून टाकले नसतील तर पदनिर्देशित अधिका-यास असे बांधकाम काढून टाकता येईल आणि त्याचा खर्च यथास्थिती अशा व्यक्तिस दयावा लागेल. असे नमूद आहे.

प्रभाग समिती क्र. 4 अंतर्गत 2012-13 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 74 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता झालेल्या खर्चाची परिगणना प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. तसेच सदर खर्चाची मागणी देखील संबंधिताकडून करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे 2012-13 वर्षाच्या अगोदर कालावधीतील सुध्दा अनधिकृत बांधकाम निष्कासन खर्चाची परिगणना व वसूली संबंधित व्यक्तिकडून करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे. अनधिकृत निष्कासनाची नोंदवही अपुर्ण असल्याने निष्कासनाकरीता झालेल्या खर्चाची वसुलपात्र रक्कम समजू शकली नाही.

3) पावती पुस्तक क्र.878 मधील पावती क्र.087754 ते 087760, 087762, 087779 ते 087789, 087793 ते 087800 लेखापरीक्षणास उपलबध झाल्या नसल्याने त्या पावत्यांद्वारे जमा केलेल्या रकमांची सत्यता पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 7 च्या नियम 75 ते 78 अन्वये नगरपालिकेला प्राप्त झालेली सर्व रकमेची तीन प्रतीमधील पूर्वीच क्रमांक घालून देण्यात आलेल्या पावतीने पोच देण्यात येईल. यामधील मुळ पावती अदात्याला देण्यात येईल आणि नक्कल प्रत पावती पुस्तकामध्ये ठेवण्यात येईल आणि तिसरी प्रत संबंधित विभागाला पाठविण्यात येईल. असे नमूद आहे.

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र.4 मधील पावती पुस्तके तपासली असता उपरोक्त नियमाप्रमाणे पावती पुस्तकातील पावत्यांवर पावती क्रमांक हस्त लिखीत करून टाकले जातात. त्याचप्रमाणे पावती पुस्तकांत फक्त दोनच प्रती असून त्यामधील नक्कल प्रत अदात्याला देण्यात येते व मुळ प्रत पावती पुस्तकात ठेवण्यात आलेली आहे.

5) प्रभाग समिती कार्यालय क्र.4 अंतर्गत जमा होणारी पदपथ दंड, विवाह नोंदणी शुल्क, दुरूस्ती परवानगी शुल्क, वृक्ष तोडणे परवानगी शुल्क व अनधिकृत बांधकाम निष्कासण खर्च वसुली परिगणना इ.बाबत उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव, उमपा आयुक्त यांचे परिपत्रकाची किंवा उपविधीची प्रत

लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने प्रभाग समितीमार्फत संबंधिताकडून आकारलेली रक्कम योग्य असल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही.

6) प्रभाग समिती क्र. 4 यांचेमार्फत पदपथावरील फेरीवाल्यांवर कारवाई अनुसरण्यात येते. कारवाईत जप्त केलेल्या मालाची नोंदवही किंवा इतर तत्सम अभिलेख प्रभाग कार्यालय स्तरावर ठेवणे आवश्यक असतांना कोणताही लिखीत स्वरुपात अभिलेख ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे पदपथ कारवाईत जप्त केलेल्या मालाचा तपशिल, दंड भरून सोडविलेल्या मालाचा तपशिल, आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम व जप्त केलेला माल न सोडविल्यामुळे शिल्लक असलेला साठा इ.बाबतच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करता आले नाही.

त्याचप्रमाणे पदपथावरील फेरीवाल्यांवर केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने जप्त केलेल्या मालावरील दंडाची रक्कम किती आकारली याबाबत उल्हासनगर मनपाचे स्थायी समिती ठराव/ उपविधी/ परिपत्रक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने संबंधित फेरीवाल्याकडून स्विकारलेली रक्कम योग्य असलेबाबत पडताळणी करता आलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.19 दि.08/04/2015 अन्वये निर्गमित केले असून अनुपालन प्राप्त झाले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 17, Hmm No : 19)

## *98 प्रभाग समिती क्र.3 मधील अंतर्गत वसुलीच्या पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :502-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8624.00/-

***प्रभाग क्र.3 मध्ये विवाह नोंदणी फी वसूल केली आहे. परंतु रकमा विलंबाने भरणा केल्या आहेत. इतर पावती पुस्तके तपासणी साठी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग-3 अंतर्गत विवाह नोंदणी दाखला, माहिति अधिकाराच्या प्रती या बाबींच्या संदर्भात 2012-13 वर्षामध्ये रु.8624 फी वसूल केली आहे. सदर वसुलीचे लेखे तपासणी केले असता अर्धसमास क्र. 76 दि. 30/06/2015 अन्वये खुलासा मागविला असून त्याचे अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1.विवाह नोंदणी फी ची वसुलीची नोंदवही तपासली असता 2012-13 मध्ये खालीलप्रमाणे रकमांची वसुली नोंदविण्यात आली आहे. परंतु वसूल रकमांच्या पावत्या/पावती पुस्तके लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात

आलेली नाही. त्यामुळे वसूल रकमांच्या अचूकतेची खात्री करता आली नाही.

| पावती पुस्तक क्र. | पावती क्र. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 743 | 74233 | 03/04/2012 | 110 |
| 743 | 74234 ते 74243 | 03/05/2012 | 2576 |
| 719 | 091648 ते 091648 | 03/07/2012 | 1222 |
| 719 | 091648 | 22/10/2012 | 2742 |
| | | एकूण | 8624 |

2.उपरोक्त वसूल रकमांच्या पावत्यांच्या नोंदींची तपासणी केली असता पावतीपुस्तक क्र.743 मधील पावती क्र.74244 ते 74300 अश्या एकूण 57 पावत्या असून त्यांच्या वापर झाल्याची नोंद नाही. तसेच त्यानंतर दुसरे पावती पुस्तक वापरले आले. तसेच पावती क्र. 74244 ते 74300 या कोऱ्या पावत्या साठ्यामध्ये देखील नाहीत त्यामुळे सदर पावत्याद्वारे वसुली झाली किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

3. वसूल रकमांच्या पावत्यान्वये जमा करण्यात आलेल्या रकमांचे अवलोकन केले असता संपूर्ण वर्षामध्ये फक्त पाच दिवसच वसुली नोंदविण्यात आली आहे. म्हणजेच वसूल रकमा वेळीच महानगरपालिका निधीत भरणा न करता दि.3/5/2012 रोजी 10 पावत्या रु.2576 दि. 7/3/2012 रोजी 11 पावत्या रु.1222 दि. 22/10/2012 रोजी 25 पावत्या रु. 2742 व दि. 27/2/2013 रोजी 16 पावत्या रु. 1974 अशा एकत्रित नोंदवून रकमा विलंबाने भरणा केला आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 8624/-

DATRVVM5901 (Ref No : 77, Hmm No : 76)

## *99 शासनाची मंजुरी न घेता महानगरपालिका सदस्यांना वाढीव बैठक भत्ता प्रदान केल्याने झालेली अनियमितता*

**महानगरपालिका फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :192-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 48700.00/-

***शासन मंजुरी न घेता महानगरपालिका सदस्यांना बैठक भत्ता रु. 100/- प्रति बैठक वरून रु. 200/-(कमाल मर्यादा रु.400/ वरून रु.800/-) प्रमाणे माहे डिसेंबर-2012 पासून वाढ केला असून त्या प्रमाणे एकूण रु.97400/- प्रदान केलेले आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दिनांक 24 जानेवारी 2005 अन्वये उल्हासनगर महानगरपालिका सदस्यांना रु.100/- प्रति बैठक भत्ता (कमाल***

***मर्यादा रु.400/-दर महा) देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्याचे पालन झालेले नाही.***

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दिनांक 24 जानेवारी 2005 अन्वये महानगरपालिका सदस्यांना रु.100/- प्रति बैठक भत्ता (कमाल मर्यादा रु.400/-दर महा) देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. महानगरपालिका सदस्यांची मानधन व दैनिक भत्ता देयके तपासली असता माहे डिसेंबर – 2012 पासून महानगरपालिका सदस्यांना रु.100 ऐवजी रु.200/- प्रति बैठक भत्ता ( कमाल मर्यादा रु.800/- दरमहा) प्रदान केलेला आहे. माहे डिसेंबर–2012 ते मार्च-2013 पर्यंत एकूण रु. 97400/- बैठक भत्ता महानगरपालिका सदस्यांना प्रति बैठक रु.200/- प्रमाणे प्रदान केलेला आहे. सदरहू वाढीव बैठक भत्त्याचे प्रदाना बाबत अर्धसमास पत्र क्र.7 दि .23/03/2015 अन्वये खुलासा करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. नगरसचिव विभागाने त्यांचे पत्र क्र.उमपा/स.का./ 268/2015 दि. 23/03/2015 अन्वये केलेले अनुपालन विचारात घेता 2012-13 च्या मूळ अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.4 दि.29/05/2012 रोजी बैठकभत्ता 100/-ऐवजी रु.200/-करणे बाबत शासनाच्या मंजुरीस अधिन राहून शिफारस करण्यात आली असून त्या प्रमाणे वाढीव भत्ता रक्कम प्रदान केली आहे. तथापि अद्याप पर्यंत वाढीव बैठक भत्त्यास शासन मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दिनांक 24 जानेवारी 2005 चे पालन झालेले नाही. विभागाने केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने महापालिका सदस्यांचे बैठक भत्यावर केलेला खर्च रक्कम रु.48700/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

TRTARCM6001 (Ref No : 4, Hmm No : 07)

## *100 मे.रिको इंडिया लि.कंपनी कडून केलेल्या गेस्टेटनर कॉपी प्रिन्टर खरेदीतील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :192-2110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 496860.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25000.00/-

***महानगरपालिकेतील सचिव कार्यालयाकरिता 2011-12 मध्ये मे. रिको इंडिया लि.कंपनीकडून गेस्टेटनर कॉपी प्रिन्टर खरेदी करण्यात आलेले आहे. दि. 11/11/2010 च्या टिपणी अन्वये जुने मशिनचा लिलाव करून किंवा मोडीत काढून नविन प्रिन्टर खरेदी करणेबाबत मंजूरी आदेश आहेत तथापि पुरवठादारास देयक प्रदान करताना***

***जुने मशिनची किमत रु.25000/-(कंपनीने ठरवलेली) वजा करण्यात आलेली नाही. तसेच जुन्या मशिनचा लिलाव देखील केलेला नाही.***

महानगरपालिकेतील सचिव कार्यालयाकरिता 2011-12 मध्ये मे. रिको इंडिया लि.कंपनीकडून गेस्टेटनर कॉपी प्रिंन्टर खरेदी करण्यात आलेले आहे. व सदरहू खरेदीचे रु.496860/-चे प्रदान 2012-13 मध्ये प्रमाणक क्रमांक 703 दिनांक 21/05/2012 अन्वये करण्यात आलेले आहे. सदरहू खरेदीतील अनियमितते बाबत अर्ध समास पत्र क्र. 93 दिनांक 14/07/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. विभागाने पत्र क्र. 82 दिनांक 17/07/2015 नुसार खुलासा सादर केलेला आहे. विभागाने केलेला खुलासा समाधानकारक नाही त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)प्रिंन्टर खरेदीकरिता निविदा जाहिरात काढण्यात आलेली नसून मे. रिको इंडिया लि. (उत्पादक कंपनी) यापूर्वी खरेदी केलेल्या कंपनीकडून दरपत्रके मागवून खरेदी केलेली आहे. त्यामुळे उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस-2002 उद्योग-6 दिनांक 4/02/2003 नुसार शासकीय विभाग/निमशासकीय विभाग/मंडळे/शासकीय उपक्रम/ महानगरपालिका इ. ना वस्तू खरेदी साठी शासनाने दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी कार्यपद्धती विहित केलेली आहे. परंतु सदर कार्यपद्धतीचा अवलंब महानगरपालिकेने प्रिंटर खरेदी करताना केलेंला नाही.

2)शासन निर्णय 02/01/1992 मधील तरतूद व उद्योग संचालनालय मंत्रालय मुंबई यांचे कडील परिपत्रक क्र.उस/शा.निम.शा.वख./परिपत्रक/2009/बी-15279 दि. 03/06/2009 मधील तरतुदी नुसार एकूण वार्षिक खरेदी रु.50000/-किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी निविदा चौकशी राजपत्रात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे तथापि अशी कार्यवाही सदरहू खरेदी प्रक्रियेत करण्यात आलेली नाही.

3) प्रिंटर, खरेदी बाबत राज्य शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दरकरार पत्रक अथवा केंद्र शासनाचे दर करार पत्रकान्वये खरेदी प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे तथापि त्याबाबत अंमलबजावणी केलेली नाही. तसेच शासनाचा दरकरार असतांना प्रिंटर खरेदी दर करारानुसार केली नाही.

4) दि.11/11/2010 च्या टिपणी अन्वये जुने मशिनचा लिलाव करून किंवा मोडीत काढून नविन प्रिंन्टर खरेदी करणेबाबतचे मंजूर आदेश आहेत तथापि पुरवठादारास देयक प्रदान करताना जुने मशिनची किमत रु.25000/- वजा करण्यात आलेली नाही. किंवा जुन्या मशिनचा लिलाव केल्या बाबतचा उल्लेख केलेला नाही.

5) पुरवठादार मे.रिको इंडिया लि.कंपनी बरोबर केलेला खरेदी व देखभालीबाबतचा करारनामा लेखा परीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

6) पुरवठादारास जकातकराची रक्कम 4% प्रमाणे रु.19110/- प्रदान केलेले आहेत. परंतु पुरवठादाराने जकात कर भरल्याच्या पावत्या देयकासोबत नस्तीत आढळून आलेल्या नाहीत.

7) पुरवठा आदेशात मालाचा पुरवठा किती कालावधीत करावा याबाबत उल्लेख नाही. पुरवठा आदेश दि.23/11/2011 चे आहेत व माल दि.24/02/2012 रोजी प्राप्त झालेला आहे. तसेच पुरवठा केलेल्या प्रिंटरची नोंद जडसंग्रह नोंदवहीत घेतलेली दिसून आली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 496860/-

वसूलपात्र रु. 25000/-

TRTARCM6001 (Ref No : 52, Hmm No : 93)

## ***101 मालमत्ता विभागाने मार्केट मधील गाळ्याच्या भाड्याच्या रकमा विलंबाने केल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :450-1910 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 50850.00/-

***मालमत्ता विभागाने मार्केट मधील गाळ्याच्या भाडे जमा केले असून ते रोजच्या रोज किंवा दुसऱ्यादिवशी मनपा कोषागारात जमा करणे आवश्यक आहे. परंतु प्राप्त झालेल्या रकमा 2 ते 530 दिवस विलंबाने भरणा केला आहे. त्यामुळे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम क्रमांक 32 चे पालन केलेले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिके कडील मालमत्ता विभागा कडील 2012-13 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात मार्केट गाळे भाड्याने दिलेले आहेत. त्याची जमा झालेल्या रुपये 52500/- रकमांच्या वसुलीच्या पावत्यांची तपासणी केली असता वसूल करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेच्या खात्यामध्ये विलंबाने भरणा करण्यात आली आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8 दि 23/03/2015 अन्वये खुलासा मागविला असता विभागाचे दिनांक 23/3/2015 रोजीचे अनुपालन विचारात घेता खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक व दिनांक | पावत्यांची रक्कम रु. | विलंब कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | 45122 ते 45123 दि.22/3/12 | 150 x 2= 300 | 79 दिवस |
| 2 | 45124 दि.28/3/12 दि 28/3/12 | 150 x 1 =150 | 77 दिवस |
| 3 | 45126 ते 45130 दि.11/6/12 | 150 x 5 =750 | 72 दिवस |
| 4 | 45131 ते 45142 दि,20/4/12 | 150x 12 =1800 | 50 दिवस |
| 5 | 45143 ते 45152 दि,23/4/12 | 150x 10 =1500 | 47 दिवस |
| 6 | 45153 ते 45159 दि,24/4/12 | 150 x 7=1050 | 46 दिवस |
| 7 | 45160 ते 45164 दि,27/4/12 | 150 x 5 =750 | 43 दिवस |
| 8 | 45165 ते 45166 दि,30/4/12 | 150 x 2 =300 | 39 दिवस |
| 9 | 45167ते 45169 दि,2/5/12 | 150 x 3 =450 | 37 दिवस |
| 10 | 45170 ते 45171 दि,4/5/12 | 150 x 2=300 | 36 दिवस |
| 11 | 45172 ते 45176 दि, 7/5/12 | 150 x 5 =750 | 33 दिवस |
| 12 | 45177 दि,9/5/12 | 150 x 1 =150 | 31 दिवस |
| 13 | 45178 ते 45179 दि,14/5/12 | 150 x 2 =300 | 26 दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | 45180ते 45181 दि,18/5/12 | 150 x 2 =300 | 22 दिवस |
| 15 | 45182 ते 45184 दि,19/5/12 | 150 x 3 =450 | 21 दिवस |
| 16 | 45185 ते 45188 दि,21/5/12 | 150 x 4 =600 | 19 दिवस |
| 17 | 45189 ते 45193 दि,7/5/12 | 150 x 5 =750 | 18 दिवस |
| 18 | 45194 दि,24/5/12 | 150 x 1 =150 | 16 दिवस |
| 19 | 45195 ते 45196 दि,28/5/12 | 150 x 2 =300 | 12 दिवस |
| 20 | 45197 ते 45200 दि,30/5/12 | 150 x 4 =600 | 10 दिवस |
| 21 | 136501 ते 136520 दि.22/2/12 | 150x 20 =3000 | 530 दिवस |
| 22 | 136521 ते 136522 दि. 23/2/12 | 150 x 2 =300 | 529 दिवस |
| 23 | 136523 ते 136540 दि.25/2/12 | 150x 18 =2700 | 526 दिवस |
| 24 | 106541 ते 106543 दि.1/3/13 | 150 x 3=450 | 523 दिवस |
| 25 | 136201 ते 136215 दि,20/11/12 | 150x 15 =2250 | 259 दिवस |
| 26 | 136216 ते 136226 दि.30/11/12 | 150x 11 =1650 | 249 दिवस |
| 27 | 136227 ते 136254 दि.5/12/12 | 150 x 28=4200 | 41 दिवस |
| 28 | 136255 ते 136266 दि.12/12/12 | 150x 12 =1800 | 12 दिवस |
| 29 | 136267 ते 136283 दि.20/12/12 | 150x 17 =2550 | 5 दिवस |
| 30 | 136301 ते 136308 दि.1/1/13 | 150 x 8=1200 | 5 दिवस |
| 31 | 136309 ते 136327 दि.4/1/13 | 150 x 19=2850 | 2 दिवस |
| 32 | 136368 ते 136382 दि.31/1/13 | 150x 15 =2250 | 10 दिवस |
| 33 | 136401 ते 136418 दि.12/2/13 | 150x 18 =2700 | 7 दिवस |
| 34 | 136701 ते 136732दि.5/7/12 | 150x 32 =4800 | 396 दिवस |
| 35 | 136733 ते 136741 दि.11/7/12 | 150 x 9=1350 | 421 दिवस |
| 36 | 106743 ते 106747 दि.19/7/12 | 150 x 5=750 | 383 दिवस |
| 37 | 106748 दि.12/10/12 | 150 x 1 =150 | 329 दिवस |
| 38 | 106749ते 106759 दि.19/7/12 | 150x 11 =1650 | 382 दिवस |
| 39 | 136419 ते 136434 .21/2/13 | 150x 16 =1800 | 5 दिवस |
| 40 | 136435 ते 136450 दि.28/2/13 | 150x 16 =2400 | 11 दिवस |
| | एकूण रक्कम रुपये | 50850 | |

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम क्रमांक 32 नुसार जमा केलेली रक्कम त्वरीत रोजच्या रोज भरणा करणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे महानगरपालिकेची रक्कम रुपये 50800/- वरीलप्रमाणे लेख्याबाहेर राहिल्यामुळे वित्तिय अनियमितता झाली आहे.

2) पावती पुस्तक क्रमांक 452 मधील पावती क्रमांक 45125 ही पावती रद्द करण्यात आली आहे. परंतु त्या सोबत दुय्यम पावती रद्द करण्यात आलेली नाही.या बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8 दिनांक 25/3/2015 नुसार कळविण्यात आले असता प्राप्त झालेल्या अनुपालना मध्ये सदर पावती संबधित लिपिकाकडून गहाळ झाल्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर पावतीचा दुरुपयोग होण्याची शक्यता

नाकारता येत नाही. त्यामुळे सदर बाब मान्य करता येत नाही.
आक्षेपाधीन रक्कम रुपये 50850/-

DATASMM5901 (Ref No : 11, Hmm No : 08)

## *102 उल्हासनगर मनपा क्षेत्रात सन 2011 या वर्षासाठी श्री. गणेशदर्शन प्रतियोगीता आयोजित करणे कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
गुंतलेली रक्कम रु. 228000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 450000.00/-

***श्री.गणेशदर्शन प्रतियोगिता कार्यक्रमाचे स्वरुपाबाबत कोणतेही धोरण निश्चित करण्यात आलेले नाही. अतिरिक्त खरेदीबाबत निविदा कार्यवाही करण्यात आलेली नाही. अनावश्यक खरेदी करण्यात आली आहे. साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.***

2011 च्या सार्वजनिक गणेशोत्सवात उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सार्व. गणेशोत्सव मंडळांकरीता श्री.गणेशदर्शन प्रतियोगीता महापौर कार्यालयाचे पत्र क्र.1089 दि.22/07/2011 अन्वये क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समितीतर्फे आयोजित करण्यात आली होती. सदर प्रतियोगीतेमध्ये विजेत्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक वितरण करणे करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.6,25,000/- करीता वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात आल्या असल्याचे नस्तीवरून दिसून आले. परंतू वर्तमानपत्राची प्रत लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. निविदा स्विकृती कालावधीत मे.राधा एन्टरप्रायझेज, मे.महेश एन्टरप्रायझेज व मे. मोहीनी एन्टरप्रायझेज या तीन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या असता मे.महेश एन्टरप्रायझेज यांची निविदा लघुत्तम असल्याने प्रथम पुरवठा आदेश क्र.139 दि.29/08/2011 अन्वये 50 नग उत्तेजनार्थ पारीतोषिके रु.3000/-प्रति नग व द्वितीय पुरवठा आदेश क्र.215ए दि.16/12/2011 अन्वये 100 नग रु.3000/- प्रति नग उत्तेजनार्थ पारीतोषिके असे एकूण 150 नग उत्तेजनार्थ पारितोषिके पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले.
प्रमाणक क्रमांक 2340 दि. 20/09/2012 व 5005 दि.25/03/2013
खर्चाची रक्कम रु.215075/- व रु. 78980/-
उत्तेजनार्थ पारीतोषिक खरेदीबाबत स्थायी समिती ठराव क्र.106 दि.12/12/2011
सदर कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.
अर्धसमास ज्ञापन क्र.10 दि. 30/03/2015 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त असून खालील आक्षेप

कायम करण्यात येत आहे.

1) महापौर कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका यांचे पत्र क्र.1089 दि. 22/07/2011 अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समितीतर्फे श्री. गणेशदर्शन प्रतियोगिता आयोजित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यक्रमाचे स्वरुप कसे असावे याबाबत आयोजनाचे व खर्चाचे धोरण निश्चित करून तशा सुचना भांडार विभागास देणे आवश्यक असतांना निश्चित असे कोणतेही धोरण महापौर कार्यालयाकडून ठरविले नाही. अथवा सुचनादेखील भांडार विभागास देण्यात आल्या नसल्याचे दिसून आले आहे.

2) सदर कार्यक्रमाकरीता निविदा प्रक्रिया केली असता कार्यादेश क्र.139 दि.29/08/2011 नुसार 50 नग उत्तेजनार्थ पारितोषिके प्रती नग रु.3000/- प्रमाणे पुरवठा करणेचे आदेश पुरवठादारास देण्यात आले आहेत. परंतू तदनंतर पुन्हा 100 नग अतिरीक्त उत्तेजनार्थ पारितोषिके पुरवठा करणेबाबत आदेश क्र. 215 दि.16/12/2011 अन्वये देण्यात आले. अतिरिक्त 100 नग खरेदीबाबत कोणतीही निविदा कार्यवाही करण्यात आली नसून पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. सदर प्रतियोगिता गणेशोत्सव कालावधीत असल्याने व गणेशोत्सव साधारणत: ऑगस्ट किंवा सप्टेंबर महीन्यात असतांना प्रत्यक्षात सदर खरेदी माहे डिसेंबर 2011 मध्ये केली आहे. त्यामुळे खरेदीबाबत साक्षंकता निर्माण होते.

3) एका उत्तेजनार्थ पारितोषिकाची रक्कम रु.3000/- असून एकूण 150 नगाकरीता रु.450000/- प्रमाणक क्रमांक 2340 दि. 20/09/2012 व 5005 दि.25/03/2013 अन्वये पुरवठादारास प्रदान करण्यात आली आहे. परंतू त्या उत्तेजनार्थ पारितोषिकांचे स्वरुप कसे असावे याबाबत पुरवठादारास कोणतेही निर्देश भांडार विभागाकडून देण्यात आले नाही.

4) मे. महेश एन्टरप्रायझेज यांचे मागणी बिल क्र.53 दि.21/12/2011 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेस वितरीत केलेल्या उत्तेजनार्थ पारितोषिकांचा तपशिल नमूद न करता बिलातील तपशिलाच्या रकान्यात "उत्तेजनार्थ पारितोषिके" असे नमूद करण्यात आले आहे. यामुळे खरेदी केलेल्या मालाचा तपशिल समजून येत नसल्याने प्रत्यक्षात खरेदीची प्रक्रिया झाल्याबाबत साक्षंकता आहे.

5) दोन पुरवठा आदेशान्वये एकूण 150 नग उत्तेजनार्थ पारितोषिके खरेदी करण्यात आली आहेत. यापैकी फक्त 74 उत्तेजनार्थ पारितोषिकांचे वितरण करण्यात आले आहेत. त्यामूळे 76 नग उत्तेजनार्थ पारितोषिके भांडार विभागाकडे शिल्लक असणे आवश्यक आहे. परंतू याबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने त्याची पडताळणी करता आली नाही. उर्वरीत 76 उत्तेजनार्थ पारितोषिकांची अनावश्यक खरेदी केल्यामुळे रक्कम रु.228000/- निधी गुंतून पडला आहे.

6) निवीदा अटी व शर्तीमधील अट क्र.1 (क) नुसार पुरवठादाराने (व्हॅट) मुल्यवर्धित कर नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना सदर प्रमाणपत्र सादर केले नसतांना निविदा अटी व शर्तीचा भंग झालेला आहे.

7) प्रमाणक क्र.2340 दि.20/09/2012 अन्वये रु.215075/- इतकी रक्कम ठेकेदारास अदा करण्यात आली आहे. परंतू याबाबत प्रमाणक, पोच इ. अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 16, Hmm No : 10)

### *103 शासन निर्णयानुसार क्रिडा विभागाकरीता तरतुद व प्रत्यक्ष खर्च न केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय नगर विकास विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. जीएन 1098/ प्र.क्र.21/98/ नवी 24 दि.09/03/1998 अन्वये क्रिडा क्षेत्राकरीता कमी तरतुद व खर्चही कमी करण्यात आलेला आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन झाले नाही.***

नगर विकास विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. जीएन 1098/प्र.क्र.21/98/नवी 24 दि.09/03/1998 नूसार महानगरपालिकेने वार्षिक खर्चापैकी 5 टक्के रक्कम क्रिडा क्षेत्राकरीता खर्च करणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे 2012-13 चे सुधारीत अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्चाची रक्कम तपासली असता शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.
2012-13 करीता आवश्यक तरतुद 5 टक्के रु. 14,85,39,850/-
2012-13 करीता सुधारीत तरतुद रु.25,00,000/-
2012-13 तील प्रत्यक्ष खर्च रु.20,60,000/-
अर्धसमास ज्ञापन क्र.30 दि.23/04/2015 रोजी दिले असून अनुपालन अप्राप्त आहे.त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 19, Hmm No : 30)

### *104 उल्हासनगर मनपातील कर्मचारी/अधिकारी यांचे सेवापुस्तकातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***रजा प्रवासभत्ता अनुज्ञेयसंबंधी अटी व शर्ती व इतर बाबी तपासणीकरीता महासभा/ स्थायी समितीच्या ठरावाची प्रत मागणी करण्यात आली परंतू सदर प्रत लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. महासभा ठरावाच्या***

***दिनांकापासून पदोन्नतीच्या पदाचे वेतन प्रदान केले आहे. त्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासून वेतन प्रदान करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही न केल्याने अतिप्रदान झाले आहे. आगाऊ वेतनवाढीबाबत स्थायी समितीचा मंजूरी ठराव लेखापरीक्षणास प्राप्त झालेला नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिकेतील निवडक कर्मचारी/अधिकारी यांचे सेवापुस्तकांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. टीआरए-1980/सीआर 318/एसईआर 5 दि.09/09/1980 व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. रप्रस-1194/184/सेवा-5 दि.28/03/1995 अन्वये शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना अनुक्रमे स्वग्राम रजा प्रवास सवलत योजना दोन कॅलेंडर वर्षातून एकदा व महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत योजना चार वर्षातून एकदा लागू केली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांना उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे रजा प्रवास सवलत योजना मंजूर करण्यात आली किंवा कसे याबाबत पडताळणी करणेकरीता महासभा/स्थायी समिती ,उल्हासनगर महानगरपालिका व नगरविकास विभाग यांचे अनुक्रमे ठरावाची प्रत व शासन निर्णयाची मागणी केली असता याबाबतचा कोणताही अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झालेला नाही. श्रीमती शुभदा सुनिल पिंपळे, लिपीक/जकात निरीक्षक यांना खालीलप्रमाणे प्रवासभत्यासह अर्जित रजा मंजूर करण्यात आलेली आहे.

दि.22/11/2004 ते दि.25/11/2004,
दि.18/10/2005 ते दि.21/10/2005
दि.13/03/2007 ते दि.17/03/2007

परंतू रजा प्रवास सवलत योजनेबाबत महासभा/स्थायी समितीच्या ठरावाची प्रत किंवा नगरविकास विभागाचा शासन निर्णय इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने रजा प्रवास सवलतीच्या अनुषंगाने केलेल्या प्रदानाबाबत अटी व शर्ती इ.बाबत पडताळणी करता आली नाही.

2) उल्हासनगर महानगरपालिका ठराव क्र.40 दि.20/11/2008 व आयुक्तांचे आदेश क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/294/09दि.03/08/2009 अन्वये श्रीमती पिंपळे यांची जकात निरीक्षक पदावर रु.4000-100-6000 या वेतनश्रेणीत पदोन्नती करण्यात आली आहे. श्रीमती पिंपळे पदोन्नतीच्या पदावर दि.03/08/2009 रोजी प्रत्यक्ष हजर झाल्या आहेत. श्रीमती पिंपळे दि.03/08/2009 रोजी पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष हजर झाल्या असल्याने दि.03/08/2009 रोजी पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चिती करणे क्रमप्राप्त होते. परंतू ठरावाच्या दिनांकापासून पदोन्तीच्या पदाचे वेतन प्रदान केल्याने झालेल्या अतिप्रदानाची परिगणना करून वसुली होणे आवश्यक आहे.

3) उल्हासनगर महानगरपालिका कार्यालयीन आदेश क्र 213 दि.7/10/2010 अन्वये श्रीमती पिंपळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्था यांची एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण केल्याने दि.16/06/2010 रोजी दोन वेतनवाढी देण्यात आल्या आहेत. परंतू याबाबत स्थायी समितीचा ठराव लेखापरीक्षणास प्राप्त झालेला नाही.

4) श्रीमती पिंपळे यांना दि.01/07/2008 रोजी वार्षिक वेतनवाढ निश्चित करतांना 3% वेतनवाढ रु.250.05 असल्याने रु.250/- इतक्या रकमेची वेतनवाढ देणे आवश्यक असतांना रु.260/-इतकी वेतनवाढ दिल्याने अतिप्रदान झाले आहे. त्याची वसुली होणे आवश्यक आहे.

5) श्री.संतोष लोणे, कनि. अभियंता/ प्रोग्रामर यांना एल.जी.एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दि.15/05/2008 रोजी एक वेतनवाढ दिल्याचे दिसून येते. याबाबत स्थायी समिती मंजूरी ठरावाची प्रत लेखापरीक्षणास प्राप्त झालेली नाही.

6) श्री.जितेंद्र एस.चोईथानी, कनिष्ठ अभियंता यांची कार्यालयीन आदेश क्र.उमपा/ साप्रवि /आस्था /टे-1/46 दि.13/12/1996 अन्वये 1400-40-1800 दरो 50-2300 या वेतनश्रेणीत दि.02/11/1996 रोजी नियुक्ती देण्यात आली आहे. पुढील नियमित वार्षिक वेतनवाढ निश्चिती खालीलप्रमाणे चुकीची करण्यात आली आहे.

| दिनांक | देय वेतनवाढ | दिलेली वेतनवाढ |
|---|---|---|
| 02/11/1996 | रु.1400 | रु.1400 |
| 01/11/1997 | रु.1440 | रु.1450 |
| 01/11/1998 | रु.1480 | रु.1500 |
| 01/11/1999 | रु.1520 | रु.1550 |

उपरोक्तप्रमाणे चुकीच्या वेतनवाढीत दुरूस्ती करून झालेल्या अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

7) श्री.अशोक तुलसीराम इंगळे, मजूर यांची दि.01/01/2006 रोजीची वेतननिश्चिती रु.5730/- अधिक ग्रेड पे रु.1300/-करण्यात आली असून दि.01/07/2006 रोजी प्रथम वेतनवाढ रु.210/- इतकी देय असतांना रु.220/- इतकी प्रदान करण्यात आली आहे. अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

8) श्रीमती माया सुर्यवंशी, मजूर यांना दि.18/04/2012 रोजी आश्वासित प्रगती योजनेंतर्गत विकल्पानूसार वेतननिश्चिती रु.6590/- अधिक रु.1600/- अशी करण्यात आली असून पुढील वेतनवाढ वित्त विभाग, अधिसुचना क्र.आरपीएस/1209/सीआर 27/एसईआर 9 दि.22 एप्रिल 2009 मधील 13(ब) (2) नूसार लगतच्या जुलै महिन्यात न देता पुढील वर्षाच्या जुलै महिन्यात देणे आवश्यक असतांना म्हणजेच दि.01/07/2012 रोजी न देता दि.01/07/2013 रोजी देणे आवश्यक होते. वेतननिश्चितीची योग्य ती दुरूस्ती करून अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

9) वित्त विभाग, अधिसुचना क्र.आरपीएस/1209/सीआर 27/एसईआर 9 दि.22 एप्रिल 2009 मधील 3(10) नूसार श्री.इंगळे व श्रीमती सुर्यवंशी यांना पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन रु.1400 देणे आवश्यक असतांना रु.1600 दिल्याने सुधारीत वेतननिश्चिती करून अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

10) सहाव्या वेतन आयोगानूसार श्री.गणेश शिंपी, लघुलेखक यांचे दि.01/01/2006 रोजीचे वेतन रु.7425/- होते. सदर वेतनावर 1.86 टक्के प्रमाणे रु.13810/- प्रमाणे वेतननिश्चिती करणे आवश्यक असतांना रु.13820/- केल्याने चुकीची वेतन निश्चिती झाली आहे. योग्य ती दुरुस्ती करून अतिप्रदानाची वसूली होणे आवश्यक आहे.

11) उल्हासनगर मनपा आदेश क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/256/2007 दि10/05/2007 अन्वये श्री. गणेश शिंपी यांना दि.21/04/2007 पासून एक आगाऊ वेतनवाढ देय असतांना दि.28/04/2006 पासून वेतनवाढ दिल्याने वेतननिश्चितीमध्ये सुधारणा करुन अतिप्रदानाची वसूली होणे आवश्यक आहे.

12) उल्हासनगर मनपा आदेश क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/01/11 दि. 28/07/2011 नूसार श्री.गणेश शिंपी, लघुलेखक यांना एकाच पदावर दि.30/09/2010 रोजी 12 वर्षे पुर्ण झाल्यामूळे त्यांच्या प्राप्त विकल्पानूसार दि.01/01/2011 पासून वेतननिश्चिती करण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगानूसार आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत वरीष्ठ पदाचे वेतननिश्चितीकरीता विकल्प बारा वर्षे जेंव्हा पुर्ण होतात

त्या दिनांकास किंवा पुढील नियमित वेतनवाढीच्या दिनांकास देणे आवश्यक होते. दि.01/01/2011 रोजी वेतननिश्चिती करतांना दोन वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले आहे. अतिप्रदानाची परिगणना करून वसुली होणे आवश्यक आहे.

13) श्री.गणेश शिंपी, लघुलेखक यांच्या संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याची त्याचप्रमाणे दि.01/01/2011 पासूनच्या रजा लेख्याची नोंद सेवापुस्तकात नोंदविण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही. अर्धसमास क्र.22 दि.13/4/2015 रोजी दिले असता आक्षेपानूसार योग्य ती दुरूस्ती करून कार्यवाही करण्यात येईल असे अनुपालनात नमूद असल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 18, Hmm No : 22)

## *105 नेताजी चौक येथिल फायर स्टेशन बांधण्याचे काम विभागणी करून दोन मजूर सहकारी संस्था कडून करून घेतल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :811-2110 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2092599.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 82394.00/-

***नेताजी चौक येथील फायर स्टेशन बांधण्याचे काम हे विभागणी करून मे. विश्वनाथ मजूर कामगार सहकारी संस्था व मे. धनलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था या दोन मजूर सहकारी संस्थाकडून करून घेतले आहे.***

2012-13 मध्ये फायर स्टेशन बांधणे करिता महानगरपालिकेने प्रमाणक क्र.4613 दि.26/02/2013 अन्वये रु.996500/- मे. विश्वनाथ मजूर कामगार सहकारी संस्था व प्रमाणक क्र.3418 दि.05/12/2012 अन्वये रु.1096099/- मे. धनलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था यांना प्रदान केलेले आहेत. खालील अनियमितते बाबत विभागास अर्धसमास क्र. 71 दिनांक 25/06/2015 अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नेताजी चौक येथिल फायर स्टेशन बांधण्याचे काम मे. विश्वनाथ मजूर कामगार सहकारी संस्था व मे. धनलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था या दोन मजूर सहकारी संस्थांना विभागून देण्यात आलेले आहे. का.आ.क्र.UMC/PWD/EE/89 दि. 06/02/2013 व का.आ.क्र. UMC/PWD/EE/54 दि. 20/11/ 2012 अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-07/96/प्र.क्र 94 इमा-2दिनांक 16/11/2006 नुसार रुपये 15 लक्ष पर्यंतची बांधकामे मजूर सहकारी संस्थाकडून करता येतील असे नमूद आहे.सदर कामाची निविदेची रक्कम ही रु 2092599/-एवढी आहे त्यामुळे सदरहू काम हे विभागून दिलेले आहे. त्यामुळे शासन निर्णयाच्या तरतुदीचे पालन झालेले नाही.

2) प्रमाणक क्र.4613 मधील देयकातील बाब क्र.14 रु.128148/- ही प्राकलनात समाविष्ट नसलेली बाब आहे. (P/A plastic allumsion paint of aap.color Quantity - 823.95 Rate 155.53 =128148)
3) अग्निशमन विभागाचा फायर स्टेशन बांधकाम करणे बाबतचा प्रस्ताव/मागणीपत्र नस्तीत समाविष्ट नाही. तसेच फायर स्टेशन बांधकाम पूर्ण झालेनंतर अग्निशमन अधिकारी यांनी विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे काम झाले आहे याबाबत फायर विभागाचे अभिप्राय व खात्री बाबतचे दस्तऐवज नस्तीत दिसून आलेले नाही.
4) बांधकाम केलेली फायर स्टेशनची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याची नोंद नस्तीत दिसून आलेली नाही. तसेच काम पूर्ण झालेल्या फायर स्टेशनचे महानगरपालिकेच्या नावे मालमत्तेत नोंद झाल्या बाबतचे अभिलेख नस्तीत आढळून आलेले नाहीत.
5) का.आ.क्र. UMC/PWD/EE 54 दि. 20/11/2012 अन्वये मे. धनलक्ष्मी मजूर कामगार सहकरी संस्था यांना कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि सदर संस्थेस काम देण्यास जिल्हा निंबंधक ठाणे यांची मंजुरी घेण्यात आलेली नाही. तरी सदर बाब ही नियमबाह्य आहे.
6) प्रमाणक क्र.4613 मधील देयकातील बाब क्र.14 (P/A plastic allumsion paint of aap.color Quantity - 823.95 Rate 155.53 =128148) चे दर हे रु. 155.53 असे आकारलेले आहेत. तथापि जिल्हा दरसूची 2011-12 मध्ये सदर बाबी करिताम रु. 55.53 असे दर आहेत. त्यामुळे रु.82394/-चे जादा प्रदान ठेकेदारास झालेले आहे. 2011-12 दरसूची नुसार अंदाज पत्रकातील दर आहेत.

